**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

**अर्धा तास चर्चा**

**पृ.शी.**: विडी व्यवसाय मालकाकडून किमान वेतन मिळण्याबाबत

**मु.शी.**: विडी व्यवसाय मालकाकडून किमान वेतन मिळण्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 25762 ला दिनांक 13 एप्रिल 2007 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा

**उपसभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आज एकंदर 10 अर्धा तासाच्या चर्चा आहेत. म्हणून माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, या सर्व अर्धा तासाच्या चर्चा दोन तासामध्ये पूर्ण करावयाच्या आहेत. त्यामुळे आपल्या सहकाऱ्यांची अर्ध्या तासाची चर्चा देखील सदनामध्ये चर्चेसाठी यावी हा विचार डोळयासमोर ठेऊन सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या अर्धा तासाच्या सूचनेसंबंधात भाषण करावे.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय,"विडी व्यवसाय मालकाकडून किमान वेतन मिळण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 25762 ला दिनांक 13 एप्रिल 2007 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, आजही असंघटित क्षेत्रातील अनेक प्रश्न उपेक्षित आहेत. तसेच वर्षानुवर्षा पासून या असंघटित कामगारांसाठी काम करणारे कामगार नेते देखील वयोवृध्द होण्याची वेळ आलेली आहे. विडी कामगारांच्या प्रश्नाच्या बाबतीत अनेक संघटना, अनेक वर्षापासून काम करीत आहेत. सोलापूर सारख्या शहरापासून ते भंडारा, गडचिरोली, नागपूर आणि अगदी मुंबई, पुणे, नाशिक येथे अनेक वर्षापासून विडी वळण्याचा व्यवसाय सुरु आहे. विडीच्या वेस्टनावर सिगरेटच्या पाकिटावर लिहितात, त्याप्रमाणेच छापले जाते की, "ही शरीरासाठी हानीकारक आहे." परंतु तसे ते छापावे लागू नये म्हणून केंद्र शासनाकडे मागणी करण्यात यावी अशी विडी कामगार उत्पादक आणि कामगार संघटनांनी मागणी केली होती. पण ती केंद्र शासनाने मान्य केलेली नाही. अशा परिस्थितीत आपण वर्षानुवर्षापासून या विषयावर सदनामध्ये चर्चा करीत आहोत. विडी कामगारांच्या

. . . .अे-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

आरोग्याचा प्रश्न आहे आणि खास करुन या व्यवसायामध्ये 98 टक्के स्त्री कामगार काम करीत आहेत. या स्त्रियांना प्रसुतीची रजा किंवा त्या कालावधीतील वेतन देखील मिळत नाही. तसेच खरा प्रश्न असा आहे की, या विडी कामगारांना कायद्याच्या चौकटीत कसे संरक्षण मिळेल ? याबाबतीत देशाच्या बाहेर जाऊन जाणून घ्यावयाचे ठरविले तर मध्यंतरी संयुक्त राष्ट्रसंघाचे ॲम्बेसेडर व अभ्यासक शशी थरुर यांनी असे सांगितले की, भारताच्या अनेक वैशिष्ट्यामध्ये विडी हे देखील वैशिष्ट्य आहे आणि पर्यावरणाला धोका निर्माण न होता, अनेक लोकांना रोजगार मिळवून देणारा हा व्यवसाय आहे. सदनामध्ये या विषयाच्या संबंधात चर्चा उपस्थित करता यावी याची आम्ही अनेक वर्षापासून अपेक्षा करीत असतो आणि काल सदनामध्ये यासंबंधात लक्षवेधी सूचना उपस्थित झाली होती. परंतु दुर्दैवाने त्यावेळी काहीही समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. म्हणून विडी कामगारांच्या प्रश्नावर आणि एकंदरीत असंघटित कामगारांच्या प्रश्नाबाबत शासन ज्या उपाययोजना करीत आहे, त्यामधून संबंधितांना संरक्षण मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा आहे की, कामगारांना किमान वेतन न देणाऱ्या कारखानदारांवर किंवा त्याच्या मालकांवर जर कामगारांनी केसेस केल्या तर त्याचा निर्णय येईपर्यंत 8-10 वर्षे लागतात आणि तोपर्यंत कामगार पूर्णत: जेरीस आलेला असतो ही वस्तुस्थिती आहे. आज विडी कारखानदार दुसऱ्या राज्यामध्ये जात आहेत. आज असे घडत आहे की, विडी वळणाऱ्या कामगारांनी तंबाकू,पाने मोजून आणावयाची आणि जणूकाही तेच कारखानदार आहेत असे भासवून स्वत:वर जबाबदारी न घेता, या विडी कामगारांना कशाप्रकारे लाचार बनविता येईल यादृष्टीने व्यवस्था सुरु झालेली आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .......

विडी कारखानदार आणि कामगार यांची संयुक्त बैठक आपण यापूर्वी कधी घेतली होती ? त्यामध्ये कोणते निर्णय झाले ? त्यातील कोणत्या निर्णयांची अंमलबजावणी झाली ? त्या निर्णयांची जर अंमलबजावणी झाली नसेल तर ही अर्धा तास उपस्थित करण्यामागचा माझा हेतू हाच आहे की, कायमस्वरुपी सुसंवादाचे माध्यम म्हणून आपण एखादी समिती तयार करावी. ज्यामध्ये कारखानदाराबरोबर ठिकठिकाणचे विडी उत्पादक आणि महाराष्ट्रातील सर्व भागांचे प्रतिनिधित्व होऊ शकेल, जेणेकरुन ही जी महत्वाची केंद्रे आहेत, मग सोलापूर असेल, पुणे असेल, मुंबई असेल, नागपूर असेल, भंडारा असेल, नाशिक असेल, ज्या ज्या शहरांमध्ये आपल्याला विडी कामगारांचे अस्तित्व दिसते त्यामध्ये त्यांचे सामाजिक प्रश्न, आरोग्य विषयक प्रश्न हाताळणे आणि त्याचबरोबर त्यांना कामगार म्हणून या प्रश्नांसाठी संरक्षण देणे यादृष्टीकोनातून कायमस्वरुपी सुसंवाद ठेवणारी एखादी समिती आपण तयार करावी. खासकरुन कामगार न्यायालयांमध्ये लवकर न्याय मिळण्यासाठी प्रयत्न करण्यासोबतच मी आपल्याला असे सुचवीन की, कामगार मंत्री या ठिकाणी आहेत, कामगारांच्या प्रश्नावर काम करणारी भारतीय कामगार सेना आहे, भारतीय कामगार सेना महासंघ आहे, यासारख्या पक्षांशी संबंधित संघटनांच्या बरोबरच छोट्या छोट्या स्वरुपामध्ये काम करणारे अनेक लोक त्याठिकाणी आहेत त्यांना प्रतिनिधित्व देण्याच्या दृष्टीकोनातून विडी कामगारांच्या प्रश्नावर आपण एक समिती तयार करावी. त्यामध्ये स्वत: माझ्याबरोबर विधानसभेतील संबंधित सदस्य असतील त्यांनाही सहभागी करुन घ्यावे असे मला सुचवावेसे वाटते. या निमित्ताने दुसरा मुद्दा असा आहे की, मध्यंतरी डॉ. बाबा आढाव यांची चर्चा मी बऱ्याचशा ठिकाणाहून ऐकली. सर्व ठिकाणचे जे असंघटित कामगार आहेत ते जेरीला आलेले आहेत. लोक आत्मदहन करण्याची भाषा बोलत आहेत. मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, असंघटित कामगारांना दिलासा देण्यासाठी सरकारची काही जबाबदारी आहे की नाही ? आपण त्यांना सांगता की, जनश्री विमा योजनांसारख्या विमा योजना त्यांना दिलासा देणाऱ्या आहेत. दुर्दैवाने या विमा योजनांमध्ये त्या माणसाचा डोळा गमावला, हात गेला, पाय गेला तर त्याला पैसे मिळतात आणि बहुतेक ठिकाणी लोकांना तीन-तीन- चार-चार वर्षापासून क्लेम प्राप्तच झालेले

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

नाहीत. म्हणून असंघटित कामगारांसाठी काम करणाऱ्या ज्या संघटना आहेत त्यांची अपेक्षा ही आहे की, आपण रोजगार हा एक मूलभूत हक्क मानून त्यांच्या सर्व सोयीसुविधांच्या संदर्भात असंघटित कामगारांसाठी एखादे महामंडळ करुन त्यामधून ही जी आस्थापना आहे त्यांच्यावर सातत्याने देखरेख करणारी यंत्रणा आणि त्यामध्ये कामगार संघटनांचा सहभाग असल्याशिवाय कोणत्याही कामगारांना न्याय मिळेल असे मला वाटत नाही. दुर्दैवाने या विडी उद्योगामध्ये अतिशय आजार आहेत आणि मला स्पष्ट बोलताना वाईट वाटते परंतु सोलापूर सारख्या ठिकाणी जसजसे विडी उद्योग बंद पडत चालले तसतसे घरातील तरुण मुलींची जी दुर्दशा चालली आहे त्याबद्दल आपण काही बोलू शकत नाही अशी परिस्थिती आहे. परंतु अशा कुटुंबातील मुला-मुलींना शिक्षणाचे संरक्षण देण्यासाठी आपण एखादी योजना केली पाहिजे की ज्यामधून त्यांच्यावर अतिशय लाचार आणि बेबस होऊन जीवन करण्याची वेळ येणार नाही. याकडे मी या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून लक्ष वेधत आहे. सारांशाने मी ज्या तीन-चार मागण्या केलेल्या आहेत त्यामध्ये पहिली मागणी अशी आहे की, लवकर निवाडे लागण्यासाठी यंत्रणा बदलावी. दुसरी मागणी अशी की, सातत्याने सुसंवाद ठेऊन काम करता येईल अशी एक समिती करावी. तिसरी मागणी अशी की, यापूर्वी जी बैठक झाली असेल त्या बैठकीतील मुद्यांची आपण काय अंमलबजावणी केलेली आहे ? या निमित्ताने आपण असंघटित कामगारांना संरक्षण देण्यासाठी कशा पध्दतीने काय पावले उचललेली आहेत याकडे शासनाचे लक्ष वेधत आहे.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/

श्री. बाबा सिद्दीकी ( कामगार राज्यमंत्री ):सभापति महोदय, सम्माननीय सदस्या श्रीमती निलम गोरहे जी ने यहां बीड़ी कामगारों के संबंध में जो चर्चा उपस्थित की है, उसके बारे में अपने उत्तर में मैं सबसे पहले मिनिमम वेजेस बढ़ाने के संबंध में यह बताना चाहूंगा कि सबसे पहले 1997 में मिनिमम वेजेस एक्ट का रिवीजन हुआ था और उसके बाद 2002 में रिवीजन हुआ था. वर्ष 2002 में मिनिमम वेजेस में जो रिवीजन हुआ वह बीड़ी कामगारों को मान्य नहीं था. इसलिए उच्च न्यायालय में याचिका दाखिल की गई थी, जिसके परिणामस्वरुप उच्च न्यायालय ने स्टे दिया था. यह बात सही है कि बीड़ी बनाना कुछ लोगों का पीढ़ियों से व्यवसाय है. जब भी हम मिनिमम वेजेस एक्ट के अनुसार वेजेस लागू करने जाते हैं और उस संबंध में कामगार और मालिक की बैठक आयोजित करते हैं तो उसमें कोई मार्ग नहीं निकलता. आज तक जितनी बैठकें हुई उसमें कोई मार्ग नहीं निकला. उसके बाद कामगारों ने मोर्चा निकाला. तत्पश्चात लेबर कमिश्नर ने एक बैठक बुलाई थी, उसमें भी कोई मार्ग नहीं निकला. इसके बाद कामगार मंत्री की अध्यक्षता में 8 जुलाई, 2008 को बैठक आयोजित की गई थी लेकिन किसी कारणवश यह बैठक पोस्टपोन हो गई. अब 1 महीने के भीतर कामगार मंत्री जी बैठक आयोजित करके कोई मार्ग निकालने की कोशिश करने वाले हैं. दूसरी बात यह है कि मुंबई शहर में जो बीड़ी कामगार रहते हैं वे खुद पत्ते खरीदकर बीड़ी बनाते हैं और अपना माल बेचते हैं. ऐसी स्थिति में उनके लिए मिनिमम वेजेस एक्ट लागू नहीं कर सकते हैं क्योंकि वह एक तरह से व्यापार हो जाता है. जहां तक 116 कामगारों के खिलाफ केसेस दाखिल करने की बात है तो मैं यह बताना चाहूंगा कि 53 क्लेम भी दाखिल किए गए हैं. लेकिन लेबर कोर्ट में इन दावों का फैसला नहीं हुआ है. लेबर कोर्ट में फैसला होने में देर होती है इसलिए सरकार यह सोच रही है कि इस प्रकार के मामलों का निपटारा करने के लिए सहायक आयुक्त (कामगार विभाग) को क्वासी ज्युडिशियल अथॉरिटी बनाया जाए. इस प्रकार से सहायक आयुक्त को अधिकार दिए जाने के बाद इन दावों का गति से निपटारा हो सकेगा और कामगारों को न्याय मिल सकेगा. दूसरी दिक्कत यह है कि ये बीड़ी कामगार बहुत गरीब होते है, उनके पास साधन और जानकारी का अभाव होता है इसलिए भी वे न्याय से वंचित हो जाते हैं. इस बात का विचार करते हुए हम सहायक आयुक्त को क्वासी ज्युडिशियल अथॉरिटी बनाने के संबंध में जल्द से जल्द जी.आर. निकालेंगे ताकि मिनिम्मम वेजेस एक्ट पर अमल हो सके.

....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री बाबा सिद्दीकी......

सभापति महोदय, बीड़ी महिला कामगार एवम् उनके बच्चों के लिए केन्द्रीय सरकार द्वारा कुछ कल्याणकारी योजनाएं शुरु की गई हैं. महिला कामगारों को पहली दो डिलीवरी के लिए रुपये 1000 रुपये की सहायता दी जाती है. बीड़ी कामगार की मृत्यु होने पर उनके परिवार के सदस्य को 10 हजार रुपये की मदद दी जाती है और अगर किसी दुघर्टना के कारण किसी बीड़ी कामगार की मृत्यु हो जाती है तो उस स्थिति में भी कामगारों को ग्रूप इंश्यारेंस स्कीम के तहत 25 हजार रुपये की मदद दी जाती है. उसी प्रकार से कैंसर, लेप्रसी, टी.बी. हार्ट डिसीज इत्यादि से ग्रस्त बीड़ी कामगारों को केन्द्रीय सरकार की तरफ से आर्थिक सहायता की जाती है. इसी प्रकार से बीड़ी कामगारों के बच्चों को स्कालरशिप भी दी जाती है. पहली से चौथी कक्षा के बच्चों को वार्षिक रुपये 250 दिए जाते हैं. पाचवीं से आठवीं कक्षा के बच्चों को वार्षिक रुपये 940 छात्राओं के लिए, रुपये 500 छात्रों के लिए दिए जाते हैं. 9 वी कक्षा की छात्राओं को वार्षिक रुपये 1140 रुपये दिए जाते हैं और छात्रों को 700 रुपये दिए जाते हैं. 10 वी कक्षा की छात्राओं को वार्षिक रुपये 1840 रुपये और छात्रों को 1400 रुपये दिए जाते हैं. 11 वीं एवम् 12 वीं की छात्राओं को वार्षिक रुपये 2440 और छात्रों को 2000 रुपये दिए जाते हैं. इस प्रकार से 4500 छात्र और छात्राओं को स्कालरशिप वितरीत की गई है. इस प्रकार की केन्द्रीय सरकार की योजना है.

सभापति महोदय, सम्माननीय सदस्या श्रीमती निलम गोरहे जी ने यह सुझाव दिया है कि बीड़ी कामगारों की समस्याओं को हल करने के लिए समिति गठित की जाए. सरकार इस सुझाव पर विचार करेगी. क्योंकि जब भी बैठक होती है तो उसमें मार्ग नहीं निकलता है. यह वस्तुस्थिति है. कामगार क्षेत्र के लोग इस समिति में शामिल होना चाहेंगे तो उनका समावेश करने के बारे में भी सरकार विचार करेगी. इतना कहकर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

.......

यानंतर श्री खंदारे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, याबाबत केव्हा निर्णय होणार आहे ते सांगण्यात यावे. कारण किमान वेतन योजना त्या लोकांपर्यंत पोहोचतच नाही. लाभधारकांची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.बाबा सिद्धिकी : ही माहिती पटलावर ठेवण्यात येईल. ही योजना लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी लोकांमध्ये जागरुकता निर्माण करुन यासंदर्भात एक महिन्याच्या आत बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीला सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनाही बोलविले जाईल.

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांची अर्धा-तास चर्चा कामकाजपत्रिकेवर दाखविलेली आहे. ती नंतर घेण्यात येईल. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांची अर्धा-तास चर्चा आहे, परंतु ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांची अर्धा-तास चर्चा घेण्यात येईल.

------

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अरविंद सावंत )**

**पृ.शी.**: राज्यातील तंत्रज्ञानविषयक अभ्यासक्रम कालबाह्य झाल्याने या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याची निर्माण झालेली आवश्यकता.

**मु.शी.**: राज्यातील तंत्रज्ञानविषयक अभ्यासक्रम कालबाह्य झाल्याने या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याची निर्माण झालेली आवश्यकता यासंबंधी डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये शिकविण्यात येणारा तंत्रज्ञान विषयक अभ्यासक्रम कालबाह्य होणे, त्यामध्ये बदल करण्यासाठी अभियांत्रिकी तंत्रशिक्षणाची शासनाने पुनर्रचना करण्याची आवश्यकता असणे, अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी लाखो रुपये भरुन पदवी घेतल्यानंतर जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी अत्याधुनिक अभ्यासक्रम तयार करण्याकरीता तज्ज्ञ समितीची नेमणुक करुन त्या समितीत उच्च गुणवत्ता प्राप्त केलेल्या नवीन पदवीधारकांचाही समावेश करण्याची आवश्यकता व त्यावर शासनाने तातडीची करावयाची कार्यवाही."

सभापती महोदय, प्रथम आपण मला चर्चेसाठी परवानगी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. राज्यामध्ये शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयातून एकूण 67 अभियांत्रिकी डिप्लोमा कोर्सेस 67 शिकविले जातात. हे कोर्सेस एआयसीटीई यांची मान्यता मिळाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये सुरु होतात. हे कोर्सेस शिकून मुले पुढे जातात. अभियांत्रिकी कोर्सेससाठी संपूर्ण जगभरातून मागणी आहे.

नंतर श्री.शिगम.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 09:45

(डॉ. दीपक सावंत....)

जर आपण या कोर्सेसचे स्वरुप पाहिले, सिलॅबस पाहिले तर असे दिसून येते की, ज्या प्रकारच्या नोक-यांची डिमांड असते, ज्या प्रकारच्या संधी जगभर उपलब्ध असतात, ज्या प्रकारे महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नाशिक येथे अनेक परदेशी कंपन्या येऊन कॅम्पस इंटरव्ह्यू घेऊन एमबीएस,एमएमएसचे कोर्स करणा-या विद्यार्थ्यांना सिलेक्ट करतात किंवा परदेशामध्ये जी.ई.सारख्या स्पर्धा परीक्षा आहेत त्या परीक्षासाठीचे जे कोर्स आहेत अशा सर्व कार्सेसना आपले कोर्स अनुरुप नाहीत. एखादा ग्रामीण भागातील मुलगा अमेरिका, यु.के. किंवा ऑस्ट्रेलियाला जाऊ इच्छित असेल तर त्यासाठी द्याव्या लागणा-या परीक्षेचा अभ्यासक्रम प्रायव्हेट क्लासेस आणि प्रायव्हेट कॉलेजेसमध्ये शिकविले जातात. परंतु राज्य शासनाच्या मान्यताप्राप्त सिलॅबसमध्ये हा अभ्यासक्रम शिकविण्याची नितांत गरज असताना त्याची कुठे तोंडओळख सुध्दा दिसत नाही. मध्यंतरी एका लातूरच्या विद्यार्थ्याला आयटीआयच्या परीक्षेला बसायचे होते. परंतु त्याला पुरेशी माहिती नसल्यामुळे तो भलत्याच परीक्षेला बसला आणि परिणामी हा हुशार विद्यार्थी परदेशी जाऊ शकला नाही.

श्री. मधुकर चव्हाण : तालिका सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधीत अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली असून संबंधित खात्याचे मंत्री सभागृहामध्ये हजर नाहीत.

**तालिका सभापती** : उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित झाल्यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांची अर्धा-तास चर्चा घेण्यात येईल. सभागृहामध्ये उपस्थित असलेल्या माननीय मंत्री महोदयांनी याची नोंद घेऊन उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांना सभागृहामध्ये उपस्थित राहाण्यास सांगावे.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रायगड जिल्ह्यातील अलिबाग मधील भूमिगत गटार योजना कार्यान्वित करण्यासाठी करावयाची उपाययोजना

**मु. शी.** : रायगड जिल्ह्यातील अलिबाग मधील भूमिगत गटार योजना कार्यान्वित करण्यासाठी करावयाची उपाययोजना यासंबंधी श्री.जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"रायगड जिल्ह्यातील अलिबाग नगरपरिषदेकडून भूमिगत गटार योजना कार्यान्वित करण्यासाठी 18 नोव्हेंबर 2004 रोजी रक्कम रुपये 7 कोटी 50 लाखांचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे सादर करणे, याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने केलेल्या सूचनांची व आक्षेपांची पूर्तता नगरपरिषदेकडून वेळोवेळी करणे, दिनांक 1 मार्च 2005 रोजी मंत्री, जलसंपदा, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडे चर्चा होऊन योजनेला शासनाची तत्वत: मान्यता असल्याचे मान्य होणे, यानंतर दिनांक 25 मे 2007 व दिनांक 26 नोव्हेंबर 2007 रोजी यासंबंधी पुन्हा मंत्री, जलसंपदा, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडे चर्चा होऊन केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहराच्या पायाभूत सुविधांचा विकास योजनेअंतर्गत (UIDSSMT) ही योजना कार्यान्वित करण्याबाबत विचार करण्यात येणे, सबब या योजनेला अंतिम स्वरुप प्राप्त होऊन ती कार्यान्वित करण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना ".

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील अलिबाग शहर हे समुद्र किनारी आहे. समुद्र वर आणि शहर खाली अशी या शहराची भौगोलिक रचना आहे. अलिबाग शहराच्या उंचीपेक्षा समुद्राची उंची जास्त आहे. त्यामुळे अलिबाग शहरातील पाण्याचा निचरा होण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. हा प्रश्न सुटावा यासाठी त्याठिकाणी भूमिगत गटार योजना करावी यासाठी गेल्या पाच-सहा वर्षापासून मी या सभागृहामध्ये सातत्याने मागणी करीत आहे. सुरुवातीला ही





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील....)

योजना नगरपालिकेच्या 10 टक्क्यातून घ्यावी असे मी सुचविले होते आणि या खात्याचे मंत्री महोदय श्री. अजित पवार यांनी ती योजना राबविण्याचे आश्वासन देखील दिले होते. गेल्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये देखील या योजनेसंबंधी माननीय मंत्री महोदयांनी बैठक घेतली होती आणि त्या बैठकीला सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते. ही योजना मंजूर झालेली आहे. किर्लोस्कर कन्सल्टण्ट कंपनीकडून योजनेचा सर्व्हे करुन घेतलेला आहे. ही योजना अंतिम टप्प्यामध्ये आहे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने माझी एकच मागणी आहे की, अलिबाग शहर हे अलिबाग नगरपालिकेच्या हद्दीमध्ये आहे. 'क' वर्गाचा दर्जा या नगरपालिकेला दिलेला आहे. अलिबाग शहरात अनेक कर्मचाऱ्यांची निवासस्थाने आहेत. अलिबाग शहर हे जिल्हयाचे मुख्यालय असल्यामुळे अनेक कर्मचारी तेथे राहतात. या कर्मचाऱ्यांची निवासस्थाने असल्यामुळे तेथे ड्रेनेजचा प्रश्न निर्माण होतो. माणुसकीच्या दृष्टीकोनातून जे चतुर्थश्रेणीचे कर्मचारी आहेत त्यांना रिपेमेंट करताना अडचणी निर्माण होतात. टँकरसाठी दर महिन्याला 500 रुपये प्रत्येक सदनिकाधारकाला खर्च येतो. नगरपालिकेचे उत्पन्न नाही. जे उत्पन्न येते त्यातील 65टक्के रक्कम प्रशासनावर खर्च होते आणि उरलेल्या 35 टक्क्यांमध्ये 20 टक्के केवळ पाणीपट्टीवर खर्च होतो. म्हणजे नगरपालिकेचे तेवढे उत्पन्नच नाही. जिल्हयाच्या ठिकाणी असलेली ही नगरपालिका आहे. या सदनामध्ये याविषयावर चर्चा झाली असताना आश्वासन देण्यात आले होते की जिल्हयाच्या ठिकाणी असलेल्या नगरपालिका आणि नगरपरिषदांना प्राधान्य देण्याचे शासनाचे धोरण आहे. कोकणात दोनच नगरपालिका जिल्हयाच्या ठिकाणी आहेत. एक रत्नागिरी आणि दुसरी अलिबागची आहे. कोकणात अनुशेष सुध्दा भरपूर आहे. म्हणून या योजनेची तातडीने अंमलबजावणी करावी आणि जिल्हयाच्या मुख्यालयाची नगरपालिका म्हणून प्राधान्य देण्यात यावे अशी मी शासनाला विनंती करतो.

----

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे(ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, अलिबाग नगरपालिकेने जो प्रस्ताव पाठविला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, युआयडीएसएसएमटी बाबतचा प्रस्ताव मागील अधिवेशनामध्ये सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिल्याप्रमाणे जून 2008 मध्ये स्टेट कमिटीकडून अंतिम प्रस्ताव मान्य झाला असून योजना प्रस्तावित करण्याचे ठरले आहे. जवळपास प्रत्येक नगरपालिका आणि नगरपरिषदांनी आपापले प्रस्ताव युआयडीएसएसमटी मार्फत प्रस्तावित केलेले आहेत. जवळपास 80 प्रस्ताव आलेले आहेत. परंतु शेवटी निधीचा प्रश्न निर्माण होतो. मागील वर्षी जे 80 प्रस्ताव आले होते त्यातील 21 प्रस्ताव मान्य केले. नगरपालिका किंवा महानगरपालिका जिल्हयाच्या ठिकाणी असल्यामुळे प्रस्तावांना प्राधान्य देणे योग्य राहणार नाही. कारण बेसिक योजना नगरपालिकांसाठी आहे. बहुतांश जिल्हयाच्या ठिकाणी नगरपालिका राहणार आहेत. इतर नगरपालिका सुध्दा आहेत. शासन असा निर्णय घेऊ शकत नाही की या नगरपालिकेला प्राधान्य दिले पाहिजे किंवा त्या नगरपालिकेला प्राधान्य दिले पाहिजे. प्रस्ताव आल्यानंतर समितीने अंतिमत: 21 प्रस्तावांना मान्यता दिली. उरलेल्या नगरपालिकांबाबत बैठक झाल्यानंतर अंतिम निर्णय धेतला जाईल. अलिबाग नगरपरिषदेच्या प्रस्तावाला स्टेट कमिटीने मान्यता दिलेली आहे. केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे. केंद्र शासन आपल्या राज्याला किती निधी देते त्यानुसार प्राधान्याने ज्या ज्या नगरपालिका येतील त्यांच्या प्रस्तावांना मान्यता दिली जाईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांचे म्हणणे मला मान्य आहे. जिल्हयाच्या ठिकाणी असलेल्या 'क' वर्ग नगरपालिकांच्या बाबतीत शासनाने धोरण जाहीर केले आहे. याठिकाणी जे आश्वासन देण्यात आलेले आहे त्याला अर्थ आहे किंवा नाही ? सभागृहामध्ये सन्माननीय मंत्री श्री. अजित पवार यांनी सांगितले होते की जिल्हयाच्या ठिकाणी असलेल्या नगरपालिकांना प्राधान्य देण्यात येईल. केंद्र शासनाला राज्य शासनाने कळवायचे आहे की कोणत्या नगरपालिकेच्या प्रस्तावांना प्राधान्य देण्यात यावे.....

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.कानडे 09:55

श्री. जयंत प्र.पाटील...

जिल्हयाच्या ठिकाणी असलेली नगरपालिका आणि क वर्ग नगरपालिका यांना प्राधान्य देण्याची मागणी मी यासाठी करीत आहे की, या सभागृहात मंत्रीमहोदयांनी आश्वासन देऊन धोरण जाहीर केले होते. ते सभागृहाच्या रेकॉर्डवर आहे. त्या धोरणानुसार प्राधान्य द्यावे अशी मागणी आहे.

श्री.रणजित कांबळे : मान्यता द्यायचे ठरले आहे आणि मान्यता दिलेली आहे. ज्याप्रमाणे निधी उपलब्ध होईल त्यानुसार निधी दिला जाईल.

**तालिका सभापती** : शासनाच्या धोरणानुसार प्राधान्य देणार आहात का?

श्री.रणजित कांबळे : मी रेकॉर्ड तपासून घेतो. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी आश्वासन दिले असेल तर शासन प्राधान्य देईल.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईतील पदपथ व पुलांवर फेरीवाल्यांनी केलेले अतिक्रमण

**मु.शी.**: मुंबईतील पदपथ व पुलांवर फेरीवाल्यांनी केलेले अतिक्रमण यासंबंधी श्री.मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धातास चर्चा.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धातास चर्चा उपस्थित करतो.

"मुंबईतील अनेक रेल्वे स्टेशन जवळील रस्ते व पदपथ तसेच रेल्वे पुलावर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केले असून अतिक्रमणामुळे सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागणे, या अतिक्रमणास पालिका प्रशासन व पोलीस जबाबदार असल्याने खात्यातील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याची गरज, त्याचबरोबर पे अँड पार्कच्या नावाने अनेक वाहने रेल्वे स्थानकाजवळ उभी करण्यात येणे, यामुळे पादचाऱ्यांना व सर्वात जास्त ज्येष्ठ नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागणे, या संदर्भात महापालिका प्रशासन, वाहतूक पोलीस, पोलीस इत्यादींना निवेदने देऊनही कोणतीही कारवाई न होणे, कारवाई केलीच तर एक दोन दिवस केली जाणे व पुन्हा परिस्थिती मूळ पदावर येणे, रेल्वे स्थानकामधून लाखो प्रवासी ये-जा करीत असताना फेरीवाल्यांकडून सामान्य नागरिकांना वेठीस धरण्याची कृती होणे, याचा सर्वाधिक त्रास ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागणे, ज्येष्ठ नागरिकांनी शासनाचे लक्ष वेधण्याकरीता नुकतेच माटुंगा येथे केलेले साखळी आंदोलन, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये वाहनांच्या दृष्टीने वाहतुकीचा प्रश्न भेडसावत आहे त्याप्रमाणेच फेरीवाल्यांचा प्रश्न उग्र होत चालला आहे. विशेषत: बोरीवली, मालाड, अंधेरी, दादर या ठिकाणी रेल्वे स्टेशनच्या बाहेर व पुलांवर, विशेषत: मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या पुलांवर फेरीवाल्यांचा त्रास मुंबईकरांना सहन करावा लागत आहे. Socio Economic ची अडचण आहे. सामाजिक व आर्थिक विषय लक्षात घेतला तरी आओ जाओ घर तुम्हारा याप्रमाणे मुंबई शहराला धर्मशाळेचे स्वरुप प्राप्त झाले आहे. फेरीवाला झोन तयार करण्याचे कोर्टाने निर्देश दिले होते. मुंबई शहरामध्ये ना फेरीवाला क्षेत्रे सुध्दा आहेत. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. विशेषत: दादर पूर्व आणि पश्चिमेला जोडणाऱ्या पुलांवर फेरीवाल्यांनी प्रचंड उच्छाद मांडला

..3..



SGB/ पूर्वी श्री.कानडे 09:55

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.........

आहे. त्या पुलांवरुन जाणाऱ्या महिलांना याचा त्रास सहन करावा लागतो. महिलांकडे पाहून बीभत्स शेरेबाजी केली जाते. ट्रेनमधून उतरल्यानंतर महिला घरी जाण्याच्या घाईत असतात, काही महिला पश्चिम रेल्वे किंवा सेंट्रल रेल्वेची ट्रेन पकडण्यासाठी दादरला उतरतात. त्यांना फेरीवाल्यांचा प्रचंड त्रास होतो. मुंबई महानगरपालिकेने 221 रस्त्यांवर 22012 ठिकाणी फेरीवाल्यांना जागा देण्याचा प्रस्ताव आणला आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये 1960-70 च्या दरम्यान फुटपाथ पाण्याने धुतले जायचे, एवढे मोठे फुटपाथ होते. आता केवळ दोन-तीन फूट अंतराचे फुटपाथ बांधण्यात आले आहेत. ते देखील अनेक ठिकाणी बांगलादेशी नागरिकांनी झोपडपट्टया उभारुन व्यापले आहेत. मुंबई शहरात फेरीवाल्यांना समान जागा देण्यात येणार आहे. 1X1 मीटरची जागा देण्यात येणार आहे. मुंबई शहरामध्ये मेट्रो सिनेमाजवळ फॅशन स्ट्रीट उभी राहिली आहे. मेट्रो सिनेमा ते पारसी विहिरीपर्यंत ही फॅशन स्ट्रीट अस्तित्वात असून यासाठी परवानगी कोणी दिली? मुंबई शहरात राहणारे जे नागरिक आपल्या पगारातून टॅक्स भरतात, प्रामाणिकपणे वेगवेगळे कर भरतात अशाच लोकांना मुंबई शहरात जीवन जगणे अवघड बनले आहे.

सभापती महोदय, मध्यंतरी शासनाने जाहीर केले की, पे अँड पार्क योजनेसाठी जादा एफएसआय देऊन इमारती बांधल्या जातील. परंतु शासनाकडे जमीन आहे का? कोर्टाने नुकताच शासनाच्या थोबाडीत मारणारा निर्णय दिला आहे. युएलसी कायद्याच्या माध्यमातून जमिनी वेळेवर ताब्यात न घेतल्यामुळे त्या जमिनी as good as release झाल्या आहेत. Thickly area, घनदाट लोकसंख्या असलेल्या भागात शासन फेरीवाल्यांची व्यवस्था करण्यासाठी आणि वाहनांच्या पार्किंगसाठी वाहनतळ निर्माण करण्यासाठी जमिनी ताब्यात घेत आहे. आमच्याकडे असलेली जागा ताब्यात घेऊन ऊंच ऊंच इमारती बांधू असे शासनाने जाहीर केले. परंतु शासनाकडे जमिनी कुठे आहेत? शासनाने युएलसी कायदा रद्द केला आहे.

(नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

युएलसी कायदा रद्द केल्यामुळे सर्व जमीन मोकळी होणार आहे. जमीन मोकळी झाल्यावर तिचा वेगवेगळ्या कारणासाठी उपयोग केला नाही तर त्या मोकळ्या जमिनीवर कर लावण्यात येईल असे शासनाने सांगितले होते. मूलभूत अधिकारामध्ये कर लावता येणार नाही असा विधि विभागाने शासनाला अहवाल दिला आहे. म्हणूनच मी यासंबंधी लक्षवेधी सूचना दिली होती. परंतु सचिवालयातील अधिकारी सांगतो की, ही लक्षवेधी सूचना शासनाच्या विरोधात आहे. त्यामुळे येथे काही अधिकाऱ्यांना शासन चालविण्यासाठी बसविले आहे की, सभागृहातील कामकाज चालविण्यासाठी बसविले आहे? म्हणजे शासनाला अडचणीत आणणाऱ्या लक्षवेधी येथे येऊ द्यावयाच्या नाहीत. आम्ही शासनाला अडचणीत आणतो म्हणजे आम्ही काही त्यांचे दुष्ट शत्रू नाही. विरोधी पक्ष म्हणून काही गोष्ट लक्षात आणून द्याव्यात म्हणून आम्ही येथे प्रश्न मांडत असतो. मी येथे मंत्रिमहोदयांची स्तुती कोणत्याही प्रलोभनाने करीत नाही. त्यांच्याकडे माझी कुठलीही फाईल प्रलंबित नाही. श्री.राजेश टोपे यांच्यासारखे दहा-बारा मंत्री आहेत. जे आमच्या सूचना ऐकतात. त्यावर अंमलबजावणी करतात. मंत्रिमहोदयांना इंद्रासारखे सर्व बघण्यासाठी हजार डोळे नाहीत. काहींनी डोळे बंद केले आहेत, हा भाग वेगळा आहे. मंत्रिमहोदय हे डोळस असल्यामुळे आम्ही त्यांना काही सूचना करतो.

माननीय मंत्रिमहोदयांनी मॅनग्रोव्हसंबंधी ठाणे महानगरपालिकेला आदेश दिले होते. पण त्यांचे आदेश ठाणे महानगरपालिकेने धाब्यावर बसविले आहेत. असे जर होत असेल तर येथील चर्चा सुद्धा वांझोटी होईल. शासन नऊ दिवसांमध्ये अधिवेशन गुंडाळत आहे. आम्ही 40 दिवस आधी प्रश्न देतो. अर्धा-तास चर्चा एक दिवसात घेणार असाल, प्रस्तावावर बोलण्यासाठी 2-3 मिनिटे देणार असाल तर आम्ही येथे यायचे कशाला. शासनाचा सातशे रूपयाचा भत्ता घेण्यासाठी? आम्ही प्रामाणिकपणे येथे सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेण्यासाठी येतो. पण येथील चर्चेचा काहीच उपयोग होत नाही. जात्यावर बसल्यानंतर ओवी येते तसेच सभागृहात आल्यानंतर आम्हाला आमचे विचार मांडल्या शिवाय राहवत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

आज मुंबईतील फेरीवाल्यांचा प्रश्न फार गहन झाला आहे. सदर प्रश्नामध्ये मार्ग काढण्यासाठी आपण मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना आपल्या दालनात बोलावून ठोस उपाययोजना करावी. आम्हाला बोलाविले नाही तरी चालेल. मंत्रिमहोदयांच्या प्रामाणिकपणावर माझा विश्वास आहे. मुंबई शहरामध्ये आपण वेशांतर करून फिरावे. तेव्हा आपल्या लक्षात येईल की, मुंबईत फेरीवाल्यांनी किती उच्छाद मांडला आहे. आज लोकांना रस्त्यावरुन, पदपथावरून चालता येत नाही. फेरीवाल्यांना निष्कासित करण्यासाठी अधिकारी,पोलीस गेल्यानंतर त्यांच्यावर चालून येण्याची हिंमत फेरीवाले दाखवतात. तेव्हा फेरीवाल्यांसबंधी माननीय सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे, तत्संबंधी प्रामाणिकपणाने अंमलबजावणी करण्यासाठी शासन काय करणार आहे ? याचा खुलासा मंत्रिमहोदयांनी करावा एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मुंबईच्या जनतेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या अशा प्रश्नावर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे, त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. या अर्धा तास चर्चेमुळे मुंबईतील फेरीवाल्यांच्या प्रश्नासंबंधी शासनाला निर्णय घेण्यासाठी गती प्राप्त होईल, असे स्पष्ट मत मी सुरूवातीला देऊ इच्छितो. फेरीवाल्यांच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता होती. परंतु, पूर्वी असे झाले नाही म्हणून कोर्टाने सन 2003 ते 2007 या कालावधीत 2-3 महत्त्वाचे निर्णय दिलेले आहेत. त्याच प्रमाणे केंद्राने सन 2004 मध्ये केंद्राने नॅशनल हॉकिंग पॉलिसी जाहीर केली. कोर्टाचा निर्णय, नॅशनल हॉकिंग पॉलिसी यासंबंधी राज्य शासनाला निर्णय घ्यावयाचा आहे. आज मुंबईमध्ये 15169 अधिकृत म्हणजे परवानाधारक फेरीवाले आहेत, तर 2 लाख अनधिकृत म्हणजे विना परवानाधारक फेरीवाले आहेत. असे असताना मुंबई महानगरपालिकेने फेरीवाल्यांना परवाना देण्याचे बंद का केले ? हा ही एक महत्त्वाचा प्रश्न आहे. दोन लाख अनधिकृत फेरीवाले आज जनतेची गरज आहे. मुंबईतील जनतेला सगळ्या वस्तू सहज मिळाव्यात असे वाटते. त्यामुळे फेरीवाले रेल्वे स्थानकाच्या बाहेर गर्दी करून बसलेले असतात. एवढेच नव्हे तर फेरीवाल्यांकडे माल देखील स्वस्त मिळतो.

यानंतर श्री.पी.खर्चे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .........

भाजीपाला, प्लास्टिक अशा छोट्या छोट्या घरगुती उपयोगाच्या वस्तू त्यांच्याकडून मिळतात त्यामुळे ही अनधिकृत फेरीवाल्यांची संख्या वाढत चालली आहे. सभागृहाला मी सुरुवातीला अनधिकृत फेरीवाल्यांची संख्या कशी वाढली ही बाब निदर्शनास आणून देतो आणि नंतर त्यावरील इलाजही सांगतो. अशा प्रकारे मुंबईत एकूण फेरीवाल्यांमध्ये अधिकृत फेरीवाले 15159 एवढे असून 2 लाख एवढे अनधिकृत फेरीवाले आहेत. अनधिकृत फेरीवाल्यांच्या संदर्भात शासनाची स्पष्ट भूमिका अशी आहे की, अनधिकृत फेरीवाल्यांनी पदपथावर बसू नये, तसेच त्यांनी कुठे बसावे व कुठे बसू नये अशा सर्व गोष्टी निश्चित केल्या आहेत. त्यासंबंधी शासनाने कारवाई सुरु केली असून मुंबईतील एकूण 29 वॉर्डात बारा-बारा तासांच्या दोन पाळ्यांमध्ये एक गाडी आणि त्यावर 6 मजूर ठेवून या अनधिकृत फेरीवाल्यांना उठविण्याचे काम करतो आणि हे काम सातत्याने सुरुच असते. मागील तीन महिन्यांची तसेच गेल्या एप्रिल ते जून, 2008 पर्यंतची फेरीवाल्यांना उठविण्यासंबंधीची आकडेवारी पाहिली तर आजपर्यंत जवळपास 2,60,548 एवढ्या अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2.69 लाख इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच रेल्वे स्टेशनवर या अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असल्यामुळे त्यासाठी प्रिव्हेंटिव्ह स्क्वॉडही आपण निर्माण केले आहे. त्या स्क्वॉडसोबत एक लॉरी, एक इन्स्पेक्टर आणि 6 मजूर काम करतात. ज्या अनधिकृत फेरीवाल्यांचा रेल्वे स्टेशनवर त्रास होतो त्याबद्दल हे स्पेशल स्क्वॉड काम करीत आहे. अशा प्रकारे वॉर्ड आणि रेल्वे स्टेशनवर आपण प्रिव्हेंटिव्ह ॲक्शन घेतो. आजपर्यंत शासनाच्या वतीने आणि फेरीवाल्यांच्या संदर्भात कोर्टाचे जे आदेश होते त्यानुसार तसेच अनेक रस्त्यांवर अनधिकृतपणे जे फेरीवाले बसलेले असतात ते रस्ते क्लिअर करुन पोलिसांना द्यावयाचे आणि पोलिसांनी त्यांच्या संदर्भात प्रिव्हेंटिव्ह ॲक्शन घ्यावयाची व पुन्हा ते या रस्त्यांवर बसू नयेत, याची काळजी घ्यायची, अशा प्रकारे 563 रोडवरील फेरीवाल्यांना आपण आजपर्यंत निष्कासित केले आहे आणि पुन्हा फेरीवाले त्या रस्त्यावर बसता कामा नये, याची जबाबदारी आपण पोलिसांकडे दिलेली आहे. एवढेच नव्हे तर अशा प्रकारे रस्त्यावर जे अडथळे निर्माण करीत असतील त्या जवळपास 159 फेरीवाल्यांवर पोलिसांनी एफआयआर दाखल केले आहेत. त्याचबरोबर महानगरपालिकेचे जे कर्मचारी या कामामध्ये निष्काळजीपणा करताना आढळून

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .......

आले त्या 12 कर्मचाऱ्यांना निलंबित करुन त्यांची चौकशी करण्याचे काम सुध्दा करण्यात येत आहे. अशा प्रकारे राज्यशासनाची या अनधिकृत फेरीवाल्यांच्या बाबतीतील भूमिका असून त्यातून कर्मचारी, अधिकारी आणि अनधिकृत फेरीवाले कारवाईतून सुटलेले नाहीत, अशा प्रकारे काम चालू आहे. मी या निमित्ताने सभागृहाला एवढेच सांगू इच्छितो की, जे अधिकृत 15159 फेरीवाले आहेत त्यांच्यासाठी 18 हजार पिचेस आपण तयार केले आहेत. तसेच जे फेरीवाले नॉन हॉकिंग झोन मध्ये बसले आहेत त्यांना हॉकिंग झोनमध्ये आणण्याचेही काम सुरु आहे व त्यासाठी जवळजवळ 190 रोडवर हॉकिंग झोन आपण निश्चित केले आहेत. मी धोरणात्मक दृष्ट्या एवढेच सांगणार आहे की, नॅशनल हॉकिंग पॉलिसी जी केंद्रशासनाने आपल्याला दिली आहे आणि हायकोर्टाने जे निदेश दिलेले आहेत त्यासंबंधी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समितीही आपण गठित केली आहे. या समितीने यासंदर्भातील निर्णय घेऊन त्याबाबतीत अंतिम धोरण शासनाला ठरवावयाचे आहे. हे धोरण आपल्याला हायकोर्टाचे निदेश आणि नॅशनल हॉकिंग पॉलिसीला धरुन तयार करावयाचे आहे. कारण हा विषय राज्यशासनाचा आहे व त्या अनुषंगाने नॅशनल हॉकिंग पॉलिसी आणि आपल्या प्रॅक्टिकल गरजा हे सर्व विचारात घेऊन शासन लवकरच आपले धोरण फायनलाईज करणार आहे. यासंबंधी सचिवांच्या पातळीवर बऱ्याच बैठका झालेल्या आहेत, असे मी या निमित्ताने मुंबईतील जनतेला व सभागृहालाही सांगू इच्छितो. आणि कुठल्याही परिस्थितीत हे काम येत्या दोन महिन्याच्या आत प्रधान सचिव, नगरविकास यांच्या माध्यमातून पूर्ण केले जाईल. नॅशनल हॉकिंग पॉलिसी व हायकोर्टाने यासंदर्भातील वेगवेगळे निदेश दिलेले आहेत.

<u>(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)</u>

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ...

ज्यामध्ये रेल्वे स्टेशनपासून, हॉस्पिटलपासून, मंदिरापासून 150 मीटर अंतरावर कोणी बसू नये किंवा शिजवलेले अन्न विकू नये अशा प्रकारचे अनेक डायरेक्शन हायकोर्टाने आपल्याला दिलेले आहेत. नॅशनल हॉकींग पॉलिसी तसेच आपल्या प्रॅक्टिकल काय गरजा आहेत या सर्व गोष्टी लक्षात घेऊन प्रधान सचिवांच्या वतीने दोन महिन्याच्या आत या विषयाच्या संदर्भात अंतिम मसुदा तयार केला जाईल व त्यामुळे आपल्याला अनेक चांगल्या गोष्टी करता येईल. अनेक स्टॉल धारकांबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांची याविषयाच्या संदर्भात एक बैठक झाली होती. आम्हाला हलवण्यात येऊ नये असे त्यांचे म्हणणे होते. स्टॉलवाल्यांसाठी, आरे सरिता स्टॉल वाल्यांसाठी काय करावयाचे यासंदर्भातील अंतिम निर्णय येत्या दोन महिन्यात निश्चितपणे घेतला जाईल असे आश्वासन या विषयाच्या निमित्ताने देऊ इच्छितो.

------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता सभागृहात माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उपस्थित झालेले असल्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी त्यांची अपूर्ण राहिलेली अर्धातास चर्चा पुन्हा सुरु करावी.

**पृ.शी.**: राज्यातील तंत्रज्ञानविषयक अभ्यासक्रम कालबाह्य झाल्याने या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याची निर्माण झालेली आवश्यकता.

**मु.शी.**: राज्यातील तंत्रज्ञानविषयक अभ्यासक्रम कालबाह्य झाल्याने या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याची निर्माण झालेली आवश्यकता यासंबंधी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

( चर्चा पुढे सुरु......

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, तंत्रशिक्षण व अभियांत्रिकी शिक्षणाच्या संदर्भात अर्धातास चर्चा उपस्थित केलेली आहे. राज्यातील अनेक महाविद्यालयांध्ये, अनेक पॉलिटेक्नीक कॉलेजेसमध्ये अभियांत्रिकी अभ्यासक्रम शिकवला जात असतो. हा अभ्यासक्रम शिकवला जात असतांना त्यामध्ये अनेक त्रुटी आढळून आलेल्या आहेत. एआयसीटीची मान्यता मिळाल्याशिवाय कोणतेही कॉलेज किंवा पॉलिटेक्नीक कॉलेज सुरु करता येत नाही याची मला चांगली कल्पना आहे. आपल्या पॉलिटेक्नीकमधून जे विद्यार्थी शिक्षण घेऊन पदवी किंवा पदविका घेऊन बाहेर पडतात त्यांना जॉब मिळणे आवश्यक आहे. अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी यु.के., यु.एस.ए. ला जावयाचे असते त्यामुळे परदेशी शिक्षण घेऊ इच्छिणारे विद्यार्थी जीआरई, टॉफेलची परीक्षा देतात तर कोणी युएसएमएलईची परीक्षा देता असतात. या परीक्षा कशा प्रकारे द्याव्यात, या परीक्षांचा अभ्यासक्रम नेमका काय आहे यासंदर्भात राज्यशासनाकडून कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. लातूर मधील गरीब कुटुंबातील हुशार मुलाला फॉरेनला जाऊन कंप्युटर सायन्समध्ये एमएस करावयाचे होते परंतु त्याला यासंदर्भात कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन न मिळाल्यामुळे तो शिक्षणासाठी परदेशी जाऊ शकला नाही. ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

कमी उत्पन्न गटातील जे विद्यार्थी आहेत त्यांना अशा प्रकारचे मार्गदर्शन कोठेही उपलब्ध नसते हा माझा पहिला मुद्दा आहे. नोकरी अनुरुप अभ्यासक्रम निवडावा लागतो परंतु त्या अभ्यासक्रमाची सांगड आपण घालत नाही. एआयसीटी रेकग्नाईज 67 डिप्लोमा कोर्सेस आहेत. हे कोर्सेस शासकीय कॉलेजमधून, खाजगी कॉलेजमधून शिकवले जातात. परंतु या ठिकाणी शिकवले जाणारे हे कोर्सेस कालबाहय झाले आहेत असे माझे स्वत:चे मत आहे. परेदशात जे कोर्सेस शिकवले जातात, त्यांचा जो सिलॅबस आहे त्याच्यांशी स्पर्धा करण्यात आपली मुले मागे पडतात ही वस्तुस्थिती आहे. परीक्षेत उत्तीर्ण कसे व्हावयाचे हे विद्यार्थ्यांना माहिती असते. समजा तुम्हाला अमेरिकन युनिव्हर्सिटीमध्ये प्रवेश पाहिजे असेल तर एजंटला पकडून त्यांची परीक्षा द्यावी लागते, परीक्षा पास झाल्यानंतर त्यांची जी काही 2-3 लाख फी असते ती देऊन, त्या ठिकाणची परीक्षा पास होऊन शिक्षण पूर्ण करावयाचे असते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याला जॉब मिळवून देणे ही त्या एजंटची जबाबदारी असते.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 10.15

डॉ.दीपक सावंत ..

त्यासाठी या विद्यार्थ्याच्या पालकांना लाखो रुपये खर्च करावे लागतात. इंजिनिअरींगच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे कॉम्प्युटर सायन्समध्ये एखाद्या विद्यार्थ्याला जर पी.एच.डी करावयाची असेल तर तो विद्यार्थी या देशात पी.एच.डी. करु शकत नाही त्यासाठी त्याला अमेरिकेमध्ये वा देशात जावे लागते. अशा प्रकारे इंजिनिअरींगच्या क्षेत्रातील विविध अभ्यासक्रम ठरविणारे जे काही तज्ज्ञ आहेत त्यांच्या विषयी पूर्णपणे आदर राखून मी सांगू इच्छितो की सध्याचा ट्रेन्ड कोणता आहे, आय.टी.क्षेत्रातील कोणत्या विषयाला प्राधान्य दिले पाहिजे व त्या दृष्टीने कोणता अभ्यासक्रम असावा हे ठरविणारी जी कोणती संस्था असेल त्यामध्ये नुकताच ग्रॅज्युएट झालेल्या ; वा पोस्ट ग्रॅज्युएट झालेल्या तरुण मुलांचा समावेश करण्यात आला पाहिजे. कोणत्या क्षेत्रात जॉब मिळू शकेल हे त्यांना माहीत असल्यामुळे त्याच्या मार्गदर्शनाचा फायदा यासाठी घेण्यात आला पाहिजे. परंतु अशा प्रकारच्या मार्गदर्शनाच्या बाबतीत सध्या राज्यामध्ये दुर्देवाने कोणतीही व्यवस्था नाही.

सभापती महोदय, केन्द्र सरकारचे नॉलेज कॉर्पोरेशन असून त्यांनी प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत तसेच मेडिकल सायन्सच्या बाबतीत आणि तंत्रशिक्षणाच्या बाबतीत काही नॉर्म्स ठरवून दिलेले आहेत परंतु त्या संदर्भात आतापर्यंत कधीही ऊहापोह करण्यात आलेला नाही. या क्षेत्रामध्ये जो काही अभ्यासक्रम ठरविण्यात आला आहे त्यामध्ये काळानुरुप बदल करण्याची आवश्यकता आहे म्हणून माझी शासनाला अशी विनंती आहे की, आपल्या राज्यातील वा ग्रामीण भागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी परदेशामध्ये उच्च शिक्षणासाठी जाण्यासाठी तसेच त्यांना चांगले जॉब उपलब्ध व्हावेत यासाठी अभ्यासक्रमात योग्य तो बदल केला पाहिजे. काल सन्माननीय मंत्री श्री. चंद्रकांत हंडोरे यांनी असे सांगितले होते की, राज्याच्या आदिवासी क्षेत्रातील 72 मुले परदेशामध्ये शिक्षण घेण्यासाठी गेले होते हे सर्व विद्यार्थी आर्टस, सायन्स आणि कॉमर्स क्षेत्रातील होते ..

एक सन्माननीय सदस्य : मेडिकल आणि इंजिनिअरींगचे सुध्दा काही विद्यार्थी होते.

डॉ.दीपक सावंत : ठीक आहे.परंतु ज्या प्रमाणात या राज्यातील मुलांनी परदेशात उच्च शिक्षण घेण्यास जावयास पाहिजे होते त्या तुलनेने हे प्रमाण फारच कमी आहे. उच्च शिक्षण घेण्यासाठी परदेशात जात जात असतांना ग्रामीण भागातील वा शहरातील आर्थिक दृष्टया कमकुवत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारी आज एकही संस्था राज्यामध्ये नाही. तंत्र शिक्षणामध्ये

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

आय.टी., इंटेरिअर डेकोरेशन या सारखे जवळजवळ 67 प्रकारचे अभ्यासक्रम सध्या शिकविण्यात येत आहेत या अभ्यासक्रमामध्ये काळानुरुप बदल करण्याची गरज आहे. यासाठी जी एक तज्ज्ञ समिती आहे त्यामध्ये नुकत्याच उत्तीर्ण झालेल्या ग्रॅज्युएटस आणि पोस्ट ग्रॅज्युएटस तरुण मुलांचा समावेश करण्यात आला पाहिजे. सध्याचा ट्रेन्ड काय आहे व त्या दृष्टीने कोणता अभ्यासक्रम असावा याची त्यांना चांगली माहिती असते. आज कॅम्पस इंटरव्हयू मध्ये कोणत्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना अधिक मागणी आहे हे देखील त्यांना माहीत असते त्यामुळे वेलिंगकर, सोमय्या, जमनालाल बजाज या सारख्या नामवंत शैक्षणिक संस्थेतूनच मॅनेजमेन्टच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळावा यासाठी त्यांचा आग्रह असतो.

श्री.दिलीप वळसे - पाटील : सिडनहॅम कॉलेजमध्ये सुध्दा प्रवेश मिळविण्यासाठी आग्रह धरला जातो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, जमनालाल बजाज, सोमय्या आणि वेलिंगकर या संस्थेतच प्रवेश मिळाला पाहिजे असे विद्यार्थ्यांना वाटते त्या तुलनेने शासकीय संस्थांमधून प्रवेश मिळविण्याच्या बाबतीत त्यांचा फारसा आग्रह नसतो. हे विद्यार्थी अहमदाबाद येथील चांगल्या खाजगी संस्थेमध्ये जाण्यास देखील तयार असतात. आपल्या राज्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी जाता यावे व जागतिक स्पर्धेत या विद्यार्थ्यांना टिकून राहता यावे यासाठी इजिनिअरीगमधील अत्याधुनिक अभ्यासक्रम ठरविण्यासाठी तज्ज्ञ समिती गठीत करावी अशी मी या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने सूचना करतो आणि त्यांनी पॉझिटीव्ह उत्तर द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने एका महत्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित केली आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय,शिक्षणाच्या संदर्भात ज्यावेळी चर्चा केली जाते त्यावेळी शिक्षक आणि त्यांच्या वेतनश्रेणी या संदर्भातच मुद्दे उपस्थित केले जातात परंतु आज सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी समाजातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या बाबतीत ज्या काही अडचणी येतात त्यात सुधारणा करण्यासाठी नवीन कल्पना सुरु करण्याच्या संदर्भात आपली भूमिका मांडली आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/ 10:20

श्री.दिलीप वळसे पाटील...

आणि ज्या ज्याठिकाणी सरकारचे चुकत असेल त्या चुका दाखवून त्या दुरुस्त करण्याची संधी आपण मला दिल्याबद्दल मी माननीय सदस्यांचे आभार मानतो व त्यांना धन्यवाद देतो. सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, जस जसे शिक्षण क्षेत्रामध्ये बदल होत असतात तस तसे आपण सुध्दा बदलले पाहिजे. सुरुवातीच्या काळात सर्वांना साक्षर करण्याची आपली भूमिका होती. त्यानंतरच्या काळात आपण उच्च शिक्षणाच्या संदर्भात भूमिका स्वीकारली. आणि आज स्पेशालिटी शिक्षणाच्या संदर्भात भूमिका घेतली आहे. आजचे शिक्षण हे फक्त श्रीमंत किंवा एज्युकेटेड वर्गाचे राहिले नाही. सामान्य कुटुंबातील मुले, मुली सुध्दा मोठी स्वप्ने बघायला लागले आहेत, खेडापाडयातील मुले, मुली सुध्दा उच्च शिक्षणाचे स्वप्न बघावयास लागले आहेत. या राज्यामध्ये आपला महाराष्ट्र विद्यापीठ कायदा आहे. या कायद्यातील सर्व तरतुदी पाहिल्यातर या विषयावर या सभागृहामध्ये आपण अनेक वेळा चर्चा पाहिली आहे. आणि सभागृहाच्या बाहेर चाललेली चर्चा सुध्दा पाहिली आहे. सभापती महोदय, आम्ही स्वायत्त आहोत, आमच्या कामकाजामध्ये सरकारने भाग धेऊ नये, किंवा आमच्या कामकाजामध्ये सरकारने हस्तक्षेप करु नये अशी विद्यापीठांची भूमिका राहिली आहे. त्यामुळे राज्य सरकार विद्यापीठाच्या कामकाजामध्ये हस्तक्षेप करीत नाही. आज आऊटडेटेड होणारे अभ्यासक्रम आपण बदलले पाहिजेत याबाबत जाहीर भूमिका मांडली. त्यासाठी आपल्याला बेसिक चिंतन करावे लागेल. काल आलेला पेंटीयम 3 चा कॉप्युटर नंतर पेंटीयम 4 आल्यामुळे तत्काळ ॲब्सुलेट होऊन जातो. परंतु आपल्या विद्यापीठातील अभ्यासक्रम वर्षानुवर्षे बदलत नाही. याचे मूळ कारण आपण कायद्यामध्ये प्रोव्हिजन केली आहे. बोर्ड ऑफ स्टडीजच्या संदर्भात जे टिचर्स असतात, त्यामध्ये काही .इंडस्ट्री एक्सपर्ट असतात, एज्युकेनिस्ट असतात त्यांच्याकडून तो प्रस्ताव तयार होतो. तो तयार झाल्यानंतर ॲकॅडमिक कौन्सिलमध्ये जातो व तो तेथून आणखी वर जातो. आणि मग अभ्यासक्रमाचे रिफॉर्मेशन करावयास सुरुवात केली तर त्यासाठी अनेक विद्यापीठांना दोन-तीन वर्षाचा वेळ लागतो. याबाबत आपण याठिकाणी कन्सर्न व्यक्त केली तशाप्रकारचे कन्सर्न माझ्या मनातही आहे. सभापती महोदय, दुसऱ्या बाजूला टेक्नॉलॉजी यायला लागली. त्या माध्यमातून विद्यापीठ, कॉलेजमध्ये न जाता जगातील ज्ञान आपल्याला उपलब्ध व्हावयास लागले. अनेक विद्यार्थ्यांना परदेशात जाण्याची संधी उपलब्ध झाली. अनेक लोक परदेशातून येऊन कॅंपस काढावयास लागले. विशेषकरुन गॅट करार झाल्यानंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री.दिलीप वळसे पाटील...

शिक्षणाचा समावेश सेवा क्षेत्रामध्ये झाला. मी या सभागृहामध्ये अनेक वेळा सांगितले आहे की, या देशामध्ये येणारी गुंतवणूक फक्त इंडस्ट्रीमध्ये येईल किंवा व्यापारात येईल असे नाही. परदेशातील गुंतवणूक शिक्षण क्षेत्रामध्ये येईल आपण ज्या संस्थांचा उल्लेख केला, त्यामध्ये वेलिंगकर इंस्टिटयुट असेल. अहमदाबादच्या संस्थेचा उल्लेख केला ती संस्था असेल, या सर्व संस्था शासन नियंत्रित नाहीत त्या खाजगी संस्था आहेत. त्या संस्थांप्रमाणे विद्यापीठामध्ये सुध्दा रिसर्च अँड डेव्हलपमेंटचे काम झाले पाहिजे. तशाप्रकारचे नव नवीन इनोव्हेटीव्ह अभ्यासक्रम तयार करुन, मुलांना डिग्रीचे इ ाान मिळवून देण्याऐवजी त्यांची पर्सोनॅलिटी बिल्डिंग, कम्युनिकेशन स्किल आणि त्यांना अप टु डेट नॉलेज या सर्व गोष्टी या खाजगी संस्थामधून उपलब्ध केल्या जातात. त्यावेळी आपल्या सरकारी संस्थांना आणि विद्यापीठांना या संस्थाबरोबर, विदेशी संस्थाबरोबर यापुढील काळात स्पर्धा करावी लागेल. दुर्दैवाने आपल्याकडे आपण खाजगी अशाप्रकारची इनॅबिलिटी तयार करण्यासाठी या सभागृहामध्ये विधेयक आणले. सेल्फ फायनान्स युनिव्हर्सिटीच्या संदर्भात इनॅबिलिंग प्रोव्हिजन त्यामध्ये होती. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण उपस्थित आहेत. सभागृहामध्ये ते विधेयक मंजूर व्हावयाचे होते. ते सुरुवातीला काही काळ स्टॉल झाले होते. तुमच्या गावाला शेवटचा कार्यक्रम होता. कै. प्रमोद महाजन यांनी त्यावेळी माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांना सांगितले होते की, श्री. दिलीप वळसे पाटील यांचे विधेयक कोणत्याही परिस्थितीत मंजूर झाले पाहिजे. या सभागृहात ते विधेयक मंजूर झाल्यानंतर खालच्या सभागृहामध्ये ते विधेयक मांडण्यात आले, परंतु ते मंजूर झाले नाही. त्यामध्ये बाकीच्या माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यामुळे ते विधेयक त्याठिकाणी थांबले. सभापती महोदय, अभ्यासक्रमाच्या बाबतीत नवनवीन उपाय योजना आपल्याला केल्या पाहिजेत. त्या संदर्भात सॅम पिट्रोडा यांच्या अध्यक्षतेखाली नॅशनल नॉलेज कमिशन नेमण्यात आले. त्यांनी माननीय पंतप्रधानांना अहवाल सादर केला आहे.

(यानंतर श्री. सुंबरे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/SBT/MMP. श्री. सरफरे नंतर --- 10:25

श्री. वळसे-पाटील .....

पंतप्रधानांनी या संदर्भात काही धोरणात्मक निवेदनही केलेले आहे. उच्च शिक्षणावरील खर्च केंद्र सरकारने करावा की राज्य सरकारने करावा आणि सरकारने करावा की न करावा याबद्दल खूप चर्चा चालू आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये देखील चर्चा झाली. शिक्षण सर्वांसाठी की क्वालिटी एज्युकेशन असाही एक मुद्दा यात आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेने काही वर्षापूर्वी सर्वांसाठी शिक्षण अशा प्रकारची भूमिका याबाबतीत घेतली आणि आज जो शिक्षणाचा विस्तार झाला आहे तो त्याप्रमाणे झाला आहे. पण आता केंद्र सरकारने केंद्राच्या बजेटच्या गेल्या वर्षीच्या तरतुदीपेक्षा 9 पट तरतूद उच्च शिक्षणासाठी अधिक वाढविण्यासाठी निर्णय घेतलेला आहे. आज आम्ही आमच्या राज्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात शिक्षणासाठी तरतूद करूनही राज्याच्या उत्पन्नापेक्षा अडीच टक्क्यापेक्षा जास्त खर्च करीत नाही, तो खर्च 6 टक्के पर्यंत घेऊन जाण्याच्यादृष्टीने आपल्याला नियोजन करायचे आहे.

सभापती महोदय, मी गेले दोन दिवस येथे नव्हतो. दोन दिवसापूर्वी ह्यूमन रिसोर्सेस मंत्र्यांनी देशातील सगळ्या राज्यांच्या शिक्षण मंत्र्यांची एक परिषद दिल्लीत आयोजित केली होती आणि त्यात खूप विस्ताराने चर्चा झाली. दोन दिवस पूर्णवेळ ती परिषद चालली. सगळ्या राज्यांनी आपापले प्रेझेंटेशन तेथे केले. त्यांच्या राज्यात त्यांनी काय काय केले आणि काय केले नाही या संबंधात हे प्रेझेंटेशन होते. आता आपण जी मागणी केली आहे नेमके तेच म्हणणे तेथेही होते. म्हणजे दुसऱ्या राज्यांनी घेतलेले इनिशिएटीवज् आणि आपल्या राज्याने घेतलेले इनिशिएटीवज्, आपण जेथे शिक्षणामध्ये मागे आहोत, तेथे काही सुधारणेसाठी आपण मागे आहोत. म्हणजे त्या संदर्भात राज्य सरकारने काही काम केले नाही असे नाही. आपण येथे म्हटले की, लातूरच्या एका विद्यार्थ्याला मार्गदर्शन केले नाही. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, यापूर्वी या राज्यात कधीही घडले नव्हते ते करण्याचा आपण प्रयत्न केला आहे. गेल्या दोन वर्षामध्ये आम्ही या राज्याच्या तंत्र आणि उच्च शिक्षण विभागाच्या माध्यमातून जिल्हा पातळीवर जाऊन करिअर फेअर्स घेतलेली आहेत. 10-10, 20-20 हजार विद्यार्थी त्या करिअर फेअर्समध्ये सहभागी झाले. सगळ्या शिक्षण संस्थांना तेथे आम्ही बोलाविले, बँकांना, टेक्नॉलॉजिस्टना बोलाविले आणि तुमच्यासाठी उद्या, भविष्यात काय काय संधी उपलब्ध आहेत हे सांगण्याच्या, याबाबत मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने आपण अशी जवळपास 30-40 करिअर फेअर्स या राज्यामध्ये घेतलेली आहेत आणि त्यांना अतिशय

...... एल 2 ...

श्री. वळसे-पाटील...

मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळालेला आहे. आता अभ्यासक्रम विकसित करण्याचा प्रश्न यामध्ये आहे. आज विद्यापीठाच्या चाकोरीमधून विद्यापीठे बाहेर जाणार असतील तर सरकार म्हणून आपण त्यांना येथून काही डायरेक्शन्स देऊ शकतो का ? हा एक भाग आहे. दुसरा म्हणजे विद्यापीठांना स्वायत्तता देण्याच्या बाबतीत किंवा शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता देण्याच्या बाबतीत आपण निर्णय घ्यायला पाहिजे होता. मागे या ठिकाणी केळकर कॉलेज, वझे कॉलेजचे उदाहरण दिले होते. मी जेव्हा ॲटॉनॉमीच्या संदर्भात सगळ्या शिक्षण संस्थांकडे जात होतो, हे ठीक आहे की, या संदर्भात विद्यापीठाला जे काही करायचे आहे ते करू द्यात, पण तुमची संस्था तुम्हाला एक्सलन्समध्ये आणावयाची असेल तर तुम्ही तुमचा स्वत:चा अभ्यासक्रम तयार करा, त्याप्रमाणे तुम्ही विद्यार्थ्यांना शिकविण्याचा प्रयत्न करा. त्यावेळेस लोक मला विचारू लागले की, तुम्ही दुसऱ्यांना मार्गदर्शन करायला निघाला आहात पण तुमच्या सरकारी संस्थांमध्ये तुम्ही काय करीत आहात ? मी त्यांना म्हटले की, आम्ही सरकारी संस्थांमध्ये देखील याबाबतीत ओपन आहोत. युडीसीटीला आपण ॲटॉनॉमी दिली, व्हीजेटीआयला, पुणे इंजिनिअरींग कॉलेजला ॲटॉनॉमी दिली. नांदेड इंजिनिअरींग कॉलेजलाही ॲटॉनॉमी दिली. आज तेथे त्यामुळे नवीन काम सुरू झालेले आहे. अशाच प्रकारचे काम आपल्याला येथेही सुरू करायचे असेल, आज आमची सरकारची जी शासकीय कॉलेजेस आहेत, पॉलिटेक्निक्स आहेत त्यामध्ये आता आपण इंडस्ट्रीज बरोबर पार्टनरशीप करायचे काम सुरू केलेले आहे. आपण जवळपास आतापर्यंत 67-68 आयटीआयमध्ये उद्योग आणि आयटीआय यांचे आपण एमओयू साईन केले आहेत. त्यामध्ये एखाद्या कंपनीने एखाद-दोन आयटीआय सिलेक्ट करायचे आणि त्या कंपनीच्या मॅनेजमेंटखाली ती आयटीआय चालविली जातील. त्यांचे ज्ञान वाढविण्यासाठी त्यांनी प्रयत्न करायचा आणि त्यामधून आपण जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे की, उद्योगाला लागणारे नेमके मॅनपॉवर तयार करण्याच्या संदर्भातील कार्यक्रम ऑलरेडी आपण सुरू केला आहे. स्वायत्तता देऊन हायर लर्निंग संस्थांमध्ये देखील हे काम आपण प्रत्यक्षपणे सुरू केलेले आहे. आता प्रश्न राहतो तो हा की, विद्यापीठांमध्ये हे काम कसे सुरू करता येईल. मी या संदर्भात एक निर्णय ऑलरेडी घेतलेला आहे. देशातील दोन दिवसांची शिक्षणविषयक परिषद संपल्यानंतर आणि आताचे हे विधीमंडळाचे अधिवेशन संपल्यानंतर उद्याच्या 8-15 दिवसात दिल्लीतील एचआरडी मिनिस्ट्री आणि युनिवर्सिटी ग्रँट कमिशन, एआयसीटीचे प्रमुख आणि बाकीच्या सर्व

...... एल 3 ...



KBS/SBT/MMP. श्री. सरफरे नंतर --- 10:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील .....

संबंधित लोकांना मी येथे बोलाविणार आहे. एक दोन दिवसांचे वर्कशॉप घेणार आहे. या संदर्भात मी विधानसभेतील काही आमदारांशीही बोललो आहे, मंत्री महोदयांशीही बोललो आहे. आपल्याला या सभागृहाच्या बाहेर देखील कधी तरी दोन दिवस या प्रश्नासाठी बसायला पाहिजे. आपली स्टेट एज्युकेशन कौन्सिल आहेच. आपल्याला नॅशनल नॉलेज कमिशनने केलेल्या शिफारशी या राज्यात राबविण्याच्या दृष्टीकोनातून काय करायला पाहिजे कारण आम्ही जेव्हा म्हणतो की, आणखी 20 वर्षांनी जगातील सगळ्यात तरूण लोकसंख्येपैकी 50 टक्के लोकसंख्या ही भारतात असणार आहे तेव्हा जगाच्या दृष्टीकोनातून असलेली ही मोठी बाजारपेठ बाकीच्या या सगळ्या राजकारणात बाजूला राहून, आमच्या या तरूण पिढीचे भवितव्य आजपासून 10-20 वर्षांनंतर काय राहणार आहे याच्या संदर्भात आपल्याला केव्हा तरी एकदा शांतपणे बसून विचार केला पाहिजे. आवश्यकता असेल तर या दोन दिवसाच्या वर्कशॉप नंतर राज्य पातळीवर एखादे स्टेट नॉलेज कमिशनदेखील आपण नेमू. ....

( यानंतर सौ. रणदिवे .... एम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ SBT/ MMP/ MMP/

10:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 10:35

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

त्यामध्ये संबंधित विद्यापीठाच्या कुलगुरुंना, सन्माननीय सदस्यांना, शिक्षण संस्थांना चर्चेसाठी बोलविण्यात येईल. तसेच दिल्ली येथील सर्वांना बोलाविण्यात येईल आणि त्यामध्ये सब कमिटी तयार करु. तसेच कोणकोणत्या क्षेत्रामध्ये नक्की कशा प्रकारच्या सुधारणा करावयास पाहिजेत याचा विचार करु. तसेच अभ्यासक्रमाचा आणि आपल्या राज्याच्या दृष्टीने क्वॉलिटी इम्प्रुव्हमेंट हा महत्वाचा मुद्दा देखील घ्यावा लागेल. या दृष्टीकोनातून पुढच्या कालावधीमध्ये पावले उचलण्यात येतील. तुमच्या मनामध्ये जो कन्सर्न आहे, तोच आमच्याही मनामध्ये आहे. म्हणून आम्ही त्यातून मार्ग काढण्यासाठी पुढे जाण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहोत. एक गोष्ट सांगावयास पाहिजे की, केंद्र शासन उच्च शिक्षणासाठी मोठया प्रमाणात बजेट वाढवून देणार आहे. त्यामुळे या राज्याचे बजेट मंजूर करीत असताना आपल्या सर्वांचा असा आग्रह राहिला पाहिजे की, राज्य शासनाने सुध्दा आपल्याला तेवढया मोठया प्रमाणात बजेट उपलब्ध करुन दिले पाहिजे. एकदा या सर्व गोष्टी सुरु झ ााल्या की, मग विद्यापिठांनी सुध्दा केवळ परीक्षा केंद्राच्या ऐवजी रिसर्च ॲण्ड डेव्हल्पमेंट मग ती कृषी विद्यापीठे असू दे, टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीज् असू दे, संस्कृत विद्यापीठ असू दे, ओपन युनिव्हर्सिटी असू दे, आपल्याला या सर्वच विद्यापीठांमध्ये काम करणे गरजेचे आहे. प्रत्यक्षात सरकारने त्या दिशेने काम सुरु केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने हा महत्वाचा विषय उपस्थित केला आणि त्याबाबतीत चर्चा घडवून आणली त्याबद्दल मी धन्यवाद देतो. याबाबत पुढच्या काळामध्ये चर्चा करण्यासाठी जरुर सर्वांना आमंत्रित करण्यात येईल आणि त्या बैठकीमध्ये या राज्याचे पुढील दहा-वीस वर्षाचे धोरण निश्चित करुन त्यात पुढे जाण्याची भूमिका घेऊ एवढे मी सांगू इच्छितो आणि शेवटी मी सन्माननीय सदस्यांचे आभार मानून माझे भाषण संपवितो.

-----

. . . .एन-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई,ठाणे,रायगड जिल्हयांमध्ये बोगस मच्छिमारी सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्याबाबत

**मु.शी.** : मुंबई,ठाणे,रायगड जिल्हयांमध्ये बोगस मच्छिमारी सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 42396 ला दिनांक 17 जुलै 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.अरविंद सावंत वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय,"मुंबई,ठाणे, रायगड जिल्हयांमध्ये बोगस मच्छिमारी सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्याबाबत"या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 42396 ला दिनांक 17 जुलै 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यामध्ये बोगस मच्छिमारी सहकारी संस्था स्थापन करण्याबाबत" माझी ही अर्ध्या तासाची चर्चा असून, आपण मला ती येथे मांडण्यासाठी परवानगी दिली, त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, मासा पाणी पितो का ? असे विचारले तर ते कळणार नाही आणि तो किती पाणी पितो ? असे विचारले तर तेही सांगता येणार नाही. तसे या संस्थांच्या संदर्भात सुध्दा आहे. सन्माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफसाहेब, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या विभागाशी संबंधित मत्स्य उद्योग अधिकारी आणि उप निबंधक अधिकारी आहेत. पण दुदैवाने विद्यमान स्थितीमध्ये दोन्हीही पदे एकाच अधिकाऱ्याकडे आहेत. मी यासंदर्भात प्रश्न विचारला होता. परंतु त्याचे समाधानकारक उत्तर मिळाले नाही म्हणून याठिकाणी चर्चा उपस्थित करण्यात आली आहे.माझ्याकडे माहिती असून 19 सोसायट्यांनी 19 सहकारी संस्था स्थापन केल्या.या सहकारी संस्था स्थापन केल्यानंतर त्यांना त्यांच्या कार्यालयाचा पत्ता द्यावा लागतो, दूरध्वनी क्रमांक सांगावा लागतो.पण उप निबंधकांनी यासंबंधात कोणतीही चौकशी न करता या सर्व संस्था नोंदणीकृत केल्या.एवढे करुन थांबले नाहीत तर केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या यासंदर्भातील ज्या योजना

. . . .एन-3





श्री.अरविंद सावंत . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत, त्या योजनांसाठी असलेले पैसे कसे लुटले ? ते पहावयाचे असेल तर त्याचे उदाहरण म्हणजे उपनिबंधकांनी केलेले काम आणि या सहकारी संस्था आहेत. एकेका संस्थेकडे पाच-पाच, सहा-सहा सदस्य आहेत आणि एकेका सदस्याने 40-40 लाख रुपयांचे अनुदान घेतलेले आहे. पण आता ते सदस्य कोण ? ती संस्था कोणती आहे ? त्यांचे कार्यालय कुठे आहे ? हे देखील माहिती नाही. 40 कोटी रुपये वाटण्यात आले, पण त्याबाबतीत चौकशी झाली नाही. म्हणून आमचे सहकारी विधान परिषदेचे माजी सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना 28 मे रोजी एक पत्र दिले. त्याच दिवशी त्यांनी संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांना देखील पत्र दिले. 28 मे रोजी पत्र दिले आणि आज 26 जुलै आहे म्हणजे पत्र देऊन तीन महिने झाले आहेत. आपण या तीन महिन्यामध्ये याबाबतीत कोणती चौकशी केली आहे ? मी आपल्या माहितीसाठी काही सोसायट्यांची नावे वाचून दाखवितो. 1) त्रिमूर्ती मच्छिमारी सहकारी संस्था. 2) माता एकवीरा मच्छिमारी सहकारी संस्था, ससून डॉक 3) भगवती मच्छिमारी सहकारी संस्था, रत्नागिरी 4) काड सिध्देश्वर मच्छिमारी सहकारी संस्था, दापोली इ.अशा एकंदर 19 सहकारी संस्था आहेत. पण मी सगळयांची नावे वाचत नाही. या प्रत्येक संस्थेने त्यांच्या प्रत्येक सदस्यांसाठी 40-40 लाख रुपये घेतले. पण बोट किंवा इतर काहीही खरेदी केली नाही. अशा प्रकारे 40 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात आला. तेथे श्री.जाधव व श्री.सोनकुरे नावाचे अधिकारी आहेत, या दोन अधिकाऱ्यांनी तेथे धुमाकूळ घातलेला आहे, त्याची चौकशी मागील दोन महिन्यामध्ये केलेली आहे काय ? जर चौकशी केली असेल तर त्यातून काय निष्पन्न झाले आहे ? जर या चौकशीतून काहीही निष्पन्न झाले नसेल तर याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांना आणि इतरांना पत्र दिल्यानंतर सुध्दा त्याबाबत काही झालेले नाही. त्यामुळे मी आज येथे यासंदर्भात अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून येथे हा प्रश्न उपस्थित करीत आहे. तेव्हा आपण संबंधितांवर कोणती कारवाई करणार आहात ? याबाबतीत सी.आय.डी.मार्फत चौकशी करणार आहात का ? जर अशा प्रकारे चौकशी करणार असाल तर ती किती दिवसामध्ये केली जाणार आहे? असे माझे मुलभूत प्रश्न आहेत आणि यानिमित्ताने तेवढयाच विषयाबाबत चर्चा उपस्थित केलेली आहे. धन्यवाद.

----

यानंतर श्री.बरवड . . . .

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ( मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी या अर्धा-तास चर्चेमध्ये ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 19 बोगस मच्छिमार संस्थांबद्दल या ठिकाणी काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. वास्तविक मच्छिमार संस्थेची जी नोंदणी होते त्यामध्ये दोन अटी असतात. एक अट अशी असते की, जे मत्स्यव्यवसाय अधिकारी असतात त्यांच्याकडून नाहरकत प्रमाणपत्र आल्यानंतर उपनिबंधकांकडे प्रस्ताव दिला जातो.

श्री. अरविंद सावंत : मत्स्यव्यवसाय अधिकारी आणि उपनिबंधक ही दोन्ही पदे एकाच व्यक्तीकडे असल्यामुळे सगळे साटेलोटे करुन ते केलेले आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मत्स्यव्यवसाय अधिकारी यांच्याकडून नाहरकत प्रमाणपत्र आल्यानंतर उपनिबंधकांकडे प्रस्ताव दिला जातो आणि मग त्या संस्थेची नोंदणी होते. नोंदणी झाल्यानंतर एन.सी.डी.सी.कडून त्यांना बोट बांधण्यासाठी कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. त्यांना सवलतीच्या दरामध्ये आपण सर्व मदत करीत असतो. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी त्रिमूर्ती, माता एकविरा, भगवती, काड सिध्देश्वर अशा 19 संस्थांच्या चौकशीची मागणी केलेली आहे. त्यांची निश्चितपणे चौकशी केली जाईल. आतापर्यंत कधी याची चौकशी झालेली नाही आणि अहवाल आलेला नाही. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, ते दोषी असतील तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करु असे मी आश्वासन देतो.

श्री. अरविंद सावंत : प्रधान सचिवांना 28 मे रोजी पत्र दिले तसेच माननीय मुख्यमंत्र्यांना सुध्दा 28 मे रोजी पत्र दिले. 28 मे रोजी पत्र मिळाल्यापासून ज्या प्रधान सचिवांनी कोणतीही कारवाई केलेली नाही त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार ? यामध्ये मोठा भ्रष्टाचार झालेला आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ते तपासून बघू. मी सांगू इच्छितो की, याबाबतीत ताबडतोबीने चौकशी करुन आपल्याला अहवाल देऊ.

श्री. अरविंद सावंत : हे आपण किती दिवसामध्ये पूर्ण करणार ?

श्री. हसन मुश्रीफ : हे तीन महिन्यात पूर्ण करु.

----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. उल्हास पवार )**

**पृ. शी.** : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा तोटा दूर करण्याबाबत करावयाची उपाययोजना

**मु. शी.** : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा तोटा दूर करण्याबाबत करावयाची उपाययोजना यासंबंधी श्री. संजय केळकर, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यात सुमारे 16 हजार गाड्यांतून वर्षाला 60 लाख प्रवासी रोज प्रवास करणे व दररोज 8 कोटी रु.उत्पन्न राज्य परिवहन महामंडळाला मिळणे, आतापर्यंत सुमारे 1200 कोटी रु.संचित तोटा असणे, दुर्गम भागात जनतेच्या सोयीसाठी तोट्यातील फेऱ्या घालाव्या लागणे, शासनाने जाहीर केलेल्या विविध 22 प्रकारच्या सवलतीमुळे तोट्यात वाढ होणे, महाराष्ट्र परिवहन महामंडळावर राज्य शासनाकडून आकारण्यात येणारा कर इतर राज्यांच्या तुलनेत प्रति तिकीट सुमारे 10 टक्के जास्त असणे, खाजगी टेम्पो, बस, ट्रॅक्स, ट्रॅक्टर, जीप व रिक्षांमार्फत अवैध वाहतुक सुरु असणे, राज्य परिवहन महामंडळाच्या कामगार संघटनेच्या वतीने शासनाने प्रवासी कर रद्द केल्यास राज्य परिवहन महामंडळाच्या भाड्यात 18 ते 20 टक्के तिकीट दर कमी होणेबाबत देण्यात आलेला प्रस्ताव, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील तोटा दूर करण्याबाबत, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, परिवहन या विषयाच्या संदर्भात मी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. या विषयाच्या संदर्भात दोन दिवसांपूर्वी सभागृहात चर्चा झालेली आहे. 1 जून रोजी आपल्या राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेला 60 वर्षे पूर्ण झालेली आहेत. प्रगत राष्ट्रांनी सार्वजनिक वाहतूक सेवा बळकट करण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्यामुळे आपल्या राज्यामध्ये सुध्दा सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत. एस. टी. महामंडळाला यावेळी जरी 158 कोटी रुपयांचा नफा दाखविलेला असला तरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3...

RDB/ KGS/ MMP/

श्री. संजय केळकर ....

वर्षानुवर्षे एस. टी. तोट्यात चाललेली आहे. एस. टी. हा गरीबरथ आहे. सामान्य माणसाला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्याचे अतिशय उत्तम साधन म्हणून एस.टी.कडे पाहिले जाते. म्हणूनच गाव तिथे रस्ता आणि रस्ता तिथे एस.टी. अशा प्रकारची भूमिका घेऊन एस.टी. महामंडळ काम करीत असते. परंतु या सगळ्या एस.टी. चा बोजवारा उडालेला आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, आकाशच फाटले आहे त्यामुळे कोठे कोठे ठिगळ लावणार ? आकाशच फाटले आहे तर एकदा ठिगळ लावून ते होईल असे मला वाटत नाही. एस. टी. तोट्यात जाण्याची अनेक कारणे आहेत. 60 लाख लोक एस.टी.ने प्रवास करतात. एस. टी. ने 1 कोटी लोक प्रवास करु शकतात परंतु अवैध वाहतुकीमुळे एस. टी. च्या प्रवासी संख्येवर आणि फेऱ्यांवर परिणाम झाला. आपल्याकडे एस. टी. बसेस उपलब्ध नाहीत. नवीन एस. टी. बसेसची खरेदी होत नाही. त्यामुळे त्याचा परिणाम या सगळ्या विषयावर होतो. परंतु केंद्र सरकार आणि राज्य सरकारने यावर जी जबर आकारणी केलेली आहे ती आकारणी कमी करण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.बरवड 10:40

श्री.संजय केळकर....

प्रवासी कर सध्या 17.5 टक्के आहे तो कमी केला तर काही प्रमाणात ही तूट कमी होईल. त्यामुळे नवीन एस.टी.चे मार्ग सुरु करता येतील, नवीन बसेसची खरेदी करता येईल, बसेसची दुरुस्ती करता येईल. सभापती महोदय, एस.टी.च्या चालकांचे मला खरोखर कौतुक वाटते. एस.टी.चा हॉर्न सोडून सगळे आवाज येतात, तरी देखील तो चालक एस.टी.चालवित असतो. त्यामुळे मला त्यांचे नेहमी कौतुक वाटते. हे चालक ग्रामीण भागातील गरीब माणसांना योग्य ठिकाणी पोहोचवितात, काही ठिकाणी मुक्कामी राहतात. यामध्ये सुधारणा करावयाची असेल तर त्यासाठी काही गोष्टी शासन देखील करु शकते. प्रवासी कर 17.5 टक्के आहे तो कमी केला तर त्याचा उपयोग होऊ शकतो.

सभापती महोदय, एस.टी.ला सवलतीच्या दरामध्ये डिझेल पुरविले पाहिजे. अनेक बाबींच्या संदर्भात शासनाकडून विक्री करामध्ये सूट दिली जाते. त्यानुसार विक्री करामध्ये सूट दिली तर तूट भरुन निघेल असे माझे मत आहे. टोल टॅक्स तर एस.टी.साठी रद्दच केला पाहिजे. एस.टी.तून प्रवास करणारे प्रवासी गरीब असतानाही एस.टी.ला टोल टॅक्स लावला जातो. हा कर रद्द केला तर सगळयाच बाबतीत फरक पडू शकतो. तसेच राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये एस.टी.बसेससाठी वेगळी तरतूद करण्याची आवश्यकता आहे. एस.टी.च्या माध्यमातून महसूल मिळतो तो प्रशासकीय आणि रुटीन खर्च भागविण्यावर खर्च होतो. त्यामुळे नवीन कोणत्याही बाबीसाठी महामंडळाकडे पैसे शिल्लक रहात नाहीत. म्हणून अर्थसंकल्पामध्ये एस.टी.साठी वेगळी तरतूद केली पाहिजे. त्याचबरोबर शासनाने आणखी काही बाबींच्या संदर्भात निर्णय घेणे आवश्यक झाले आहे. ज्येष्ठ नागरिकांना साध्या एस.टी.बसमध्ये सवलत दिली जाते. परंतु ही सवलत एशियाड किंवा त्यावरील वरच्या दर्जाच्या बसेससाठी दिली जात नाही. हे ज्येष्ठ नागरिक गरीब आहेत म्हणून ते साध्या बसमधून प्रवास करतात. त्यामुळे अशा बसेसमधून प्रवास करणा-या ज्येष्ठ नागरिकांना सवलत लागू करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना 1986 सालापासून एस.टी.च्या प्रवासामध्ये सवलत दिलेली आहे. त्यानंतर यासंदर्भात पुन्हा सुधारित जी.आर.काढण्यात आलेला नाही किंवा नवीन धोरण स्वीकारलेले नाही. सध्या ग्रामीण भागात अनेक नवनवीन कोर्सेस सुरु झ ाले असल्यामुळे अनेक मुलेमुली हे कोर्सेस शिकण्यासाठी एस.टी.तून प्रवास करतात. पण हे





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.संजय केळकर....

कोर्सेस शिकणा-या विद्यार्थ्यांना एस.टी.कडून प्रवास सवलत मिळत नाही. याबाबत मी अनेकवेळा एस.टी.महामंडळाकडे पत्रव्यवहार केलेला आहे. मंत्रिमहोदय याबाबत अनुकूल आहेत, पण शासनाने यासंबंधी निर्णय घेतला पाहिजे असे त्यांनी उत्तरात कळविले आहे.

कोकणामध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या अंतर्गत लोक विद्यालयातर्फे 1 वर्षापासून अनेक कोर्सेस शिकविले जात आहेत. या कोर्सेससाठी खेडयापाडयातून मुलेमुली येतात. त्यांना कोणत्याही एस.टी.बसमध्ये सवलत मिळत नाही. ही मुले गरीब घरातील असल्यामुळे त्यांना एस.टी.ची प्रवास सवलत मिळाली पाहिजे. मला सांगण्यास आनंद वाटतो की, या लोक विद्यालयाच्या माध्यमातून गेल्या वर्षभरामध्ये 850 मुलींना कोठल्या ना कोठल्या रुग्णालयामध्ये नोकरी मिळाली आहे.

सभापती महोदय, एस.टी.महामंडळामध्ये अनेक संवर्गातील पदे रिक्त आहेत. 1400 वाहकांची आणि 600 यांत्रिकी कामगारांची पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे न भरल्यामुळे अनेक ठिकाणच्या फायद्याच्या फे-या सुरु करता येत नाहीत. त्याठिकाणी नवीन फे-या सुरु केल्या तर एस.टी.चा महसूल वाढू शकतो. त्यामुळे ही रिक्त पदे लवकरात लवकर भरावीत. खाजगी वाहतूकदार या संधीचा फायदा घेत आहेत. लोकांच्या सोयीसाठी शासनाने हा सार्वजनिक उपक्रम सुरु केलेला आहे. परंतु शासनाचे या उपक्रमाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे खाजगी अवैध वाहतुकीला प्रोत्साहन मिळत आहे. लोकांना नाईलाजास्तव खाजगी वाहतुकीने जादा पैसे देऊन प्रवास करावा लागत आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 10:50

(श्री. संजय केळकर....)

अनेक गोष्टींवर केलेला खर्च फुकट गेलेला आहे. मागे 55 कोटी रुपयाची वायरलेस यंत्रणा सुरु केली होती ती नीट कार्यान्वित होऊ शकली नाही. त्यावरील सर्व खर्च वाया गेला. या वायरलेस यंत्रणेचे पुढे काय झाले याची माननीय मंत्री महोदयांनी उच्चस्तरीय चौकशी करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बस स्थानकांची अतिशय दुरवस्था झालेली आहे. ही बस स्थानके पंचतारांकित असावीत असे मी म्हणत नाही. परंतु ज्या काही योजना एस.टी. महामंडळाने बनविलेल्या आहेत त्या तरी नीट राबविण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील बस स्थानकावरील प्रसाधनगृहे, कॅण्टीन कसे स्वच्छ राहातील याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. एस.टी.मध्ये जसे कार्यक्षम कर्मचारी आहेत तसेच अकार्यक्षम देखील आहेत. मी एक परभणीचे उदाहरण देतो. परभणी येथील कदम नावाच्या लिपिकाने फसवणूक केली, तो दोषी आढळला, उपाध्यक्षांनी त्याबाबतीत लेखी आदेश काढले, तरी देखील त्याला कामावर ठेवलेले आहे. तेव्हा ही एस.टी. तोट्यात जाऊ नये यासाठी अनेक प्रकारच्या सुधारणा करणे जसे आवश्यक आहे तसे योग्य प्रशासन देखील आवश्यक आहे. हा गरिबांचा रथ संपूर्ण राज्याची वाहिनी आहे. ती अधिक सक्षम कशी होईल यादृष्टीने शासनाने पावले उचलावीत एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--

श्री. दिवाकर रावते : तालिका सभापती महोदय, या अर्धा-तास चर्चेसंबंधी काही महत्वाचे मुद्दे मांडण्यासाठी मला परवानगी द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी एका मिनिटात आपले मुद्दे मांडावेत.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : तालिका सभापती महोदय, परवा एस.टी.च्या संदर्भात विधानपरिषद नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, एस.टी. सीएनजी गॅसवर चालविण्यासाठी खर्च करीत आहोत. यासंबंधी मला काही महत्वाचे मुद्दे माननीय मंत्री महोदयांसमोर उपस्थित करावयाचे आहेत. त्या मुद्यांचा त्यांनी खुलासा करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. खरे म्हणजे मी यासंबंधी त्यांना पत्र देणार होतो. परंतु एस.टी.च्या संदर्भात अर्धा-तास चर्चा याठिकाणी उपस्थित झालेली असल्यामुळे सभागृहाच्या माध्यमातून ते मुद्दे मी माननीय मंत्री महोदयासमोर मांडत आहे.

सीएनजी गॅसमुळे गाडयांची गती कमी होते. पेट्रोल आणि डिझेलवर चालणा-या गाडयांना जेवढा पिकअप आणि गती मिळते तेवढी सीएनजी गॅसवर चालणा-या गाड्यांना मिळत नाही.

सीएनजी गॅस वापरण्यासाठी एस.टी.च्या सर्व गाडयांतील इंजिनमध्ये परिर्वतन करावे लागेल आणि त्यासाठी खूप खर्च येईल. हा खर्च केल्यानंतर एस.टी.च्या सर्व गाडयांना सी.एन.जी.गॅस उपलब्ध करुन देण्यासाठी ठिकठिकाणी सीएनजीचे सेंटर्स उघडावे लागतील.

गाडयांची गती कमी झाल्यामुळे प्रत्येक ठिकाणच्या फे-यांची फ्रिक्वेन्सी कमी होईल, त्यामुळे फे-या कमी होतील. एस.टी.चा प्रत्येक कि.मी.वर हिशेब असतो. फे-या कमी झाल्यामुळे उत्पन्न कमी होईल, अवैध वाहतूक वाढेल. अवैध वाहतूक करणा-या एक लाख जीप्स आहेत त्या दोन लाख होतील.

बदलत्या काळानुसार एस.टी.ने गतिमान सेवा देण्याची गरज आहे. तेव्हा कुणाचे हितसंबंध जपण्यासाठी एस.टी.गाडया सीएनजी गॅसवर करावयाच्या असतील तर सर्व गाडयांच्या इंजिनमध्ये परिवर्तन करावे लागेल, ठिकठिकाणी सीएनजी गॅस सेंटर्स् उघडावे लागतील, गाडयांची गती कमी झाल्यामुळे फे-या कमी होतील परिणामी उत्पन्न कमी होईल आणि अंतिमत: तोट्यात चालणारी एस.टी. आणखी तोट्यात जाईल. या वर्षी ही एस.टी.फायद्यामध्ये आणल्याबद्दल मी महामंडळाचे अध्यक्ष श्री. सुधाकर परिचारक तसेच एस.टी.चे अधिकारी आणि कर्मचा-यांचे अभिनंदन करतो. या वर्षी त्यांनी 35 कोटीचा नफा मिळवून दाखवला. या वर्षी फायदा झाला असला तरी एस.टी.चा संचित तोटा त्यामुळे भरुन निघत नाही. तेव्हा चुकीचे निर्णय घेऊन या एस.टी.ला आणखी खड्डयात घालण्याचे काम होता कामा नये. तेव्हा मी उपस्थित केलेल्या मुद्यांचा माननीय मंत्री महोदयांनी

..3..



MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 10:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

साकल्याने विचार करावा एवढे बोलून आणि मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल तालिका सभापती महोदय, आपले आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो.

---

..नंतर श्री. कानडे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.शिगम 10:55

श्री. हसन मुश्रीफ (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून एस.टी. बाबत चर्चा उपस्थित केली आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सुध्दा या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने मार्गदर्शन केले. वास्तविक दोन दिवसापूर्वी नियम 260 अन्वये याच विषयावर प्रस्ताव आला होता आणि त्यावेळी बरीच चर्चा झाली होती. सविस्तरपणाने एस.टी.चे धोरण आणि एस.टी.महामंडळ करीत असलेले काम कसे आहे हे सांगण्याचा माननीय सदस्यांनी प्रयत्न केला होता. माननीय सदस्य श्री. केळकर यांना त्या प्रस्तावावर बोलण्याची संधी मिळाली नव्हती म्हणून त्यांनी आज अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून याविषयावर बोलण्याची संधी घेतली आहे. 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर चर्चा झाली त्यावेळी एस.टी.महामंडळाने आजपर्यंत केलेल्या कामाची मुक्तकंठाने प्रशंसा आणि गौरव केला होता. 1948 साली एस.टी.महामंडळाची स्थापना झाली आणि आज एस.टी.ला 2008 मध्ये 60वर्षे पूर्ण झाली आहेत. राज्याच्या जीवनाशी निगडीत असलेली आणि लोकांच्या दैनंदिन जीवनाशी एकरुप झालेली एस.टी.अशा तऱ्हेने अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. एस.टी.सुरु झाली की पूर्वी गावागावात तिची पूजा करुन फटाके फोडून स्वागत केले जात होते. 'गाव तेथे एस.टी.' हे शासनाचे धोरण आहे. 580 कोटी रुपयांचा संचित तोटा एस.टी.ला होता ज्याचा उल्लेख माननीय सदस्य श्री. रावते साहेब यांनी केला. परंतु एस.टी.च्या कर्मचाऱ्यांनी अतिशय चिकाटीने आणि जिद्दीने 2006-07 मध्ये 23 कोटी रुपयांचा नफा मिळविला तर 2007-08 मध्ये 158 कोटी रुपयांचा नफा मिळविला. सदनामध्ये माहिती देण्यासाठी मी एस.टी.महामंडळाकडून माहिती घेतली असता असे दिसून आले आहे की गेल्या तीन महिन्यात एस.टी.महामंडळाने 50 कोटी रुपयांचा नफा मिळविला आहे. 15 ते 16 हजार गाडया असलेली आणि 247 डेपो असलेली एस.टी.महाराष्ट्राच्या खेडयापाडयातून रस्त्यावर धावत आहे. यानिमित्ताने प्रश्न विचारला की इतर राज्यामध्ये प्रवासी कर सात ते साडेसात रुपये असताना महाराष्ट्रात मात्र 17 रुपये 50 पै.इतका आकारला जातो तो कमी करण्यात यावा. निश्चितपणाने याचा विचार केला जाईल. तसेच डिझेलवर व्हॅट लावतो तो सुध्दा कमी करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे. टोलटॅक्सच्या रुपाने महामंडळाला 35 कोटी रुपये भरावे लागतात. त्याबाबतीत सुध्दा विचार करण्यात येत आहे आणि आता निविदा काढताना अट घातली जाईल आणि कालावधी वाढवून देता आला तर विचार केला जाईल. टोलटॅक्स बंद करता आला तर 35 कोटी रुपये एस.टी.महामंडळाला अधिक

....2

श्री. हसन मुश्रीफ .....

मिळतील. सध्या एस.टी.महामंडळ शासनाच्या विविध प्रकारच्या 22 योजनांद्वारे प्रवाशांना सवलत देत आहे. यामध्ये स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक, दलितमित्र, आदिवासी मित्र पुरस्कार विजेते, आदी योजनांचा समावेश आहे. 500 कोटी रुपये यासाठी खर्च येतो आणि टॅक्समध्ये त्याचे समायोजन करतो. निमआराम आणि आराम बसेसमध्ये सुध्दा या योजनेमधून सवलत दिली जाईल असे माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात जाहीर केलेले आहे. विद्यार्थ्यांना मात्र नवीन कोर्सेसच्या बाबतीत प्रवासासाठी सवलत देता येईल काय याबाबत विचार करण्यात येईल. वाहन चालकांची पदे भरण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून जाहिरात दिलेली आहे. 50 कोटी रुपयांची वायरलेस यंत्रणा बसविली त्याचे काय झाले असा प्रश्न विचारला आहे. याची निश्चितपणाने चौकशी करण्यात येईल. 50 कोटी रुपयांची वायरलेस यंत्रणा निकामी झाली असेल तर चौकशी करु. बस डेपोच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करण्यात आला. आता आपण बीओटी तत्वावर बसस्टॅन्ड दिलेले आहेत. यासाठी बऱ्याच निविदा आलेल्या असून अनेक ठिकाणी निविदा यावयाच्या आहेत. त्याचप्रमाणे माननीय सदस्यांनी परभणीच्या डेपोमधील लिपिकासंबंधी उल्लेख केला. त्याबाबतीत सुध्दा निश्चितपणाने चौकशी केली जाईल. एस.टी.बसेस सीएनजीवर चालविण्याबाबत अनेक माननीय सदस्यांनी मागणी केली होती. त्यातून बराच फायदा होईल असे सांगण्यात आले. 280 बसेस प्रायोगिक तत्वावर सीएनजीमध्ये रुपांतर करण्याचा प्रयत्न आहे. माननीय सदस्य श्री. रावते साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे सीएनजी कीट बसविल्यावर गती कमी होईल, त्यामुळे फेऱ्यांवर परिणाम होईल तसेच सीएनजी केंद्रे उभारावी लागतील आदी गोष्टींचा विचार करा असे सुचविले. निश्चिपतणाने या गोष्टी तज्ज्ञांमार्फत तपासून घेऊन आणि अभ्यास करुनच पुढील अंमलबजावणी केली जाईल. मिनीबसेस आणि नवीन बसेसबाबत मी मागील चर्चेच्या वेळी उल्लेख केला होता. मी पुन्हा एकदा माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांचे आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

------

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मला मंत्रिमहोदयांना एक गोष्ट विचारावयाची आहे की, पिंपरी-चिंचवड आणि पुण्यासाठी प्राधिकरण आहे तसे प्राधिकरण ठाणे जिल्ह्याचे क्षेत्रफळ लक्षात घेता येथील महापालिकांना एकत्रितपणे जोडणारे प्राधिकरण करण्यासंबंधीचा शासनाचा प्रस्ताव होता. तेव्हा यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी दालनात बोलावून यासंबंधीची माहिती घेऊन त्यांना सांगतो.

.......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : धनगर समाजाच्या मेंढपाळांवर मेंढी चराई लागू करणे.

**मु.शी.**: धनगर समाजाच्या मेंढपाळांवर मेंढी चराई लागू करणे यासंबंधी श्री.प्रकाश शेंडगे, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

श्री.प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करतो.

"भारत सरकारच्या महाराष्ट्र राज्यासाठी असलेल्या ग्रेजींग पॉलिसीमध्ये वन विभागाच्या चराऊ कुरण (क वर्ग) जंगलात मेंढयांना चराईची तरतूद असताना सुद्धा त्याचा चुकीचा अर्थ लावून वन अधिकाऱ्यांनी गेली 40 वर्षे धनगर समाजाच्या मेंढपाळांवर मेंढी चराई लागू करणे, या बेकायदेशीर बंदीमुळे महाराष्ट्रातील डोंगर, कपारीमध्ये मेंढी पालन करणारी ही जमात पूर्णपणे उद्‌ध्वस्त होणे, हजारो शेळ्या-मेंढ्या जप्त करणे, मेंढपाळांवर केसेस भरल्या जाणे, माननीय वन मंत्र्यांनी या वन जमिनींमध्ये चराईक्षेत्र निश्चित करण्यासाठी शासन निर्णय 21 डिसेंबर 2003 व 21 नोव्हेंबर 2005 अन्वये मेंढी चराईचे क्षेत्र नक्की करून चराई जमावबंदी अहवाल सादर करण्याचे काढलेले आदेश, त्या विषयी महाराष्ट्रातील सर्व वन विभागातील चराई अहवाल अंतिम करून दिनांक 30 जानेवारी 2007 पर्यंत सर्व क्षेत्र नक्की करून धनगर समाजाच्या मेंढपाळांना पासेस देऊ असे दिलेले आश्वासन, परंतु, आजतागायत असे पासेस देण्याचे आदेश विभागीयवन अधिकाऱ्यांना न दिले गेल्यामुळे मेंढपाळ व वन अधिकारी यांच्यामध्ये खटके उडत असणे, त्यातूनच मेंढपाळ व शेतकरी यांच्यातसुद्धा मोठ्या दंगली निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला असणे या सर्व बाबींवर उपाययोजना करण्याची आवश्यकता व यावर शासनाची प्रतिकिया."

सभापती महोदय, घोड्याच्या पाठीवर आपली कच्चीबच्ची घेऊन मेंढपाळी करत भटकत राहणाऱ्या समाजाला जगण्याचा अधिकार देणारी ही अर्धा तास चर्चा आहे. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, आपण मला पाच मिनिटे अधिक वेळ द्यावा. कारण गेली 40 वर्षे हा प्रश्न फक्त कागदावरच आहे. अजूनही यासंबंधी काहीही अंमलबजावणी झालेली नाही. 10 लाख कुटुंब आज रस्त्यावर आहेत. उघड्यावर, माळरानावर, पाल्यामध्ये राहत आहेत. अजूनही या समाजाचा संपूर्ण

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....

संसार घोड्यावर आहे. या विषयी सभागृहामध्ये सतत 3 वर्षे सेवा चर्चा झालेली आहे. पण अजून पर्यंत या प्रश्नाला न्याय मिळत नाही. म्हणून या प्रश्नाकडे गांभीर्याने पहावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. महाराष्ट्राचे एकूण वन क्षेत्र 69916 चौरस किलोमीटर आहे. आपल्या राज्यात एकूण जमिनीपैकी 20 टक्के जमीन ही वनांनी व्यापलेली आहे. 1885-86 साली वनाचे वर्गीकरण करण्यात आले. पुढे त्यास 1892 मध्ये कायद्यान्वये मान्यता मिळाली. तेव्हा वनांचे वर्गीकरण करण्यात आले. बेअरर फॉरेस्ट लॉ च्या कलम 46 सी प्रमाणे अधिसूचना जारी करण्यात आली. त्यात जंगलाचे वर्गीकरण करण्यात आले. राखीव इमारती आणि दळणवळणासाठी राखीव ठेवलेले क्षेत्र अशी 'अ' वर्गाची व्याख्या करण्यात आली. गवताच्या उत्पादनासाठी, कुरणासाठी राखीव ठेवलेले क्षेत्र अशी 'ब' वर्गाची व्याख्या करण्यात आली. चराई क्षेत्र अशी 'क' वर्गाची व्याख्या करण्यात आली. वन क्षेत्रामध्ये चराई क्षेत्राची तरतूद करण्यात आली. ब्रिटीशांच्या काळात या 'क' वर्ग जमिनीमध्ये धनगर समाजाच्या मेंढमाळांना चरई करण्यास मुभा देण्यात आली होती. पण स्वातंत्र्यानंतर चराई कुरणावर बंदी आणण्यात आली. त्यामुळे हा समाज उद्ध्वस्त झाली. महाराष्ट्रामध्ये चराई धोरण काय असावे यासाठी 1968 साली केंद्र शासनाने चराई धोरण जाहीर केले. दुभत्या जनावारांसाठी काय केले पाहिजे, शेतामध्ये काम करणाऱ्या जनावरांसाठी काय केले पाहिजे, भाकड जनवारांसाठी काय केले पाहिजे, शेळ्या-मेंढ्यांसाठी काय केले पाहिजे हे सगळे फॉरेस्ट पॉलिसीमध्ये नमूद करण्यात आले. 1968 साला पासून आजपर्यंत कुठले वनक्षेत्र चरण्यासाठी दिले पाहिजे हे नक्की करण्याचे काम अजून सुरु आहे. त्यामुळे गेल्या 40 वर्षात हा समाज उद्ध्वस्त झाला आहे. आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हमाली करण्यासाठी हा समाज भटकत आहे. 90 टक्के धनगर समाजाचे माथाडी कामगार हे धनगर समाजाचे आहेत. ऊस तोडीमध्ये 50 टक्के कामगार हे धनगर समाजाचे आहेत. माझे वडील श्री.शिवाजीराव बापू शेंडगे हे या राज्याचे माननीय राज्यमंत्री होते. हे सुद्धा हमाली करण्यासाठी मुंबईत आले. त्याच हमालाचा मी मुलगा आहे. म्हणूनच मी मेंढपाळ समाजाचा प्रश्न या सभागृहामध्ये मांडत आहे.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे..........

1968 साली शासनाने ग्रेझिंग पॉलिसी तयार केली. 1973 साली जी.आर.काढून सेटलमेंट एरिया तयार करण्याचा निर्णय घेतला. 1991 साली जी.आर.काढून चराई क्षेत्र निश्चित केले पाहिजे असा निर्णय घेतला. मी सन्माननीय वनमंत्री श्री.बबनराव पाचपुते यांना धन्यवाद देतो. पहिल्यांदा 40 वर्षानंतर यांच्या काळामध्ये चांगला निर्णय झाला. सभागृहामध्ये झालेल्या चर्चेत अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला होता. 46 वन क्षेत्रांपैकी 19 वन क्षेत्रांमध्ये चराई क्षेत्र देण्याचा अहवाल अंतिम करण्यात आला. 27 वनक्षेत्राबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना मांडल्यानंतर माननीय वनमंत्र्यांनी आदेश काढले. सगळ्या चराई क्षेत्राबाबतचा अहवाल मागविण्यात आला. काही अधिकाऱ्यांनी घाईघाईत एकपानी अहवाल सादर केला. माझ्याकडे अनेक जिल्हयांचा चराई क्षेत्रासंबंधीचा अहवाल उपलब्ध आहे. बुलढाणा जिल्हयाच्या अहवालामध्ये प्रत्येक गाव, सर्वे नंबरसहित माहिती दिलेली आहे. तो अहवाल वाचल्यानंतर आपल्या ज्ञानात भर पडेल. परंतु काही अधिकाऱ्यांना वेळ नसल्यामुळे चराई वन क्षेत्र याठिकाणी उपलब्ध नाही असा एकपानी अहवाल देऊन धनगर समाजाची कुचेष्टा करण्यात आली आहे. ज्यांनी एकपानी अहवाल सादर केला आहे त्या जिल्हयात सर्वे योग्यरित्या झालेला नाही. अशा जिल्हयांमध्ये पुन्हा सर्वे करण्याबाबत मंत्रीमहोदय आदेश देतील का? सन्माननीय मंत्रीमहोदयांच्या नगर जिल्हयामध्ये वनक्षेत्र किती आहे? नंदूरबार जिल्हयात 47 टक्के वनक्षेत्र आहे. रायगड-अलिबाग येथे 24.32 टक्के वनक्षेत्र आहे. ठाणे जिल्हयात 39.71 टक्के वनक्षेत्र आहे. पुणे जिल्हयात 13.5 टक्के वनक्षेत्र आहे. नाशिक जिल्हयात 22 टक्के वनक्षेत्र आहे. असे असताना एक इंच जागा या अधिकाऱ्यांनी धनगर समाजाला दिलेली नाही. जळगाव जिल्हयामध्ये 14.96 टक्के वनक्षेत्र उपलब्ध आहे. अमरावती जिल्हयात 29.35 टक्के वनक्षेत्र उपलब्ध आहे. यवतमाळ जिल्हयात 37.35 टक्के, नगर जिल्हयात 14 टक्के वनक्षेत्र उपलब्ध असताना या वनक्षेत्रात क वर्ग जंगल उपलब्ध नाही असे म्हणावयाचे आहे का? क वर्ग जंगल उपलब्ध असताना अधिकाऱ्यांनी घाईघाईने अहवाल पाठवून वनक्षेत्र उपलब्ध नाही असा अहवाल दिला आहे. पुन्हा एकदा अत्याचाराची मालिका अशीच चालू ठेवली आहे.

..2..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे..........

सभापती महोदय, आपण याबाबतीत हस्तक्षेप करुन मंत्रीमहोदयांना आदेश द्यावेत. हा अन्याय गेली 40 वर्षे सुरु आहे. 29 ऑक्टोबर, 2007 रोजी शासनाने जीआर काढून या 19 वनक्षेत्रामध्ये चराई क्षेत्र उपलब्ध करुन द्यावे असे सांगितले. परंतु माजी आमदार श्री.नाना कोकरे यांनी या निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे केली. त्यामुळे 40 वर्षानंतर वनक्षेत्र चराईसाठी देण्याचा निर्णय झालेला असताना त्या निर्णयाला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी स्थगिती दिली. आम्ही या संदर्भात आरडाओरडा केला. स्थगिती देत असताना शासनाने आमची विचारपूस केली नाही. आम्ही सन्माननीय श्री.गोपीनाथ मुंडे यांना सोबत घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेतली आणि स्थगिती उठविण्याची मागणी केली. त्यानंतर शासनाने स्थगिती उठविली. परंतु 15 मे, 2008 पासून पुन्हा बंदी आणली आहे. कारण 15 मे ते 15 सप्टेंबर या काळात चराईसाठी वनक्षेत्र द्यायचे नाही असा शासनाचा जीआर आहे. चार महिन्याच्या काळासाठी बंदी घातली आहे. पावसाळ्याच्या चार महिन्याच्या काळात बंदी घालण्यास कायदेशीर अधिष्ठान आहे का? ग्रेझिंग पॉलिसीच्या कलम 115 प्रमाणे वन अधिकाऱ्यांना अधिकार दिले आहेत. या चार महिन्यात संरक्षित क्षेत्रामध्ये चराई देण्याचा अधिकार वन अधिकाऱ्यांना दिलेला आहे.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ....

असे असताना आपण या चार महिन्यात अशा क्षेत्रात चराईसाठी परवानगी देणार काय ? कारण आपण या मेंढपाळांना बंदी केल्यामुळेच हा प्रश्न निर्माण झाला आहे, यातून तोडगा काढावा अशा माझ्या दोन मागण्या आहेत. तसेच आपल्या अधिकाऱ्यांनी जो अहवाल पाठविला आहे त्याचा पुन्हा सर्व्हे करुन नव्याने अहवाल मागवावा, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

----------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते (वन मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे हे मी वन खात्याचा मंत्री झाल्यापासून सतत हा विषय माझ्याकडे मांडत आले आहेत की, महाराष्ट्रात असलेल्या मेंढपाळांना वनातील चराई क्षेत्र राखीव ठेवावे. ही गोष्ट खरी आहे की, राज्यात वनाचे क्षेत्र फक्त 20.13 टक्के आहे. तसेच या क्षेत्राची पूर्वी अ, ब, क आणि ड अशी वर्गवारी होती परंतु सन 1980 चा वनसंवर्धन कायदा आल्यानंतर हे सर्व वन राखीव वन म्हणून झालेले आहे व त्या क्षेत्राला वन संवर्धन कायद्याचे सर्व नियम लागू झाले आहेत. चराईसाठी दिलेले वनाचे क्षेत्र म्हणजे हक्क नाही तर ती एक सवलत होती. परंतु या क्षेत्राची हक्काच्या स्वरुपात मागणी केली तर त्यातून अनेक अडचणी निर्माण होणार आहेत. तसेच मी यापूर्वी सभागृहात राज्यातील वनामध्ये चराईतील क्षेत्र किती असे निवेदन दिलेले आहे. तसेच सुधारित निवेदनही दिलेले आहे. मागील काळात हा विषय सदनात उपस्थित झाला होता आणि त्यासाठी एक अधिकारी आपण नेमला होता. त्या अधिकाऱ्याने यासंबंधीचा सविस्तर अहवाल तयार केला असून त्याप्रमाणे एकूण चराईसाठी किती क्षेत्र योग्य आहे, कोणते क्षेत्र योग्य नाही यासंबंधीची पूर्ण माहिती तयार करुन घेतली आहे. यामध्ये तशी खूप लवचिकता ठेवली असून त्यात मेंढी चराईसाठी जे प्राधान्य आहे ते वन खात्याच्या कायद्याप्रमाणे खालून पहिल्या नंबरवर आहे. त्यात सुरुवातीला दुभती जनावरे, त्यानंतर कष्ट करणारी जनावरे आणि नंतर गटांप्रमाणे असे हे प्राधान्य आहे. वर्षानुवर्षे हे लोक राज्यात मेंढ्या चारण्यासाठी फिरतात म्हणून त्यासंबंधी शासनाने चराई क्षेत्राबाबत निर्णय घेतला आहे की, कोणत्या क्षेत्रात त्यांना जाता येणार आणि कोणत्या क्षेत्रात जाता येणार नाही म्हणून यासंबंधीची आकडेवारी मोठ्या प्रमाणात असल्यामुळे मूळ विषय बाजूलाच राहील म्हणून ही माहिती मी पटलावर ठेवण्यास अथवा सन्माननीय सदस्यांना स्वत:कडे पाहिजे असल्यास त्यांनाही देण्यास तयार आहे. तसेच जागतिक पातळीवर आज ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न निर्माण होत चालला आहे. वन क्षेत्रात मात्र आपल्याकडे वाढ झालेली नाही. तसेच 33 टक्के वनाचे क्षेत्र आवश्यक आहे परंतु आपण ते वाढवू शकलो नाही. मध्यंतरी माननीय मुख्यमंत्र्यांनी चांगली सूचना केली की, महाराष्ट्रात असलेल्या गायरान जमिनी, सरकारी जमीन, पडिक जमिनी आणि डोंगराळ जमीन अशा जमिनी वन विभागाकडे वर्ग कराव्यात. आणि हा निर्णय आपण लवकरच घेत आहोत. जे क्षेत्र वर्षानुवर्षे पडिक राहते, त्यावर शेतकरी पीक घेत नाही अशा क्षेत्राबाबत सलग तीन वर्षे जर शेतकऱ्याने शेती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते .....

केली नसेल तर अशा जमिनी आपोआपच वन खात्याकडे वर्ग व्हाव्यात असा दंडक करण्यात येणार आहे. याचा उद्देश एकच आहे आणि तो म्हणजे ग्लोबल वॉर्मिंगसंबंधीचा जो धोका संपूर्ण जगालाच निर्माण झालेला आहे त्यामुळे हे करणे आपल्याला अनिवार्य आहे. कारण पृथ्वीवरील वनाचे क्षेत्र दिवसेदिवस कमी व्हायला लागले आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर हा चर्चेचा विषय झाला आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेली विनंती बरोबर आहे की मेंढ्या घेऊन फिरणाऱ्या माणसाला, कष्टकऱ्याला आपण संधी दिली पाहिजे. पण आपल्या समाजाकडूनही माझी अशी अपेक्षा आहे की, आपण असे किती दिवस या लोकांना मेंढ्या घेऊन फिरायला लावणार आहात ? किती दिवस मुख्य प्रवाहापासून त्यांना बाजूला ठेवणार आहात ? कारण या मुलांचे शिक्षण अजिबात होत नाही, ती मुले शाळेतच जात नाहीत, शिक्षणासाठी त्यांना प्रवासाचे पासेस दिले होते तेही त्या मुलांनी घेतले नाही. बालविवाह बंदीचा अत्यंत कडक कायदा आपल्याकडून असतानाही या समाजातील आठ-नऊ वर्षाच्या मुलांचे बालविवाह होताना दिसून येतात. आपण चराई क्षेत्राची मागणी केली आहे त्यासंदर्भात मी एवढेच सांगणार आहे की, चराईसाठी जेवढे क्षेत्र आपल्याला दिलेले असेल त्यापेक्षा जास्त सरकार देऊ शकत नाही. तसेच शासनाच्या नियमाप्रमाणे प्रायॉरिटी खालून सुरु होते परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, जास्तीत जास्त क्षेत्र आपल्याला शासनाने दिलेले आहे. यासंबधीचा अभ्यास करताना असे आढळून आले की.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

शेळ्या, मेंढ्यांच्या खुरामुळे मोठया प्रमाणात जमीन तुडवली जाते व शेळ्या-मेंढ्यांच्या दातामुळे गवताची तसेच झाडांची वाढ खुंटते. त्यामुळे या लोकांनी वनामध्ये शेळ्या-मेंढ्या चारण्यापेक्षा त्यांनी कितीही गवत कापून नेले तर त्याला आमची हरकत राहणार नाही, त्यांनी गवत कापून नेले तर त्यांच्याकडून पैसेही घेतले जाणार नाही. जुन, जुलै , ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात गवताची खरे म्हणजे मोठया प्रमाणात वाढ होत असते त्यामुळे मेंढपाळांनी डायरेक्ट मेंढया न चांरता गवत कापून नेले तर त्याला आमची हरकत राहणार नाही. गवत कापून घेण्यासाठी शासनाकडून पैसेही घेतले जाणार नाही यासंदर्भात ऑर्डर सुध्दा काढण्यात आलेली आहे. खरे म्हणजे या मेंढपाळांना आपल्याला मुळप्रवाहात आणण्याची आवश्यकता आहे. या लोकांना आपण विकासापासून किती दिवस लांब ठेवणार आहात ? मेंढपाळांना पर्यायी व्यवसाय द्यावा लागणार आहे. खरे म्हणजे शेळ्या-मेंढयांच्या दातापासून, खुरापासून झुडपांना, गवतांना मोठया प्रमाणात इजा होत असते. शेळ्या-मेंढयांच्या खुरामुळे जमीन मोठया प्रमाणात दबली जाते. आठ टन वजनाच्या रोलरपासून जेवढी जमीन दबली जात नाही त्यापेक्षा जास्त जमीन शेळ्या-मेंढयांच्या खुरापासून दबली जात असते. खरे म्हणजे आमचा दोन्ही बाजूने कोंडमारा होत आहे. आम्हाला एका बाजूने मेंढपाळांना जगवायचे आहे, सामाजिक बांधिलकी ठेवायची आहे आणि दुस-या बाजूने आम्हाला वन कायद्याचे संरक्षण करावयाचे आहे अशा कात्रीत आम्ही सापडलेलो आहोत. मेंढपाळाचा व्यवसाय करणा-यांना कोणत्याही प्रकारचे शिक्षण मिळत नसते, ते विकासापासून दूर आहेत, आज जग एकविसाव्या शतकात गेले असतांना या समाजाला तेथेच ठेवणे योग्य होणार नाही. या समाजाला मुळप्रवाहात आणण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र बसून प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आज वनाचे क्षेत्र कमी होत चालले आहे. वनाचे क्षेत्र जास्तीत जास्त कशा प्रकारे वाढवता येईल यासाठी अभ्यास केला जात आहे. या मेंढपाळांना आपण चराई क्षेत्र दिले तर त्यांचे खूप काही चांगले होईल अशी परिस्थिती आज राहिलेली नाही. या समाजाला शिक्षण देऊन मूळ प्रवाहात आणले तरच त्यांना ख-या अर्थाने फायदा होईल. आता आपण त्यांना चराईसाठी नवीन क्षेत्र देऊ शकत नाही. आपल्याला वेगळया पध्दतीने मेंढपाळांचे पुनर्वसन करावे लागणार आहे अशी परिस्थिती आहे. कारण केंद्रशासनाने आपल्याला दरवर्षी एक लक्ष हेक्टरवर

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

झाडांची लागवड करण्यास सांगितलेले आहे. आता बांबू पॉलिसी आल्यामुळे आपण मोठया प्रमाणात बांबूची लागवड करीत आहोत, वनौषधींची लागवड करीत आहोत. मेंढपाळांना आपण चराईसाठी किती दिवस वन क्षेत्र उपलब्ध करुन देऊ शकतो हा प्रश्न आता निर्माण झालेला आहे. मेंढपाळांना वेगवेगळे व्यवसाय उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. या समाजाला मुळप्रवाहात आणण्यासाठी शासनाला कोटयावधी रुपये खर्च करण्याचे काम करावे लागणार आहे. आता ग्लोबल वॉर्मिंगमुळे अजून मोठया समस्या निर्माण झालेल्या आहेत. वनाचे महत्व आता सर्वांना पटायला लागले आहे. मेंढपाळांना चराईसाठी आम्ही लवचिक धोरण ठेवलेले आहे. मेंढपाळांनी कितीही गवत कापून नेले तर त्यांच्याकडून काहीही फी आकारली जाणार नाही. त्यासाठी पास सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. या प्रश्नाची ख-या अर्थाने सोडवणूक करावयाची असेल, या समाजाला मूळ प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यासाठी शासनाला एक वेगळे पॅकेज तयार करावे लागेल व यासाठी आपल्या सर्वांना एकत्र बसून यासंदर्भात निर्णय घ्यावा लागणार आहे. हे सर्व करण्याची शासनाची तयारी आहे. मेंढपाळाच्या संदर्भात शासनाची भूमिका सहानुभुतीची राहणार आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 11.20

श्री.प्रकाश शेंडगे : मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे.चराईला बंदी घातली आहे. ती उठविण्यात येणार आहे काय ?

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार )** : सन्माननीय सदस्यांना माझी अशी विनंती आहे की,सभागृहाची बैठक 11.30 वाजता संपवावयाची आहे. या प्रश्नाबाबत सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा करण्याची सन्माननीय मंत्रिमहोदयांची तयारी देखील आहे त्यामुळे त्यांनी प्रश्न उपस्थित करु नये.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या अर्धा तास चर्चेला उत्तर देतांना मी सांगितले की, चराईचे क्षेत्र पूर्णपणे बंद करावे असे मी म्हटलेले नाही तर त्यांचे क्षेत्र वाढवून देता येत नाही असे मी सांगितले आह. त्याचबरोबर हे क्षेत्रसुध्दा किती वाढवून द्यावयाचे असा प्रश्न आहे. त्यामुळे या संदर्भात मी सविस्तर दिलेले आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी** : वीरमाता जिजाबाई उद्यान आणि प्राणी संग्रहालयाचा आरक्षित भूखंड
**मु.शी** : वीरमाता जिजाबाई उद्यान आणि प्राणी संग्रहालयाचा आरक्षित भूखंड या संबंधी श्री.मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा - तास चर्चा उपस्थित करतो.

"वीरमाता जिजाबाई उद्यान व प्राणी संग्रहालयाच्या विस्ताराकरिता उद्यानाच्या दक्षिणेस लागून असलेले सुमारे 14 हजार चौरस मिटर्स क्षेत्रफळाचे दोन भूखंड संपादित करण्याकरिता मुंबई महानगरपालिकेने राज्य शासनाला केलेली विनंती, यासाठी महानगरपालिकेच्या स्थायी समितीकडून आवश्यक ती मंजूरी घेण्यात येणे,त्यानुसार राज्य शासनाने नगररचना कायद्याच्या 127 व भूसंपादन कायद्याच्या कलम 6 अन्वये भूसंपादनाची अधिसूचना दिनांक 22 डिसेंबर 2006 रोजी काढलेली असणे, तसेच या भूसंपादनासाठी पालिकेने साडेपाच कोटी रुपये शासनाकडे जमा केलेले असणे, परंतु विकास आराखडयानुसार गेली 44 वर्षे हे भूखंड उद्यानाच्या विस्ताराकरिता आरक्षित दाखविलेले असूनसुध्दा या भूखंडाची मालकी श्री.जेठा नावाच्या व्यक्तीकडे असून त्याने उच्च न्यायालयात भूसंपादनाविरुध्द दाद मागणे, न्यायालयाने भूसंपादनाची कारवाई रद्द करणे, या मालकाने पालिकेला विकास आराखडयानुसार आरक्षण ठेवल्यानंतर दहा वर्षे या जमिनी संपादित केल्या गेल्या नसल्याने, महानगरपालिकेने एक तर पैसे देऊन या जमिनी ताब्यात घ्याव्यात किंवा त्या आरक्षणातून वगळाव्यात अशी पर्चेस नोटीस पालिकेवर बजावलेली असणे, त्यामुळे वीरमाता जिजाबाई उद्यान व प्राणी संग्रहालयाच्या सौंदर्यीकरणाचा प्रस्ताव प्रलंबित राहण्याची शक्यता, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

सभापती महोदय, भायखळया जवळ 50 ते 55 एकर जमिनीवर वीर माता जिजाबाई उद्यान आणि प्राणी संग्रहालय आहे .त्या ठिकाणी एक प्राणी संग्रहालय व पशु संग्रहालय तयार करण्यात आलेले आहे. मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरामध्ये अशा प्रकारचे संग्रहालय कोठेही नसल्यामुळे केवळ वीर माता संग्रहालय हे मुंबईतील मुलांना, पालकांना , शाळेतील विद्यार्थ्यांना बाहेरच्या पर्यटकांना आकर्षित करणारे क्षेत्र होते. तेथील बरेच प्राणी नष्ट झालेले असून त्या ठिकाणी फक्त रिकामे पिंजरेच शिल्लक राहिलेले आहेत. तेथे वाघ नाही, तेथे हत्ती आणि एक दोन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गेंडे आणि एक दोन मोर वा थोडे फार पशु पक्षी आहेत. असे गेल्या पाच दहा वर्षापासून लक्षात येत आहे. मुंबई शहरातील "हार्ट ऑफ द सिटी " असे ज्याला म्हटले जाते तेथे मोठया प्रमाणावर सिमेन्टचे जंगल तयार होत चालले आहे. अशा परिस्थितीत खेळाची मैदाने, मनोरंजनाची मैदाने, बाग बगिचे ज्या ठिकाणी आहेत ती सर्व अनधिकृत बांधकामाने व्यापलेली आहेत, किंवा भविष्यामध्ये तेथे कोणताही विकास होण्याची शक्यता नाही . पूर्वी राणीचा बाग म्हटले जावयाचे परंतु आता वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान म्हटले जाते आजही पहाटे जर कोणी फिरावयास गेले तर तेथील वातावरण अत्यंत प्रसन्न आहे पंरतु तेथील प्राणी संग्रहालय मात्र भकास झालेले आहे.14 हजार चौरस मिटर्सचे दोन भूखंड विस्तारासाठी विकास आराखडयामध्ये आरक्षित करण्यात आलेले होते परंतु मुंबई उच्च न्यायालयाने भू संपादनाची कार्यवाही बेकायदा ठरवली असून अनुक्रमे 7 हजार 653 आणि 6 हजार 520 चौरस मिटर्स एवढया आकाराचे दोन भूखंड श्रीमती सुरय्या अकबरअली जेठा आणि इतर तसेच श्री हसनअली हसनभाई जेठा यांच्या मालकीचे असून विकास आराखडयात 44 वर्षापासून उद्यानाच्या विकासासाठी आरक्षित ठेवलेले होते. महानगरपालिकेचा नियम असा आहे की, एखादी जमीन जर विकास आराखडयामध्ये आरक्षित ठेवली असेल तर महानगरपालिकेने ती ॲक्वायर करुन घ्यावयास पाहिजे . मालकाला जर ती रिलीज करुन घ्यावयाची असेल तर परचेस नोटीस दिली पाहिजे. परचेस नोटीस दिल्यापासून सहा महिन्याच्या आत जर खरेदी केली नसेल तर "इट इज ॲज गुड ॲज रिलीज" असे समजले जाते आणि महानगरपालिकेचे अधिकारी व काही मंडळी अत्यंत बदमाशीचा धंदा तेथे करीत असल्यामुळे त्यांनी मुंबई शहराची वाट लावली आहे.मुंबई शहरामध्ये एकही चांगले उद्यान नाही . पवई येथे चायना गार्डन आहे. मुबई शहरातील पालकांनी रविवारच्या दिवशी वा इतर सुटीच्या दिवशी मुलांना घेऊन कोठे जावयाचे ? माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आपण या वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानामध्ये एकदा जाऊ पहावे. माननीय मंत्री किंवा महापौर तैथील वीरमाता जिजाबाई यांच्या पुतळयाला हार घालण्यासाठी एकदाच जातात त्यानंतर या उद्यानाकडे कोणीही पाहत नाही. तेथे गार्डन सुपरिटेन्डेन्टचा एक बंगला होता परंतु गेल्या दहा वर्षापासून तो बंद होता आता महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती राधा त्या ठिकाणी राहत आहेत गेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

44 वर्षापासून हा भूखंड आरक्षित करण्यात आला होता. विकास आराखडयानुसार त्याचा वापर करता यावा म्हणून त्यासाठी महानगरपालिकेच्या स्थायी समितीने प्रस्ताव पास केला होता त्याचबरोबर राज्य सरकारने नगररचना कायद्याच्या कलम 128 व भू संपादन कायद्याच्या कलम 6 अन्वये भूसंपादनाची अधिसूचना 22 डिसेंबर 2006 रोजी काढली होती.महानगरपालिकेने भूसंपादनासाठी साडेपाच कोटी रुपये राज्य शासनाकडे अदा केले असून या कार्यवाहीला जेठा कुटुंबियांनी कोर्टात आव्हान दिले आहे. उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, ही जमीन आरक्षित ठेवल्यानंतर दहा वर्षे ही जमीन संपादित केली नसल्यामुळे पैसे देऊन या जमिनी ताब्यात घ्याव्यात किंवा त्या आरक्षणातून वगळाव्यात.. हे काय चालले आहे ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/ 11:25

श्री. मधुकर चव्हाण...

किंवा आपण ते देऊन टाकावे, हे काय चालले आहे? मी नेहमी सांगत असतो की, ज्यावेळी 1947 ते 1950 साली मुंबई शहराची लोकसंख्या 35 लाख होती, त्यावेळी ती लोकसंख्या लक्षात घेऊन सुमारे 50, 55 एकराच्या जमिनीच्या भूखंडावर सुंदर अशी बाग होती आणि त्यामध्ये प्राणी ठेवले होते. आज मुंबई शहराच्या जमिनीमध्ये वाढ झालेली नाही, मात्र लोकसंख्या 1 कोटी 35 लाख एवढी झाली आहे. मुंबई शहरामध्ये एकही उद्यान नाही. विकास आराखडयासाठी ज्या जमिनी आहेत त्या सर्व झोपडपट्टयांनी व्यापल्या आहेत. आणि शासनाने 1995 पर्यंत विकासासाठी आरक्षित केलेल्या असो, किंवा खाजगी जमिनी असू द्या, त्यावर ज्या झोपडपटया किंवा अनधिकृत बांधकामे झ ाली आहेत त्यांना शासनाने संरक्षण दिले आहे. मी स्पष्टपणे बोलतो की, आता तर तुम्ही आम्ही सर्वांनी मिळून मतासाठी 2000 सालानंतर 2005 पर्यंतच्या झोपडयांना मान्यता दिली आहे.. त्याचप्रमाणे एस.आर.ए. योजनेंतर्गत घरे दिली आहेत. गरिबांना घर दिले पाहिजे याबद्दल प्रश्नच नाही. परंतु ही सर्व उद्याने ही मुंबई शहराची फुफ्फुसे आहेत., मोकळया बागा आणि भूखंड या मुंबई शहराची फुफ्फुसे आहेत. त्यांना आज कॅन्सर झाला असेल तर हे मुंबई शहर कधीही संपल्याशिवाय रहाणार नाही. म्हणून मला शासनाला विचारावयाचे आहे की, यासंबंधी शासन काय करणार आहे? याठिकाणी पर्चेस नोटीस दिली आहे, उच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. त्यावर तुम्ही सांगणार की आम्ही सुप्रिम कोर्टात जाणार. एका ओळीमध्ये मी ऑब्जेक्टिव्ह प्रश्न विचारल्यानंतर आपण त्याठिकाणी ऑबजेक्टिव्ह उत्तर द्याल. आपण कारवाई कां केली नाही? याबाबत मला आपणाकडून सबजेक्टिव्ह उत्तर हवे आहे. साडे पाच कोटी रुपये भरुन सुध्दा एवढी 4-5 वर्षे कां काढण्यात आली? मंत्रालयाच्या 5 व्या किंवा 6 व्या मजल्यानंतर आणि आता वाढविलेल्या 7 व्या माळयावरील मंत्र्यांना मी उद्देशून बोलत नाही तर अधिकाऱ्यांना म्हणत आहे. मंत्रालयातील जास्तीत जास्त अधिकारी आपल्या टेबलावर फाईल ठेवतात. म्हणून याठिकाणी आपण कारवाई करणार आहात की नाही? ही राणीबाग तुम्हाला संपवायची आहे काय? तुम्हाला तिथे मॉल करावयाचे आहेत काय? म्हणून आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाणार आहोत असे एका ओळीचे उत्तर आपण देऊ नका. आपण मला सबजेक्टिव्ह उत्तर द्यावे. ॲक्शन ओरिएंटेड आणि रिझल्ट ओरिएंटेड असे उत्तर द्यावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

26-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) X 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री.राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, याठिकाणी माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी राणीबाग किंवा वीरमाता जिजाबाई उद्यानाच्या विस्तारासाठी आरक्षित असलेल्या जागेबाबत कोर्टाच्या माध्यमातून रिझर्व्हेशन रिलिज केले त्या संदर्भात अर्ध्या तासाची चर्चा उपस्थित केली आहे. त्या संदर्भात मी आपणास थोडक्यात माहिती सांगतो. एम.आर.टी.पी. ॲक्टमध्ये असलेल्या तरतुदीनुसार महानगरपालिका किंवा नगरपालिका असो, कोणत्याही शहराचा 20 वर्षाचा विकास आराखडा तयार केला जातो. त्या ठिकाणी पहिल्या दहा वर्षाचे आरक्षण विकसित केले नाहीतर त्या व्यक्तिला कलम 127 अन्वये नोटीस देण्याची तरतूद केली आहे की, तो पर्चेस नोटीस देऊ शकतो आणि सांगू शकतो की, ही माझी जमीन रेडी रेकनरप्रमाणे आणि भूसंपादन कायद्यातील तरतुदीप्रमाणे जो भाव असेल त्याप्रमाणे आपण खरेदी करावी. नाहीतर सहा महिन्याच्या मुदतीमध्ये जर सेक्शन सहा प्रमाणे कार्यवाही झाली नाही तर ती आपोआप रिलिज केली जाईल. अशाप्रकारची तरतूद त्यामध्ये केली आहे. त्या तरतुदीचा फायदा घेऊन जमीन मालक श्री. हसन अली जेठा यांनी दि.17.10.2002 रोजी सेक्शन 127 ची नोटीस दिली आहे. आणि तिची मुदत 16.4.2003 पर्यंत म्हणजे सहा महिन्याची होती. त्यामध्ये वस्तुस्थिती अशी आहे की, महानगरपालिकेने त्यावेळी ठराव करावयास पाहिजे होता,आणि तो करुन राज्य सरकारकडे पाठवावयास पाहिजे होता. आणि त्यामध्ये राज्य सरकारने सेक्शन 6 ची नोटीस करावयास पाहिजे होती. अशाप्रकारची प्रक्रिया आहे. या बाबतीत आपण घेतलेल्या ॲक्शनच्या तारखा पाहिल्या तर महानगरपालिकेने 17.10.2002 रोजी नोटीस दिली आहे, त्यावर पहिली ॲक्शन घेण्यासाठी ईम्प्रुव्हमेंट कमिटीचा ठराव 19.3.2003 ला झाला. म्हणजे पाच महिन्यानंतर महानगरपालिकेच्या ईम्प्रुव्हमेंट कमिटीने पहिला ठराव केला. त्यानंतर दुसऱ्या महिन्यात 7.4.2003 रोजी जनरल बॉडीने ठराव केला. म्हणजे नोटीस लॅप्स होण्याची तारीख 16.4.2003 होती, जनरल बॉडीचा अंतिम ठराव 7.4.2003 रोजी झाला. मंत्रालयात ठराव पाठविण्याची तारीख 10.4.2003 होती. म्हणजे लॅप्स होण्याच्या तारखेच्या सहा दिवस अगोदर मंत्रालयात सेक्शन 6 च्या नोटीससाठी हा ठराव पाठविण्यात आला होता.

(यानंतर श्री. सुंबरे)

अप्रसुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MMP/KGS. श्री. सरफरे नंतर --- 11:30

श्री. राजेश टोपे ....

आणि त्यांनी तो ठरावही पाठविला नव्हता तर प्रस्ताव पाठविला होता. वास्तविक त्या प्रस्तावाबरोबर ठराव पाठविला पाहिजे होता तो पाठविलाच नव्हता. म्हणते ती त्यात त्रुटी होती. त्यामुळे खऱ्या अर्थाने सर्व मिळून जो सहा महिन्यांचा अवधी आहे, म्हणजे नोटीस नंतर 6 महिन्यात जे काम करायला पाहिजे होते, सेक्शन 6 काढायला पाहिजे होता, त्यातील 98-99 टक्के पिरिएड हा महानगरपालिकेनेच घेतलेला आहे. त्यांनंतर जेव्हा 10 एप्रिलला शासनाकडे हा प्रस्ताव आला तेव्हा त्यापुढील कारवाई करण्यात आली. 22.12.2003 ला सेक्शन 6 ची नोटीस त्या ठिकाणी काढण्यात आली. त्यानंतर महापालिकेने त्यासाठी कायद्यानुसार जे पैसे भरायला पाहिजे होते ते सव्वापाच कोटी रूपये भरले ही वस्तुस्थिती असली तरी कायद्याचा आधार घेऊन संबंधित मालक कोर्टात गेले आणि कोर्टाने त्या संदर्भातील निर्णय, म्हणजे 22.12.2003 ची जी काही भूसंपादनाची नोटिफिकेशन काढले आहे ते रद्द करण्याचा निर्णय 12.6.2008 रोजी घेतला. म्हणजे मागच्याच महिन्यात हायकोर्टाने हा निर्णय दिलेला आहे. त्यात हायकोर्टाने म्हटले की, तुमची ही नोटिफिकेशन कायद्याला धरून नाही त्यामुळे आम्ही ती रद्द करीत आहोत. आता आपल्या सगळ्यांचा उद्देश एकच आहे की, राणीच्या बागेच्या विस्तारीकरणासाठीची ही जी जागा आहे तिचे आरक्षण टिकले पाहिजे. म्हणून शासनाची आता ही भूमिका राहील की, हायकोर्टाने या संबंधात निर्णय दिलेला आहे तेव्हा त्या विरोधात सुप्रीम कोर्टात अपील दाखल करायचे. त्याप्रमाणे त्यासाठी स्पेशन लीव पिटीशन करण्याची आमची, राज्य सरकारची भूमिका अगदी स्पष्ट आहे. त्यानुसार 12.6.2008 रोजी हायकोर्टाने जो या संदर्भात निर्णय घेतला आहे त्या विरोधात आपण ताबडतोबीने सुप्रीम कोर्टात जात आहोत हे मला या ठिकाणी आवर्जून सांगावयाचे आहे. हा झाला आपला पहिला विषय. त्यानंतरचा दुसरा विषय म्हणजे शेवटी हे सहा महिन्यांच्या आत हे करायला पाहिजे होते. या संदर्भात कायद्यात, एमआरटीपी ॲक्टमध्ये जी तरतूद आहे त्यानुसार सहा महिन्यांच्या आत हे करायलाच पाहिजे होते हे सगळे माहिती असतानाही त्याबाबत दिरंगाई का झाली ? हाही एक महत्त्वाचा यातील भाग आहे. त्यामुळे इम्प्रूवमेंट कमिटीला इतका विलंब का झाला ? तेथील प्रशासन इम्प्रूवमेंट कमिटीपुढे इतक्या विलंबाने का घेऊन गेले ? इम्प्रूवमेंट कमिटीने देखील यामध्ये तातडीने करायला पाहिजे होते, त्यासाठी तेथील लोकप्रतिनिधी असतील, स्थायी समिती असेल, महापौर असतील, आयुक्त असतील बाकीचे अन्य अधिकारी असतील, या

..... वाय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे .....

सगळ्यांनीच यामध्ये खरे तर लक्ष घालायला पाहिजे होते. ही वस्तुस्थिती देखील कोणी नाकारून चालणार नाही. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना मी सांगू इच्छितो की, शेवटी हा कायदा काही काल झालेला नाही. तो अगोदर पासूनच आहे. त्यामुळे या कायद्यानुसार नोटीस आल्यानंतर, त्या संदर्भात एवढी महत्त्वाची ही जमीन आहे, काही शेकडो कोटी रूपये किंमतीची ही जमीन आहे आणि ती आपल्या हातून गेली तर निश्चितपणे राज्य सरकारचे आणि येथील जनतेचेही मोठे नुकसान होऊ शकणार आहे. कारण शेवटी हे लोकांसाठी असलेले मैदान आहे, प्राणी संग्रहालय आहे, अतिशय जुने प्राणीसंग्रहालय आहे त्यामुळेदेखील त्याचे महत्त्व आगळे-वेगळे आहे. त्यादृष्टीकोनातून या बाबत दखल तितक्याच त्वरेने, गांभीर्याने घ्यायला पाहिजे होती हे माझे मत मी निश्चितपणे स्पष्टतेने येथे सांगू इच्छितो. तेव्हा यामध्ये जाणीवपूर्वक काही दुर्लक्ष करण्यात आलेले आहे काय ? जाणीवपूर्वक काही गोष्टी टाळण्यात आलेल्या आहेत काय ? या साऱ्याची चौकशी निश्चितपणे होणे आवश्यक आहे. तेव्हा ही चौकशी झाल्यानंतर याबाबतीत जाणीवपूर्वक कोणाकडून दिरंगाई झाली असेल, कारण शेवटी अशा बाबतीत महानगरपालिकेच्याही काही प्रोसिजर्स असतात. म्हणजे इम्प्रूवमेंट कमिटी वगैरे वगैरे करीत करीत या साऱ्या गोष्टी होत असतात त्यामुळे देखील काही वेळेस यामध्ये वेळ लागू शकतो. तेव्हा कोणत्या कारणाने यात वेळ लागला आहे ...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी स्वत: महापालिकेमध्ये होतो. मी अतिशय प्रांजळपणे सांगू इच्छितो की, तेथील काही अधिकारी तर इतके निर्लज्ज आहेत की त्यांना या मुंबई शहराचे कोठलेही सोयरसुतक नाही. त्यांना डेवलपमेंट प्लॅनमध्ये ही जमीन राखीव ठेवली असल्याचे माहिती नव्हते का ? पण भ्रष्टाचाराचे पैसे घरी नेऊन स्वत:च्या घरावर सोन्याची कौले चढविण्याची नालायकगिरी करणाऱ्या या लोकांना आपण धरणार आहात की नाही ? महानगरपालिकेच्या इम्प्रूवमेंट कमिटीसमोर हा विषय त्यांनी इतक्या विलंबाने का आणला ? नाही तर नेहमी ते अधिकारी डेवलपमेंट प्लॅन घेऊन बसत असतात आणि तेथे बिल्डर्स लोकांना बोलवत असतात. मी हे कोठल्याही अभिनिवेशाने बोलत नाही. आज अशा अधिकाऱ्यांमुळे मुंबई शहराची वाट लागली आहे. त्यामुळे एक इंच देखील जमीन लोकांना श्वास घ्यायला, मुलाबाळांना फिरायला देखील मोकळी राहिलेली नाही. तेव्हा त्या लोकांपैकी किमान दोन तीन लोकांना तरी तुम्ही जेल

...... वाय 3 ...



KBS/MMP/KGS. श्री. सरफरे नंतर --- 11:30

श्री. मधुकर चव्हाण ....

मध्ये पाठवा म्हणजे मग इतर सगळे सरळ येतील. म्हाडातील 19 लोकांवर तुम्ही कारवाई केली आता तेथील कारभार सुधारायला सुरूवात झालेली आहे. सभापती महोदय, जेव्हा जनरल बॉडीने या ठिकाणी प्रस्ताव मंजूर केला त्याचवेळेस ती जमीन ॲज गुड ॲज ॲक्वायर झाल्यासारखी आहे. हा कायद्याच्या संदर्भातील एकच मुद्दा मी आपल्या लक्षात आणून देतो तो आपण आपल्या वकीलाला कोर्टात मांडायला सांगा. पण सगळे मॅनेज होतात हो म्हणून तर बिघडते आहे.

( **सभापतीस्थानी - माननीय तालिका सभापती श्री.भास्कर जाधव** )

( यानंतर सौ. रणदिवे .... झेड 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी माझे मत स्पष्टपणे सांगितलेले आहे की, यामध्ये निश्चितपणे दिरंगाई झालेली आहे.यासंबंधात चौकशी होणे गरजेचे आहे असे माझे स्वत:चे मत आहे. त्यामुळे मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, यासंबंधात आमच्या विभागाचे जे प्रधान सचिव आहेत, त्यांच्या स्तरावर जरुर चौकशी करण्यात येईल, महानगरपालिकेच्या स्तरावर नाही. यासंदर्भात जे कोणी दोषी असतील, त्यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून शासन मागे-पुढे पहाणार नाही हे मी कारवाईच्या संबंधात सांगितले आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, या मध्ये केवळ पत्र देऊन चालत नाही. कारण याबाबतीत पूर्वी गिरनार ट्रेडर्सच्या बाबतीत एक निर्णय झालेला आहे.त्यामध्ये सुप्रीम कोर्टातील तीन जज्जेसनीं निर्णय दिलेला आहे. त्यामध्ये 2-1 असे व्होटींग होऊन निर्णय झाला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना सांगू इच्छितो की, केवळ जनरल बॉडीचा सहा महिन्याच्या आत ठराव झाला म्हणजे विषय संपला अशातला भाग नाही. तर दोन जज्जेसचे असे मत होते की, सेक्शन-6 ची कारवाई झाली पाहिजे आणि एका जज्जचे असे मत होते की, जर नुसता ठराव झाला असेल किंवा लॅण्ड ॲक्वीझिशन ऑफीसकडे पत्र जरी गेले असेल तरी सुध्दा याबाबतीत एक स्टेप उचलण्यात आली आहे असे समजण्यात यावे. त्यामुळे याबाबतीत 2-1 असे व्होटींग होऊन निर्णय देण्यात आलेला आहे. यासंदर्भात सुध्दा आपण असे म्हणू या की, क्युरेटीव्ह पिटीशन अंडर आर्टीकल 142 अन्वये सुध्दा पाच जज्जेसचा यासंदर्भातील निर्णय अपेक्षित आहे. म्हणून राज्य शासन सुध्दा क्युरेटीव्ह पिटीशन करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणार आहे. मी एवढेच सांगेन की, . . . .

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : मला असे वाटते की, कामकाज पत्रिकेवर ज्या अर्धा तासाच्या चर्चा दाखविण्यात आलेल्या आहेत, त्या चर्चेसाठी सकाळी 9.30 ते 11.30 वाजेपर्यंत वेळ देण्यात आली होती. अजून दोन अर्धा तासाच्या चर्चा व्हावयाच्या आहेत. त्यामुळे वेळेच्या बाबतीत काय करावयाचे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी माझे म्हणणे पाच मिनिटांमध्ये संपवितो.

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ पुढील दोन अर्ध्या तासाच्या चर्चा संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय,मी शेवटी एवढेच सांगतो की,खरे म्हणजे या कायद्या --

. . . .झेड-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे . . . .

मध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. 127 कलम आहे, ज्याच्यामध्ये सहा महिन्याचा कालावधी दिलेला आहे. कधी-कधी मुंबई महानगरपालिकेमध्ये असणारी प्रोसेस किंवा इतर अनेक महानगरपालिकांमध्ये काही कारणामुळे होणारी दिरंगाई, यामुळे बरीच रिझर्वेशन लॅप्स होत आहेत असे चित्र शासनाला पहावयास मिळते. म्हणून यामध्ये सुध्दा एम.आर.ॲण्ड टी.पी.च्या सेक्शन 127 मध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनातून आमचा प्रस्ताव आहे. त्या दृष्टीकोनातून हा कालावधी कसा वाढविता येईल ? हा मुद्दा आहे. साधारणपणे महानगरपालिकेला खरेदी सूचना मिळाल्यापासून सहा महिन्याच्या आत महानगरपालिकेने राज्य शासनाकडे भूसंपादनासाठी अर्ज करावा असा बदल करीत आहोत. त्यानंतर राज्य शासनाने 12 महिन्यामध्ये कलम 6 ची अधिसूचना काढावी म्हणजे एकूण 18 महिने दिले तर अशा प्रकारे रिझर्वेशन लॅप्स होण्याचे प्रमाण कमी होईल आणि सहा महिन्याच्या कालावधीचा दुरुपयोग करुन अशा प्रकारे काही गोष्टी करता येणे शक्य होऊ नये यादृष्टीकोनातून सुध्दा राज्य शासन एम.आर.ॲण्ड टी.पी.च्या 127 कलमामध्ये ॲमेंडमेंट करण्याच्या दृष्टीकोनातून सुध्दा लवकरच बिल आणत आहे. नाहीतर आम्ही यासंबंधात निश्चितपणे ऑर्डीनन्स काढणार आहोत. एकदा हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये उपस्थित झाला होता. तेथे त्यावर चर्चा देखील झाली आणि त्यामध्ये काही दुरुस्ती करुन मग ती बाब परत मंत्रिमंडळाच्या समोर यावी असे ठरले. म्हणजे राज्य शासनाची भूमिका स्पष्ट आहे. कलम 127 मध्ये ॲमेंडमेंट करुन अशा प्रकारे रिझर्वेशन्स् लॅप्स् होऊ नयेत याची काळजी राज्य शासनाच्या वतीने घेतली जात आहे असे मी सांगू इच्छितो. तेव्हा या अर्धा तासाच्या चर्चेच्या निमित्ताने मी मघाशी तीन पध्दतींचा उल्लेख केलेला आहे. एक म्हणजे याबाबतीत आम्ही ॲमेंडमेंट करु. दुसरे म्हणजे चौकशी करुन कारवाई करु आणि तिसरे म्हणजे यासंबंधात हाय कोर्टामध्ये जो निकाल लागला आहे, त्याबाबतीत सुप्रीम कोर्टामध्ये स्पेशल लिव्ह ॲप्लीकेशन करुन ताबडतोब अपिल दाखल करु.

-----

. . . .झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी** : चणेरा (ता.रोहा,जि.रायगड) येथे बृहत लघु पाटबंधाऱ्याच्या

कामासंबंधात कार्यवाही न करणे

**मु.शी.**: चणेरा (ता.रोहा,जि.रायगड) येथे बृहत लघु पाटबंधाऱ्याच्या कामासंबंधात कार्यवाही न करणेयासंबंधी श्री.जयंत प्र.पाटील वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"चणेरा (ता.रोहा, जि.रायगड) येथे बृहत लघु पाटबंधाऱ्यांच्या कामासंबंधीचा प्रस्ताव सन 1978 रोजी तयार करुन त्यास सन 1981 साली प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, प्रशासकीय मंजुरीनंतर शासनाने या कामासाठी आर्थिक तरतूद केली नसल्यामुळे पाच वर्षानंतर प्रशासकीय मंजुरी आपोआपच रद्द होणे, यानंतर तब्बल 13 वर्षानंतर दिनांक 9 जून 1994 रोजी या कामास रुपये 28 कोटी 70 लाख रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी देणे, त्यानंतर उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाकडून सन 1995-96 मध्ये रुपये 2 कोटींची आर्थिक तरतूद करणे, परंतु या प्रकल्पाचे कामाबाबत पुढे कोणतीही कार्यवाही न करणे, या बंधाऱ्यामुळे पाण्याचा सठा 35.64 दशलक्ष घनमीटर असून मुरुड व रोहा तालुक्यांतील 1655 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणे, शिवाय 3.49 दशलक्ष घनमीटर पिण्याचे पाणी उपलब्ध होणे. त्यामुळे हया महत्वाच्या आवश्यक असलेल्या प्रकल्पाकडे शासनाने लक्ष न दिल्याने परिसरातील जनतेत असंतोष पसरलेला असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, रायगड जिल्हयातील, रोहा तालुक्यातील चणेरा येथे पाटबंधारे विभागामार्फत लघु पाटबंधारा बांधण्याचे काम करण्यात येणार आहे. 1981 मध्ये या कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली. उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाकडून या कामासाठी 2 कोटी रुपयांची तरतूद देखील करण्यात आली. पण अजूनपर्यंत कामाला सुरुवात झालेली नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

या बंधाऱ्यातून रोहा आणि मुरुड या दोन तालुक्यातील 1655 हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. एक तर कोकण विभागामध्ये सिंचनाचा अनुशेष आहे. कोकण पाटबंधाऱ्याचे जवळजवळ 300 कोटी रुपये कृष्णा खोऱ्याकडे गेले. या बंधाऱ्याला 1981 साली प्रशासकीय मान्यता मिळाली. अजूनही त्या कामाला सुरुवात होत नाही. म्हणून या अर्धा-तास चर्चेव्दारे शासनाला विनंती करतो की, त्या ठिकाणचे 1655 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याच्या दृष्टीने उपाययोजना करुन हे काम तातडीने करण्याच्या दृष्टीने या कामाला गती द्यावी.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. सुनील देशमुख ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, चणेरा-मुठा लघुपाटबंधारे योजना ता. रोहा, जिल्हा रायगड या ठिकाणी स्थानिक नाल्यावर प्रस्तावित आहे. त्यामध्ये 26.68 द.ल.घ.मी. पाणीसाठा प्रस्तावित आहे. त्या प्रकल्पातून रोहा आणि मुरुड तालुक्यातील 30 गावांमध्ये 1442 हेक्टर क्षेत्रात सिंचन होणार आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 1981 मध्ये या प्रकल्पाला मूळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली व त्याची किंमत 5 कोटी 92 लाख रुपये होती. त्यानंतर 1994 मध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली व त्याची किंमत 28.70 लाख रुपये होती. त्यानंतर व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता 2001 मध्ये देण्यात आली. मान्यतेपासून 5 वर्षाच्या आत आर्थिक तरतूद न झाल्यामुळे 1994 ची जी सुधारित प्रशासकीय मान्यता होती ती व्यपगत झाल्यामुळे 2001 साली 37.27 लाख रुपये किंमतीला व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. या प्रकल्पासाठी जे भूसंपादन करावयाचे आहे ते क्षेत्र एकंदर 327 हेक्टर आहे. त्यामध्ये खाजगी आणि सरकारी क्षेत्र 130 हेक्टर आहे व वन जमीन 166 हेक्टर आहे. जी वन जमीन आहे त्यामध्ये पांचाड अभयारण्यातील 22.37 हेक्टर क्षेत्र येते. हे क्षेत्र अभयारण्यातील असल्यामुळे केंद्र शासनाचे 2001 मध्ये जे पत्र आले त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही अभयारण्यातील क्षेत्र वनेतर उपयोगासाठी वापरता येत नाही. आपल्याला पांचाड अभयारण्याचे क्षेत्र घ्यावयाचे असेल तर त्याला सुप्रीम कोर्टाची परवानगी लागते. सुप्रीम कोर्टाच्या परवानगीशिवाय आपल्याला हा प्रकल्प सुरु करता येत नाही. त्यामुळे हा प्रकल्प स्थगित केलेला आहे. आपल्याला ते वनक्षेत्र वगळावयायचे असेल तर त्या धरणाची जी महत्तम उंची 44 मीटर आहे ती 22 मीटरने कमी करावी लागेल. त्यामुळे 1400 हेक्टर सिंचन प्रकल्पासाठी जो 26.68 द.ल.घ.मी. पाण्याचा साठा करण्याची क्षमता आहे ती कमी होऊन 9.38 द.ल.घ.मी. राहील. त्यामुळे तो प्रकल्प विहित मापदंडात बसत नाही. त्यामुळे हा प्रकल्प स्थगित झालेला आहे. अभयारण्याचे क्षेत्र असल्यामुळे हा प्रकल्प स्थगित ठेवलेला आहे.

श्री. जयंत पाटील : यासंदर्भात सुप्रीम कोर्टामध्ये अपील करणार काय ?

डॉ. सुनील देशमुख : मी सांगू इच्छितो की, विदर्भामध्ये जास्तीत जास्त प्रकल्प वन जमिनीखाली येतात. ही अत्यंत किचकट प्रक्रिया आहे आणि त्या प्रक्रियेमध्ये याला मान्यता मिळत नाही. म्हणून हा प्रकल्प स्थगित ठेवलेला आहे.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जिल्हा नियोजन समितीची रचना परिपूर्ण न होणे

**मु. शी.** : जिल्हा नियोजन समितीची रचना परिपूर्ण न होणे यासंबंधी श्री. जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"जिल्ह्यातील पंचायती व नगरपालिका यांनी तयार केलेल्या योजना एकत्रित करण्यासाठी आणि संपूर्ण जिल्ह्यासाठी विकास योजनेचा मसुदा तयार करण्यासाठी जिल्हा पातळीवर जिल्हा नियोजन समितीची रचना करण्याकरिता तरतूद करण्यासाठी शासनाने दिनांक 9 ऑक्टोबर, 1998 रोजी अधिनियम प्रसिध्द करणे, या अधिनियमात सुधारणा करुन दिनांक 4 मे, 2000 रोजी सुधारित नियम प्रसिध्द करणे व त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी तीस पेक्षा कमी नसतील व पन्नासपेक्षा जास्त नसतील इतक्या सदस्यांचा समावेश असलेली एक जिल्हा नियोजन समिती असणे, तसेच महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (निवडणूक) नियम 1999 नुसार दिनांक 9-4-2007 च्या असाधारण राजपत्रामध्ये सुधारित नियम प्रसिध्द करुन त्यानुसार जिल्हा नियोजन समितीवर सदस्यांची निवड करणे, जिल्हा नियोजन समितीवर निवडणूकीद्वारे निवड होणाऱ्या सदस्यांची निवडणूक होण्यासाठी निवडणूकीची प्रक्रिया सुरु करुन ती दिनांक 20 जुलै, 2007 पूर्वी पूर्ण करणेबाबत शासनाने दिनांक 17 मे, 2007 रोजी आदेश देणे, मात्र या आदेशाला शासनानेच दिनांक 7 जून 2007 अन्वये आदेश देवून निवडणूक प्रक्रिया स्थगित करणे, त्यामुळे जिल्हा नियोजन समितीची रचना परिपूर्ण न होणे, तसेच जिल्हा नियोजन समितीच्या बैठका वेळीच न होणे, आठ-दहा सदस्यांमार्फतच जिल्ह्याच्या विकासाची कामे ठरविणे, सबब जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाकरिता जिल्हा नियोजन समितीवरील सर्व सदस्यांना या प्रक्रियेत भाग घेता यावा यासाठी जिल्हा नियोजन समितीची रचना ताबडतोबीने होण्यासाठी तातडीने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, जिल्हा नियोजन मंडळाच्या संदर्भात मी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे. या शासनाची मुदत आता एक वर्ष राहिलेली आहे. जी त्र्याहत्तरावी घटनादुरुस्ती केली

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. जयंत प्र. पाटील ....

त्यामध्ये जिल्हा नियोजन मंडळ कसे असावे, एकूण लोकप्रतिनिधी कसे असावेत हे दिलेले आहे. यासंदर्भात लोक हायकोर्टामध्ये गेले. हायकोर्टाने निर्देश दिले तरी शासन त्याची पुनर्रचना करीत नाही. जिल्हा नियोजन मंडळ हे 8 ते 9 लोक चालवित आहेत. सभापती महोदय, आपल्याला हे माहीत आहे. त्या ठिकाणी कोठेही लोकशाही राहिलेली नाही. अधिकारी आणि पालकमंत्री हेच या जिल्हा नियोजन मंडळाचे मालक झालेले आहेत. माननीय मंत्रिमहोदय हे स्वत: स्व. राजीव गांधी यांचे हितचिंतक आणि त्यांना मानणारे आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

घटना दुरुस्ती केल्यानंतर पंचायती राज व्यवस्था व डी.पी.डी.सी.ची रचना लोकशाही पध्दतीने झाली पाहिजे असे स्व.राजीव गांधी यांना हे अभिप्रेत होते. दोन वर्षापूर्वी सभागृहात त्या अनुषंगाने मी ही मागणी केलेली होती. या मागणीला अनुसरुन शासनाला निवडणूक जाहीर करावी लागली. त्यानंतर नामनिर्देशनाची प्रक्रिया सुरु झाली होती, पण शासनानेच त्याला स्थगिती दिली आहे. त्या प्रक्रियेला स्थगिती का दिली आणि आता ती स्थगिती उठविण्यासाठी काय अडचण आहे ? निवडणुकीची प्रक्रिया थांबविलेली आहे ती ताबडतोबीने सुरु करुन निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करावा यासाठी मी ही अर्ध्या तासाची चर्चा उपस्थित केलेली आहे. लोकशाहीच्या प्रक्रियेतून डी.पी.डी.सी.चा कारभार चालला पाहिजे अशी मागणी मी यानिमित्ताने करीत आहे.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

डॉ.सुनील देशमुख ( वित्त व नियोजन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जिल्हा नियोजन विकास समितीच्या संदर्भात अर्ध्या तासाची चर्चा उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, सन 1998 मध्ये जिल्हा नियोजन विकास समितीची रचना व कामे अधिनियम करण्यात आला. त्यानंतर डी.पी.डी.सी.च्या अधिनियमामध्ये ज्या काही त्रुटी होत्या त्या दूर करण्यासाठी 1999 मध्ये दुरुस्ती करण्यात आली. महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती रचना व कामे या अधिनियमाखाली प्रत्येक जिल्हयासाठी डी.पी.डी.सी.चे गठन केले जाते. जिल्हयाच्या लोकसंख्येनुसार या समितीची सदस्य निश्चित केलेली आहे. जिल्हयाची लोकसंख्या 20 लाख असेल तर त्या जिल्हयातील या समितीमध्ये 30 सदस्य घेता येतात. यामध्ये निवडून आलेले 24 सदस्य असतील, पदसिध्द 3 सदस्य, नामनिर्देशित 3 सदस्य असतील. पदसिध्द सदस्यांमध्ये जिल्हयाचे पालक मंत्री, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि जिल्हाधिकारी असतात. त्यामध्ये काही स्कोप नाही. त्या जिल्हयामधील खासदार आणि त्या जिल्हयात 8-9 आमदार असतील तर त्यापैकी एकाच आमदारांना या समितीमध्ये घेता येते, उर्वरित सर्व आमदार या समितीच्या बाहेर राहतात. या समितीमध्ये आमदारच नसतील तर त्या जिल्हयाच्या नियोजनामध्ये अडचण होईल असे सांगून विधानसभेमध्येही सन्माननीय सदस्यांनी विरोध केला होता. त्यामुळे मागील 5-6 वर्षापासून ही प्रक्रिया थांबली होती. प्रिफरेन्शल व्होटिंग सिस्टिमद्वारे पुन्हा निवडणूक घेण्याची प्रक्रिया सुरु करणार आहोत. ती केल्यानंतर 15 दिवसाच्या आत विधी व न्याय विभागाकडे ही बाब तपासासाठी पाठविली जाईल. त्यानंतर 15 दिवसामध्ये ती सूचना प्रसिध्द केली जाईल. त्यानंतर दोन महिन्याच्या आत निवडणुकीचा कार्यक्रम पूर्ण करण्याचे निदेश सर्व जिल्हाधिका-यांना देण्यात येतील. 73 वी घटना दुरुस्ती केंद्र सरकारने केलेली आहे. त्यामध्ये दुरुस्ती करण्याचे अधिकार राज्य सरकारला नाही. नामनिर्देशित सदस्यांना मतदानाचे अधिकार राहणार नाहीत. आता मी एवढेच सांगू इच्छितो की, 15 दिवसाच्या आत विधी व न्याय विभागाकडून मत आल्यानंतर दोन महिन्याच्या कालावधीत निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, शासनाने जिल्हा नियोजन समिती अधिनियम 1998 तयार केला होता. त्या कायद्याच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्हयासाठी जिल्हा नियोजन समिती स्थापन करण्याची प्रक्रिया सुरु केली होती. लोकनियुक्त प्रतिनिधी मग ते आमदार असतील, खासदार असतील त्यांना या समितीतून वगळले जाणार असेल तर ही समिती परिपक्व होणार नाही. त्यामुळे स्थानिक आमदारांना त्या समितीमध्ये घ्यावे. पदसिध्द किंवा नामनिर्देशित सदस्यांना घ्यावे पण स्थानिक लोकप्रतिनिधींना या समितीतून वगळू नये असे मी यानिमित्ताने सांगतो.

श्री.चंद्रकांत पाटील : जिल्हा परिषद, नगरपालिका यांच्या माध्यमातून 24 सदस्य निवडून येणार आहेत. या निवडणुकीसाठी मतदार यादीतील मतदार असतील की बाहेरचे लोक असतील ?

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, सध्या जिल्हा नियोजन विकास समितीच्या बैठकाच होत नाहीत. रायगड जिल्हयाची बैठक मागील 4 वर्षामध्ये झालेली नाही.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर..

खरे म्हणजे प्रत्येक तीन महिन्यानंतर ही बैठक व्हायला पाहिजे. ही अतिशय महत्वाची आणि जिल्ह्याच्या एकूण कारभारासंबंधीची बैठक असते. रायगड जिल्ह्याची डीपीडीसीची बैठक 5 वर्षे झालेली नाही. तेव्हा याबाबतीत माननीय मंत्री महोदय काही निर्देष देतील काय ?

डॉ. सुनील देशमुख : घटनेच्या 74व्या घटना दुरुस्ती नुसार घटेनेच्या अनुच्छेद 243 (झेड) (डी) मध्ये राज्यात जिल्हा नियोजन समित्या स्थापन करावयाच्या आणि प्रेफरेन्शियल व्होटींग घ्यायचे अशी दुरुस्ती करण्यात आलेली आहे. या समित्यांमध्ये निमंत्रितांचा समावेश असेल परंतु त्यांना मतदानाचा अधिकार राहाणार नाही. दोन महिन्याच्या आत निवडणुकीचा कायक्रम पूर्ण करण्यात येईल.

**तालिका सभापती** : व्होटींगची पध्दत कशी राहाणार आहे ?

डॉ. सुनील देशमुख : विधानपरिषदेप्रमाणे प्रेफरेन्शियल व्होटिंग सिस्टिम राहील आणि जे मतदार असतील त्यांनाच निवडणुकीला उभे राहाता येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी सांगितल्याप्रमाणे डीपीडीसीची बैठक वेळेवर होत नाही. पालकमंत्री हे महाराजा झालेले आहेत. पालकमंत्री हे शासकीय यंत्रणा आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वयक असतात. ते ठरवतील तसेच होते. कोणत्याही आमदाराला त्यांचा विकास निधी वापरु दिला जात नाही. तेव्हा याबाबतीत माननीय मंत्री महोदय लक्ष घालणार आहेत काय ?

डॉ. सुनील देशमुख : 74व्या घटना दुरुस्तीनंतर डीपीडीसीची संरचना होणार आहे. त्यामध्ये हे दोष दूर होतील.

**तालिका सभापती** : अर्धा-तास चर्चा संपलेल्या आहेत. आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सकाळी 11.48 ते दुपारी 12.00 पर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

---

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**<u>सभापतीस्थानी माननीय सभापती</u>**

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याच्या मुद्यासंबंधी.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, काल दिवसभर सदनामध्ये शिक्षणावर प्रदीर्घ चर्चा झाली. पर्सेंटाईल सूत्राविषयी अजूनही न्यायालयाने निर्णय दिलेला नाही. त्यामुळे पालक आणि विद्यार्थी अतिशय विमनस्क स्थितीत आहेत आणि हवालदिल झालेले आहेत. पर्सेंटाईल सिस्टीममुळे सर्व प्रवेश रद्द होतात की काय असा भीतीचा गोळा पालकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या पोटात निर्माण झाला आहे. निर्णय प्रक्रियेमध्ये जे लोक सहभागी आहेत त्यांच्याच नातेवाईकांची मुले सीबीएसई आणि आयसीएसई या शाळांमधून प्रवेश घेणार आहेत. त्यामुळे तिकडे झुकते माप चालले आहे असा जाणकारांचा होरा आहे. त्यामुळे कदाचित निर्णय विरोधात गेला तर हजारो विद्यार्थी ज्यांना प्रवेश मिळाला आहे ते प्रवेशापासून वंचित राहतील आणि शैक्षणिक युध्द सुरु होईल. एकेका जागेसाठी 10-10 पालक माऱ्यामाऱ्या करतील. हे सर्वोच्च सभागृह असल्यामुळे कृपा करुन यातून काही तरी मार्ग काढणे आवश्यक आहे म्हणून मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मी आपणांस विनंती करीत आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, काल दिवसभराच्या शिक्षणावरील चर्चेनंतर जी भीती वाटत होती ती पुन्हा एकदा कोर्टासमोर जी निर्णय प्रक्रिया सुरु आहे त्यावरुन सिध्द झालेली आहे. निर्णय प्रक्रियेमध्ये ज्या तऱ्हेने आयसीएसई आणि सीबीएसई शाळांमधील विद्यार्थ्यांना झुकते माप देण्याचा प्रयत्न सुरु आहे ते पाहता न्याय प्रक्रियेमध्ये सुध्दा त्या बाजूने झुकते माप दिले जात आहे हे स्पष्ट होत आहे. दहा लाख मुलांना 26000 मुलांसाठी ओलीस ठेवले जात आहे हे सिध्द झाले आहे. एकतर्फी निर्णय झाला तर कोर्टाच्या निर्णयाच्यासंदर्भात राज्य शासनाने निश्चित भूमिका घेतली पाहिजे. 90 टक्के प्रवेश पूर्ण झालेले आहेत. ते रद्द केले तर प्रचंड प्रमाणावर पालक आणि मुले रस्त्यावर येतील आणि युध्दजन्य परिस्थिती निर्माण होईल. सर्वोच्च सभागृह असल्यामुळे यामध्ये हस्तक्षेप करावा आणि शासनाने आपली भूमिका स्पष्टपणाने घ्यावी. कोर्टाकडून न्याय मिळेल किंवा नाही याबद्दल रास्त शंका आहे. कोर्ट सार्वभौम नाही. सभागृह सार्वभौम आहे. शेजारच्या गुजरात राज्यामध्ये न्याय मिळतो मग या राज्यामध्ये का मिळत नाही म्हणून शासनाने याबाबतीत तात्काळ न्याय द्यावा अशी मी विनंती करतो.

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि श्री. कपिल पाटील आणि सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या अनुषंगाने असणारी जी शंका आहे ती व्यक्त केली गेली. माननीय शिक्षणमंत्री आणि शिक्षण राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने आणि पालकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब असल्यामुळे शिक्षण मंत्री प्रा. पुरके आणि शिक्षण राज्यमंत्री श्री. मुश्रीफ यांनी शासनाची भूमिका सभागृहात स्पष्ट करावी.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यावेळेला 10 वी परीक्षेचा निकाल मोठया प्रमाणावर लागला. त्याबाबत अनेक वेळा सदनात चर्चा झालेली आहे. त्या खोलामध्ये मी जाऊ इच्छित नाही. याचा परिणाम असा झाला की, प्रवेशाची समस्या आ वासून उभी राहिली. गेल्या 5-7 वर्षामध्ये शिक्षण विभागाच्या असे लक्षात आले की सीबीएसई आणि आयबीएसई ही दोन केंद्राची बोर्ड आहेत त्यांचे निकाल मोठे लागायचे आणि एसएससी बोर्डाचा निकाल कमी लागायचा.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 12:05

श्री.हसन मुश्रीफ............

उदाहरण द्यायचे झाले तर एसएससी बोर्डामध्ये पहिला आलेला मुलगा रुपारेल कॉलेजच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये 44 व्या क्रमांकावर असायचा. विशेषत: महाराष्ट्रात राहणाऱ्या नागरिकांच्या मनात आपल्या मुलांना चांगल्या दर्जाच्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळत नाही याबद्दल फार मोठा असंतोष होता. आयसीएसई आणि सीबीएसई शाळातील मुलांना सहज प्रवेश मिळत होता. म्हणून प्रवेश प्रक्रियेमध्ये शासनाने दोन बदल करण्याचा निर्णय घेतला. 2003 साली 70:30 चे सूत्र लागू करण्याचा जीआर काढला होता, परंतु त्याची अंमलबजावणी करण्याची वेळ आली नाही. कारण एसएससी बोर्डाचा निकाल कमी प्रमाणात लागत होता. 70:30 प्रमाण म्हणजे 70 टक्के मुले स्थानिक आणि 30 टक्के मुले ही त्या जिल्हयाबाहेरील परंतु मेरिटनुसार घेतली जातील. पर्सेंटाईल पध्दत का आणावी लागली याचे मी उदाहरण दिले. सभापती महोदय, ही जगन्मान्य पध्दत आहे. अमेरिका आणि इतर देशांमध्ये देखील ही पध्दत लागू आहे. याबद्दल न्यायालयाच्या मनामध्ये शंका आहे, त्या शंकेचे निरसन करण्याचा शासनाने प्रयत्न केला आहे. परंतु न्यायालयाने सांगितले की, एसएससी बोर्डाची 100, आयसीएसई बोर्डाची 100 आणि सीबीएसई बोर्डाची 100 यामधून जे सूत्र काढले, त्याला अमुकाने भागा, ते योग्य आहे का बघा. या संदर्भात शालेय शिक्षण विभाग लक्ष देत आहे. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, न्यायालयाबद्दल बोलणे उचित होणार नाही. ज्यांची मुले आयसीएसई आणि सीबीएसई बोर्डाचे शिक्षण घेत आहेत त्या पालकांच्या मनामध्ये भीती आहे की,आपल्या मुलांवर अन्याय होईल का? अशी भीती रास्त आहे. परंतु उलट निकाल आला तर फार मोठा असंतोष निर्माण होईल. काल न्यायालयात माननीय न्यायमूर्तींनी उच्चारलेले वाक्य मी वाचले. 'एवढी पुढे गेलेली पध्दत कशी रोखता येईल' हे वाक्य लक्षात घेता कदाचित उलट निकाल येणार नाही असे माझे स्वत:चे मत आहे. उलट निकाल आला तर काय करायचे हे शासनाला ठरवावे लागेल. माननीय मंत्रीमहोदयांशी माझे बोलणे झाले आहे. विधी व न्याय विभागाशी चर्चा करीत आहोत. प्रवेश प्रक्रिया रद्द झालीच तर फार मोठा असंतोष निर्माण होईल, त्यादृष्टीने शासन निश्चित काळजी घेत आहे. मला विश्वास आहे, शासनाने लागू केलेले सूत्र सोमवारी न्यायालय मान्य करेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सरकारी वकील न्यायालयापुढे शासनाची बाजू मांडण्याचे काम करीत असतात. तुम्हा-आम्हाला काय वाटते हे तिथे मांडले जात नाही. त्यांना न्यायमूर्तींचा आदर करावा लागतो. ज्याप्रमाणे आम्ही सभागृहात माननीय सभापतींचा आदर राखतो. पण ज्या पध्दतीने न्यायमूर्ती सरकारी वकिलांना दटावतात, वागतात ते लक्षात घेतल्यानंतर त्यांना मनात जे आहे ते राबवून घेण्याचा प्रयत्न करतात असा आमचा न्यायालयाबाबत आक्षेप आहे, हे मी अधिकृत बोलत आहे. महाराष्ट्रामध्ये शिक्षण कोणत्या पध्दतीने असावे हे धोरण राज्याचे आहे. या राज्याच्या धोरणावर आघात करुन 10 लाख विद्यार्थ्यांचे मातेरे करणार असतील तर त्याचा प्रक्षोभ न्यायालयापर्यंत जाईल आणि गंभीर परिस्थिती निर्माण होईल. याला कोण जबाबदार आहे? शासनाने जे धोरण ठरविले आहे ते न्यायालयापुढे मांडले आहे.

श्री.हसन मुश्रीफ : ॲडव्होकेट जनरलना सोमवारी न्यायालयापुढे बाजू मांडण्यास उभे राहण्याची विनंती करतो.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आज अधिवेशन संपणार आहे. ॲडव्होकेट जनरल यांना आपण आपल्या दालनामध्ये बोलावून दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांसह ही परिस्थिती त्यांच्या निदर्शनास आणू शकता. हा फार जिव्हाळ्याचा आणि महत्वाचा विषय आहे. सभागृहाची भूमिका मांडली गेली पाहिजे. ॲडव्होकेट जनरलना बोलावून सांगितले पाहिजे. अन्यथा विरुध्द निर्णय आला तर 10 लाख विद्यार्थ्यांचे मातेरे होईल.

**सभापती** : माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितलेच आहे की, एकंदरीत या केसचे महत्व जेवढे आपल्याला वाटते तेवढे ते शासनालाही वाटते. म्हणून ॲडव्होकेट जनरलना या बाबतीत लक्ष घालण्यास सांगितले आहे. ते स्वत: याबाबतीत उच्च न्यायालयामध्ये शासनाची बाजू मांडतील आणि मला खात्री आहे, त्यादृष्टीने सन्माननीय सदस्य जे अपेक्षित करीत आहेत त्या पध्दतीने निकाल मिळण्यामध्ये शासन यशस्वी होईल.

---------

(नंतर श्री.भारवि...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील (कृषि राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यात खतांच्या झालेल्या तुटवड्याबाबत"या विषयावरील सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी जगदीश गुप्ता, सय्यद पाशा पटेल, दिवाकर रावते, अरविंद सावंत, गोपीकिसन बाजोरिया, सुरेश जेथलिया, किसनचंद तनवाणी, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, सुभाष चव्हाण, श्रीमती मंदा म्हात्रे, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, प्रतापसिंह मोहिते-पाटील, रणजितसिंह मोहिते-पाटील, जितेंद आव्हाड, प्रा.फौजिया खान, श्री.विक्रम काळे, डॉ.वसंत पवार सर्वश्री परशुराम उपरकर, यशवंतराव गडाख, गुरूमुख जगवानी, प्रतापराव सोनवणे, केशवराव मानकर, चरणसिंग सप्रा, जयंत पाटील, कपिल पाटील, प्रकाश शेंडगे, संजय केळकर, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, वि.प.स.यांच्या दिनांक 17 जुलै 2008 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 42285 ची अधिक माहिती सभागृहामसोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : अधिक माहिती छापावी)

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ SBT/

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक 1 ते 15 सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची 1 ते 15 अमुद्रित यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक 1 ते 15 अमुद्रित स्वरूपात सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे. अमुद्रित यादी क्रमांक 1 ते 15 मुद्रित स्वरूपात प्राप्त झाल्यानंतर माननीय सदस्यांना वितरित करण्यात येईल.

( प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात )

.....

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ SBT/

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.हसन मुश्रीफ (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा सन 2005-2006 चा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर मांडतो.

**सभापती** : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला.

....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचासन 2005-2006 चा प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रशासन अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला.

.....

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक आधुनिकीकरण करण्यासाठी मदरसा शिक्षण बोर्ड स्थापन करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी समिती नियुक्ती करणे.

श्री.हसन मुश्रीफ (शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधान परिषद नियम 158 अन्वये खालील प्रस्ताव मांडतो :-

दिनांक 14 डिसेंबर2006 रोजी विधान परिषद सभागृहात उत्तरित झालेल्या सर्वश्री सदाशिव पोळ, जितेंद्र आव्हाड, प्रा.फौजिया खान, वि.प.स.यांच्या "मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक आधुनिकीकरण करण्यासाठी मदरसा शिक्षण बोर्ड स्थापन करणे" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 23361 च्या चर्चेच्या वेळी माननीय शालेय शिक्षणमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सदर प्रकरणी सखोल चौकशी करून उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहाच्या खालील 25 सदस्यांची समिती गठित करण्यात यावी.

1 प्रा.वसंत पुरके, माननीय मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवककल्याण

2 श्री.हसन मुश्रीफ, माननीय राज्यमंत्री, शालेय शिक्षण

3 श्री.गणपतराव देशमुख, वि.स.स.

4 श्री.नरसय्या आडम, वि.स.स.

5 श्री.जे.पी.गावित, वि.स.स.

6 श्री.हर्षवर्धन देशमुख, वि.स.स.

7 ॲड्.वामनराव चटप, वि.स.व.

8 डॉ.सय्यद अहमद, वि.स.स.

9 श्री.हाफिज धत्तुरे, वि.स.स.

10 श्री.शेख रशिद हाजी,वि.स.स.

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

11 श्री.दुर्राणी अब्दुल्ला खान अ.लतिफ खान, वि.स.स.

12 श्री.खान मोहम्मद आरीफ नसीम, वि.स.स.

13 श्री.माणिकराव कोकाटे, वि.स.स.

14 श्री.संजय चव्हाण, वि.स.स.

15 श्री.दादाजी भुसे, वि.स.स.

16 श्री.विजय जाधव, वि.स.स.

17 श्रीमती शोभा बच्छाव, वि.स.स.

18 प्रा.फौजिया खान, वि.प.स.

19 श्री.मुझफ्फर हुसेन नझर हुसेन, वि.प.स.

20 श्री.पाशा पटेल, वि.प.स.

21 श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

22 श्री.जयंत पाटील, वि.प.स.

23 श्री.सुरेश जेथलिया, वि.प.स.

24 श्री.सागर मेघे, वि.प.स.

25 श्री.जितेंद्र आव्हाड, वि.प.स.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना सन्माननीय सदस्यांची नावे कोणी दिली आहेत ? त्याला आमची हरकत आहे.

**सभापती** : अशा समितीवर त्या त्या पक्षातील प्रपोर्शनेटली नावे घेत असतो.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या समितीवर घेतलेल्या सन्माननीय सदस्यांची नावे गट नेत्यांना दाखविण्यात येतील. त्यात जर त्यांना काही बदल करावयाचे असतील तर त्याप्रमाणे बदल करण्यात येईल.

**सभापती** : जो पर्यंत बदल करण्यात येत नाही, तो पर्यंत हा प्रस्ताव आपल्याला संमत करता येणार नाही. तेव्हा समिती सदस्यांची नावे अंतिम झाल्यानंतर सदर प्रस्ताव पुन्हा सभागृहासमोर आपण घेऊन यावा. ...6



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : होय.

श्री.गुरूनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, अशा समितीसाठी सभागृहाचे जे गट नेते असतात त्यांच्याकडून नावे घेतली पाहिजेत किंवा पक्ष प्रतोद यांच्याकडून नावे घेतली पाहिजेत. सरकारी अधिकाऱ्यांनी नावे सुचवावयाची आणि समिती करावयाची हे बरोबर नाही.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, समिती सदस्यांच्या नावामध्ये दुरूस्ती करण्यात येईल.

**सभापती** : ठीक आहे.

.......

...7

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मुंबईतील धर्मादाय रूग्णालयांची तपासणी करण्याकरिता नियुक्त केलेल्या तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री.हसन मुश्रीफ (विधी राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, "मुंबईतील धर्मादाय रूग्णालयांची तपासणी" या विषयावरील तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्यासाठी दिलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढवून द्यावा.

महोदय, या तदर्थ समितीचे काम अतिशय चांगले चालले आहे. हजारो गरीब रूग्णांना मोठ्या रूग्णालयामध्ये मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यामध्ये या समितीने महत्त्वपूर्ण अशी भूमिका बजावली आहे. मोठी रूग्णालये एकाही गरीब रूग्णाला आपल्या रूग्णालयातच प्रवेश देत नव्हते. पण आता त्यात बराचसा बदल झालेला आहे. या समितीतील सन्माननीय सदस्यांनी समितीच्या कामकाजामध्ये मनापासून भाग घेतलेला आहे. तेव्हा या समितीची मुदत वाढवावी अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

.....

यानंतर पी खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ( समिती प्रमुख ): सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, महाराष्ट्र विधानपरिषद विशेष हक्क समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या, 1) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय; प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगांव, जि.बुलढाणा आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण व 2) श्री.मनेश मसंद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक हॉस्पिटल, मुंबई यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण

या दोन्ही प्रकरणांवरील विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प. नियम 178 (1) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष हक्कभंगाच्या सूचनेसंबंधी</u>

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यापूर्वी मला एक धमकीचे पत्र आले होते आणि त्यासंदर्भात मी देखील एक हक्कभंगाची सूचना दिली असून त्या धमकीच्या पत्रात आपल्यालाही चॅलेंज केलेले आहे. त्यासंबंधीचा निर्णय अद्यापही झालेला नाही.

**सभापती** : आपण दिलेल्या पत्राच्या संदर्भात मी नंतर माहिती देतो.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जे पत्र दिलेले आहे त्यासंबंधीची चौकशी देखील पूर्ण होत आली आहे.

----------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन पस्तिसावा अहवाल सन 2005-2006 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : पुनर्विलोकन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------------

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लातूर, वाशिम व चंद्रपूर या जिल्हा परिषदांचे सन 2006-2007 चे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक पुनर्विलोकन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----------------

डॉ. सुनील देशमुख ( पाटबंधारे राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा सन 2006-2007 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------------

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मा. राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने सन 2007-2008 मधील वितरित तरतूद व मार्च, 2008 अखेर खर्चाचा जिल्हानिहाय तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : खर्चाचा जिल्हानिहाय तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------------

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन 2005-2006 चा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------------

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (वस्त्रोद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2002-2003 चा 31 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------------

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा सन 2004-2005 चा 43 वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------------

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री ) :महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मार्यादित, नागपूर यांचा सन 2005-2006 चा 32 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------------

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विधानपरिषदेच्या सन 2008 च्या पहिल्या अधिवेशनात दिनांक 10 मार्च, 2008 ते 25 एप्रिल, 2008 या कालावधीत मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 1130 आश्वासनांची यांदी" तसेच "सन 1982 च्या पहिल्या अधिवेशनापासून ते सन 2007 च्या तिस-या अधिवेशनापर्यंत देण्यात आलेल्या 654 आश्वासनावरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीची विवरणपत्रे" सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : आश्वासनावरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीबाबतची विवरणपत्रे सभागृहासमोर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेले विवरणपत्रे छापावे.)

----------------

यानंतर श्री. गायकवाड....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळ मर्यादितचा सन 2004-2005 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे

---

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे सन 1990-91, 1991-92, 1992-93, 193-94,1994-95 आणि 1995-96 चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ हे गरीब व मागालेल्या समाजातील लोकांच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेले आहे. या महामंडळाचा सन 1990-91 सालचा अहवाल 2008 साली सादर करण्यात येत आहे. तेव्हा अहवाल सादर करण्यास इतका विलंब होण्याची कारणे काय आहेत आणि जो अधिकारी या विलंबास जबाबदार असेल त्याच्याविरुद कारवाई करण्यात येणार आहे काय ?

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला आहे तो बरोबर आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचा 1990-91 सालचा अहवाल 2008 साली सभागृहासमोर ठेवला जात आहे. वास्तविक अशा प्रकारच्या महामंडळाच्या कामकाजांचे अहवाल जर तातडीने उपलब्ध झाले तर कामकाजाच्या दृष्टीने त्यांचा उपयोग होऊ शकेल.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या अहवालाच्या संदर्भात अनेक चांगल्या प्रकारच्या सूचना केलेल्या असतात तसेच काही ऑब्जेक्शन काढलेले असतात त्यामुळे अहवाल सादर करण्यास विलंब होत असतो. अहवाल सादर करण्यास विलंब व्हावयास नको अशी भावना सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी मांडलेली आहे त्याच्याशी मी सहमत आहे. त्याचबरोबर या संदर्भात आपण जे काही निदेश दिलेले आहेत त्याच्याशी देखील मी सहमत आहे. त्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करु आणि अहवाल सादर करण्यास विलंब होणार नाही या दृष्टीने पुढच्या काळात काळजी घेण्यात येईल. इतक्या विलंबाने अहवाल सादर करणे म्हणजे केवळ औपचारिकता पूर्ण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

करण्यासारखे आहे. तेव्हा अशा घटना पुन्हा घडणार नाहीत आणि वेळेवर अहवाल सादर करण्यात येईल. त्याचप्रमाणे हा अहवाल सादर करण्यास विलंब का झाला आहे त्या संदर्भात चौकशी करण्यात येईल आणि जो अधिकारी या विलबांस जबाबदार असेल त्याच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय दीड दोन वर्षापासून सतत अधिका-यांकडे पाठपुरावा केला असल्यामुळे 1990-91 ते 1995-96 पर्यंतचे अहवाल सादर करण्यात आलेले आहेत. 1996-97 ते 2007पर्यंतचे अहवाल पूर्ण केलेले आहेत. ए.जी.कडून त्यासबंधीचा फायनल रिपोर्ट आल्यानंतर हे अहवाल देखील पुढील अधिवेशनात सभागृहाला सादर करण्यात येतील.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

## रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे

श्री.जैनुद्दीन जव्हेरी ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा सतरावा अहवाल सभागृहाला सादर करतो

**सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--

## लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

प्रा.बी.टी.देशमुख (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा दहावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : लोकलेखा समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--

## अंदाज समितीचा अहवाल सादर करणे

श्री.मधुकर चव्हाण (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा एकोणीसावा अहवाल सभागृहाला सादर करतो

**सभापती** : अंदाज समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री.आर.आर.पाटील :सभापती महोदय, काही अहवाल उशिरा सादर केले जातात तेव्हा .अहवाल उशिरा सादर करणे हा एक भाग आहे त्याचबरोबर जे अहवाल सभागृहासमोर सादर करण्यात आलेले आहेत ते अहवाल सन्माननीय सदस्यांनी जर वाचण्यासाठी घरी नेले तर बरे होईल. मी आमदार म्हणूनही काम केलेले आहे.तेव्हा मला असे दिसून आले आहे की, काही सन्माननीय सदस्य असे अहवाल बाजूला ठेवतात. ही वस्तुस्थिती आहे. काही सन्मानीय सदस्य अहवाल बरोबर नेतात त्यांना मी धन्यवाद देतो . तेव्हा जे अहवाल सभागृहाला सादर केले जातात त्यातील सायलेंट फिचर्स सबंधी किंवा महत्वाच्या मुद्यासंबंधीची जर सभागृहात माहिती देण्यात आली तर जे सन्माननीय सदस्य हे अहवाल नेत नाहीत त्यांना त्यांचा उपयोग होईल.

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, या अहवालावर चर्चा करण्यात यावी असा मुद्दा आम्ही गेल्या दोन अधिवेशनापासून मांडत आहेत. त्याचप्रमाणे दोन दिवस या अहवालावर चर्चा घेण्यात यावी. अशी माननीय सभापतींना देखील विनंती केली होती. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे या अहवालावरील सायलेन्ट फिचर्सच्या संदर्भात मर्यादित वेळ देऊन चर्चा झाली पाहिजे असे आम्हाला देखील वाटते. या अहवालावर काही मते व्यक्त व्हावयास पाहिजेत अन्यथा आपण सांगितल्याप्रमाणे अवाल सादर होतात व येथेच पडून राहतात. त्याचबरोबर जे अहवाल सादर होत असतात ते आम्ही नेत असतो व ते वाचल्यानंतर या अहवालातील माहितीच्या आधारे काही प्रश्न देतो त्यातील काही प्रश्न स्वीकारले जातात परंतु काही प्रश्न स्वीकारले जात नाहीत. या ठिकाणी सभागृहाचे नेते म्हणून त्यांनी जी सूचना केलेली आहे तिचे मी स्वागत करतो आणि या अहवालावर अधिवेशनामध्ये एक दोन दिवस चर्चा करण्यात यावी अशी मी माननीय सभापतींना विनंती करतो.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी लोक लेखा समितीचा चेअरमन होतो तेव्हा सुध्दा माझी हीच मागणी होती .विविध समित्यांच्या बैठकासाठी सन्माननीय सदस्य मतदारसंघातून आठवडयातून दोन दिवस या ठिकाणी येतात. त्याचप्रमाणे संपूर्ण राज्यातून अनेक अधिकारीसुध्दा येत असतात .या बैठकांमध्ये माहिती घेऊन काही निष्कर्ष काढले जातात .परंतु त्या अहवालाकडे कोणी पहावयाचे नाही, त्याबाबतीत कोणी वाचावयाचे नाही....

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

काहीही उपाय योजना नाही किंवा त्याची चर्चा होत नाही त्यामुळे हा अनाठायी खर्च होतो. असे होऊ नये म्हणून माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सूचना केल्याप्रमाणे कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये याबाबत निर्णय घेऊन प्रत्येक अधिवेशनामध्ये किमान एक अहवाल आला तर त्या समितीलाही वाटेल की, आपण जे कष्ट करतो काम करतो, त्याचा राज्याला उपयोग होत आहे. त्यामुळे माननीय सदस्यांच्या सूचनेशी शासन सहमत आहे. पुढील अधिवेशनापासून एक अहवाल चर्चेकरिता घेऊन त्यावर दिवसभर चर्चा करावी.

**सभापती** : माननीय उपमुख्यमंत्री व माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सभागृहासमोर मांडण्यात येणाऱ्या अहवालांपैकी किमान एक-दोन निवडक अहवालावर एक किंवा दोन दिवस चर्चा होणे गरजेचे आहे अशाप्रकारची सूचना केली. मी आपणास एवढेच सांगतो की, कामकाज सल्लागार समितीसमोर यापुढील अधिवेशनात हा प्रस्ताव ठेऊन किमान एक किंवा दोन निवडक अहवालावर सविस्तर चर्चा केली तर ज्यांच्याकडून हे अहवाल तयार करण्यात येतात त्यांनाही आपण तयार केलेला संपूर्ण अहवाल पाहिला जातो, त्यावर विचारविनिमय होतो, सविस्तरपणे चर्चा होते असे वाटेल. त्यादृष्टीने माननीय सदस्यांनी केलेली सूचना अत्यंत महत्वाची आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/ MMP/

पृ.शी
मु.शी } महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

डॉ. नीलम गोऱ्हे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सभागृहाला सातारा जिल्हा परिषदेच्या सेवेतील महिला अधिकारी व कर्मचारी यांची भरती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना या विषयावर दिनांक 24 एप्रिल 2002 रोजी महिलांचे हक्क व कल्याण समितीने सभागृहास सादर केलेल्या पाचव्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल सादर करते.

सभापती महोदय, मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, महिलांचे हक्क व कल्याण समितीमध्ये असणारे आम्ही आमदार सदस्य हे सातत्याने समितीने केलेल्या शिफारशींबाबत पुढे काय झाले याचा पाठपुरावा करुन त्यासंबधी सातत्याने बैठका घेत असतो. त्यामध्ये सातारा जिल्हा परिषदेच्या संदर्भात सन 2002 मध्ये समितीने शिफारशी केल्या होत्या. त्यामध्ये 30 टक्के आरक्षणाबाबत जिल्हा परिषदेकडून कार्यवाही पूर्ण झालेली नव्हती. इतकेच नव्हे तर त्या करिता सातारा जिल्हा परिषदेने जी यंत्रणा तयार केली पाहिजे ती सुध्दा झालेली नव्हती. ग्रामसेविकांचा 71 पदांचा अनुशेष असून त्यामध्ये 30 टक्के आरक्षणानुसार जागा भरावयास पाहिजे होत्या, त्या भरल्या गेल्या आहेत हे मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे. त्याचप्रमाणे सातारा जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास समितीबाबत जिल्हा परिषदेची अतिशय उदासीन भूमिका आहे. जिल्हा परिषदेला वेगवेगळया वस्तू लागतात, त्या वस्तू महिला बचत गटाकडून घेतल्या पाहिजेत अशाप्रकारची शिफारस सन 2002 मध्ये समितीने आपल्या अहवाल केली होती. तिची अंमलबजावणी अजिबात झाली नाही. त्यासाठी समितीने सातारा जिल्हा परिषदेला सूचना केली होती. त्याचबरोबर केंद्र सरकार पुरस्कृत इंदिरा आवास योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील व्यक्तिंना घरकुलांचे वाटप होते. परंतु अनेक महिला अशा आहेत की, त्यामध्ये विधवा आहेत, परित्यक्ता आहेत. परंतु त्या दारिद्रय रेषेच्या वरील आहेत. तेव्हा कनिष्ठ, मध्यम वर्गातील महिलांना घरकुल योजनेचे वाटप करण्यासाठी राजीव गांधी निवारा योजना अग्रक्रमाने घेण्यासाठी सातारा जिल्हा परिषदेने लक्ष द्यावे अशी समितीची शिफारस आहे. खास करुन 10 टक्के निधी महिला व बाल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे...

विकास समितीला दिला जातो तो अतिशय अपुरा आहे. हा निधी कशापध्दतीने वाढविता येईल याबाबत जिल्हा परिषदेने राज्य सरकारला निर्गमित करावे अशी शिफारस केली आहे. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आणि माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी सूचना मांडली आहे त्यानुसार अनेक समित्यांच्या अहवालापैकी या समितीचा अहवाल प्राधान्याने चर्चेकरिता घेण्यात यावा अशी मी विनंती करते.

**सभापती** : सातारा जिल्हा परिषदेच्या सेवेतील महिला अधिकारी व कर्मचारी यांची भरती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना या विषयावर दिनांक 24 एप्रिल 2002 रोजी महिलांचे हक्क व कल्याण समितीने सभागृहास सादर केलेल्या पाचव्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. आर. आर पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "बुलढाणा जिल्हयातील 9 वर्षांच्या बालिकेवर झालेला बलात्कार" या विषयावरील सर्वश्री अरविंद सावंत व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वये सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिनांक 28 मार्च 2006 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : या ठिकाणी सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

----

(यानंतर श्री. सुंबरे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम 93 अन्वये सूचनांबाबत ...**</u>

**सभापती** : आज नियम 93 अन्वये सूचना आलेल्या नाहीत. मात्र नियम 93 खालील सूचनांच्या अनुषंगाने आज 15 निवेदने आलेली आहेत. आता ती निवेदने घेतली जातील.

**पृ. शी.** : डहाणू तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील आश्रमशाळांत सडक्या धान्याचे अन्न दिले जाणे.

**मु. शी.** : डहाणू तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील आश्रमशाळांत सडक्या धान्याचे अन्न दिले जाणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "डहाणू तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील आश्रमशाळांत सडक्या धान्याचे अन्न दिले जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..... केके 2 ...

( नियम 93 खाली आदिवासी विकास मंत्र्यांचे निवेदन (क्र.1) नंतर .. )

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीचे जेवण न मिळणे तसेच अन्य सुविधा न मिळणे याबाबत गेल्या 2-4 दिवसात अनेक माध्यमातून येथे चर्चा झालेली आहे आणि आज पुन्हा एकदा आदिवासी विद्यार्थ्यांना सडक्या धान्याचे अन्न दिले जात असल्याचा प्रश्न येथे आलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे की, डहाणू तालुक्यातील ज्या आश्रमशाळा आहेत तेथील विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे जेवण मिळत नाही, दिले जात नाही. त्यांना अत्यंत निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जाते. शासनाकडून नेहमीच म्हटले जाते की, आश्रमशाळांतील मुलांना आम्ही चांगले जेवण देतो, सर्व सुविधा देतो पण ती दिशाभूलच आहे. आजच्या 'दै. नवशक्ती' मध्ये शहापूर, मुरबाड येथील आदिवासी आश्रमशाळा, मोरोशीची आश्रमशाळा यासंबंधात अर्धा पान आर्टिकल आलेले आहे त्यात तेथील विद्यार्थ्यांना कोणकोणत्या गैरसोयी आहेत हे सांगितले आहे. तेव्हा या आदिवासी विद्यार्थ्यांच्या गैरसोयी लक्षात घेता परवाच येथे चर्चा झाली पण तरीही याची दखील घेऊनर ताबडतोब आपण काही उपाययोजना करणार काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, ऑलरेडी या संदर्भात पाहणी करण्यासाठी, चौकशी करण्यासाठी दोन्ही सभागृहाची अनुसूचित जमाती कल्याण समिती आहे त्या शिवाय पी.ओ. पातळीवर त्यांची एक समिती आहे त्याचबरोबर गाव पातळीवरदेखील आश्रमशाळा समिती आहे. तरीही पीओ समिती किंवा आयुक्तांमार्फत या संदर्भात पुन्हा सगळी चौकशी करून उचित कारवाई केली जाईल.

***

..... केके 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील अनुदानित आदिवासी आश्रमशाळांना दिले जाणारे परिरक्षण अनुदान.

**मु. शी.** : राज्यातील अनुदानित आदिवासी आश्रमशाळांना दिले जाणारे परिरक्षण अनुदान याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, चंद्रकांत पाटील, मधुकर चव्हाण, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, चंद्रकांत पाटील, मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी "राज्यातील अनुदानित आदिवासी आश्रमशाळांना दिले जाणारे परिरक्षण अनुदान" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी केलेल्या निवेदनाने आमचे समाधान झाले आहे, आम्हाला उपप्रश्न विचारावयाचे नाहीत.

..... केके 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आदिवासी आश्रमशाळा मांगुळ (टाकळगाव), ता.बाभुळगाव, जिल्हा यवतमाळच्या व्यवस्थापनाच्या मनमानी कारभारामुळे विद्यार्थी तसेच कर्मचाऱ्यांची होत असलेली पिळवणूक.

**मु. शी.** : आदिवासी आश्रमशाळा मांगुळ (टाकळगाव), ता.बाभुळगाव, जिल्हा यवतमाळच्या व्यवस्थापनाच्या मनमानी कारभारामुळे विद्यार्थी तसेच कर्मचाऱ्यांची होत असलेली पिळवणूक याबाबत श्री.कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री): सभापती महोदय, श्री. कपिल पाटील यांनी "आदिवासी आश्रमशाळा मांगुळ (टाकळगाव),ता.बाभुळगाव,जिल्हा यवतमाळच्या व्यवस्थापनाच्या मनमानी कारभारामुळे विद्यार्थी तसेच कर्मचाऱ्यांची होत असलेली पिळवणूक " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... केके 5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 खालील आदिवासी विकास मंत्र्यांच्या निवेदन (क्र.3) नंतर ...)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आदिवासी आश्रमशाळांच्या संदर्भात या अगोदर झ ालेल्या दोन निवदेनाचा जो विषय आहे तोच जवळपास सारखा असलेला हाही विषय आहे. पण हा एका आश्रमशाळेचा प्रश्न नाही वा परिस्थिती नाही तर राज्यातील जवळपास सर्वच आश्रमशाळांची परिस्थिती अत्यंत वाईट अशी आहे. त्यांना खराब अन्न दिले जाते. एक प्रकारे या गरीब आदिवासी विद्यार्थ्यांच्या ताटातील अन्नच हे संस्थाचालक खात असतात. आपण जो मेनू ठरवून दिलेला असतो त्याप्रमाणे तेथे कधीच जेवण दिले जात नाही. तेव्हा माझी या निमित्ताने विनंती आहे की, या राज्यातील सर्वच आश्रमशाळांची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची गरज आहे आणि ही चौकशी करताना खाजगी संस्थेची मदत घेऊन, तेथे प्रत्यक्ष काय होत आहे ते पाहणे गरजेचे आहे. आज आश्रमशाळांतील या गरीब मुलांना कित्येकदा उपाशी पोटीच झोपावे लागते. तेव्हा एक दोन शाळांपुरता हा विषय मर्यादित नाही हे लक्षात घेऊन आपण राज्यातील सर्व आश्रमशाळांची चौकशी खाजगी संस्थेकडून करणार काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, त्रयस्थ एजन्सीमार्फत या सर्व अनुदानित आश्रमशाळा आहेत त्यांची चौकशी करून उचित ती कारवाई केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर असा प्रश्न आहे. आता या आदिवासी आश्रमशाळांची पाहणी करण्यासाठी आपल्या विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहाची अनुसूचित जाती कल्याण समिती आहे. परंतु साधारणपणे असे लक्षात येते की, त्याच प्रवर्गातील लाक त्या त्या समित्यांवर जात असतात. आता सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे हा प्रश्न केवळ ठाणे जिल्ह्यातील वा अन्य एका जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळेचा प्रश्न नाही तर एकूणच राज्यातील सर्वच आदिवासी आश्रमशाळांचा प्रश्न आहे म्हणून या सभागृहाची एक नवी त्रयस्थ समिती नेमून तिच्यामार्फत अहवाल घेऊन तो सभागृहासमोर आपण ठेवणार का ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आदिवासी मुलांसाठी नॉन-आदिवासी आमदारांची समिती नेमणे हा आदिवासी आमदारांवर अविश्वास दाखविल्यासारखे होईल. त्यामुळे अनुसूचित जाती, जमातींसाठी असलेल्या योजनांचे परीक्षण करण्यासाठी, सुपरविजन करण्यासाठी त्यांची समिती आपण नेहमीच गठित करतो. ....

( यानंतर सौ. रणदिवे ..... एलएल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/SBT/MMP पूर्वी श्री.सुंबरे . . . . 12:40

श्री.आर.आर.पाटील . . . .

त्यासंबंधात आपली कमिटी आहे. त्यांनी याबाबतीत पहाणी करणे हे अधिक चांगले होईल. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जो प्रश्न विचारला होता, त्याला माननीय मंत्री महोदयांनी चांगले उत्तर दिलेले आहे की, थर्ड पार्टीकडून आम्ही चौकशी करु.

-----

. . . .2एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 अन्वयेच्या निवेदन क्र.4 बाबत</u>

**सभापती** : मी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात माननीय सामान्य प्रशासन राज्यमंत्री श्री.राजेश टोपे उत्तर देणार आहेत. परंतु ते आता विधानसभेमध्ये असल्याने, निवेदन क्र.4 बाबतची चर्चा पेंडींग ठेवण्यात येईल. माननीय सामान्य प्रशासन राज्यमंत्री सदनामध्ये आल्यानंतर सदरहू निवेदन चर्चेसाठी घेता येईल.

----

. . . . 2 एल-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नदीजोड प्रकल्पाच्या अंमलबजावणीस होत असलेली दिरंगाई

**मु. शी.** : नदीजोड प्रकल्पाच्या अंमलबजावणीस होत असलेली दिरंगाई याबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे, विनोद तावडे, मधुकर चव्हाण,रामनाथ मोते वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ.सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते यांनी "नदीजोड प्रकल्पाच्या अंमलबजावणीस होत असलेली दिरंगाई" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . . 2एल-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, केंद्र शासनाचा नद्याजोड प्रकल्प आहे. तसेच पाणी टंचाईवर मात करण्यासाठी केंद्र शासनाने आंतरनदी जोड योजनेचा कार्यक्रम तयार केलेला आहे. या कार्यक्रमांतर्गत सांगली जिल्हयातील ज्या नद्या आहेत, त्याविषयी एक आराखडा सादर झालेला आहे असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, जो आराखडा सादर करण्यात आलेला आहे, त्यामध्ये कोणकोणत्या नद्या घेण्यात आलेल्या आहेत ? केंद्र शासनाकडे हा आराखडा कधी सादर करण्यात येणार आहे ? ही योजना कधी कार्यान्वित होणार आहे ? याचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, देशांतर्गत असलेल्या पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी केंद्र शासनाने नॅशनल रिव्हर लिंकेज प्रोजेक्ट, जो अत्यंत महत्वाकांक्षी असा प्रोजेक्ट आहे, त्याचा कार्यक्रम तयार केलेला आहे. या कार्यक्रमामध्ये हिमालयीन घटकामध्ये 14 नद्या आणि पेनिनसुलर घटकामध्ये 16 नद्या अशा प्रकारे दोन घटकामधील कार्यक्रम आहे. पण या दोन्ही घटकांच्या बाबतीत सांगावयाचे तर महाराष्ट्रावर फार मोठया प्रमाणावर अन्याय होत आहे. कारण या दोन्ही घटकांमध्ये महाराष्ट्राचा अंतर्भाव कमी असल्यामुळे म्हणजे दमनगंगा-पिंजाळ जोड योजना एवढयापुरताच मर्यादित असल्यामुळे आपण ऑब्जेक्शन दाखल केले होते की, महाराष्ट्र शासनाने या राज्यावर होणारा अन्याय वेळोवेळी निदर्शनास आणला आहे व महाराष्ट्राच्या राज्यांतर्गत असलेली नदीजोड योजना या कार्यक्रमाच्या अंतर्गत घेण्याची मागणी केली. मला सांगण्यास अत्यंत आनंद होत आहे की, केंद्र शासनाने आपली ही मागणी मान्य केलेली आहे. सध्याच्या घटकेला आपण सहा प्रस्ताव पाठविलेले असून, त्यामध्ये विदर्भातील 3, जळगावमधील 2 आणि पश्चिम महाराष्ट्रातील 1 असे आहेत. विदर्भातील कन्हान-वर्धा, वैनगंगा-पूर्णा आणि इंद्रावती-वर्धा असे तीन प्रस्ताव असून, जळगाव जिल्हयाच्या बाबतीत सांगावयाचे तर जळगाव जिल्हा नदीजोड योजना, रिव्हर लिंकेज कॅनॉल हा प्रस्ताव आहे आणि पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा-भीमा स्थैर्यीकरण असा प्रस्ताव आहे. आता जे नवीन प्रस्ताव पाठविणार आहोत, त्याचा सर्व्हे राष्ट्रीय जलविकास अभिकरणातर्फे म्हणजे एन.डब्ल्यू.डी.ए.मार्फत होणार आहे. शासनास सादर केलेला सांगली जिल्हा नदीजोड प्रकल्पाचा प्रस्ताव त्यांच्याकडे पाठविण्यात येणार आहे. त्याचा सर्व्हे झाल्यानंतर याबाबतीत निर्णय होऊ शकतो.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, आपण जो प्रस्ताव सादर केला, त्यामध्ये एक कोटी

. . . .2 एल-5



श्री.प्रकाश शेंडगे . . . .

रुपये खर्च केले. पण सांगली जिल्हयातील कोणत्या नद्या घेण्यात आल्या आहेत.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, याबाबतीत मी सांगितलेले आहे.

-----

. . . .2 एल-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



<u>नियम 93 च्या निवेदन क्र. 6 व 7 बाबत</u>

**सभापती** : निवेदन क्र.6 व 7 च्या संदर्भात माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे उत्तर देणार आहेत. परंतु ते सध्या विधानसभेमध्ये असल्याने, ते याठिकाणी आल्यानंतर सदरहू निवेदनांवर चर्चा घेण्यात येईल.

नियम 93 च्या निवेदन क्र.8 बाबत

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, याठिकाणी सदरहू निवेदनाच्या संदर्भात उत्तर देण्यासाठी माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उपस्थित नाहीत. तसेच संबंधित विभागाचे राज्यमंत्री देखील उपस्थित नाहीत. त्यामुळे सदनामध्ये मंत्री उपस्थित झाल्यानंतर यावरील चर्चा घेण्यात यावी.

**सभापती** : ठीक आहे.

----

. . . .2 एल-7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : भातसा नदीमध्ये असंख्य मृत मासे आढळून येणे

**मु.शी.** : भातसा नदीमध्ये असंख्य मृत मासे आढळून येणे

याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे,
रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स. यांनी
दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रविशेठ पाटील (पर्यावरण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "भातसा नदीमध्ये असंख्य मृत मासे आढळून येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 एल-8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की, त्यांना सदरहू निवेदनातील उत्तरामध्ये काही बदल करावयाचा आहे काय ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी नियम 93 च्या सूचनेच्या माध्यमातून असा प्रश्न उपस्थित केला आहे की, भातसा नदीमध्ये दि.10 जुलै 2008 रोजी असंख्य मासे मृत झाल्याचे दिसून आले आहे. तर तेथील कारखान्याच्या दूषित पाण्यामुळे हा परिणाम झालेला आहे काय ? पण शासनाने निवेदनाच्या पहिल्या पानावर दुसऱ्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "सदर पाहणी दरम्यान नदीच्या पाण्यावर कोठेही तवंग आल्याचे व मासे मर्तुक झाल्याचे आढळून आले नाही." मराठीमध्ये "मर्तुक" हा शब्द कुठून काढलेला आहे हे मला माहिती नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .......

यामध्ये "मर्तुक" या शब्दासाठी दुसरा मराठी शब्द माहीत नाही काय ? मासे मेल्याचे आढळून आले असे उत्तर देऊ शकला असता. या परिच्छेदाच्या शेवटी असे म्हटले आहे की, या सर्व बाबींचे अवलोकन करता, रासायनिक प्रदूषणामुळे माशांची मर्तुक झाली असे म्हणणे योग्य ठरणार नाही. म्हणजे आपण हे नाकबूल केलेले आहे. निवेदनाच्या दुसऱ्या पानावर तिसऱ्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन दक्षता म्हणून वासिंद गावाचा पाणीपुरवठा दिनांक 10.07.2008 रोजी बंद करण्यात आला होता. पहिल्या परिच्छेदामध्ये पाणीपुरवठा बंद करण्यात आला नव्हता असे म्हटले आहे. तिसऱ्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, सदर पाणीपुरवठा दोन दिवस बंद करण्यात आला. सांपगांव, बामणे, पिसे येथील पाणीपुरवठा योजना सुस्थित चालू असल्याचे आढळून आले असे म्हटले आहे. दुसऱ्या पानावरील चौथ्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, केंद्रीय मत्सीकी शिक्षा संस्थान, वर्सोवा, मुंबई यांच्या पथकाने घटनेची चौकशी करण्यासाठी 11.07.2008 रोजी परिसरास भेट दिली होती व मृत माशांचे नमुने चाचणीसाठी संकलित केले होते. मात्र काही तांत्रिक कारणास्तव त्यावरील चाचण्या घेण्यात आलेल्या नाहीत. प्रश्न असा आहे की, पहिल्या परिच्छेदामध्ये शासनाने दोन्ही गोष्टी नाकारलेल्या आहेत आणि दुसऱ्या पानावर असे म्हटले आहे की, या गोष्टी गांभीर्याने घेतलेल्या आहेत आणि त्याप्रमाणे कारवाई करीत आहोत. यामध्ये नेमके काय आहे ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, यामध्ये जो प्रश्न विचारलेला आहे त्यासंदर्भात सांगू इच्छितो की, भेटीच्या वेळी ग्रामस्थंनी मौजे सरलांबा या ठिकाणी मासे मर्तुकीची घटना घडल्याचे सांगितले. सदर गाव भातसा धरणाच्या खालील बाजूस आहे व या पट्टयामध्ये कोणतेही उद्योग नसल्याने औद्योगिक पाणी जाऊन मासे मर्तुक झालेली नाही.

श्री. मधुकर चव्हाण : भातसा नदीमध्ये मासे मरुन पडलेले होते. दोन दिवस लोकांनी मासे एकत्र केले. त्या ठिकाणी पाणी पुरवठा बंद झाला. शासनाने हे मान्य केलेले आहे की, या घटनेचे गांभीर्य लक्षात घेतलेले आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, सूचनेमध्ये असे म्हटले आहे की, लिबर्टी ऑईल मिलने पाणी सोडल्यामुळे भातसा धरणामध्ये मासे मेले. पण तसे झालेले नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी भातसा नदीचा उल्लेख केलेला आहे. मी धरणाचा उल्लेख केलेला नाही.

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, भातसा धरणाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी विचारलेले आहे. भातसा नदीमध्ये 10 जुलै, 2008 रोजी असंख्य मृत मासे आढळून येणे असा सूचनेमध्ये उल्लेख केलेला आहे. मासे मर्तुक झाल्यानंतर आम्ही पाहणी केली. जी ऑईल मील आहे ती खाली आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, हा प्रकार झालेला आहे ही वस्तुस्थिती शासनाला नाकारता येणार नाही. त्या ठिकाणी लिबर्टी ऑईल मिल्सचे दूषित पाणी त्या नदीमध्ये सोडले जाते. त्यामुळे हा सगळा प्रकार घडलेला आहे. मागच्या वेळी 28 जुलैला यासंदर्भात सभागृहामध्ये चर्चा झाली. सन्माननीय राज्यमंत्र्यांबरोबर आपण त्या कारखान्याची पाहणी केली. प्रत्यक्ष पाहणीमध्ये आपल्याला हे आढळून आले आहे. आपण प्रदूषण मंडळाला निर्देश दिले होते. त्या ठिकाणी प्रदूषण होत नाही असे म्हणत असला तरी ही घटना प्रदूषणामुळे घडलेली आहे. बोर्डाला अहवाल देण्यास सांगितले होते तो अहवाल त्यांनी दिलेला नाही. आता घडलेली घटना लिबर्टी ऑईल मिल्सचे पाणी गेल्यामुळे घडली आहे. सेंट्रल फिशरीज बोर्डाचा जो रिपोर्ट आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, तेलकट पाणी गेल्यामुळे आणि चोकींग झाल्यामुळे मासे श्वास घेऊ शकले नाहीत त्यामुळे मासे मृत झालेले आहेत. ही वस्तुस्थिती आहे. म्हणून आम्हाला सोबत घेऊन पुन्हा लिबर्टी ऑईल मिल्सची चौकशी करुन त्यांच्यावर तातडीने कारवाई करणार काय ?

श्री. रविशेठ पाटील : निश्चितपणे आपण पुन्हा जाऊन चौकशी करु. सन्माननीय सदस्य श्री. मोते साहेबांना माहीत आहे की, आपण गेलो होतो त्यावेळी काही मिळाले नव्हते. त्यांचे फक्त 100 घनमीटर सांडपाणी निर्माण होते. ते पाणी रिसायकलींग करुन शेतीत जाते. भेटीच्या वेळी आपण होता. त्यावेळी मृत मासे आढळून आले नाही.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, त्या धरणातील पाणी पिण्यासाठी बंद केले होते. शासनाने निवेदनात जे उत्तर दिले आहे ते लिबर्टी ऑईल मिल्सची वकिली करण्यासारखे दिले आहे. त्या नदीच्या किनारी लिबर्टी ऑईल मिल्स हा एकमेव कारखाना आहे, अन्य कोणताही कारखाना नाही. श्री.पुरुषोत्तम यांनी दिलेल्या अहवालानुसार हे पाणी पिण्यासाठी योग्य नाही. त्या पाण्यामध्ये ऑईल मिल्समधील रासायनिक द्रव्य जमा झाल्यामुळे मासे मेले आहेत. त्यामुळे या कारखान्याला शासन कशासाठी संरक्षण देत आहे ? शासन त्या कारखान्याची चौकशी करणार आहे काय ?

श्री.रविशेठ पाटील : होय.

--------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

**पृ. शी.** : श्रीक्षेत्र माहूर येथील रेणुका मातेच्या मंदिर परिसरातील व्यापा-यांनी तेथील जमीन व्यवसायासाठी मिळण्याची केलेली मागणी

**मु. शी.** : श्रीक्षेत्र माहूर येथील रेणुका मातेच्या मंदिर परिसरातील व्यापा-यांनी तेथील जमीन व्यवसायासाठी मिळण्याची केलेली मागणी याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बबनराव पाचपुते ( वने मंत्री ) : सभापती महोदय, श्री.दिवार रावते यांनी "श्रीक्षेत्र माहूर येथील रेणुका मातेच्या मंदिर परिसरातील व्यापा-यांनी तेथील जमीन व्यवसायासाठी मिळण्याची केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे निवेदन पाहिले तर लक्षात येईल की, मागील 30-40 वर्षापासून तेथे दुकाने आहेत, तरीही त्या दुकानांना अतिक्रमित असे म्हटले आहे. या दुकानांमुळे अडचण होते हा मुद्दा गौण आहे. त्या देवीच्या ठिकाणी जाताना कोणत्याही रस्त्याला अडथळा निर्माण होत नाही. पण पोलीस निरीक्षक, माहूर यांनी जिल्हाधिका-यांना असे कळविले आहे की, "अतिक्रमण दुकान व हॉटेल्स धारकांच्या योगाने मांडवा देवी/ गुजरात नवरात्र महोत्सवात झालेल्या चेंगराचेंगरी सारखी भयानक घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सभापती महोदय, या देवालयापासून 100-150 पाय-यांपर्यंत एकही दुकान नाही. असे असताना अशाप्रकारचा अहवाल कसा काय दिला जातो ? यासंदर्भात मी तहसीलदारांना विचारले होते. दुकाने खाली आहेत, वरच्या भागात एकही दुकान नसल्यामुळे चेंगराचेंगरीचा प्रश्न येतो कोठे ? याच निवेदनात असेही म्हटले आहे की, "मंदिर परिसरात सर्व सोयी उदा.पाय-या, रस्ता रुंदी करण्यासह दुकाने, पार्किंग इत्यादीसाठी जागा निश्चित करुन त्यासाठी वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत निर्वणीकरणेबाबतचा प्रस्ताव तयार करुन सादर करता येईल." अशा परिस्थितीमध्ये तेथील 30-40 वर्षांपूर्वीच्या दुकानदारांबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे, त्यांचे पुनर्वसन कसे करणार आहे, त्याबाबत शासनाचे नियोजन काय आहे ? श्री सिध्दीविनायक मंदिराबाबत असाच प्रश्न होता. मी तेथील अडथळयाबाबत प्रश्न उपस्थित केल्यावर तेथील लोकांनी माझ्या विरोधात आंदोलन केले होते. पण आता तेथील दुकानदारांना एस.के.बोले मार्ग ही संपूर्ण एक लेन उपलब्ध झाली आहे. या प्रश्नाबाबत शासन काय करणार आहे, कारण ती भाविकांची गरज आहे. दुकाने 30-40 वर्षांपासून असल्यामुळे शासनाचे धोरण काय आहे ते स्पष्ट करावे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माहूरगड येथे रेणुका देवीचे मंदिर आहे. या देवालयामध्ये जाणारा रस्ता वन खात्याच्या अंतर्गत आहे. पूर्वी हे देवालय हैद्राबाद राज्यामध्ये होते. त्या देवालयाची जागा वन विभागाच्या ताब्यातून ट्रस्टच्या ताब्यात कायम स्वरुपी द्यावी अशी त्यांची मागणी आहे. त्यामुळे मी त्यांना तशाप्रकारचा प्रस्ताव द्यावा, तो प्रस्ताव मी केंद्र सरकारकडे पाठवितो असे सांगितलेले आहे. तेथे एकूण 110 मोठे दुकानदार आहेत. देवालयाच्या पाय-यांवर दुकाने नाहीत. दुकाने खालच्या बाजूला आहेत. परंतु यापूर्वी मांढरदेवीच्या ठिकाणी दुर्दैवी घटना

4...



NTK/ MMP/ SBT/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते.....

घडल्यानंतर शासनाने संपूर्ण राज्यातील देवालयांबाबत खबरदारी घेतली आहे. या देवालयाच्या ठिकाणी 3-4 लाख लोक यात्रेला जमतात. पण पुन्हा तशी दुर्दैवी घटना घडू नये यासाठी ज्या ज्याठिकाणी डोंगरावर देवालये असतील तेथे खबरदारी घेतलेली आहे. मुळात ही वन खात्याची जमीन आहे. तरीही त्यांनी एक प्रस्ताव तयार करुन सादर करावा असे सुचविले आहे. दुकानांसाठी 20 गुंठे, 1 हेक्टर मंदिरासाठी आणि आणखी 1 हेक्टर जागा इतर कारणांसाठी अशा एकूण 5 हेक्टर जागेचा प्रस्ताव तयार करुन पाठविला तर तो केंद्र सरकारकडे रितसर पाठविता येईल.

नंतर श्री.शिगम......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. बबनराव पाचपुते....)

यासाठी प्रस्ताव तयार केला पाहिजे. हा प्रस्ताव जोपर्यन्त वन खात्याकडे येत नाही तोपर्यन्त ही जमीन वन खात्याचीच राहील.

श्री. दिवाकर रावते : प्रस्ताव कोणी द्यावयास पाहिजे ?

श्री. बबनराव पाचपुते : प्रस्ताव ग्रामपंचायतीने, तहसीलदाराने किंवा ट्रस्टने दिला पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : दुकानांसाठी लागते तेवढी पर्यायी जमीन देण्याची त्यांची तयारी आहे.

श्री. बबनराव पाचपुते : तेथील सर्व संबंधित लोक मला भेटले. यासंबंधी प्रस्ताव कसा तयार करायचा याबाबत अधिका-यांना सूचना दिलेल्या आहेत. अधिकारी प्रस्ताव तयार करतील. प्रस्ताव आमच्याकडे आल्यानंतर तो संबंधित विभागाकडे पाठविण्यात येईल. तेथील पुनर्वसनासाठी येणा-या अडचणीय लक्षात घेऊन, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेऊन कार्यवाही करण्यात येईल. परंतु याबाबतीत ग्रामपंचायतीने प्रस्ताव केला पाहिजे. याबाबतीत ग्रामपंचायतीला सूचना दिलेल्या आहेत. 110 लोकांनी त्यांची संघटना तयार करावी असे देखील मी त्यांना सांगितलेले आहे...

श्री. दिवाकर रावते : याबाबतीत बैठक बोलवावी.

श्री. बबनराव पाचपुते : या प्रकरणी माझी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या बरोबर बैठक घेण्याची तयारी आहे. ही बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल.

----

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : मुंबईतील गिरणी कामगारांचे पुनर्वसन करण्याकरिता कोऑर्डिनेशन कमिटी नेमण्याची केलेली घोषणा

**मु. शी**. : मुंबईतील गिरणी कामगारांचे पुनर्वसन करण्याकरिता कोऑर्डिनेशन कमिटी नेमण्याची केलेली घोषणा याबाबत श्री. दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "मुंबईतील गिरणी कामगारांचे पुनर्वसन करण्याकरिता कोऑर्डिनेशन कमिटी नेमण्याची केलेली घोषणा" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3...

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 12:55

श्री. दिवाकर रावते : गिरणी कामगारांच्या संदर्भातील हा विषय आहे. कामगारांची 19.68 कोटीची देणी अजून दिलेली नाहीत. कोणत्या गिरणीने ही देणी अजून दिलेली नाहीत ? ही देणी कामगारांना केव्हा देण्यात येतील ? "117 गिरणी कामगारांना नोक-या प्राप्त झालेल्या आहेत" असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे." उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार 29 हजारा पेक्षा जास्त गिरणी कामगारांचे नोकरीसाठी अर्ज आलेले आहेत. "गिरण्यांच्या जागेत होणारा विकास विचारात घेऊन मिटकॉनने त्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम आखावा असे मिटकॉनला कळविण्यात आले आहे"असेही निवेदनामध्ये म्हटलेले आहे. आतापर्यन्त नोकरीसाठी 29 हजार अर्ज आलेले असून आणखी 6-7 हजार अर्ज येतील. म्हणजे 40 हजार गिरणी कामगार नोक-यांची मागणी करतील. या सर्वांना ट्रेनिंग द्यावयाचे आहे. तसचे त्या गिरणीच्या जागेवर जे उद्योग सुरु होतील त्यानुसार नोक-या देण्यात येतील अशी अट टाकलेली आहे. मग या नोक-यासाठी अर्जदारांची निवड कशी करणार ? उर्वरित कामगारांचे काय करणार ? प्रॉयॉरिटी कोणाला देणार आणि या 40 हजार कामगारांच्या नोकरीची काय व्यवस्था करणार ? असे प्रश्न निर्माण होतात. ट्रेनिंगचा विषय या सदनामध्ये मांडण्यात आला त्यावेळी 2 हजार लोकांना ट्रेनिंग देण्यात येईल असे सांगितले होते. मग उर्वरित लोकांच्या बाबतीत शासन काय करणार आहे ? गिरणी कामगारांचे हे जे विविध प्रश्न निर्माण झालेले आहेत त्याबाबतीत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 93 अन्वये उपस्थित केलेल्या गिरणी कामगारांच्या प्रश्नासंबंधी मागेही या सदनामध्ये सविस्तर चर्चा झालेल्या आहेत आणि गिरणी कामगारांचे प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात शासनाने निश्चितपणाने खूप चांगले निर्णय घेतलेले आहेत. कामगारांची देणी देण्याबाबतचा प्रश्न येथे उपस्थित करण्यात आला. कोर्ट केस असल्यामुळे मफतलाल गिरणीतील कामगारांची देणी देण्याचे राहिलेले आहे. कोर्ट केस लवकरात लवकर निकाली काढण्याच्या बाबतीत शासनाकडून प्रयत्न होतील. कोर्टाचा निर्णय झाल्यानंतर ताबडतोबीने कामगारांची देणी देण्यात येतील. 29 हजार गिरणी कामगारांचे अर्ज व याद्या प्राप्त झालेल्या आहेत. रोजगार व स्वयंरोजगार विभागामध्ये गिरणी कामगारांसाठी एक स्वतंत्र विभाग निर्माण केलेला असून सचिव, रोजगार व स्वयंरोजगार यांच्या माध्यमातून आढावा घेतला जातो.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 12:55

(श्री. राजेश टोपे....)

29हजार गिरणी कामगारांच्या मुलांनी अर्ज केलेले आहेत. त्यांना ट्रेनिंग देऊन ज्या ज्या ठिकाणी गिरणी डेव्हलपमेंटसाठी काढण्यात येणार आहे, जेथे जेथे नोक-या मिळण्याच्या संधी आहेत त्या ठिकाणी यांना प्राधान्य द्यावे अशी डीसी रुल्स 58(2)मध्ये तरतूद केलेली आहे.

....नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.शिगम 13:00

श्री. राजेश टोपे....

जी नोकरी उपलब्ध होईल त्यात गिरणी कामगारांच्या मुलांना प्राधान्य देण्यात यावे. त्या मुलांजवळ पात्रता नसेल तर उद्योगांना बाहेरुन कामगार घेण्याची संधी मिळणार आहे. बाहेरच्या मुलांना जास्तीत जास्त नोकऱ्या जाऊ नयेत आणि त्या गिरणी कामगारांच्या मुलांना मिळाव्यात म्हणून त्यांना ट्रेनिंग देण्यासाठी मिटकॉन संस्थेची नेमणूक केलेली आहे. त्याठिकाणी जे प्रवेश घेतले जातात त्यातील 75 टक्के प्रवेश गिरणी कामगारांच्या मुलांना दिले जाणार आहेत. उर्वरित 25 टक्के प्रवेश बाहेरील मुलांना मिळू शकतील. मुख्य उद्देश तेथील उद्योगांमध्ये नोकऱ्यांची संधी गिरणी कामगारांच्या मुलांना मिळवून देणे हा आहे. त्यादृष्टीने राज्य शासनाची भूमिका अतिशय सुस्पष्ट आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, याविषयावर मागे चर्चा झाली होती त्यामध्ये सगळे विषय झालेले आहेत. 21000 अर्ज आलेले आहेत. अजून जवळजवळ 40 हजारापर्यंत अर्ज येतील असा अंदाज आहे. मिटकॉनमार्फत ट्रेनिंग देण्यात येणार आहे. पण एखाद्या गिरणीच्या जागेवर नवीन उद्योग आला की त्यामध्ये 200 नोकऱ्या उपलब्ध असतील तर 200 मुलांना ट्रेनिंग दिले जाईल. परंतु 40 हजार अर्ज आले असतील तर उर्वरित पाल्यांचा प्रश्न तसाच राहणार आहे त्यांच्या नोकऱ्यांसंबंधी शासन काय धोरण स्वीकारणार आहे ?

श्री. राजेश टोपे :सभापती महोदय, गिरण्यांच्या जमिनीच्या विकासामधून ज्या नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत त्यामध्ये प्रथम प्राधान्य हे गिरणी कामगारांच्या मुलांना दिले जाईल ही शासनाची भूमिका आहे. 100 टक्के पाल्यांना नोकऱ्या मिळतीलच ही खात्री मी देऊ शकत नाही. गेल्या अनेक वर्षापासून गिरणी कामगारांची मुले आपापल्या गावी निघून गेलेली आहेत. त्यांना पेपरमध्ये जाहिरात देऊन बोलावून घेऊन नोंदणी करण्यास सांगितले आहे आणि ट्रेनिंग देऊन जेथे नोकरी करण्याची आवश्यकता असेल तेथे ती पात्रता निर्माण करुन देण्याचे काम या ट्रेनिंगच्या माध्यमातून केले जाणार आहे आणि जास्तीत जास्त गिरणी कामगारांच्या मुलांना नोकऱ्या कशा मिळतील हे पाहिले जाणार आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मॉलमध्ये आता बँका आलेल्या आहेत. नॅशनल किंवा इंटरनॅशनल बँकामध्ये जागा झाल्यावर ते त्यांचे कर्मचारी घेतात. परप्रांतातून अधिकारी आणतात आणि तिकडे जागा भरतात. ट्रान्सफर म्हणून अधिकारी मुंबईत आणतात आणि तिकडे

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या त्या प्रांतातील उमेदवार भरती करतात. गिरणी कामगारांच्या मुलांना या बँकामधून नोकरी दिली जाणार आहे काय ? नोकऱ्यांची उपलब्ध होणार आणि उद्योगवाले किंवा बँकवाले मागील दाराने बाहेरुन उमेदवार भरणार हे कसे काय चालणार ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी पूर्वीच सांगितले आहे की, नोकरी उपलब्ध झाल्यावर नंबर 1 चे प्राधान्य गिरणी कामगारांच्या मुलांना राहणार आहे. काही प्रमाणात बँकांच्या शाखा आल्या तर ट्रान्सफर करुन घेण्याची त्या त्या बँकांची पॉलिसी असू शकेल. शासनाची भूमिका स्पष्ट आहे की, गिरण्यांच्या जमिनीच्या विकासातून नोकऱ्या उपलब्ध होतील त्या कसल्याही कॅटॅगरीतील म्हणजे वर्ग 1,2,3 आणि वर्ग 4 मधील असल्या तरी नंबर 1 चे प्राधान्य हे गिरणी कामगारांच्या मुलांना दिले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण पाहतो की मॉलमध्ये आता चॅनेलवाले सुध्दा आले आहेत. मराठी चॅनेल असते परंतु स्टाफ मात्र हिंदी भाषिक असतो. जागा भरताना जोपर्यंत रिस्ट्रीक्शन घातले जात नाही तोपर्यंत गिरणी कामगारांच्या मुलांना नोकऱ्या मिळणार नाहीत.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या पाल्यांजवळ नोकरीसाठी जी काही पात्रता असेल त्यानुसार कुठल्याही प्रकारे त्यांना डावलले जाऊ शकत नाही. त्यामध्ये काही उणिवा असतील तर त्या दूर करु.

**सभापती** : गिरणी कामगारांच्या मुलांसंबंधीचा महत्वाचा प्रश्न असल्याने त्या अनुषंगाने मी चार वेळा माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिलेली आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या धोरणामध्ये काही उणिवा असतील तर त्या दूर करण्यासाठी काय केले पाहिजे यासंबंधी माननीय सदस्यांनी सूचना कराव्यात त्याचा निश्चितपणाने विचार करुन त्या दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.भोगले

SGB/ 13:05

निवेदन क्रमांक-13... श्री.राजेश टोपे.........

सभापती महोदय, आपल्या सूचनेचा आणि माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी केलेल्या सूचनेचा आदर करुन अशा कोणत्याही डेव्हलपमेंट करणाऱ्या मिलच्या ठिकाणी बाहेरुन उमेदवारांना नोकरीवर घेतले जात असेल तर त्याठिकाणी कमर्शियल बिझिनेस थांबविण्याची किंवा रिडेव्हलपमेंटचे काम थांबविण्याची कार्यवाही शासनाच्या वतीने केली जाईल.

डॉ.दीपक सावंत : मंत्रीमहोदयांनी आमच्याबरोबर जॉईंट व्हिजिट करावी, आम्ही ही बाब मंत्रीमहोदयांच्या निदर्शनास आणून देण्यास तयार आहोत.

श्री.राजेश टोपे : जॉईंट व्हिजिटला सुध्दा माझी तयारी राहील. शासनाची भूमिका स्पष्ट आहे. नोकरी आणि घरे देण्याच्या दृष्टीकोनातून शासनाची भूमिका मी स्पष्ट केली आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणामध्ये केलेली कपात

**मु. शी.**: इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणामध्ये केलेली कपात याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणामध्ये केलेली कपात" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-4...........

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. भारतीय घटनेच्या कलम 340 अन्वये ओबीसी हा मागासवर्ग प्रवर्ग मान्य केलेला आहे. अलिकडच्या काळात आयआयटी व आयआयएम या संस्थांमध्ये उच्चशिक्षणासाठी ओबीसी प्रवर्गास 27 टक्के आरक्षणाचा हक्क मान्य करण्यात आला आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ओबीसी प्रवर्गाला वर्ग 3 व 4 च्या पदावर सरळसेवेने नियुक्ती करताना 19 टक्के आरक्षण लागू आहे. सामान्य प्रशासन विभागाने दिनांक 1 सप्टेंबर, 1997 च्या शासन निर्णयान्वये गडचिरोली जिल्हयातील ओबीसी प्रवर्गाच्या आरक्षणात 8 टक्के कपात करुन ते 11 टक्क्यावर आणले. अशी कपात करताना ओबीसी समाजाची लोकसंख्या कमी झाल्यामुळे आरक्षणात कपात करण्याबद्दलचा अहवाल किंवा पुरावा उपलब्ध नसताना 8 टक्के आरक्षण कमी केले. दिनांक 25 ऑक्टोबर, 2002 च्या शासन निर्णयानुसार पुन्हा आरक्षणाच्या प्रमाणात 5 टक्के कपात करण्यात आली व आता फक्त 6 टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे. एकच गडचिरोली जिल्हा असा आहे, ज्याठिकाणी ओबीसी समाजातील तेली, माळी, कुणबी, तांबोळी, धनगर, कुंभार समाजाची मोठया प्रमाणात लोकसंख्या असताना त्या जिल्हयात आरक्षण कमी करण्यात आले आहे. पोलीस, शिक्षक, आरोग्य कर्मचारी, वन कर्मचारी, शिपाई, लिपीक इ. पदावरील नोकर भरती बंद झालेली आहे. त्या जिल्हयातील एकही ओबीसी समाजाचा उमेदवार शासन सेवेमध्ये घेतला जात नाही. त्यामुळे त्या जिल्हयात ओबीसी संघर्ष कृती समिती स्थापन झाली. काँग्रेस पक्षाचे आमदार सर्वश्री नाना पटोले, विजय वडेट्टीवार, हंसराज अहिर यांनी सर्वपक्षीय समिती स्थापन केली व धरणे धरले, आंदोलने केली आणि दिनांक 5 सप्टेंबर, 2007 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी संघर्ष कृती समितीला आश्वासन दिले की, कोणत्याही परिस्थितीत ओबीसी प्रवर्गाला 19 टक्के आरक्षण लागू करण्यात येईल. अद्यापही हे आश्वासन अंमलात आणलेले नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन देऊनही अद्याप 6 टक्केच आरक्षण ठेवण्यात आलेले असल्यामुळे त्या जिल्हयातील ओबीसी प्रवर्गाच्या उमेदवारांना नोकर भरतीमध्ये प्राधान्य देण्यात आलेले नाही.

(नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

त्यामुळे ओबीसीमधील एकही मुलगा नोकरीला लागलेला नाही. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनाप्रमाणे गडचिरोली जिल्ह्यामध्ये ओबीसींसाठी 19 टक्के आरक्षण शासन पुन्हा लागू करणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. शासकीय नोकरीमध्ये 52 टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणाने सांगितले आहे की, आरक्षणाचे प्रमाण हे 50 टक्क्यांच्यावर जाता कामा नये. ओबीसी, एस.सी.,एस.टी आणि अन्य जाती-जमातींसाठी असलेले आरक्षणाचे प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण 52 टक्क्यांपर्यंत जाते. ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, रायगड, यवतमाळ, गडचिरोली हे अनुसूचित जमातीचे जिल्हे आहेत. लोकसंख्येप्रमाणे आरक्षण असावे असा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. ह्याच निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. त्यामुळे हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. राज्यामध्ये ओबीसीची टक्केवारी 19 टक्के असली तरी जेथे आदिवासींची लोकसंख्या जास्त आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : माननीय साभापती महोदय, माझी उत्तराला हरकत आहे. राज्यात अनेक जिल्हे अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे आहेत. नाशिक, ठाणे, चंद्रपूर येथे अनुसूचित जमातीच्या लोकांची संख्या जास्त आहे. येथे लोकसंख्येप्रमाणे आरक्षण देण्यात येते आहे काय ? ठाणे, नाशिक येथे लोकसंख्येप्रमाणे आरक्षण देण्यात येत नाही. असा अन्याय गडचिरोली जिल्ह्यावर करण्यात येत आहे. गडचिरोली जिल्ह्यातील आरक्षणाचे प्रमाण 6 टक्क्यावर आणले आहे. आपल्याला घटनेने जो अधिकार दिला आहे, तो उलांडून महाराष्ट्र सरकार ओबीसींवर अन्याय करणार असेल तर ते सयुक्तिक नाही. तिथल्या कृती समितीला माननीय आश्वासन दिले. या आश्वासनांची प्रतिपूर्ती शासन करणार आहे काय ? हे प्रकरण न्यायालयात आहे हे माननीय मुख्यमंत्र्यांना माहिती होते. गडचिरोली जिल्ह्यातील ओबीसींना 19 टक्के आरक्षण देण्यात येईल असे आश्वासन त्यांनी दिले होते. लोकसंख्येचा नियम लागू केला असेल तर तो इतर जिल्ह्यांना का लागू केला नाही ? असा माझा प्रश्न आहे. ..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना खात्रीलायक सांगू इच्छितो की, सगळ्या आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये लोकसंख्येप्रमाणेच आरक्षण आहे. सगळीकडे एस.टी.साठी 7 टक्के आरक्षण नाही. ठाण्यामध्ये ओबीसींसाठी 9 टक्के आरक्षण आहे. तेथे एस.टी.22 टक्के आरक्षण आहे. धुळ्यामध्ये एस.टी.ला 22 टक्के आरक्षण आहे. तेथे ओबीसीला 9 टक्के आरक्षण आहे. नंदूरबारला एस.टी.साठी 22 टक्के आरक्षण आहे, तर ओबीसीसाठी 9 टक्के आरक्षण आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये आदिवासींची लोकसंख्या जास्त आहे, तेथे त्यांच्यासाठी आरक्षण जास्त आहे. हे आरक्षणाच्या कायद्यातच आहे. त्यात जर बदल करावयाचा असेल तर कायद्यात सुधारणा करावी लागेल. आदिवासी जिल्ह्यांमध्ये लोकसंख्येप्रमाणे टक्केवारी ठरविण्यात आली आहे. ती सरसकट 7 टक्के नाही. रायगडमध्ये एस.टी.चे प्रमाण 2 टक्क्यांनी जास्त केले आहे. 7 टक्क्यांच्या ऐवजी 9 टक्के केले आहे. ठाणे, नाशिक, धुळे, नंदूरबार येथे प्रमाण 22 टक्के केले आहे. चंद्रपूरमध्ये 15 टक्के केले आहे, यवतमाळमध्ये 14 टक्के केले आहे. ज्याप्रमाणात एस.टी.चे प्रमाण वाढले त्याप्रमाणात एस.सी., ओ.बी.सी., व्हीजेएनटी यांचे टक्केवारीचे प्रमाण त्या तुलनेत कमी करण्यात आले आहे. हे सर्व ॲक्टनुसार करण्यात आले आहे. यासंबंधी औरंगाबाद खंडपीठामध्ये रिट पीटीशन दाखल करण्यात आले आहे. यासंबंधी कुठलाही निर्णय कोर्टाने दिलेला नाही. हे सर्व सब ज्युडिस मॅटर आहेत. म्हणून कोर्टाचे निर्णय देखील आपल्याला अपेक्षित आहेत. तसेच सन्माननीय विरोधी पक्ष म्हणतात त्याप्रमाणे बैठक घेऊन काही मार्ग काढता येईल काय ? हे देखील पाहिले जाईल.

यानंतर श्री.पी खर्चे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ........

हा विचार आपल्याला करावा लागेल. परंतु ही सर्व प्रकरणे न्यायप्रविष्ट असून त्यात आपल्याला कोर्टाच्या निर्णयाची वाट पाहणे आवश्यक आहे. तसेच या दोन्ही सभागृहांनी आरक्षणासंबंधीचा कायदा केला असून त्यानुसारच हे आपण केले.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, हा राज्यशासनाचा अधिकार नसून घटनेच्या 340 कलमाच्या आधारे हे अधिकार राज्याला बहाल केलेले आहेत. आणि घटनेचा अधिकार ओलांडून शासनाने हा प्रकार केलेला आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, गेल्या 7 वर्षात गडचिरोली जिल्ह्यात किती ओबीसी प्रवर्गाच्या लोकांना नोकऱ्या दिल्या आहेत ?

श्री. राजेश टोपे : महोदय, यासंबंधीची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

-----------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांना चेकद्वारे वेतन देणे

**मु. शी.** : ठाणे महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांना धनादेशाद्वारे वेतन देणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि.प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि.प.स. यांनी "ठाणे महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांना धनादेशाद्वारे वेतन देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : महोदय, ठाणे महापालिकेतील कंत्राटी कामगारांचा हा विषय असून उच्च न्यायालयाने कंत्राटी कामगारांना त्यांचे वेतन धनादेशाद्वारे देण्यात यावे, असे आदेश दिलेले आहे. ठाणे महापालिकेमध्ये बरीच कामे कंत्राटी पध्दतीवर करुन घेतली जातात. ही कामे 2000 कंत्राटी मजुरांच्या माध्यमातून केली जातात. परंतु असे लक्षात येते की, या कंत्राटी कामगारांना धनादेशाद्वारे वेतन दिले जात नाही. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले आहे की, कंत्राटी कामगारांना महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या समक्ष कॅशमध्ये वेतन दिले जाते. तसेच ठाणे महापालिकेकडून या कामगारांना धनादेशाद्वारे वेतन अदा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. म्हणजे उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर धनादेशाद्वारे वेतन देण्यासाठी इतका कालावधी आपल्याला लागला याचे कारण काय ? तसेच कमी कामगार कामावर ठेवले जातात आणि आवश्यक तेवढ्या कामगारांचे वेतन काढले जाते हा जो प्रकार चालला आहे, त्याची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : महोदय, हे नक्की आहे की, मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे वेतन दिले पाहिजे. तसेच ते धनादेशाच्या माध्यमातून दिले पाहिजे. ही पध्दत येत्या दोन महिन्याच्या आत ठाणे महापालिकेच्या माध्यमातून अंमलात आणली जाईल. तसेच सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यानुसार आवश्यकतेपेक्षा कमी कामगार ठेवून तेवढ्या कामगारांचे पैसे घ्यावयाचे, अशा प्रकारचा घोटाळा असेल तर प्रधान सचिव, नगरविकास यांच्या वतीने चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : विदर्भातील नगरपालिकांना खास आर्थिक तरतूद न करणे

**मु. शी**. : विदर्भातील नगरपालिकांना खास आर्थिक तरतूद न करणे याबाबत श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री.गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांनी "विदर्भातील नगरपालिकांना खास आर्थिक तरतूद न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------------

......5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिशन बाजोरिया : महोदय, नगरविकास विभागाच्या अनुदानाबद्दल निवेदनात सविस्तर माहिती दिलेली आहे. तरी सुध्दा 50 कोटी रुपये दरवर्षी विदर्भातील नगरपालिकांना देण्यात आले आहेत. परंतु खऱ्या अर्थाने अकोला, बुलडाणा, आणि वाशिम जिल्ह्यात या अनुदानाचे समसमान वाटप न झाल्यामुळे ही परिस्थिती उद्‌भवली आहे. निवेदनात असेही म्हटले आहे की, क्रीडा संकूल, नाट्यगृहे, पर्यटन, आरोग्य व इतर सेवा यांची उभारणी करण्यासाठी अनुदान दिले आहे. हे अनुदान उपरोक्त जिल्ह्यांमध्ये कोणकोणत्या नगरपालिकांसाठी दिलेले आहे ? तसेच समसमान वाटपाप्रमाणे अकोला, बुलडाणा, वाशिम या जिल्ह्यांना सुध्दा अतिरिक्त निधीचे वाटप शासन करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : महोदय, मधल्या काळात वेगवेगळ्या विभागांच्या स्तरावर विकास कार्यक्रम मंत्रिमंडळाने ठरविले होते. त्यात मराठवाडा, विदर्भ विकास कार्यक्रम असेल यासंदर्भात निर्णय घेऊन त्यात समाविष्ट करावयाचे आणि प्रति वर्षी साधारणपणे पाच वर्षांचे हे कार्यक्रम ठरविण्यात आले आहेत. यासंदर्भात किती रक्कम द्यावयाची असाही निर्णय घेण्यात आला. त्यावेळी प्रत्येक विभागाला कोणती कामे द्यावयाची यासंबंधी संपूर्ण आराखडा तयार करण्यात आला असून त्यानुसार नगरविकास विभागाच्या वतीने मराठवाडा, कोकणच्या स्तरावरील जिल्ह्यांच्या नगरपालिका आहेत त्यात स्थानिक आमदार असतील त्यांनी सुचविल्याप्रमाणे हा कार्यक्रम आखण्यात आला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे....

परंतु जिल्हयाच्या ज्या नगरपालिका आहेत त्यांना सरसकट पैसे देण्यात आलेले असून यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव करण्यात आलेला नाही. स्थानिक आमदारांच्या सूचनेप्रमाणे म्हणजे त्यांनी सूचना केल्या असा त्याचा अर्थ होत नाही.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदय, आपण स्थानिक आमदार याचा मर्यादित अर्थ न काढता स्थानिक आमदार याचा अर्थ मग ते विधानसभेचे आमदार असतील आणि त्या ठिकाणी विधान परिषदेचे राहणारे आमदार असतील असा अर्थ घ्यावा.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माझ्या बोलण्याचा अर्थ सन्माननीय सदस्यांनी समजून घ्यावा. माझे म्हणणे असे आहे की, मंत्रिमंडळाने जो निर्णय घेतलेला आहे तो धोरण म्हणून घेतलेला आहे, मतदारसंघ म्हणून घेतलेला नाही. विदर्भाच्या ज्या जिल्हा नगरपालिका आहेत, ज्यांना पैसे मिळाले नाहीत आणि ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. विधान परिषदेची जी काही घटनात्मक मांडणी झालेली आहे त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेतून निवडून येणारा आमदार हा या सभागृहात येत असतो. स्थानिक आमदार म्हटले की, त्याचा मोठा मतदार संघ येतो. त्यामध्ये नगरपालिका किंवा नगरपरिषद असते. हे सर्व बघण्यासाठी त्या नगरपालिकेतील नगरसेवक आहेत, सीईओ आहेतच पण त्या व्यतिरिक्त विधिमंडळातील आमदार त्या ठिकाणी नियुक्त व्हावा. त्यामुळे स्थानिक आमदारांना न घेता त्या धोरणात परिषदेचा आमदार प्रमुख असला पाहिजे व उपसूचनेमध्ये स्थानिक आमदार असला पाहिजे. विधानपरिषद सदस्याचे घटनेने स्थान निर्माण केलेले आहे. त्यामुळे ज्याचे घटनेने स्थान निर्माण केलेले अशा विधान परिषद आमदारांचा त्या ठिकाणी समावेश केला जाणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी हरकतीच्या मुद्याद्वारे या ठिकाणी विचार मांडलेले आहेत.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मूळ प्रश्नाला फाटा देण्याचे काम या ठिकाणी सुरु आहे. याविषयाच्या संदर्भात लोकांच्या आमच्याकडे सातत्याने तक्रारी येत आहेत. कोकण आणि

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ...

मराठवाडा या ठिकाणच्या जिल्हयाच्या नगरपरिषदांना विशेष निधीचा कार्यक्रम मान्य केला आहे. ही योग्य गोष्ट झाली. कोकण आणि मराठवाडयामध्ये जी स्थिती आहे ती लक्षात घेता ते करतांना विदर्भातील जिल्हास्तरीय नगरपरिषदा वगळण्यात आल्या हा त्यातील मुख्य प्रश्न आहे. लोक आम्हाला विचारतात की, आता हे नवीन सोंग सुरु झाले आहे काय ? अनुशेषामध्ये नंबर 1, नंबर 2 आणि नंबर 3 असा क्रम आहे. नंबर 2 ला वाढले, नंबर 3 ला वाढले नाही असा प्रकार झालेला आहे. जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणच्या लोकांची अशा प्रकारे सातत्याने तक्रार आहे. या ठिकाणी मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले आहे की, टॉयलेटसाठी पेसे दिले, यासाठी पैसे दिले परंतु ते न देता माझे म्हणणे असे आहे की, जिल्हयाचे जे मुख्यालय आहे तेथील नगरपरिषदांना इकडे ज्या प्रमाणात पैसे दिलेले आहेत त्यापेक्षा एक टक्क्याने थोडा निधी कमी दिला तरी चालेल. परंतु निधी दिला पाहिजे ही महत्वाची गोष्ट आहे. हा भेदभाव, विषमता दूर करण्याच्या बाबतीत आपण निर्णय घ्याल काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, कोकण आणि मराठवाडयाच्या जिल्हास्तरीय नगरपालिकांना मंत्रिमंडळाने त्या त्या विभागाचा विकास कार्यक्रम तयार करण्याच्या संदर्भात मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे. याचा अर्थ पैसे कपात करण्यात आली असा होत नाही. मराठवाडयासाठी मंत्रिमंडळाने सन 2000 ते 2004 या कालावधीत 132 कोटी रुपये प्रती वर्ष 33 कोटी रुपये या प्रमाणे दिले आहेत. कोकणासाठी 112 कोटी रुपये दिले असून ते प्रती वर्ष 28 कोटी रुपये या प्रमाणे दिलेले आहेत व विदर्भासाठी 250 कोटी रुपये दिलेले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 13.25

प्रा.बी.टी.देशमुख : पैसे दिलेले नाहीत...

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतर प्रश्न विचारावा . त्यांनी मघाशी जो प्रश्न उपस्थित केला होता त्याचा खुलासा मी करणार आहे.मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची माहिती मला सभागृहाला द्यावयाची आहे.विदर्भाला प्रती वर्षी 50 कोटी रुपये या प्रमाणे विदर्भाला 250 कोटी रुपये दिले होते त्यामध्ये जिल्हास्तरीय नगरपालिका जरी नसल्या तरी त्यांच्या विविध विभागांना हे पैसे देण्यात आलेले आहेत. जिल्हा स्तरीय नगरपालिकांना हे पैसे देण्यात आलेले नाहीत त्यामुळे पुढील विकास कार्यक्रमामध्ये त्यांचा अंतर्भाव केला जाईल आणि मराठवाडा आणि कोकणमधील जिल्हा स्तरीय नगरपालिकांना ज्याप्रामाणे निधी दिला जातो तशाच पध्दतीने विदर्भातील जिल्हास्तरीय नगरपालिकांना देखील निधी देण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : अपंगाच्या शासनमान्य अनुदानित संस्थेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्या

मु.शी : अपंगाच्या शासन मान्य अनुदानित संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्या बाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर,प्रतापराव सोनवणे,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.चंद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ) सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर प्रतापराव सोनवणे यांनी "अपंगाच्या शासन मान्य अनुदानित संस्थेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

- निवेदना नंतर -

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, अपंगाच्या अनुदानित संस्थेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांचा हा प्रश्न असून गेल्या अनेक वर्षा पासून या कर्मचा-यांच्या मागण्या प्रलंबित आहेत. या संदर्भात लोकप्रतिनिधी बरोबर आणि शिष्ट मंडळाबरोबर चर्चा करण्यात आलेली आहे परंतु अद्यापही या मागण्याबाबत निर्णय झालेला नाही. परंतु निवेदनामध्ये दिलेल्या उत्तरावरुन असे दिसून येत आहे की,याबाबत माननीय मंत्रीमहोदय पाठपुरावा करीत आहेत. ज्या विषयासंबंधी न्यायालयाची अडचण येणार आहे तो विषय बाजूला ठेवला तरी हरकत नाही परंतु अन्य मागण्यांच्या बाबतीत तातडीने पाठपुरावा करुन निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

श्री.चंद्रकात हंडोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे या प्रश्नाच्या बाबतीत अनेक वर्षापासून कर्मचा-यांच्या संघटना सातत्याने सरकार बरोबर चर्चा करीत आहेत. त्यांचे प्रश्न आणि अडचणी लक्षात घेऊन विभागाने कॅबिनेटच्या बैठकीत दहा मागण्या मांडण्यासंबंधीचा प्रस्ताव आणला होता परंतु त्यामध्ये काही दुरुस्त्या सुचविण्यात आल्या असल्यामुळे पुन्हा वित्त विभागाकडे ही नस्ती पाठविण्यात आली आहे. वित्त विभागाबरोबर सुध्दा तीन चार बैठका झाल्या आहेत. आता हा विषय अंतिम टप्यात असून आठ दिवसात त्याला मान्यता मिळेल व त्यानंतरच्या कॅबिनेटच्या बैठकीमध्ये हा प्रस्ताव आणला जाईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





पृ.शी : मुंबईत खोटी प्रमाणपत्रे देऊन अकरा रेशनिंगच्या दुकानाचे

परवाने मिळविणे

मु.शी : मुंबईत खोटी प्रमाणपत्रे देऊन अकरा रेशनिंगच्या दुकानाचे परवाने मिळविणे या बाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील,विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण,वि.प.स यांनी दिलेली नियम 93 ची सूचना

श्री.बाबा सिध्दिकी (अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री) :सभापती महोदय, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, नितीन गडकरी ,मधुकर चव्हाण यांनी " मुंबईत खोटी प्रमाणपत्रे देऊन अकरा रेशनिंगच्या दुकानाचे परवाने मिळविणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणें मला निवेदन करावयाचे आहे. निवदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

5..



- निवेदना नंतर -

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, निवेदनात असे म्हटलेले आहे की ,"या तक्रारीमध्ये तथ्य आहे " परंतु हे श्रेय आपण घेता कामा नये ते श्रेय पोलिसांना दिले पाहिजे.या तक्रारीची चौकशी करण्याचे काम श्री.राकेश मारिया यांच्याकडे दिल्यानंतर त्यांनी त्वरित प्रफुल्ल नावाचे अधिकारी पाठवून चौकशीची कारवाई केली होती. निवेदनात असे म्हटलेले आहे की," तक्रारीत सकृतदर्शनी तथ्य आढळून आल्यामुळे चार दुकानापैकी तीन दुकाने रद्द करण्यात आली आहे". परंतु पोलिसांनी त्यांच्या अहवाल असे म्हटलेले आहे की,"so far we have found 11 shops whose licences were issued by using documents of somebody else." नोकरीचे अमीष दाखवावयाचे, त्यांच्याकडून सगळी कागदपत्रे घ्यावयाची आणि रेशन दुकाने मिळवली जातात. हा मुद्दा पोलिसांच्या अहवालात मांडण्यात आला आहे . त्यांनी 11 दुकानांच्या बाबतीत असे आढळून आल्याचे म्हटलेले आहे परंतु या निवेदनामध्ये मात्र 4 दुकानाच्या बाबतीत तसे आढळून आल्याचे म्हटलेले आहे. ठीक आहे. तेव्हा या दोन्ही पैकी नेमकी खरी वस्तुस्थिती काय आहे ? त्याचबरोबर या प्रकरणात किती अधिका-यांना निलंबित केले आहे आणि निलंबित केले नसल्यास का केले नाही. ? त्याचप्रमाणे निवेदनात पुढे असे म्हटलेले आहे की,"खोटी प्रमाणपत्रे सादर करुन अधिकृत शिधावाटप मंजूर करण्यात आल्याच्या कथीत घटना विचारात घेऊन "तेव्हा ही कथीत घटना नाही. या बाबतीत पोलिसांनी चौकशी करुन ही बाब सत्य असल्याचे सागितलेले आहे. तेव्हा दोन वर्षात देण्यात आलेल्या दुकानाच्या मंजुरीच्या संदर्भात शासनानेच निर्णय घेतला आहे. कागदपत्राची सखोल चौकशी किती दिवसात करण्यात येणार आहे आणि त्यासबंधीचा अहवाल पुढील अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, 11 दुकानों की तक्रार आई थी. जब डिपार्टमेंट ने इनकी चौकशी की तो 4 दुकाने रद्द की गईं और एक दुकान को सस्पेंड किया गया. हाईकोर्ट से निर्देश आया और सरकार ने उसको स्टे दिया है. 15 दिन के अन्दर इस बारे में फैसला करेंगे. बाकी जिन 7 दुकानों की चौकशी की गई थी, उनके नाम हैं : श्री. दीनानाथ यादव, श्रीमती वीना बापू गायकवाड, श्रीमती पिंकी अग्रवाल, श्रीमती आशा बाबन लोखारे, श्रीमती सुनीता सुरेश सोनावणे, श्रीमती आशालता अशोक तावडे और 2 दुकाने सम्राट कन्ज्यूमर कॉपरेटिव सोसायटी की हैं. माननीय सदस्य ने प्रश्न पूछा है कि चौकशी कितने दिन में की जाएगी तो यह प्रकरण



श्री.बाबा सिध्दिकी......

अलग किस्म का है. 2 साल के अन्दर मुंबई में 130 राशन की दुकाने दी गई हैं. अगले अधिवेशन के पहले मैं इनकी चौकशी करके उसका अहवाल सदन के पटल पर रखूंगा. दोषी अधिकारियों के बारे में इन्क्वायरी करेंगे और जो अधिकारी उस समय रेशनिंग ऑफिसर थे या जो भी ऑफिसर उस समय थे, उनकी यादी निकालकर उनकी जल्दी से जल्दी डिपार्टमेंटल इन्क्वायरी शुरु होगी और अगले अधिवेशन के पहले डिपार्टमेंटल इन्क्वायरी का निकाल आ जाएगा.

. . . नंतर सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महादेव कोळी समाजाचे दाखले खोटे ठरवून शासकीय सेवेतून कमी करणे

**मु.शी.**: महादेव कोळी समाजाचे दाखले खोटे ठरवून शासकीय सेवेतून कमी करणे बाबत डॉ. नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : माननीय सामाजिक न्याय मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन चर्चेकरिता मी प्रलंबित ठेवतो.

----

**पृ.शी.** : रत्नागिरी जिल्हयातील दापोली येथील टेटवली ग्रामस्थांनी जमीन संपादनास केलेला विरोध

**मु.शी.**: रत्नागिरी जिल्हयातील दापोली येथील टेटवली ग्रामस्थांनी जमीन संपादनास केलेला विरोध याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

(माननीय सदस्य अनुपस्थित)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: इयत्ता 5 वी ते 9 वीच्या क्रीडा क्षेत्रातील प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना 11 वीच्या प्रवेशाकरिता 5 टक्के आरक्षण ठेवणे

**मु.शी.**: इयत्ता 5 वी ते 9 वीच्या क्रीडा क्षेत्रातील प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना 11 वीच्या प्रवेशाकरिता 5 टक्के आरक्षण ठेवणेबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी "इयत्ता 5 वी ते 9 वीच्या क्रीडा क्षेत्रातील प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना 11 वीच्या प्रवेशाकरिता 5 टक्के आरक्षण ठेवणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांनी आपणास पत्र दिले, व त्या पत्राला उत्तर मिळाल्यामुळे त्यांचे समाधान झाले आहे. इयत्ता 11 वी मध्ये प्रवेश देत असतांना क्रीडा क्षेत्रामध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांकरिता 5 टक्के जागा आरक्षित असल्याचे म्हटले आहे. ते गृहीत धरुन केवळ 10 व्या इयत्तेमध्ये असतांना क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना गृहीत धरले जाते. परंतु इयत्ता 5 वी ते 9 वीपर्यंत ज्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रामध्ये प्राविण्य मिळविले आहे ते गृहीत धरले जात नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, इयत्ता 11 वीमध्ये प्रवेश देतांना केंद्रीय प्रवेश समितीतर्फे इयत्ता 5 वी ते 9 वीमधील क्रीडा क्षेत्रातील प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा विचार न करता 10 वीच्या वर्गातील क्रीडा क्षेत्रातील प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा विचार केला जातो. तेव्हा 5 वी ते 9 वीच्या वर्गातील क्रीडा क्षेत्रातील प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा विचार करण्याबाबत शासन काय कारवाई करणार आहे? आणि जर आपण विचार केला असेल तर आतापर्यंत आपण किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे?

प्रा. वसंत पुरके :सभापती महोदय, क्रीडा व विविध खेळाच्या संदर्भात मुलांमध्ये खेळाचे आकर्षण निर्माण व्हावे व त्यांना प्रोत्साहन मिळावे याकरिता 26 जून 2006 रोजी शासनाने निर्णय घेतला. व त्यानुसार इयत्ता 10 वीच्या मुलांनी विभागीय स्तरावर व राज्य स्तरावरील क्रीडा क्षेत्रामध्ये विविध प्रकारचे प्राविण्य मिळविले असेल तर इयत्ता 11 वीच्या प्रवेशाकरिता 5 टक्के आरक्षण निश्चित केले आहे. याबाबत माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा निश्चितपणे विचार केला जाईल..

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: 35 % व 49 % गुण पातळीवरील विद्यार्थी महाविद्यालयीन प्रवेशापासून वंचित असणे

**मु.शी.**: 35 % व 49 % गुण पातळीवरील विद्यार्थी महाविद्यालयीन प्रवेशापासून वंचित असणे याबाबत श्री कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

(माननीय सदस्य अनुपस्थित)

-----

**पृ.शी.**: मुळशी धरणग्रस्तांचे प्रश्न धसास लावण्यासाठी विधानसभा सदस्य श्री. शरद ढमाले यांनी जलसमाधी घेण्याची केलेली घोषणा

**मु.शी.**: मुळशी धरणग्रस्तांचे प्रश्न धसास लावण्यासाठी विधानसभा सदस्य श्री. शरद ढमाले यांनी जलसमाधी घेण्याची केलेली घोषणा याबाबत श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

(माननीय सदस्य अनुपस्थित)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

**पृ.शी.**: केंद्र शासनाच्या जागेवर झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्यास केंद्र सरकारची मंजूरी न मिळणे

**मु.शी.**: केंद्र शासनाच्या जागेवर झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्यास केंद्र सरकारची मंजूरी न मिळणे याबाबत ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी "केंद्र शासनाच्या जागेवर झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्यास केद्र सरकारची मंजूरी न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, शासनाच्या एसआरए योजनेमध्ये प्रचंड गोंधळ आहे. शासनाने आपले धोरण बदलल्यामुळे त्या गोंधळात आणखी भर पडली आहे. याठिकाणी आपण जी आकडेवारी दिली आहे ती नवीन धोरण अंमलात येण्यापूर्वीची आहे. आणि नवीन धोरण अंमलात आल्यानंतर आपण किती योजना मंजूर केल्या? त्याचप्रमाणे केंद्र सरकारच्या जमिनीवर मोठया प्रमाणात झोपडया झालेल्या आहेत. गेल्या 50 ते 60 वर्षापासून त्या जागेवर झोपडया आहेत. त्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. या झोपडयांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने केंद्र सरकारकडे प्रस्ताव दिला आहे काय? नसेलतर, या गरीब लोकांबाबत आपण सहानुभूतीपूर्वक धोरण आखणार आहात काय? त्यासंबंधी केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करणार आहात काय?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, दिनांक 1.7.2008 पर्यंत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे 2171 झोपडपटट्यांचे पुनर्वसन योजनेचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

(यानंतर श्री. सुंबरे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. शेगावकर ....

आणि ठराविक मुदतीत आलेले प्रस्ताव छाननी केल्यानंतर त्यापैकी 234 प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात आले असून 1937 प्रस्ताव कार्यरत आहेत. त्यापैकी 1171 प्रस्तावांना मंजुरी देण्यात आलेली आहे. उर्वरित 676 प्रस्तावांची छाननी सुरू आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, आपली नवी पॉलिसी आल्यानंतर किती प्रस्तावांना मंजुरी दिलेली आहे ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, नवीन धोरण आल्यानंतर 22 प्रस्ताव आलेले आहेत. त्या अगोदर जे प्रस्ताव मंजुर झालेले आहेत त्यांची अमलबजावणी बरोबर चालू आहे. परंतु जे आलेले प्रस्ताव आहेत त्यामध्ये नवीन धोरणानुसार 269 चौ.फूटाची सदनिका द्यायची असल्याने त्यांना पुन्हा त्यानुसार प्रस्ताव सादर करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच केंद्र सरकारच्या जागांवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी केंद्र सरकारची अनुमती आवश्यक आहे. तसेच हे काम त्या त्या केंद्र सरकारच्या विभागांनी करावयाचे आहे. म्हणजे रेल्वे ॲथॉरिटी, केंद्रीय विमानतळ प्राधिकरण या सारख्या विभागांनी त्यासाठीचा प्रस्ताव द्यायचा आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, पण त्या जागांवर 50 वर्षांपासून गरीब लोक रहात आहत त्यासाठी आपण आपले धोरण निश्चित करावे म्हणून केंद्र सरकारकडे आपण प्रस्ताव पाठविला आहे काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, केंद्राच्या ज्या विभागाच्या, ॲथॉरिटीच्या जागेवर योजना राबवावयाची आहे त्यासाठीचा प्रस्ताव हा त्या त्या ॲथॉरिटीनेच पाठवायचा आहे. ..

**सभापती** : मी माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. तेव्हा आपण स्वत: आपल्या दालनामध्ये सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब व अन्य सदस्यांना बोलावून घेऊन चर्चा करावी आणि त्यांच्या मनात याबाबत काही शंका असल्यास त्या दूर कराव्यात.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : ठीक आहे.

***

......डब्ल्यूडब्ल्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सुभिक्षा मॉल तथा सुभिक्षा ट्रेडींग सर्व्हिसेस लि. कडून विनापरवाना होत असलेले काम.

**मु. शी.** : सुभिक्षा मॉल तथा सुभिक्षा ट्रेडींग सर्व्हिसेस लि. कडून विनापरवाना होत असलेले काम याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बाबा सिद्दिकी (अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री पाडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "सुभिक्षा मॉल तथा सुभिक्षा ट्रेडींग सर्व्हिसेस लि. कडून विनापरवाना होत असलेले काम " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... डब्ल्यूडब्ल्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 खालील मा.अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर...)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज काल दूरदर्शनवर आणि दूरदर्शनवरील विविधी वाहिन्यांवर सुभिक्षा - स्वस्त वस्तू मिळण्याचे ठिकाण अशा प्रकारच्या जाहिराती प्रचंड प्रमाणात दाखविल्या जात आहेत. या संदर्भात सुभिक्षा ट्रेडिंग सर्व्हिसेस लि. च्या मानकोली नाका, दापोडा गाव, तालुका भिवंडी जिल्हा ठाणे या संस्थेच्या पाच ठिकाणी आपल्या अधिकाऱ्यांनी छापे टाकलेले आहेत. आता त्या छाप्यांबाबत आपण या निवेदनात 'भेटी दिल्या' असे म्हटले आहे. त्या छाप्यामध्ये 1) मे. सुभिक्षा सर्व्हिसेस लि., 2) सुभिक्षा ट्रेडिंग सर्व्हिसेस लि., 3) ॲनलाग फायनान्शिअल सर्व्हिसेस प्रा.लि., 4) क्वॉड्रन्गल ट्रेडिंग सर्व्हिसेस प्रा.लि. आणि 5) इन्ट्यूटिव्ह सॉफ्टवेअर डिझाईन सर्व्हिसेस प्रा.लि. या पाच कंपन्यांच्या नावे परवाने मंजूर असल्याचे आढळून आले. मात्र या पाचही कंपन्यांसाठी एकाच जागेत पॅकींगचे, रिपॅकींगचे काम करण्यात येत होते. या निवेदनात म्हटले आहे की, सुभिक्षा ट्रेडिंग सर्व्हिसेस लि. मानकोली नाका, दापोडा, ता.भिवंडी, जिल्हा ठाणे या संस्थेकडून अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा, 1954 व त्या खालील नियम 1955 मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले आहे. असे असतानाही या पाचही कंपन्यांचे परवानगी आपण किती दिवसांसाठी रद्द केले ? सभापती महोदय, हा सार्वजनिक वितरणाचा विषय आहे आणि यामध्ये या सुभिक्षा कंपनीचे क्षेत्र आता महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता आता गुजरातमध्ये देखील ही कंपनी गेलेली आहे. ...

**( सभापतीस्थानी - माननीय उपसभापती )**

( यानंतर सौ. रणदिवे ....एक्सएक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

एवढा गंभीर दोष असतानाही पाचही संस्थांचे परवाने दि.1-3-2008 ते दि.10-3-2008 म्हणजे 10 दिवसासाठी निलंबित करण्यात आले. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "मे.सुभिक्षा ट्रेडिंग सर्व्हीसेस लि.या पेढीच्या बाबतीत दि.10-12-2007 रोजी तपासणी करण्यात आली. त्यामध्ये देखील त्रुटी सापडल्या. त्यामुळे या संस्थेचा परवाना दि.23-6-2008 ते दि.27-6-2008 म्हणजे 3-4 दिवसासाठी निलंबित करण्यात आला. वा, साहेब, आपण फार चांगल्या प्रकारे कारवाई करीत आहात. जे छापे टाकले, त्यामध्ये कोणकोणत्या त्रुटी दिसून आलेल्या आहेत ? याची माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, एफ.डी.ए. के छापे में कुछ गंभीर बातें सामने आईं हैं, लेकिन वे हानिकारक नहीं थी. जिस तरह की बातों को एफ.डी.ए. गंभीर समझता है, जिन बातों को हम गंभीरता से लेते हैं, उनमें से गुटका खाकर थूकना, यह वायलेशन है और इसको हम गंभीर मानते हैं. जहां पर फूड आर्टिकल रखे थे, वहां की सेनिटरी कंडीशन बराबर नहीं थी, बिल प्रिंटेड नहीं था, दीवाल पर मकड़ी का जाला था, लेकिन वहां पर कोई भी जहरीली चीज नहीं थी. इस मामले में कानून और नियम के अनुसार कार्रवाई की गई है. एफ.डी.ए. कमिश्नर के पास अपील आई है. मैं सदन को आश्वस्त करना चाहता हूँ कि कमिश्नर को 10 दिन के अन्दर निकाल देने के बारे में निर्देश दिया जाएगा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी वाचून दाखवितो. संबंधितांनी परवाना न घेता पॅकीग केलेले आहे आणि ही बाब अतिशय गंभीर आहे.

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, परवाना घेतलेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 5 पेढयांमध्ये रिपॅकिंगचे काम होत आहे. पण एकाही पेढीने रिपॅकिंगसाठी परवाने घेतलेले नाहीत. याबाबतीत तपासणी केली असता याठिकाणी असे म्हटलेले आहे की,"वरील सर्व पेढयांचे काम एकत्रितपणे एकाच जागेत रिपॅकिंग व साठवणूक (विक्रीसाठी केली जाते) वरील पाच पेढयांमध्ये वेगवेगळे पार्टीशन केलेले नाही. तसेच सदर पाचही पेढयांमध्ये रिपॅकिंग होत असल्याचे आढळले. परंतु एकाही पेढीने रिपॅकिंगसाठी परवाना घेतलेला नाही. 2) सदर ठिकाणी रिपॅक होत असलेल्या अन्न पदार्थांच्या काही लेबलवर उत्पादक अथवा रिपॅकरचे नाव मार्कर पेनच्या सहाय्याने खोडून टाकले असल्याचे आढळून आले.3) सदर जागेतील

. . . .2 एक्स-2



अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

जागेतील जमीन एकसंघ (काही ठिकाणी) नाही. काही ठिकाणी उखडलेली असून त्यामध्ये अन्न पदार्थांचे दाणे अडकून बसलेले आहेत. तसेच जमिनीवर धुळ साचलेली आढळली. 4) सदर पेढीत रिपॅकिंग उपरोक्त अ.क्र.1 मधील क,ड,इ मध्ये नमूद पेढीच्या नावाने व सुभिक्षा या ब्रॅन्ड नावाने रिपॅकिंग होते. तीनही पेढीच्या नावे पॅकिंग एकत्रितपणे केले जाते. 5) सदर पेढीत छतांना (पॅकिंग कक्षातील) व भिंतीवर जाळी-जळमटे मोठया प्रमाणावर झालेली आढळले. 6) सदर पेढीमध्ये अन्न पदार्थांची साठवणूक ज्याठिकाणी केली जाते. तेथील सर्व पिलर्सवरती (खांबावरती) गुटखा व पान खाऊन थुंकलेले आढळले. 7) सदर ठिकाणी रिपॅकिंगच्या ठिकाणी अन्न पदार्थ साठविण्याकरीता उंच कठडा केलेला नाही. सर्व अन्न पदार्थ जमिनीवर आढळले. 8) रिपॅकिंगच्या ठिकाणी अन्न पदार्थांचा साठा वेगवेगळया ठिकाणी साठविलेला होता. त्यावर Damaged to be discarded by order असे लेबल लावलेले आढळले. त्या बाबतीत हजर व्यक्ती स्पष्टीकरण देऊ शकलेली नाही.

**उपसभापती** : मला असे वाटते की, हे फार लांबलचक होत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्यांनी छापा टाकला आहे, त्यांनी शासनाला हा अहवाल सादर केला आहे. इतक्या प्रकारच्या त्रुटी आढळून आल्यानंतरही शासनाने केवळ 3-3 दिवस परवाने रद्द केलेले आहेत. सुभिक्षामार्फत माल वितरित केला जातो. परंतु अपिल केले म्हणून त्यांच्यावरील कार्यवाही थांबविली जाते. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, समाजाला भेसळयुक्त पदार्थ पुरविणाऱ्या संस्थेचे कायमस्वरुपी लायसन्स रद्द करणार आहात काय ?

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, माननीय विरोधी पक्ष के नेता ने जो पॉइंट्स बताए है, वही पॉइंट्स मैंने भी बताए हैं. मी गुटख्याच्या बाबतीत सांगितले. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कंपनीला लायसन्सेस नाहीत. ज्या तीन कंपन्या आहेत त्यामध्ये अनॅलॉग फायनान्शियल सर्व्हिसेस, इन्ट्युटिव्ह सॉफ्टवेअर आणि क्वॉड्रन्गल ट्रेडिंग, इनको पॅकिंग की परमीशन है और वे सुभिक्षा को पॅकिंग की परमीशन देते है. हमने मिर्ची पावडर, हल्दी पावडर, जीरा, गरम मसाला, ड्राय कोकोनट, सुगर, बेसन और सुंठ के सॅम्पल लिए थे. इसमें से मिर्ची पावर स्टॅन्डर्ड पाया गया, हल्दी पावडर स्टॅन्डर्ड पाया गया, जीरा स्टॅन्डर्ड पाया गया लेकिन ड्राय कोकोनट सबस्टॅन्डर्ड पाया गया. इसके लिए भिवंडी कोर्ट में दिनांक 22 अप्रैल को क्रमांक 501/08 पर प्रोसीक्यूशन डाल दिया है. बेसन स्टॅन्डर्ड पाया गया, लेकिन सुंठ सबस्टॅन्डर्ड पाई गई. इसके लिए दिनांक 22 अप्रैल को क्रमांक 502/08 पर भिवंडी कोर्ट में प्रोसीक्यूशन डाल दिया है. इनका लाइससेंस सस्पेंड कर दिया गया था. अब यह अपील में एफ.डी.ए. कमिश्नर के पास है. मैने पहले ही बताया है कि 10 दिन के अंदर उनको निकाल देने के लिये निर्देश दिया जायेगा. The Commissioner is a quasi-judicial authority and the Government can not influence quasi-judicial authority.

श्री. पांडुरंग फुंडकर : त्यांनी आपल्या किती नियमांचे उल्लंघन केलेले आहे ? तपासणीच्या वेळी सखोल तपासणी केली. त्यांनी नियमांचे उल्लंघन केलेले आहे. रिपॅकींगचा परवाना घेतलेला नाही. केंद्रीय नियम क्रमांक 50(1) चे उल्लंघन केलेले आहे. त्यानंतर नियम क्रमांक 50(9) चे उल्लंघन केलेले आहे.. नियम 5(3) चे उल्लंघन केलेले आहे. नियम 14 (अ) चे उल्लंघन केलेले आहे. नियम 4(3) चे उल्लंघन झाले आहे. इतक्या कलमांचे उल्लंघन या कंपन्यांनी केलेले आहे.

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्ष नेता ने जो मुद्दे उपस्थित किये है, उनकी आप फिर से जांच कीजिए और अगर उसमे कुछ तथ्य है तो उनका लायसेन्स रद्द कीजिए.

श्री. बाबा सिद्दीकी : इस मामले में कमिश्नर के पास अपील पेंडिंग है. कमिश्नर इस मामले की सुनवाई करेगा और नेचुरल जस्टिस के हिसाब से निकाल देगा.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, इतक्या नियमांचे उल्लंघन करुन सुध्दा यांनी फक्त तीन-तीन दिवस परवाने रद्द केले.

**उपसभापती** : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगितले की, आपण पुन्हा तपासणी करावी आणि त्यामध्ये तथ्य आढळून आले तर आपण त्यांचे लायसन्स रद्द करावे.

श्री. बाबा सिद्दीकी : होय.

----

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : चिपळूण येथील वशिष्ठी नदीतील गाळ प्रकरणी पत्रकारांना झालेली मारहाण

**मु. शी.** : चिपळूण येथील वशिष्ठी नदीतील गाळ प्रकरणी पत्रकारांना झालेली मारहाण याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. आर. आर. पाटील ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "चिपळूण येथील वशिष्ठी नदीतील गाळ प्रकरणी पत्रकारांना झालेली मारहाण" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, चिपळणूला वशिष्टी नदीच्या ठिकाणी पत्रकारांना मारहाण झाली. त्या ठिकाणी दिवसाढवळ्या 60-70 भट्टया चाललेल्या असतात. अगदी परशुरामाच्या त्या बाजूपासून खाली संगमेश्वरला जाणारा नदीचा जो प्रवाह आहे त्या ठिकाणी दोन्ही बाजूला दिवसाढवळ्या भट्टया लागलेल्या असतात. चिपळूण पोलीस स्टेशनमध्ये जर सिनियर इन्स्पेक्टर सोडले तर त्यांच्या खालचे सगळे लोक गेली 7-8 वर्षे त्याच ठिकाणी आहेत. मी त्या ठिकाणचा राहणारा असल्यामुळे दर महिन्याला मी गावी जातो त्यामुळे मला माहीत आहे. त्यांच्या बदल्या करणार काय ? दिवसाढवळ्या पत्रकारांवर हल्ला केला त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, ही घटना गंभीर आहे. त्या पोलीस स्टेशनमध्ये पाच वर्षापेक्षा अधिक काळ काम करणाऱ्या सगळ्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येतील. पाच वर्षाच्या वर कोणालाही ठेवले जाणार नाही आणि तेथील वरिष्ठ पोलीस निरीक्षकाला सस्पेंड केले जाईल.

----

... 5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS

**पृ. शी.** : रायगड जिल्ह्यातील धाराब औद्योगिक वसाहतीतील सुदर्शन केमिकल्स कारखान्यातील कंत्राटी कामगारांवर पोलिसांनी केलेला लाठीमार

**मु. शी.** : रायगड जिल्ह्यातील धाराब औद्योगिक वसाहतीतील सुदर्शन केमिकल्स कारखान्यातील कंत्राटी कामगारांवर पोलिसांनी केलेला लाठीमार याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. आर. आर. पाटील ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. किरण पावसकर यांनी "रायगड जिल्ह्यातील धाराब औद्योगिक वसाहतीतील सुदर्शन केमिकल्स कारखान्यातील कंत्राटी कामगारांवर पोलसांनी केलेला लाठीमार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील सुदर्शन केमिकल्स कंपनीच्या कामगारांवर झालेला गोळीबार यासंदर्भातील निवेदनामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे 18 जुलै, 19 जुलै, आणि 21 जुलै या तीनही दिवशी जर बैठकी झाल्या असत्या तर त्या बैठकी झाल्यानंतर तिकडचे पोलीस अधिकारी ही परिस्थिती येऊन नये यासाठी दक्षता घेऊ शकले असते.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/ श्री.बरवडनंतर 13:50

श्री.किरण पावसकर....

अचानक जर प्रकार झाला असता तर कळू शकेल. परंतु दिनांक 18, 19 व 21 या तीन दिवशी बैठका होतात आणि तिस-या दिवशी गोळीबाराचा प्रकार होऊ शकतो. हे आंदोलन करणारे त्या कंपनीत काम करणारे कामगार होते. ते आपल्या हक्कासाठी, न्यायासाठी गेटवर गेले होते. अशा आंदोलकांवर 307 व इतर कलमाखाली केसेस दाखल केल्या आहेत. ज्या मालकामुळे ही परिस्थिती निर्माण झाली त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय किंवा केली जाणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : यामध्ये मालकाचा संबंध येत नाही. कारण हे कंत्राटी कामगार एका ठेकेदाराकडे काम करीत होते. ते मिलचे डायरेक्ट कामगार नव्हते. .

श्री.किरण पावसकर : त्या कंपनीमध्ये हे ठेकेदार नेमले होते. प्रिन्सिपल एम्प्लॉयर म्हणून केमिकल कंपनीची जबाबदारी होती, कारण ते ठेकेदार नेमतात. ठेकेदारांना नेमण्याची जबाबदारी जर मालकाची असेल तर तेथे गडबड झाल्यावर त्याची जबाबदारी मालकावर का येऊ शकत नाही ?

श्री.आर.आर.पाटील : कामगार कायदा पाहिला तर जे कंत्राटी कामगार असतील त्याच्याशी मुख्य मॅनेजमेंटचा काय संबंध येतो ? प्रिन्सिपल एम्प्लॉयरचा येथे काहीही संबंध पोहोचत नाही.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोकण कृषी विद्यापीठासाठी जमीन संपादनास शेतक-यांनी विरोध केला असतानाही सक्तीने जमिनी संपादित करण्यात येणे

**मु. शी.** : कोकण कृषी विद्यापीठासाठी जमीन संपादनास शेतक-यांनी विरोध केला असतानाही सक्तीने जमिनी संपादित करण्यात येणे याबाबत श्री.दिवाकर रावते वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री.दिवाकर रावते यांनी "कोकण कृषी विद्यापीठासाठी जमीन संपादनास शेतक-यांनी विरोध केला असतानाही सक्तीने जमिनी संपादित करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "418.31 हेक्टरपैकी 188 हेक्टर क्षेत्र विद्यापीठाने स्वत:कडे ठेवून उर्वरित 230.31 हेक्टर क्षेत्र विद्यापीठाने संपादनातून वगळावयाचे असे ठरले." त्याला महसूल खात्याने परवानगी दिलेली आहे. 2000 सालापासून ही कार्यवाही सुरु असून आता आपण 2008 सालामध्ये आहोत. यासंबंधी आणखी किती विलंब लावला जाणार आहे ? पुन्हा विधी खात्याचा सल्ला कशासाठी घेतला जाणार आहे ? या सर्व प्रक्रियेसाठी वेळ न घालविता 2-4 महिन्यामध्ये निर्णय घेतला जाईल काय ? शेतक-यांनी तेथे आंदोलन केले आहे. त्यामुळे केरळ कोर्टाचे कारण दाखविण्याचे थांबविण्यात यावे. कोकणच्या राजाच्या नावाने त्या खात्याचे मंत्री तेथे फिरत आहेत त्यांचे राजेपण सिध्द करण्याची वेळ आलेली आहे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : या विद्यापीठासाठी संपादित केलेली जमीन शेतक-यांना परत देण्याबाबत कोर्टाच्या निर्णयाची अडचण आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "संपादित केलेली जमीन परत करीत असताना त्याचा जाहीर लिलाव करावा लागेल." त्याच्या अधिन राहून याबाबत लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

श्री.दिवाकर रावते : याचा अर्थ ती जमीन शेतक-यांना द्यावयाची नाही. या निवेदनात असे म्हटले आहे की, "मौजे टेटवली येथे एकूण 418.31 हेक्टर जमीन संपादित करण्यात आली टेटवली येथील प्रत्यक्षात 418.31 हेक्टर जमीन संपादन झाल्याचे दर्शविण्यात आले असले तरी प्रत्यक्षात 188 हेक्टर इतकी जमीन विद्यापीठाच्या ताब्यात आलेली आहे." त्यामुळे मला मंत्रिमहोदयांनी कोर्टाच्या निर्णयाची माहिती देऊ नये. तो निर्णय मला माहीत आहे. या निवेदनात पुढे असेही म्हटले आहे की, "माननीय कृषी मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली व माननीय पालकमंत्री, रत्नागिरी व स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच माननीय कुलगुरु व संबंधित प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत दि.10.6.2008 रोजी झालेल्या बैठकीत 230.31 हेक्टर जमिनी सिमांकन करुन मोजणीनंतर महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत प्रस्ताव शासनास सादर करावा तसेच मोजणीचे शुल्क विद्यापीठाने भरावे असे सुचविण्यात आले व त्यानुसार प्रस्तावाची विधी व न्याय विभागाकडून तपासणी करुन प्रस्ताव महसूल व वन विभागाच्या मंजुरीकरिता पाठविण्यात यावा असे ठरले आहे."
आता महसूल खात्याने निर्णय घ्यावयाचा आहे. त्यामुळेशेतक-यांना त्यांच्या जमिनी परत देण्याचा शासन निर्णय घेणार आहे की नाही ?

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : शासन कोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या अधिन राहून निर्णय घेणार आहे. विद्यापीठानेही तेवढया जमिनीची आवश्यकता नाही, त्यामुळे ती जमीन परत करण्यास हरकत नाही असे म्हटलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : मग 1 रुपये दराने लीजवर त्यांना ही जमीन देणार आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : याबाबत निश्चितपणे एक आठवडयात निर्णय घेतला जाईल.

श्री.दिवाकर रावते : पुण्याची जमीन मग लीजवर कशी दिली आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : एक आठवडयात निर्णय घेतला जाईल.

-----

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनाबाबत**

डॉ. दीपक सावंत : उपसभापती महोदय, मघाशी जेव्हा 93च्या सूचनेवरील निवेदने घेण्यात आली त्यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये हजर नसल्यामुळे ते निवेदन वितरित झाले नाही. आता सन्माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित असल्यामुळे त्यांना ते निवेदन वितरित करण्यास सांगावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

श्री. दिवाकर रावते : काल सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी माननीय गृहमंत्री आज निवेदन करणार आहेत. सभागृहाची बैठक संपण्यापूर्वी ते निवेदन करण्यास सांगावे.

**उपसभापती** : सभागृहाची बैठक संपण्यापूर्वी माननीय मंत्री महोदय निवेदन करतील.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांनी फीमध्ये एकतर्फी जाहीर केलेली वाढ

**मु. शी.** : राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांनी फीमध्ये एकतर्फी जाहीर केलेली वाढ याबाबत डॉ. दीपक सावंत,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांनी फीमध्ये एकतर्फी जाहीर केलेली वाढ" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांनी फीमध्ये वाढ करण्याचे ठरविलेले आहे. यावर्षीची फी अजून निश्चित झालेली नाही. वैद्यकीय शिक्षणासाठी 60 आणि अभियांत्रिकी शिक्षणासाठी 80 टक्के अंतरिम फी विद्यार्थ्यांनी भरावी असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, शिक्षण शुल्क समिती आणि प्रवेश नियंत्रण समितीची स्थापना झ ालेली आहे. दरवर्षी फीसंबंधी आढावा घेण्याऐवजी एकदा निश्चित केलेली फी 3 वर्षापर्यन्त कायम ठेवावी अशा प्रकारचा निर्णय शासन त्यांना घेण्यास भाग पाडील काय ? ही फी भरण्याच्या बाबतीत पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झालेले आहे. हा संभ्रम दूर करण्यासाठी एकदा निश्चित केलेली फी 3 वर्षासाठी कायम ठेवण्यात येणार आहे काय ? ही फी जर डबल किंवा तिप्पट झाली तर 2 लाखाच्या ऐवजी 4 लाख रु. किंवा तिप्पट झाली तर त्याही पेक्षा जास्त फी विद्यार्थ्यांना भरावी लागेल. तेव्हा हा फीचा किती बोजा पालकांवर पडणार आहे ? फीची मर्यादा ठरवून देण्यात येणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारले. त्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, शिक्षण शुल्क समिती ही कोर्टाच्या आदेशाप्रमाणे स्थापन झालेली आहे. फी शिक्षण शुल्क समिती ठरवते. सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना शिक्षण शुल्क समितीच्या अध्यक्षांना कळविण्यात येईल. ही फी डबल किंवा तिप्पट होईल असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. फी कशी निश्चित करायची यासंबंधीचे नियम ठरलेले आहेत.

...नंतर श्री. कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.शिगम 14:00

श्री. सुरेश शेट्टी....

जे नियमाप्रमाणे आहे ते करण्यात येईल. मागील अधिवेशनात यासंबंधात चर्चा झाली होती आणि त्यावेळी यासंदर्भातील माहिती मी सदनाला दिली होती. फी दुप्पट होईल की तिप्पट होईल हे मी सांगू शकत नाही परंतु नियमाप्रमाणे शुल्कसमिती फी निश्चित करते. शासनाने निर्णय घेतला आहे त्याप्रमाणे अनु.जाती आणि अनु.जमातीमधील विद्यार्थ्यांची 100 टक्के फी खाजगी महाविद्यालयांमध्ये आपण भरतो. ओ.बी.सी.आणि इ.बी.सी.मधील विद्यार्थ्यांची 50 टक्के फी शासन भरते.

----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुळशी धरणग्रस्तांना पुनर्वसन कायदा लागू करणे

**मु.शी.**: मुळशी धरणग्रस्तांना पुनर्वसन कायदा लागू करणेबाबत श्री. अरविंद सावंत,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

डॉ. राजेंद्र शिंगणे (मदत व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी मुळशी धरणग्रस्तांना पुनर्वसन कायदा लागू करणे याविषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस :येथे सोबतचे निवेदन छापावे. )

------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SSK/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.शिगम 14:00

**निवेदनानंतर**

श्री. अरविंद सावंत :सभापती महोदय, मुळशी धरणासाठी सेनापती बापट यांनी आंदोलन केले होते. त्यावेळी पुनर्वसन कायदा लागू नव्हता. आता या धरणाची उंची 1 मिटरने वाढविण्यात येणार आहे त्यामुळे जे नियम आणि निकष आहेत त्यानुसार धरणग्रस्तांना पुनर्वसन कायदा लागू करावयास हवा. सद्यस्थितीत विचार केला तर धरणाची उंची एक मिटरने वाढविल्यामुळे 134 हेक्टर क्षेत्र नव्याने ओलिताखाली येणार आहे. त्यापैकी 114 हेक्टरक्षेत्र टाटा कंपनीचे आहे त्यामुळे पुनर्वसन कायदा लागू करणार नाही. विधानसभेचे या क्षेत्राचे सदस्य श्री. शरद ढमाले यांनी यासाठी जलसमाधी आंदोलन जाहीर केले होते. पूल बांधण्यासाठी टाटाने 2.5 कोटी रुपये देण्याचे कबूल केले होते. आता पुलाची किंमत 25 कोटीपेक्षा अधिक झाली आहे. धरणाची उंची वाढविण्यासाठी टाटाची जमीन जाणार आहे तरी सुध्दा पुनर्वसन कायदा लागू करणार काय ? तो केव्हापासून लागू करणार ? टाटा कंपनी पूल बांधण्यासाठी 2.5 कोटी रुपये देणार आहे त्यामुळे पुलाच्या खर्चाची उर्वरित रक्कम शासन देणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मुळशी धरणाच्या संदर्भात माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये सूचना मांडून काही मुद्दे उपस्थित केले आहेत.माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या धरणाला पुनर्वसन कायदा लागू नाही. एक मिटर धरणाची उंची वाढविल्यामुळे जी काही जमीन संपादित होणार आहे त्यातील जास्तीत जास्त जमीन ही टाटा कंपनीची स्वत:ची आहे. धरणाची उंची एक मिटरने वाढविल्यामुळे काही प्रश्न निर्माण होणार आहेत. याप्रश्नांच्यासंदर्भात मुळशी भागातील नागरीक तसेच त्या परिसरातील शेतकरी यांनी अनेक प्रकारच्या मागण्या शासनाकडे केलेल्या आहेत. त्याबाबतचा उल्लेख निवेदनाच्या उत्तरात केला आहे. या मागण्या पूर्ण कराव्यात आणि पुनर्वसन कायदा लागू करावा यासाठी याभागाचे आमदार श्री. शरद ढमाले यांनी जलसमाधी घेण्याचे जाहीर केले होते ही गोष्ट खरी आहे. सन्माननीय सदस्यांनी विधानसभेमध्ये याविषयीच्या भावना व्यक्त केल्यानंतर असा निर्णय झाला की जलसंपदा मंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि मदत व पुनर्वसन मंत्री यांची एक बैठक घेण्यात यावी. बैठकीमध्ये ज्या मागण्या मांडलेल्या आहेत त्या मागण्यांबाबत विचार करण्यात येईल. त्यातील ज्या ज्या मागण्या मान्य करणे शक्य आहे त्याबाबतीत निर्णय घेतला जाईल. ही बैठक येत्या 15 दिवसात घेतली जाईल.

------ .....4



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महादेव कोळी समाजाचे दाखले देण्यास होत असलेला विलंब

**मु.शी.**: महादेव कोळी समाजाचे दाखले देण्यास होत असलेला विलंब याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

डॉ.विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महादेव कोळी समाजाचे दाखले देण्यास होत असलेला विलंब याविषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस :येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-----

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-14..........

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या सभागृहाचे माजी सदस्य श्री.अनंत तरे यांनी या प्रश्नाचा बरेच दिवस पाठपुरावा केलेला होता. त्यांनी जी.आर.ची मुदत वाढविण्यात यावी अशी मागणी केली आहे. जेणेकरुन महादेव कोळी समाजावर जो अन्याय होत आहे, तो दूर होईल. माझ्याकडे त्यांच्या 28 नोव्हेंबर, 2007 च्या पत्राची प्रत आहे. दिनांक 15 जून, 1995 च्या जी.आर.ची व्याप्ती 2002 पर्यंत वाढवावी, अशी त्यांनी शासनाला विनंती केलेली आहे. 2000 नंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना नोकरीवरुन कमी करण्यात येत आहे, त्यांची सेवा रद्द करण्यात येत आहे त्याबद्दल शासन सकारात्मक निर्णय घेईल का? जी.आर.ची व्याप्ती वाढविण्यात येईल का?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, खरे तर कायद्याने अशा प्रकारचे संरक्षण देता येत नाही. 15 जून, 1995 पर्यंत संरक्षण दिले आहे. त्याबाबत सुप्रीम कोर्टात चॅलेंज करण्यात आल्यानंतर सुप्रीम कोर्टाने असे करता येणार नाही अशा प्रकारचा निर्णय दिला. त्यामुळे विधी व न्याय विभागाकडे विचारणा केली आहे की, जी.आर.ची व्याप्ती वाढविता येते का? विधी व न्याय विभागाने सकारात्मक अभिप्राय दिले तर निश्चितपणे तसा विचार करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रचलित जी.आर. विचारात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. एखाद्या गोष्टीची व्याप्ती वाढविण्याचा सरकारने निर्णय घेतला तर त्याला न्यायालयाची हरकत असणार नाही. शासनाने आपला अधिकार वापरला तर न्यायालयाचा विषयच येत नाही. प्रचलित जी.आर.ची व्याप्ती वाढविण्याचा अधिकार शासनाचा आहे. तो अधिकार वापरुन मंत्रीमहोदय जी.आर.ची व्याप्ती वाढविणार आहेत काय?

डॉ.विजयकुमार गावित : आदिवासींच्या जागेवर फक्त आदिवासीना नियुक्ती देता येते. बिगर आदिवासींना त्या पदावर नेमले असले तरी कायद्याने नियुक्ती देता येत नाही. ज्यांना सेवेत घेतले होते त्यांना 1995 पर्यंत संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्या निर्णयाच्या विरोधात सुप्रीम कोर्टात दावा दाखल केल्यामुळे सुप्रीम कोर्टाने तसे करता येणार नाही असे सांगितले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-14..........

**उपसभापती** : इतकी वर्षे त्या पदावर त्यांनी काम केल्यानंतर शासनाला दृष्टान्त झाला की, ते संज्ञेत बसत नाहीत. त्यानंतर शासनाने न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला दिला. शासन कोर्ट चालविते की शासन शासनच चालविते? हा मुलभूत प्रश्न आहे. आता त्यांची वयोमर्यादा संपुष्टात आली असावी. अशा परिस्थितीत त्यांनी जायचे कुठे? याबाबत शासनाने देखील स्पष्ट धोरण स्वीकारले पाहिजे. संज्ञेत बसत नसतील तर इतर ठिकाणी त्यांना सामावून घेतले पाहिजे. त्यांचा रोजगार काढून घेऊ नये. अशा प्रकारच्या बऱ्याच केसेस झालेल्या आहेत.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, आपण म्हणता ती गोष्ट खरी आहे. म्हणूनच 15 जून, 1995 च्या जी.आर.नुसार आदिवासींसाठी राखीव असलेल्या जागेवर बिगर आदिवासींना नोकऱ्या देण्यात आल्या होत्या, त्यांना त्या पदावरुन काढून ते ज्या समाजाचे आहेत, ज्या कॅडरमध्ये बसत असतील म्हणजे ओबीसी समाजाचा असेल तर ओबीसी, एससी समाजाचा असेल तर एससी, व्हीजेएनटी समाजाचा असेल तर व्हीजेएनटीसाठी राखीव असलेल्या संवर्गामध्ये सामावून घ्यावे आणि आदिवासींसाठी जागा रिक्त कराव्यात व यापुढे अशा प्रकारे पदे भरण्यात येऊ नयेत असे आदेश त्यावेळी देण्यात आलेले होते.

**उपसभापती** : 1995 साली ज्या बाबी उघडकीस आल्या, त्यानंतर सेवेत आलेले उमेदवार आहेत, जे जॉबलेस होणार आहेत त्यांना ज्याठिकाणी ते बसत असतील त्याठिकाणी सामावून घ्यावे. हे शक्य नसेल तर पदे निर्माण करावीत. परंतु त्यांची नोकरी काढून घेऊ नये.

डॉ.विजयकुमार गावित : हे असे प्रकार घडत होते म्हणून 15 जून, 1995 ला आदेश काढून त्या त्या संवर्गामध्ये त्यांना वर्ग करावे व त्यानंतर अशा प्रकारे भरती करु नये असे सांगितले होते. 1995 नंतर नोकऱ्या दिल्या. सुप्रीम कोर्टाने सांगितले की, आदिवासींच्या जागेवर बिगर आदिवासींना नोकरी देता येणार नाही. त्यामुळे शासनाला यामध्ये बदल करता येणार नाही.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, राज्य मागासवर्गीय आयोगाला या संदर्भात न्यायालयास शिफारस करावी लागते. तशा पध्दतीची शिफारस आयोगाने केली तर नोकरीतून कमी करावे लागणार नाही.

(नंतर श्री.भारवि....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : शासन आयोगाला सूचना करणार काय ? असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, असा कुठलाही आयोग नाही.

**उप सभापती** : मंत्रिमहोदय एक साधा प्रश्न आहे. आता आपण येथे 1995 चा उल्लेख केला आहे. समजा एका उमेदवाराने अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदावर 10 ते 15 वर्ष सेवा केली असेल आणि त्याला 15 वर्षानंतर आपण काढत असाल तर यात त्याचा दोष नाही. मी येथे पीडितांची बाजू घेत आहे. तेव्हा ज्या कर्मचाऱ्यांची नोकरी जात आहे, अशांचा आपण सहानुभूतीपूर्वक विचार केला पाहिजे. ज्यांनी चुकीची ऑर्डर त्या उमेदवारांना दिली आहे, त्याचे परिणाम या उमेदवारांनी का म्हणून भोगायचे ? असा मुद्दा आहे. शासनाने या उमेदवारांना आदेश दिल्यामुळे ते कामावर रूजू झाले आहेत. आता आपण सांगत आहात की, त्या जागा आदिवासी उमेदवारांसाठी होत्या त्या रिक्त करा. यासाठी आपण कोर्टाच्या आदेशाचा आधार घेतला आहे. कोर्टाबद्दल आम्हाला आदर आहे. पण शासन न्यायालय चालविते का ? असा प्रश्न देखील निर्माण होता. तेव्हा मंत्रिमहोदयांनी मेहरबानी करून कारण नसताना असंतोष होईल असे वातावरण निर्माण होऊ देऊ नये. त्यामुळे ही बाब पुन्हा तपासून बघा. सर्वांना एकत्र घेऊन एक बैठक बोलावून आपण यात तोडगा काढावा. हा प्रश्न तातडीचा, निकडीचा आणि तीव्र आहे. येथे उत्तर देऊन हा प्रश्न सुटणार नाही. ज्यांच्या नोकऱ्या जाणार आहेत, त्यांना प्रस्थापित करणे आपले कर्तव्य आहे.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, हा घटनात्मक प्रश्न आहे. तरी देखील आपले म्हणणे तपासून घेतले जाईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, अशा उमेदवारांना शासकीय सेवेत कायम स्वरूपी घेण्यासाठी जी.आर.निर्गमित केला आहे. मंत्रिमहोदयांना त्याची प्रत पाहिजे असल्यास ती मी देण्यास तयार आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..2

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, राज्य मागासवर्गीय आयोग आहे किंवा नाही याचा खुलासा मंत्रिमहोदयांनी करावा.

**उपसभापती** : मी मंत्रिमहोदयांना विनंती करतो की, त्यांनी यासंबंधी आपल्या दालनात बैठक घ्यावी. मी येथे मूळ दुखण्याला वाचा फोडली आहे.

डॉ.विजयकुमार गावित : माननीय सभापती महोदय, मागासवर्गीय आयोगाला शिफारस करता येत नाही. ट्रायबल रिसर्च इन्स्टिटयूटकडून प्रस्ताव येतो आणि मग तो पुढे जातो. यासंबंधी मी माझ्या दालनात सन्माननीय सदस्यांना बोलावून चर्चा करीन व नियमाप्रमाणे, घटनेप्रमाणे निर्णय घेईन.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या प्रश्नावर ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी भूमिका मांडली आहे, त्यांना मंत्रिमहोदयांनी आमंत्रित करावे अशी मी सूचना करीत आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

.................

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दुष्काळी परिस्थितीमुळे निर्माण झालेली चारा टंचाई**

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, जत-कवठेमहांकाळ येथे दुष्काळ असल्यामुळे चारा टंचाई निर्माण झाली आहे. जिल्हाधिकारी श्री.चव्हाण यांनी चाऱ्यासंबंधी बैठक घेऊन वेगवेगळी विधान केली आहेत. चारा डेपो सुरू करणे शक्य होणार नाही, सुका चारा दिला जाईल अशा प्रकारची विधाने करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे. आज दहा लाख जनावरे आहेत. त्यांना चारा देण्यासंबंधी शासनाचे धोरण काय आहे ? हे शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना कळवावे.

यानंतर श्री.पी.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ......

तरच हा जो असंतोष निर्माण झालेला आहे, तो दूर होईल म्हणून यासंदर्भात शासनाने आपले निश्चित धोरण ठरवावे.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पाऊस न पडल्यामुळे अत्यंत गंभीर समस्या निर्माण होते त्यात जास्त समस्या कोणती असेल तर ती म्हणजे जनावरांच्या चाऱ्याची. मागील दुष्काळात आपण जनावरांसाठी छावण्या उघडल्या होत्या. मात्र त्यांचे रिझल्ट आणि रिपोर्ट फारसे समाधानकारक नाहीत. शेतकऱ्यांना मदत करण्यासंबंधीच शासनाचे धोरण असते. पण चारा कोणत्या स्वरुपात व कसा द्यावयाचा यासंबंधी लवकरच सूचना दिल्या जातील.

---------------

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : पुणे येथे दैनिक सामनाच्या कार्यालयावर झालेला हल्ला

**मु. शी**. : पुणे येथे दैनिक सामनाच्या कार्यालयावर झालेला हल्ला यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे,सर्वश्री अरविंद सावंत, अनिल परब, परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे येथील वडगाव धायरी येथे दिनांक १३ जून, २००८ रोजी दैनिक सामनाच्या कार्यालयावर एका राजकीय पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी केलेली दगडफेक व हल्ला, सामना अंकाची छपाई बंद पाडण्यात येणे, कार्यालयाचे दगडफेकीमुळे झालेले प्रचंड नुकसान, अशा प्रकारे राजकीय पक्षाचे गुंड वृत्तपत्राची करीत असलेली गळचेपी व वृत्तपत्र स्वातंत्र्यावर केलेला हल्ला, सदर प्रकरणी पोलिसांकडे तक्रार करुनही पोलीस उशिरा येणे, अशा प्रकारे वृत्तपत्राच्या कार्यालयावर हल्ला करुन वृत्तपत्रस्वातंत्र्याची करण्यात येत असलेली गळचेपी, हल्लेखोरांवर तात्काळ कारवाई करण्याची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

.....3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, दैनिक सामनाच्या वडगाव-धायरी येथील कार्यालयवर हल्ला करण्यात आला, त्यामध्ये 3 लाखाचे नुकसान झाले पण ही लक्षवेधी सूचना केवळ पुणे येथील सामनाच्या कार्यालयावर जसा हल्ला झाला त्यासंदर्भात मी दिली नसून माननीय उपमुख्यमंत्री वृत्तपत्राचे खूप मोठे भोक्ते आहेत, समर्थक आहेत. अशा वेळी वृत्तपत्रांवर जो हल्ला झाला तो केवळ पुण्यातच झाला नाही तर ठाण्यातही रघुनाथ नगर नाक्यावर रविंद्र फाटक या नगरसेवकाने सामनाचा अंक जाळला आणि संजय राऊत यांचा पुतळाही जाळला. त्याचप्रमाणे वाशी व नवी मुंबईतील कार्यालय डिझेल टाकून जाळण्याचे प्रयत्न झाले. जालना येथेही असाच प्रकार घडला. पुण्याच्या हल्ल्यासंबंधी बोलत असताना हल्ला झाल्यावर पोलिसांना बोलाविले, त्यानंतर पोलीस आले व त्यांनी संरक्षण दिले. पण इतर पाच-सहा ठिकाणी जे हल्ले झाले त्याच्या पाठीमागे निश्चितच सुत्रधार आहेत. हे सुत्रधार कोण आहेत यासंबंधी तपास करुन ती कारवाई करणार काय ? तसेच श्री. रविंद्र फाटक हे या हल्ल्याचे सुत्रधार असून त्यांच्या मोबाईलवरुन जे फोन करण्यात आले त्यांची तपासणी करावी. आणि खासदार संजय राऊत यांचा पुतळा जाळणारे जे कार्यकर्ते आहेत त्यांची आणि या सुत्रधारांची सीआयडी मार्फत चौकशी करण्यात येणार काय ? तसेच कलम 120 (ब) नुसार कटकारस्थान करणे यानुसार संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील काय, त्याचबरोबर ज्यांना अटक केलेली आहे ते सचिन सातपुते आणि सचिन घुले हे कोणाच्या तरी बांधकामावर काम करणारे मजूर आहेत ? तसेच आमदार श्री. विनायक निम्हण यांचे हे बांधकाम आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, ही गोष्ट खरी आहे की, वर्तमानपत्रातून विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे यासाठी मी नेहमीच आग्रही राहणार आहे, पण त्यात विचार असले पाहिजे. हा जो हल्लाझाला तो म्हणजे "नव वधू प्रिया ही बावरते" या मथळ्याखाली फोटोसह जो लेख छापून आला होता त्या अनुषंगाने झाला की काय........अडथळा.....मी हल्ल्याचे समर्थन करु शकणार नाही, टीका टिप्पणी ही नेहमी होत असते.......

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

या वर्तमानपत्रात नववधूच्या वेषात फोटो छापण्यात आलेला आहे आणि त्याला मुख्यमंत्र्यांचा संदर्भ दिलेला आहे. यामध्ये मुख्यमंत्री म्हणतात की, नववघु नव्याने घरी आली की, ती नवी असल्यामुळे तिला काहीही माहिती नसते त्यामुळे प्रथम ती चिडते, वैतागते असा उल्लेख केलेला आहे. उद्या आम्ही या आरोपाच्या बाबतीत उघडे करु म्हटले तर ? मग आम्ही काय करायचे ? खरे म्हणजे वर्तमानपत्रांनी अशा प्रकारचे फोटो छापतांना तारतम्य बाळगले पाहिजे अशी माझी वैयक्तिक भावना आहे. अशा प्रकारचा फोटो छापून आल्यानंतर पोलिसांना असे काही प्रकार होतील असा अंदाज आला होता त्यामुळे सामना वर्तमानपत्राची राज्यभरात ज्या ज्या ठिकाणी कार्यालये आहेत त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढवण्याच्या संदर्भात सूचना देण्यात आल्या होत्या. पुण्यातील कार्यालयावर पोलिसांनी अगोदरच बंदोबस्त ठेवला होता. काही वर्तमानपत्रांच्या कार्यालयांची माहिती आम्हाला मिळू शकली नाही तसेच काही वर्तमानपत्रांनी आपल्या कार्यालयाची माहिती पोलिसांनाही दिल्या नव्हत्या. पोलीस जर अशा प्रकारची माहिती गोळा करण्यासाठी वर्तमानपत्राच्या कार्यालयावर गेले तर तुम्ही गुप्त माहिती कशासाठी गोळा करीत आहेत, चौकश्या सुरु झाल्या का ? अशा प्रकारे पोलिसांवर आरोप होत असतो. त्यामुळे अशा प्रकारची माहिती गोळा करणे पोलिसांना अडचणीचे होते. वर्तमानपत्रात अशा प्रकारचा फोटो छापून आल्यानंतर आमच्या वरिष्ठ अधिका-यांनी, तुमची कार्यालये किती आहेत ? कोठे बंदोबस्त ठेवावयास पाहिजे यासाठी आपणहून संपर्क साधला होता. त्यामुळे अन्यत्र हा प्रकार कोठे घडू शकला नाही. सामना या वर्तमानपत्राचे कार्यालय पुण्यापासून 10 कि.मी. अंतरावर आहे. असे असतांनाही आमच्या पोलिसांनी घटना झ ाल्यानंतर 10 मिनिटाच्या आत पोलीस पोहचले होते. तेथे जाऊन 6 आरोपी आणि काही वाहने पोलिसांनी जागेवरच पकडली होती. त्यादिवशी मी पुण्यालाच मुक्कामी होतो. ज्यावेळी वर्तमानत्रावर हल्ला झाल्याची बातमी मला कळाली त्याच वेळेस सकाळ होईपर्यंत सर्व आरोपी ॲरेस्ट झाले पाहिजे अशा सूचना मी सीपींना दिल्या होत्या. सीपीने सकाळी वर्तमानपत्रावर हल्ला केलेल्या आरोपींना पकडण्यात आलेले आहे अशी माहिती मला दिली .पोलिसांनी 8-10 टीम करुन एका रात्रीत आरोपींना पकडलेले आहे. यातील बहुतांश आरोपींना 3 दिवसांची कस्टडी मिळाली होती.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. गो-हे यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे की, श्री. सचिन घुले हा कोणाच्या बांधकामावर काम करतो? त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, मी बाबतीतही पोलिसांना चौकशी करण्यास सांगेन. पोलिसांनी प्रत्यक्ष साईटवर जाऊ गुन्हे करणा-यांनाच पकडलेले आहे. ज्या लोकांना अटक करण्यात आलेली आहे त्यांच्या मागे कोणाचा हात आहे याचा सुध्दा तपास केला जाईल.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिलेले असल्यामुळे आम्ही आभारी आहोत. आम्ही सामनाच्या उपकार्यालयांची माहिती देण्यास तयार आहोत, सहकार्य करण्यास तयार आहोत. या घटनेत 5-6 ठिकाणी हल्ले झालेले असल्यामुळे यासंदर्भात सीआयडी मार्फत सखोल चौकशी केली जाईल काय ? मोबाईलच्या संदर्भात आम्ही आपल्याला विनंती केलेली आहे त्यामुळे त्यासंदर्भात आपण भाष्य करावे अशी विनंती आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, त्यांच्या मोबाईल वरील कॉल, त्यांना कॉल कोणी करावयास सांगितले होते यासंदर्भात पोलिसांनी काय केले हे मी पुढील अधिवेशनातील पहिल्याच दिवशी सांगेन. पोलीस तपास करतील. मी जी नाराजी व्यक्त केली ती व्यक्तिगत होती. गृहमंत्री म्हणून सर्व वर्तमानपत्रांना संरक्षण देणे हे आमचे काम असल्यामुळे ते केले जाईल.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, सामना या दैनिकामधून अत्यंत शिवराळ आणि विकृत भाषा वापरली जाते. महाराष्ट्रात एक प्रकारची भाषिक दुर्गंधी हे दैनिक नेहमी पसरवत असते. जो प्रकार घडलेला आहे त्यासंदर्भात या दैनिकाला न्यायालाने आदेश होते की, यानंतर बदनामी कारक वृत्त देऊ नका असे न्यायालयाने आदेश दिले होते. त्यानंतरही सामना दैनिकाने अशा प्रकारचे बदनामीकारक वृत्त देण्याचे थांबवलेले नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले ..

माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना माझा असा प्रश्न आहे की,महाराष्ट्रात सामंजस्य प्रस्थापित करण्या ऐवजी महाराष्ट्रातील सामाजिक ऐक्याचा भंग करणाऱ्या विकृत सामाना दैनिका विरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या बातमीच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे सरकारने त्याबाबतीत काही करण्यासारखे नाही. त्यांनी व्यक्तिगत बदनामीचा दावा दाखल करावा..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले आहे की सरकारने उत्तर देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही या वर्तमानपत्राने बदनामीकारक मजकूर छापू नयेत असे न्यायालयाचे आदेश आहेत असे निवेदन आता करण्यात आलेले आहे त्यामुळे त्यांनी न्यायालयात जाऊन त्या बाबतीत निर्णय घ्यावा. न्यायालयाने जर सांगितले असेल तर त्याबाबतीत शासनाने उत्तर देण्याचे काही कारण नाही. माननीय उपमुख्यमंत्रानी उत्तर देण्यासाठी उभे राहणे गैर आहे. न्यायालयाने याबाबतीत सांगितलेले असल्यामुळे न्यायालयात जाऊन त्यांनी हा मुद्दा मांडावा व कोणती बदनामी झाली आहे हे ठरवून घ्यावे..........

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

श्री.वसंत पुरके : सभापती महोदय सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना माझी अशी विनंती आहे की, ही केवळ वैयक्तिक बाब नाही. असा मुद्दा कोणाच्याही बाबतीत उपस्थित होऊ शकतो.

डॉ.दीपक सावत : विकृत सामना हे शब्द कामकाजातून काढून टाकण्यात यावेत

**उपसभापती** : माननीय उपमुख्यमंत्र्यांचे म्हणणे मांडून झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडावे

( एकाच वेळी अनेक सन्मानीय सदस्य बोलतात )

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे.

श्री.दिवाकर रावते : त्यांना वकीलपत्र कोणी दिले आहे ?

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्या डॉ नीलम गो-हे यांनी प्रश्न विचारला होता व त्या प्रश्नाला माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना जरुर मांडाव्यात परंतु त्या मांडत असतांना त्यांनी काही बंधने स्वत:वर घालून घेतली पाहिजेत. या ठिकाणी मघाशी सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी विकृत सामना हे शब्द वापरले असल्यामुळे त्या शब्दाला हरकत घेण्यात आली आहे. एखादे दैनिक विसंगत किंवा विपर्यस्त वृत्त छापत असेल तर ......

प्रा.सुरेश नवले : त्या वर्तमानपत्रातील भाषा शिवराळ आहे. ..महाराष्ट्रातील अनेक नेत्यांच्या बाबतीत अशी भाषा वापरली जाते ...

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम शांत बसावे याबाबतीत रुलिंग देत असतांना मला काही कोटेशन्स द्यावयास पाहिजे..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती...**

प्रत्येक वर्तमानपत्राची मुद्दे मांडण्याची एक शैली असते. आज नवाकाळ सारखे दैनिक समाजातील अत्यंत शेवटच्या थरातील गरीबातला गरीब माणूस वाचतो. त्या दैनिकाचे संपादक श्री. निळुभाऊ खाडीलकर हे त्यामध्ये अग्रलेख लिहितात. त्यांच्यासारखे थोर संपादक आपले विचार प्रगल्भतेने मांडतात. त्यांच्या अग्रलेखातील एखादी गोष्ट आपल्याला पटत नाही याचा मला देखील बऱ्याच वेळा अनुभव आलेला आहे. परंतु पत्रकार हे पत्रकारितेचे काम करीत असतात. त्यामधील नेमके आपण अचूक काय उचलावे आणि काय उचलू नये याचे भान शेवटी वाचक आणि समाज ठेवीत असतो. त्यामुळे मला असे वाटते की, या ठिकाणी आपण एक चांगले समंजस आणि अत्यंत लोकप्रिय प्रतिनिधी आहात. युतीच्या शासनामध्ये मंत्री म्हणून देखील आपण अत्यंत चांगली कामगिरी बजावली आहे. या सभागृहामध्ये आपले उच्च विचार ऐकण्याची माझ्यासारख्याला आवड आहे. मी या ठिकाणी एवढेच सांगेन की, या सभागृहात एकमेकांवर टीका करीत असतांना सर्वांनी आपल्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत. याठिक्णी विकृत आणि शिवराळ भाषेबाबत आपण उल्लेख केला. यामध्ये "शिवराळ" हा शब्द असंसदीय नाही. परंतु दै. सामना मधून छापण्यात आलेल्या मजकुरामध्ये विकृत अशाप्रकारच्या शब्दाचा उल्लेख झाला असेल तर तो गाळण्यात यावा. माननीय सदस्यांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपण ज्यांच्याबाबत या ठिक्णी बोलत आहात त्यांच्याबद्दल मला व्यक्तिश: आदर आहे. त्यांनी या राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषविले आहे. आणि त्यावेळी त्यांच्याबरोबर आपणही काम केले आहे. शेवटी लोकशाहीमध्ये मतभेद हे निश्चितपणे होत असतात. आज आपण इथे आहोत उद्या कुठे असू माहीत नाही. परवाच्या दिल्लीच्या राजकारणामध्ये आपण पाहिले आहे. परंतु हे राजकारण राजकारणाच्या ठिकाणी ठेवून राजकारणात हवी असलेली उंची आणि समाजाला अभिप्रेत असलेले आपले बोलणे, वागणे आणि चालणे याचे भान ठेवले पाहिजे. रस्त्यावर भटकत असतांना एखाद्या फिरत असलेल्या व्यक्तिबद्दल जर मी अपशब्द वापरला तर त्यामुळे माझी किंमत कमी होण्यापेक्षा माझ्या पक्षाची किंमत कमी होत असते. याचे भान ठेवून मी समाजात वावरत असतो. माझी सर्वांना नम्र प्रार्थना आहे की, लोकांनी आपल्याला या सर्वोच्च सभागृहात पाठविले आहे. लोकांच्या आपल्याबद्दलच्या भावना निश्चितपणे चांगल्या आहेत. त्यांच्या भावनांची परिपूर्ती करण्यासाठी आपण या सभागृहात येत असतांना राजकारणाचे जोडे बाहेर काढून ठेवीत असतो. आपण या ठिक्णी येतांना समाजाचे, लोकांचे प्रश्न



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

**उपसभापती**...

सोडविण्यासाठी येतो. त्यामुळे येथील कोणत्याही वादाला, कुठल्याही प्रकारची व्यक्तिगत धार असू नये असे माझे या ठिकाणी प्रामाणिक मत आहे. याठिकाणी झालेल्या सर्व वादावर मी पडदा टाकतो. आदरणीय गृहमंत्र्यांना या संदर्भातील उत्तर द्यावयाचे असेल तर ते त्यांनी ध्यावे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, जरी एखाद्या वर्तमानपत्रामध्ये काही खटकणारे छापले गेले असेल तर त्याबाबत प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाकडे तक्रार करता येते. ज्यावेळी हल्ला करणाऱ्या लोकांवर आम्ही कारवाई केली, त्यावेळी चांगल्या कायदा तज्ज्ञांकडून असाही सल्ला घेतला की, अशाप्रकारचा फोटो छापल्यानंतर आपणास त्या दैनिकावर काही कारवाई करता येईल काय? याबाबत दोन वकिलांनी स्पष्टपणे ओपिनियन दिले की, याबाबत आपल्याला केस करता येत असली तरी ज्यांचा फोटो छापला आहे त्यांना डिफेंडची केस करता येईल. सरकार यामध्ये सुमोटो काही करु शकत नाही, पोलिसांना यामध्ये कोणतेही अधिकार नाहीत. यानंतर त्यांनी वकिलाचा सल्ला घेऊन या वर्तमानपत्राच्या विरोधात व्यक्तिगत केसही केली आहे, ती कोर्टामध्ये प्रलंबित आहे. त्यामुळे फार चर्चा होऊ नये असे मला वाटते. दै. सामनावर झालेल्या हल्ल्याच्या पाठीमागे कुणी होते काय? हे देखील तपासून पाहिले जाईल. सभापती महोदय, दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांना माझी आवाहनात्मक सूचना आहे की, राज्यामध्ये छोटया छोटया प्रश्नांवरुन कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण करुन एकमेकांसमोर आव्हान निर्माण करण्याचे काम करु नये. पहिल्यांदा जेव्हा वर्तमानपत्रामध्ये फोटो छापून आला, तेव्हा तो छापून आल्यानंतर आपली बदनामी झ ाली म्हणून ते कोर्टात गेल्यानंतर पुन्हा फोटो छापण्यात आला. आणि तो छापल्याबद्दल दैनिक सामनावर कारवाई करावी म्हणून पुन्हा फोटो छापण्यात आला. सभापती महोदय, या सदनामार्फत आणि काम करुन करुन कंटाळलेल्या पोलिसांमार्फत मी एवढीच विनंती करतो की, आज विधानपरिषदेत या फोटोमुळे पुन्हा चर्चा झाली म्हणून दुसऱ्यांदा तो फोटो छापून येऊ नये. सभापती महोदय, वर्तमानपत्रवाल्यांनी फोटो छापावयाचे, तो छापून आल्यानंतर पुन्हा हल्ले होणार, आणि पुन्हा पोलिसांनी रात्रभर जागे रहावयाचे हा खेळ आता संपला पाहिजे. यामधून काहीच निष्पन्न होणार नाही. म्हणून या प्रकरणावर दोन्ही बाजूंनी पडदा पडावा अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : उद्या कार्याध्यक्षांचा वाढदिवस असल्यामुळे या चर्चेचा आपण इथेच शेवट करु या.

(यानंतर श्री. सुंबरे)

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : मुलुंड-मुंबई येथे डेरा सच्चा चौदाचे प्रमुख बाबा राम-रहीम यांच्या अंगरक्षकांनी केलेला गोळीबार.

**मु. शी.** : मुलुंड-मुंबई येथे डेरा सच्चा चौदाचे प्रमुख बाबा राम-रहीम यांच्या अंगरक्षकांनी केलेला गोळीबार यासंबंधी सर्वश्री चरणसिंग सप्रा, एस.क्यू.जामा, संजय दत्त, गोविंदराव आदिक, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. एस.क्यू. जमा (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुलुंड (मुंबई) येथे दिनांक 20 जून 2008 रोजी शीखांचे गुरू गोविंदसिंगजी यांच्यासारखा वेष परिधान करून त्यांचा अवमान करणारे डेरा सच्चा सौदाचे प्रमुख बाबा राम-रहीम मुलुंडच्या निर्मल लाईफ स्टाईल मॉलमध्ये आपल्या जथ्यासह खरेदीला आले असताना 50 ते 60 शीख पंथीय युवकांशी त्यांच्या समर्थकांची जोरदार चकमक होणे, बाबा राम-रहीम यांच्या सोबत असलेल्या अंगरक्षकांनी केलेल्या गोळीबारात बलराजसिंग युवकाचा मृत्यू होणे व अनेक जखमी होणे., या घटनेमुळे मुलुंड परिसरात जबर तणावाचे वातावरण पसरणे, या बाबत त्यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करून तातडीने अटक करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...... 3आय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मा. उपमुख्यमंत्र्यांचे लक्षवेधी सूचनेवरील निवेदनानंतर ... )

श्री. एस.क्यू.जमा : सभापति महोदय, माननीय उप मुख्यमंत्री महोदय ने जो उत्तर दिया है वह समाधानकारक है. लेकिन मैं सिर्फ एक ही अनुरोध करना चाहता हूं कि ंगुरु गोविंदसिंह जी का डुप्लीकेट बनकर उनका अपमान करने की जो घटना हुई है और उस बारे में जो कार्रवाई प्रशासन और पुलिस ने की है उसकी विस्तृत जानकारी समाचार पत्रों के माध्यम से या दूसरे माध्यमों से दी जानी चाहिए थी. लेकिन यह जानकारी हमें आज मिली है. इस में काफी विलंब हुआ है. यह जानकारी जल्द मिलनी चाहिए थी ताकि समाज में शांति व्यवस्था बनाए रखने में मदद मिल सके.

श्री. आर.आर. पाटील : सजेशन फॉर ॲक्शन.

***

..... 3आय 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अमरावती येथील विमानतळासाठी एमआयडीसीकडून जागा देण्याबाबत होत असलेली कुचराई व दिरंगाई.

**मु. शी.** : अमरावती येथील विमानतळासाठी एमआयडीसीकडून जागा देण्याबाबत होत असलेली कुचराई व दिरंगाई यासंबंधी प्रा.बी.टी.देशमुख व श्री.वसंतराव खोटरे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नांदगाव पेठ (अमरावती) येथील औद्योगिक क्षेत्रामधील जागा महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस उपलब्ध करून देण्याबाबत औद्योगिक विकास महामंडळाने दिनांक 17 मे 2008 रोजीच्या पत्रान्वये तयारी दर्शविणे, इतर कोणत्याही खाजगी औद्योगिक प्रतिष्ठानाला जागा देताना प्रस्तावित विमानतळ विकसित करण्यात कोणतीही बाधा येणार नाही याची काळजी घेण्याविषयी माननीय उद्योगमंत्र्यांनी संचालक मंडळाच्या बैठकीत (ठराव क्र.4517 नुसार) स्पष्ट आदेश दिलेले असताना विमानतळ विकासासाठी अशी जागा हस्तांतर करण्यात औद्योगिक विकास महामंडळाकडून कुचराई होणे, महाराष्ट्राच्या सर्व विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी व काही विकसित जिल्ह्यांच्या मुख्यालयी सुसज्ज विमानतळे यापूर्वीच कार्यरत झालेली असताना किंवा होत असताना सर्वात जास्त अनुशेष असलेल्या विभागीय मुख्यालयी विमानतळ विकसित करण्यास्तव जागा हस्तांतरित करण्याबाबत होत असलेली दिरंगाई, त्यामुळे अनुशेषग्रस्त भागात निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.अशोक चव्हाण (उद्योग मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...... 3आय 4 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सूचनेवरील मा. उद्योगमंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हे जे निवेदन येथे वितरित करण्यात आलेले आहे हे निवेदन म्हणजे प्रादेशिक असमतोलाची चिघळलेली अशी जी जखम आहे ती भरून काढता काढता आमचे जवळ जवळ अर्धे आयुष्य निघून गेले आहे आणि पुन्हा नव्याने हा असमतोल निर्माण होऊ नये यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. सभापती महोदय, विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी सुसज्ज विमानतळ नाही असे एकमेव ठिकाण म्हणजे अमरावती. इतर सर्वच विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी सुसज्ज विमानतळ झालेले आहेत, काही जिल्ह्यांच्या ठिकाणी देखील झालेले आहेत. महत्तम अनुशेष असलेल्या ठिकाणी मात्र विमानतळ अजूनही झालेला नाही. एमआयडीसीचा देखील सर्वात जास्त अनुशेष याच भागात आहे. एक लाख हेक्टरमध्ये किती उद्योग असले पाहिजेत हा मापदंड दांडेकर समितीने ठरविला आणि त्यानुसार पाहिले असता हा अनुशेष 9 पटीने वाढला. दुर्दैवाने एक असत्य माहिती या निवेदनात दिलेली आहे. एमआडीसीने त्यांच्या 17 मे2008 च्या पत्रान्वये विमानतळ विकास कंपनीकडे काही माहिती मागविली असता त्यांनी ती पाठविली नाही असे जे यात म्हटले आहे ते चुकीचे आहे. आता मी त्याबद्दल येथे काही प्रश्न विचारीत नाही. कारण त्यात वेळ जाईल. पण चंद्रपूरला एका कार्यक्रमामध्ये श्री.अरूण साधू यांनी जाहीरपणे या संदर्भात अडवून सांगितले होते की, विदर्भ-मराठवाड्याच्या असमतोलाबाबत तुम्ही जाहीरपणे बोलू लागला आहात पण मंत्रिमंडळामध्ये जेव्हा या संदर्भात निर्णय होतात तेव्हा तुमचे मंत्री काय करतात ? त्यावर मी त्यांना काहीच सांगू शकलो नाही. सभापती महोदय, मला या ठिकाणी माननीय उद्योग मंत्र्यांना जाहीरपणे धन्यवाद दिले पाहिजेत. कारण हा विमानतळ होणार नाही असे अधिकारी सांगत आहेत असे सांगितल्यावर तेथील उद्योजकांनी माझ्याकडे जी कागदपत्रे दिली त्यात माननीय उद्योग मंत्र्यांचा त्यांच्या हस्ताक्षरात लिहिलेला शेरा होता आणि तो नंतर त्या बैठकीच्या मिनिटस्मध्ये देखील आलेला आहे. "Adequate care has to be taken" असा तो शेरा आहे. माननीय मंत्री महोदयांनी असे लिहिल्याबद्दल जरूर त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. आता आमचे एकच म्हणणे आहे की, राज्याचे मंत्री आदेश देतात आणि जानेवारी महिन्यातील हे आदेश आहेत व आपले अधिकारी उलट दिशेने प्रवास सुरू करीत आहेत. तेव्हा मला या ठिकाणी नेमके विचारावयाचे आहे की, या विमानतळास जागा हस्तांतरित केल्याशिवाय दुसऱ्या कोणालाही तेथील जागा हस्तांतरित करू नका असे स्पष्ट आदेश आपण एमआयडीसीला देणार आहात का ?

( यानंतर सौ.रणदिवे....3जे 1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:40

श्री.अशोक चव्हाण ( उद्योग मंत्री ) : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नांदगाव पेठ (अमरावती) येथील औद्योगिक क्षेत्रामधील जागा महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस उपलब्ध करुन देण्याबाबत प्रश्न, उप प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांची विभागीय असमतोलाच्या बाबतीत जी भावना आहे, तशाच प्रकारची भावना आमची देखील आहे, कारण आम्ही दोन्ही मंत्री मराठवाड्यातील असल्यामुळे तुमच्या भागातील विभागीय असमतोल दूर करण्यासाठी मराठवाडा कटीबध्द आहे हे मला सुरुवातीला मुद्दाम सांगितले पाहिजे. त्यामुळे विभागीय असमतोल दूर व्हावा अशी जी सन्माननीय सदस्यांची भावना आहे, त्यासाठी हे विमानतळ होणे गरजेचे आहे. एखाद्या राज्यातील भागामध्ये विमानतळ झाल्यानंतर त्या विमानतळाच्या अनुषंगाने तेथील औद्योगिक विकास, तेथे होणारी गुंतवणूक अशा अनेक गोष्टी होत असतात आणि त्यामधून त्या विभागाला बराच फायदा होणेही अपेक्षित असते. त्यामुळे याठिकाणी देखील विमानतळ झाले पाहिजे अशी शासनाची धारणा आहे आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची सुध्दा आहे. या विमानतळाच्या बाबतीत आपल्या जिल्हयाचे माननीय पालकमंत्री सातत्याने पाठपुरावा करीत आहेत आणि सन्माननीय सदस्यांकडून देखील बराचसा पत्रव्यवहार करुन त्याव्दारे पाठपुरावा केला जात आहे. यामध्ये एक वस्तुस्थिती सांगितली पाहिजे की, या देशाच्या सन्माननीय राष्ट्रपती महोदया देखील त्याच परिसरातील आहेत. त्यामुळे अमरावती येथे विमानतळाचे काम व्हावे अशी त्यांची देखील भूमिका आहे. म्हणून शासनाने हे काम प्राधान्याने घेतलेले आहे. परंतु एकतर त्या परिसरामध्ये या विमानतळाचा प्रस्ताव येण्यापूर्वी काही जागा इतर उद्योगांना देण्यात आलेली आहे. छोटया प्रमाणात दिलेली आहे. आता माझ्याकडे याबाबतीतील नक्की आकडेवारी उपलब्ध नाही. बहुतेक माननीय राज्यमंत्री याबाबत माहिती देऊ शकतील. पण काही प्रमाणात तेथे उद्योजकांना जागा देण्यात आली आहे हा यातील पहिला मुद्दा आहे.

सभापती महोदय, दुसरा विषय असा आहे की, अमरावती एम.आय.डी.सी.मध्ये दोन पॉवर प्रोजेक्ट देण्याकरता इरादा पत्रे देण्यात आलेली आहेत. अशा वेळी तेथे विमानतळ करीत असताना विमानाच्या लॅण्डींग व टेक ऑफच्या बाबतीत एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाकडून तांत्रिक अभिप्राय मिळणे आवश्यक आहे. तसेच आपण राज्यामध्ये नव्याने महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हल्पमेंट कॉर्पोरेशन सुरु केलेले असून माननीय मुख्यमंत्री त्याचे अध्यक्ष आहेत. आपल्या राज्यामध्ये नवीन ..

. . . .3 जे-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण . . ..

विमानतळाचा विकास करण्याची जबाबदारी एम.ए.डी.सी.कडे आहे. त्या कॉर्पोरेशनच्या माध्यमातून हे विमानतळ विकसित व्हावे अशा स्वरुपाचा तत्वत: निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे याठिकाणी विमानाच्या लॅण्डींग आणि टेक ऑफच्या बाबतीत किंवा यासाठी जी जागा ठरविलेली आहे, ती सुटेबल आहे की नाही याबाबतीत त्यांनी तांत्रिक अभिप्राय द्यावा अशा प्रकारे आम्ही त्यांच्याकडे मागणी केलेली आहे. कारण उद्या जर आपण यासाठी जमीन दिली आणि नंतर त्यांनी असे सांगितले की, या जमिनीवर असे काही करणे शक्य होणार नाही. कारण बाजूला इंडस्ट्री येणे अपेक्षित आहे किंवा त्यातून काही प्रश्न निर्माण होऊ नयेत म्हणून एम.ए.डी.सी. कडून अभिप्राय मागविण्यात आलेला आहे, एवढाच यातील मुद्दा आहे.

(यानंतर सदनामध्ये टी.व्ही.चा कॅमेरा आणला जातो आणि अनेक सन्माननीय एकदम बोलतात.)

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याठिकाणी हा जो कोणी चावटपणा केलेला आहे, तो बरोबर नाही. मघाशी सदनामध्ये कॅमेरा होता आणि नंतर तो बाहेर गेला. ज्या अधिकाऱ्यांनी हे काम केले असेल त्यांच्यावर ताबडतोब कारवाई झाली पाहिजे. ही काय हिंमत आहे ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, ते कशी हिंमत करतात ? कॅमेरा कोणाला विचारुन बाहेर नेण्यात आला ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, कॅमेरामधील कॅसेट संपलेली होती. ती कॅसेट भरुन आता तो कॅमेरा सदनामध्ये आणलेला आहे आणि अगोदर कॅमेरा सुरु होता.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी कॅमेरा सुरु नव्हता. तुम्ही काय सांगत आहात? मी खूण केलेली पाहिली आहे आणि मग कॅमेरा बाहेर गेला आहे. तुम्ही काय सांगता ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, बाहेर जाण्यासाठी खूण केलेली आम्ही पाहिलेली आहे.





श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, असे कसे ? हे बरोबर नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण याची दखल घ्यावी. हा चावटपणा सहन करता कामा नये. त्यांची हिंमत कशी होते ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मग तो काढूनच टाका.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, येथे स्वत:चा सोयीस्कर भाग घेण्यासाठी कॅमेरा आणलेला आहे काय ? तुमचे थोबाड दाखविण्यासाठी येथे आणलेला आहे काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता मी त्यालाच बाहेर गाढून विचारतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याला काय अर्थ आहे ? हे सर्व जाणीवपूर्वक होत आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**उपसभापती** : तुम्ही सर्वजण एवढया बारीक गोष्टीमध्ये लक्ष घालू नका.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. सदनामध्ये असलेला कॅमेरा कोणाच्या आदेशानुसार बाहेर नेण्यात आला आणि कोणाच्या आदेशानुसार पूर्ववत आत आणून सुरु करण्यात आला हे आम्हाला कळले पाहिजे.

**उपसभापती** : मी याबाबतीत सांगतो. आता सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी बोलावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जाणीवपूर्वक ऐकून घ्यावे. हा अत्यंत अघोरी स्वरुपाचा अनुशेष वाढविण्याचा प्रयत्न आहे, मी अघोरी असा शब्दप्रयोग करीत आहे, यामध्ये काही अधिकाऱ्यांनी खाजगी लोकांशी संधान बांधलेले आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख ......

ती त्यांना बांधू द्या. ते त्यांचे बारमाही काम आहे. त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. मी माननीय मंत्रिमहोदयांना पॉइन्टेड प्रश्न विचारु इच्छितो. आपण जी छोटी मोठी जमीन दिली असेल त्याबाबतीत माझे काही म्हणणे नाही कारण आपण ती जमीन दिली आहे असे शब्द वापरले. यापुढे जमीन देता कामा नये, ही एक गोष्ट. जी जमीन दिली ती विमानतळाला अडचण येणार नाही या आपल्या आदेशाची काळजी घेऊन दिली असेल तर तिला डिस्टर्बन्स येण्याचे कारण नाही. जर आपल्या आदेशाचा भंग करुन दिली असेल तर त्या अधिकाऱ्यांवर केली पाहिजे आणि ती दुरुस्ती केली पाहिजे. आपण जी जमीन दिली ती दिली. यानंतर विमानतळाला त्यांनी नाही म्हटले तर मग आमचे काही म्हणणे नाही. यांना जमीन हस्तांतरण केल्या शिवाय दुसऱ्या कोणालाही यानंतर हस्तांतरण होता कामा नये. हे जे पैसेवाले लोक त्या ठिकाणी फिरतात ते विदर्भाचा अनुशेष वाढवण्याचे पाप करतील. शासनातील कोणी ते करु नये अशी आमची विनंती आहे आणि म्हणून हा आदेश पाहिजे. स्वाभविकपणे मग जागा दिली असेल तर आपल्या आदेशाचा भंग करुन का दिली ही पुढची गोष्ट आहे. तो प्रश्न मी विचारत नाही. कारण तो आपला प्रश्न आहे. यानंतर कोणतीही जागा यांना हस्तांतरित केल्याशिवाय त्यांना हस्तांतरित केली जाणार नाही असे स्पष्ट आदेश आज दिले जातील काय आणि दिले जाणार नसतील तर अडचण काय आहे ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी जसा पॉइन्टेड प्रश्न विचारला तसेच माझे या प्रश्नाबाबत पॉइन्टेड उत्तर असे आहे की, विमानतळाला पहिला अग्रक्रम राहणार आहे. जी जमीन अगोदर देण्यात आलेली आहे ती विमानतळाचा प्रस्ताव येण्याच्या अगोदर झालेल्या निर्णयातील आहे. एमएडीसीचा निर्णय अपेक्षित आहे. एमएडीसीकडून माहिती यावयाची आहे. हे करणे शक्य आहे की नाही याबाबत आपण महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडून तांत्रिक माहिती मागविलेली आहे. कारण एखादे विमानतळ करीत असताना विमानाच्या दृष्टीकोनातून आसपास धोकादायक गोष्टी येऊ नयेत. किंबहुना कोणत्याही नवीन विमानतळाच्या बाबतीत निर्णय घेत असताना एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया तसेच डीजीसीए यांच्यामार्फत सगळे तांत्रिक सल्ले घेतले जातात. आपली विमानतळ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण ......

करण्याची भूमिका असल्यामुळे आपण यामध्ये पुढे जात आहोत. विमानतळाला कोणतीही तांत्रिक बाधा येणार नाही ही दक्षता प्रथम घेतली जाईल. त्याशिवाय विमानतळाला बाधा येईल अशी कोणतीही गोष्ट अलॉटमेंटच्या बाबतीत शासनाकडून होणार नाही, ही दक्षता घेतली जाईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे तो प्रश्न मी पुन्हा विचारत नाही. दुसरा प्रश्न असा की, आता आपण जी माहिती म्हणत आहात ती माहिती 17 मे च्या पत्रान्वये मागितली. ती माहिती त्यांनी आपल्याला 23 मे च्या पत्रान्वये कळवली. हे अधिकाऱ्यांनी का म्हणून दिले नाही ? त्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार ? विमानतळ महामंडळाने दिलेल्या 23 मे च्या पत्रामध्ये स्पष्टपणे असे म्हटले आहे की, तुम्हाला 4 मे ला माहिती दिलेली आहे. शेवटी त्यांनी असे म्हटले आहे की, "As desired by you I am sending this information with a request to kindly collect the drawings from the above mentioned officers in your office." त्यांनी 4 मे रोजीच माहिती दिली. ही दुष्टबुध्दीने केलेली कारस्थाने आहेत. यामध्ये आपण कोणी सहभागी होऊ नये अशी अत्यंत नम्र विनंती आहे. माझे पॉइन्टेट म्हणणे असे आहे की, जानेवारी महिन्यामध्ये आपण आदेश दिला आणि आदेश दिल्यानंतर 17 तारखेला माहिती विचारली आणि 23 तारखेला माहिती कळवली. सर्व तुमच्या ऑफिसमध्ये आहे असे यामध्ये लिहिले आहे. यामध्ये जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर ॲक्शन घ्यावी. म्हणजे सभागृहात सुध्दा जादूटोणा चालतो काय ? सभापती महोदय, माझे पॉइन्टेड म्हणणे आहे. आपण पहिले जे आश्वासन दिले ते अतिशय स्पष्ट शब्दात दिलेले आहे. आपल्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, 17 मे च्या पत्रान्वये एमआयडीसीकडून विनंती करण्यात आलेली आहे. सदर माहिती प्राप्त झाली नाही. माझ्याजवळ या माहितीची प्रत आहे ती 23 मे ची आहे आणि त्यामध्ये असे म्हटले आहे की, 4 मे ला आपल्याला सर्व दिलेले आहे. ज्या अधिकाऱ्यांनी ही माहिती दिलेली नाही त्यांच्यावर आपण ॲक्शन घेणार काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख साहेबांनी 23 मे च्या पत्राचा उल्लेख केलेला आहे ते पत्र प्राप्त नाही असे परत एकदा मला

...3...

RDB/

श्री. राणा जगजितसिंह पाटील ....

सांगण्यात आले आहे. आपण सांगितले की, 17 मे च्या एमआयडीसीच्या पत्राच्या अनुषंगाने 23 मे ला उत्तर दिले गेले आहे. हे पत्र दिले गेलेले नाही असे एमआयडीसीने मला कळविलेले आहे. आपण दिलेले पत्र आणि आपण जे सांगितले ते सर्व खरे मानून चौकशी करु आणि जे संबंधित अधिकारी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.

यानंतर श्री. खंदारे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सन्माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर म्हणजे हिंमतीने केलेले काम आहे. दिनांक 23 मे, 2008 रोजीचे पत्र मिळाले नाही असे त्यांना म्हणावयाचे असेल तर त्या पत्रात काय नमूद केले आहे ते सांगतो. त्या पत्रात असे नमूद केले आहे की, "दिनांक 4.4.2008 रोजीच्या पत्रान्वये ही माहिती दिली असून ती आपल्या कार्यालयात आहे." त्यातील शेवटचे वाक्य असे आहे की, "त्यांच्या जवळील ड्राईंग्ज पाहून घ्यावीत." आपण यासंदर्भात कारवाई करतो असे म्हटलेले आहे. पण अधिका-यांचा जो दुष्टपणा आहे, त्याच्या कमाल मर्यादा किती आहेत ते मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. एम.आय.डी.सी.ने ठराव क्रमांक 4576 मंजूर केलेला आहे. त्या ठरावात असे म्हटले आहे की, "ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारीतील अमरावती येथील सध्याचे विमानतळ महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्रमांक... अन्वये दिनांक 9.4.2008 च्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांना विनाशुल्क हस्तांतरित करण्यात यावे व तसे करण्यास या ठरावाद्वारे मंजुरी प्रदान करण्यात येत आहे." माझे असे म्हणणे आहे की, मुडदे उकरुन काढण्यापेक्षा प्रथम नवीन जागेचा ठराव करणे आवश्यक आहे. या आधारावर जागा देण्यासाठी आपण तयार आहोत असा ठराव अजूनही केलेला नाही. शासनाने आदेश देऊन सुध्दा एम.आय.डी.सी.ने मुडदा तयार केला आहे. निकामी झालेले विमानतळ आहे एम.ए.डी.सी.कडे हस्तांतरित करण्याचा ठराव केला आहे. धोरण म्हणून आमच्याकडे विमानतळ तयार करताना तुमच्याकडे सोपविले. आता विमान महामंडळ निर्माण झाले आहे. माझे म्हणणे आहे की, बेलो-याविषयी एम.आय.डी.सी.ने ठराव केला आहे तशाप्रकारचा नवीन जागेसंबंधी ठराव करुन विमान महामंडळाकडे पाठविला जाईल काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, बेलोरा आणि सध्याचा प्रस्ताव या दोन्ही भिन्न गोष्टी आहेत. त्यांचा एकमेकाशी काही संबंध नाही. बेलो-याच्या विमानतळाची मालकी एअरपोर्ट ॲथोरिटीची आहे. तसेच एअरपोर्ट ॲथोरिटी आणि सा.बां.विभाग यांच्यामधील तो विषय आहे. ही जागा हस्तांतरित करण्याची त्यांनी मागणी केली होती म्हणून तो निर्णय झालेला आहे. विमानतळ होण्याला प्राधान्य दिलेले आहे. प्रोजेक्टपेक्षाही विमानतळ प्रथम व्हावे अशी शासनाची भूमिका आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण.....

परंतु त्यासाठी काही तांत्रिक माहिती लागणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्या म्हणण्यानुसार एम.आय.डी.सी.ने एम.ए.डी.सी.कडे पत्र पाठविले असेल तर ती चांगली गोष्ट आहे. त्याठिकाणी विमानतळ करणे तांत्रिकदृष्टया सोयीचे आहे अशाप्रकारे त्या पत्रात स्पष्टपणे म्हटले असेल तर त्या पत्राच्या आधारे जमीन हस्तांतरित करण्याचा निर्णय तातडीने घेतला जाईल. पण तसे पत्र दिले असेल तर निर्णय घेतला जाईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : मी अमरावती जिल्हयातील विमानतळाबाबत प्रश्न विचारत नाही. परंतु सभागृहात माननीय उद्योग मंत्री उपस्थित असल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील विमानतळाच्या संदर्भात मी प्रश्न विचारतो. सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झालेला आहे. मालवण व वेंगुर्ला या तालुक्यांच्या सीमेवर चिपी हे गाव आहे. त्याठिकाणी एअरपोर्ट निर्माण करण्याचे ठरले होते. एम.आय.डी.सी.ने त्यासाठी फंड उपलब्ध करुन दिल्यानंतर जमीन संपादित करण्याचे काम सुरु झाले होते. त्या एअरपोर्टच्या कामामध्ये एका इंचाने सुध्दा प्रगती झालेली नाही. मंत्रिमहोदय त्या एअरपोर्टबाबतची सद्य:स्थिती सांगतील काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील चिपी येथील विमानतळाचा विषय वेगळा आहे. आजची लक्षवेधी अमरावती जिल्हयातील विमानतळापुरती मर्यादित आहे. चिपी येथील विमानतळासंबंधी माननीय सदस्यांनी वेगळी लक्षवेधी सूचना उपस्थित करावी. मी त्यांना माहिती देण्यास तयार आहे.

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

**पृ. शी.** : मुंबईमध्ये मोठया प्रमाणावर इलेक्ट्रॅानिक उपकरणे निकृष्ट होणे.

**मु. शी.** : मुंबईमध्ये मोठया प्रमाणावर इलेक्ट्रॅानिक उपकरणे निकृष्ट होण्या-संबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबईत दरवर्षी 23,000 टन इलेक्ट्रॅानिक उपकरणे निकृष्ट होत असणे, यापैकी केवळ 40 टक्के इलेक्ट्रॅानिक वस्तू पुन:प्रक्रियेकरिता निर्यात केल्या जाणे, मुंबईत येणा-या स्वस्त चिनी उत्पादनांमुळे लहान मुलांची खेळणी, संगणक, मोबाईल, आदि दैनंदिन वापरातील वस्तू बाजारपेठेत येत असून त्याचे दरही सामान्यांना परवडणारे असल्यामुळे या वस्तू खराब झाल्यावर या सर्व इलेक्ट्रॅानिक्स कचऱ्याची विल्हेवाट कशी लावावी याबाबतची माहिती महापालिकेकडे नसणे, कुर्ला, साकीनाका, कामाठीपुरा, ग्रॅन्ट रोड, जोगेश्वरी, मालाड या भागात या इलेक्ट्रॅानिक कचऱ्यावर अनधिकृतपणे प्रक्रिया होत असणे, यामुळे या विभागात वायू प्रदूषण होऊन नागरिकांच्या आरोग्यास निर्माण होणारा धोका, त्यामुळे या विभागातील नागरिकांच्या मनात निर्माण झालेला असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रविशेठ पाटील ( पर्यावरण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये 23,000 टन इलेक्ट्रॉनिक उपकरणे निकृष्ट होत असतात. त्यापैकी केवळ 40 टन रिसायकलिंग करुन पुन्हा उपयोगात आणता येतात. मुंबई शहरामध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे.आय.आर.जी.सिस्टिम प्रा.लि.यांना यासंदर्भातील सर्वेक्षण करण्यास सांगितले होते. त्यांचे म्हणणे आणि निवेदनातील उत्तर यामध्ये विसंगती आहे ती तपासून घेण्यात यावी. या निवेदनात असे म्हटले आहे की, "सदर संस्थेने याबाबत सर्वेक्षण करुन मार्च, 2007 मध्ये अहवाल सादर केलेला असून त्यामध्ये मुंबई शहरामध्ये टी.व्ही., रेफ्रिजरेटर,मोबाईल व संगणक या उपकरणांमुळे अंदाजे 23,000 मे.टन इतका इलेक्ट्रॉनिक कचरा निर्माण होत असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. या कच-यामधून लेड, कॅडमियम, मर्क्युरी, इ.रासायनिक द्रव्ये असल्यामुळे या कच-याच्या विल्हेवाटीसाठी वापरल्या जाणा-या विहित प्रक्रियांमुळे प्रदूषणाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो." शासनाने दिलेल्या थातरमातूर उत्तरावरुन शासन मुंबईकरांच्या जीवनाशी कसे खेळ करीत आहे ते दिसून येते.

नंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 14:55

श्री. मधुकर चव्हाण......

निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "एकत्रिकरण व विल्हेवाटीची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाकडे जाते. बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार मिश्र कच-याबरोबर जो ई-कचरा क्षेपणभूमीवर येतो, तो अल्पशा प्रमाणात असून त्याचे परिगणन अद्याप करण्यात आलेले नाही. तद्वत या मिश्र कच-याच्या एकत्रिकरण व विल्हेवाटीची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याकडे जाते."माझा प्रश्न असा आहे की, 23 हजार टन इलेक्ट्रॉनिक्स कच-याची विल्हेवाट आपण केन्द्रीय आदेशाप्रमाणे कशाप्रकारे लावणार आहात ? तसेच या ई-कच-या पासून जी भयानक अशी रसायने निर्माण होतात त्यापासून मुंबईकरांना आपण कसे वाचविणार आहात ?

श्री. रविशेठ पाटील : महाराष्ट्रामध्ये जवळ जवळ 23 हजार मेट्रिक टन इलेक्ट्रॉनिक्स कचरा तयार होतो. या कच-यामध्ये लेड, कॅडमियम, मर्क्युरी इत्यादी वस्तु विकल्या जातात. मुंबईमध्ये जो इलेक्ट्रॉनिक्स कचरा निर्माण होतो त्याची कुर्ला आणि साकीनाका येथे विल्हेवाट लावली जाते. या व्यवसायात गुंतलेल्या लोकांच्या आरोग्यावर परिणाम होतो. या कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने कशी विल्हेवाट लावता येईल याबाबतीत आपण निश्चितपणे विचार करीत आहोत. ही इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे घेताना परदेशामध्ये त्यावर किंमत आकारली जाते. आपल्याकडे तशी पध्दत नाही. या विषयावर अभ्यास चालू आहे. या इलेक्ट्रॉनिक्स कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने कशी विल्हेवाट लावता येईल याबाबत विचार सुरु आहे.

श्री. मधुकर चव्हाण : या इलेक्ट्रॉनिक्स कच-यामुळे घातक असे प्रदूषण निर्माण होऊ शकते. जोपर्यन्त शास्त्रोक्त पध्दतीने या कच-याची विल्हेवाट लावणारी यंत्रणा तयार होत नाही तोपर्यन्त या कच-याची विल्हेवाट मुंबईच्या बाहेर लावण्यात येईल काय ?

श्री. रविशेठ पाटील : आपल्याकडे सोय नसल्यामुळे यापैकी काही कचरा दिल्लीकडे पाठविण्याचा विचार चालू आहे. भौतिक कचरा दिल्लीला पाठविण्यात येतो. याबाबतीत जरुर विचार केला जाईल.

डॉ. दीपक सावंत : इलेक्ट्रॉनिक्स कच-याच्या विनियमनासंबंधी मी काल अशासकीय विधेयक सभागृहामध्ये मांडलेले आहे. ते विधेयक शासन संमत करील काय ? तसेच या इलेक्ट्रॉनिक्स कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी किती संयत्रे खरेदी करावी लागणार आहेत ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील : याबाबत जरुर विचार केला जाईल. शासनाने हा विषय गांभीर्याने घेतलेला आहे. या कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी मोठा खर्च येणार आहे. तेव्हा याबाबतीत सबसिडी द्यावी की अन्य कोणती उपययोजना करावी यासंबंधी विचार सुरु आहे.

श्री. मधुकर चव्हाण : चिनी बनावटीची उपकरणे आणि खेळणी भारतामध्ये आणि विशेषत: आपल्या राज्यामध्ये मोठ्याप्रमाणावर येतात. महाराष्ट्राची 1/10 लोकसंख्या मुंबई शहरामध्ये रहाते. या इलेक्ट्रॉनिक्स कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावेपर्यन्त मुंबईबाहेर या कच-याची विल्हेवाट लावण्यात येईल काय ?

श्री. रविशेठ पाटील : या कच-याची मुंबईबाहेर विल्हेवाट लावता येईल का याबाबत योग्य तपासणी केली जाईल.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 14:55

**पृ. शी.** : नवी मुंबईमध्ये प्रकल्पग्रस्तांना शाळा, महाविद्यालयासाठी भूखंड न मिळणे

**मु. शी.** : नवी मुंबईमध्ये प्रकल्पग्रस्तांना शाळा, महाविद्यालयासाठी भूखंड न मिळणे यासंबंधी श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा. फौजीया खान व श्रीमती उषा दराडे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. एम.एम.शेख : सभापती महोदय, या विषयावर मी देखील लक्षवेधी सूचना दिली होती आणि माझे नाव या लक्षवेधीच्या सूचनेमध्ये आलेले नाही. तेव्हा मला ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्याची परवानगी द्यावी अशी मी आपणास विनंती करतो.

**उपसभापती** : ठीक आहे.

श्री. एम.एम.शेख (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" नवी मुंबईमध्ये ज्या प्रकल्पग्रस्तांच्या शैक्षणिक संस्था असून त्यांना महाविद्यालयासाठी भूखंड देण्यात यावेत याबाबत जून, 2008 मध्ये उरणमधील एका कार्यक्रमात माननीय मुख्यमंत्री यांनी जाहीर करणे, प्रत्येक प्रकल्पग्रस्तांच्या शिक्षण संस्थेला एकच भूखंड देण्यात येणार असल्याचे व शाळेला भूखंड दिला असला तर महाविद्यालयास देण्यात येणार नसल्याचे घोषित करणे, तथापि, प्रकल्पग्रस्त म्हणून संबंध नसणा-या लोकांच्या संस्थेला सात ते आठ भूखंड देण्यात येणे, मात्र ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित केल्या त्यांना एकच भूखंड देण्यात येणे, जे प्रकल्पग्रस्त शाळा, कॉलेज चालवू शकतात, त्यांना शाळा, कॉलेजसाठी भूमखंड मिळणेबाबत मागणी करुनही भूखंड न मिळणे, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये निर्माण झालेले नाराजीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5..

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एम.एम.शेख : सभापती महोदय, नवी मुंबईतील शैक्षणिक संस्थासाठी राखून ठेवण्यात आलेले भूखंड सिडकोने कोणतेही शैक्षणिक उपक्रम नसलेल्या संस्थेला दिलेले आहेत. हे भूखंड देऊन 10-10 वर्षे होऊन देखील त्या संस्थांनी शैक्षणिक उपक्रम सुरु करण्यासाठी कोणतेही बांधकम केलेले नाही.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ SBT/ MMP/ MMP/ पूर्वी श्री.शिगम 15:00

श्री.एम.एम.शेख....

दुसरा प्रश्न ज्या जुन्या संस्था आहेत आणि ज्यांना परवानगी मिळाली आहे परंतु ज्या भाडयाच्या जागेमध्ये संस्था चालतात त्यांच्यासाठी शासनाने भूखंड देण्याबाबत धोरण निश्चित करावे. परंतु शासनाने जुन्या भूखंड न देता नवीन जाहिरात दिली आणि नव्याने अर्ज मागविले. ज्या संस्थांना परवानगी आहे त्या भाडयाच्या इमारतीमध्ये चालतात. नवीन परवानगी न देता अर्ज मागविले. मागील अधिवेशनात मंत्रीमहोदयांनी आश्वासन दिले होते की, जुन्या संस्थांचे अर्ज निकाली काढल्याशिवाय नवीन अर्ज मागविणार नाही. ज्या जुन्या संस्थांचे अर्ज प्रलंबित आहेत त्यांच्यासाठी शासन काही नव्याने धोरण आखणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सिडकोच्या भूखंडाचे वाटप विशेषत: सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना भूखंड वाटप करताना सध्याच्या धोरणात दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. एक गोष्ट निश्चित आहे की अनेक संस्था भाडयाच्या रुपाने मोठा खर्च करुन संस्था चालविल्या जात आहेत. काही संस्थांनी 2-2 किंवा 4-4 प्लॉट घेऊन ठेवले आहेत. या धोरणात बदल करण्याची आवश्यकता आहे. लॉटरी टाकून भूखंड वितरीत करताना सध्या जी पध्दत आहे त्यात बदल करुन मेरीट कम् नीड अशा बेसीसवर भूखंड देण्याबाबतचे नवीन धोरण आणता येईल काय यादृष्टीने निश्चित प्रकारे विचार करणे आवश्यक आहे. गरजू लोकांना प्लॉट मिळावेत आणि ते मेरीटवर मिळावेत यादृष्टीने सध्याच्या धोरणात बदल करण्याच्या बाबतीत शासन सिडकोला सूचना देईल.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, ज्या लोकांचा प्रकल्पग्रस्त म्हणून संबंध आहे त्या संस्थेला अनेक भूखंड दिल्याचे आढळून आले आहे. ज्याची सूची शासन जाहीर करील काय ? त्याचप्रमाणे ज्या संस्थांनी गैरव्यवहार करुन भूखंड घेतलेले आहेत त्या संस्थांकडून हे भूखंड परत घेण्यात आलेले आहेत काय आणि नसल्यास ते केव्हा घेण्यात येतील ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्त म्हणून काही बोगस नांवे घालून संस्था रजिस्टर करुन भूखंड घेतले आहेत त्यांची तातडीने चौकशी करण्यात येईल आणि चौकशी करुन त्या संस्थांची यादी पटलावर ठेवण्यात येईल. त्याचप्रमाणे ज्या अधिकाऱ्यांनी हे केले आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ SBT/ MMP/ MMP/ पूर्वी श्री.शिगम 15:00

लक्षवेधी सूचना पुढे सुरु....

श्री.एम.एम. शेख : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी माझ्या प्रश्नाला उत्तर दिलेले नाही. जुन्या संस्था आहेत आणि ज्यांना परवानगी आहे त्या भाडयाच्या इमारतीमध्ये काम करीत आहेत. त्यांच्यासाठी नवीन धोरण आखले जाईल काय ? तसेच चार दिवसापूर्वी नव्याने जी जाहिरात दिली आहे ती रद्द करण्यात येईल काय ? जुन्या संस्थांचे अर्ज जोपर्यंत निकाली काढण्यात येत नाहीत तोपर्यंत जाहिरात रद्द करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले आहे की गरज आणि मेरीट यादृष्टीकोनातून भूखंड वाटपाचे नवीन धोरण निश्चित केले जाईल. जुन्या संस्थांनी अनेक वर्षापासून अर्ज केले आहेत तसेच धोरण येण्याच्या अगोदरचे ज्यांचे अर्ज आहेत त्यांच्या बाबतीत खास बाब म्हणून भूखंड वाटप करावे अशी जी सूचना माननीय सदस्यांनी केलेली आहे त्याबाबतीत निश्चित विचार करु.

**उपसभापती** : मागील अधिवेशनामध्ये मी सिडकोबाबत काही गोष्टी सांगितल्या होत्या. अधिकाऱ्यांचे सिंडीकेट झालेले आहे. अनेक वर्षे एकाच ठिकाणी असलेल्या अधिकाऱ्यांवर ॲक्शन घेणार किंवा नाही ? त्यांच्या बदल्या तरी करा. जेवढा भ्रष्टाचार झाला आहे तेवढा पुरे.

श्री. राजेश टोपे : माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी विचारल्याप्रमाणे काही प्रमाणात बोगस संस्था आहेत त्यांची निश्चित चौकशी करु. अनेक वर्षे अधिकारी त्याठिकाणी आहेत .....

**उपसभापती** : आमची टर्म संपून जाईल....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, वर्षानुवर्षे जे लोक एकाच ठिकाणी आहेत त्यांच्या बदल्या करण्याच्या दृष्टीने सूचना देऊ.

-----

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 15:05

लक्षवेधी सूचना क्र.2.........

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण जे काही केले त्याबद्दल आम्हाला आनंद वाटतो.

**उपसभापती** : मी काहीच केले नाही.

श्री.दिवाकर रावते : असे नाही. परंतु लक्षवेधी सूचना देणाऱ्या सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा.फौजिया खान व श्रीमती उषा दराडे सभागृहात उपस्थित नाहीत. तरी देखील या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा चालू आहे. ज्या सन्माननीय सदस्यांचे लक्षवेधी सूचना देणाऱ्या सदस्यांमध्ये नाव असेल आणि ते सभागृहात उपस्थित नसतील तर ती लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊ नये. सचिवांच्या लक्षात आले नाही.

श्री.एम.एम.शेख : सभापती महोदय, मी अर्ज दिलेला आहे. लक्षवेधी सूचनेवर मी सही केलेली होती, परंतु माझे नाव छापून आलेले नाही.

श्री.दिवाकर रावते : या सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी बोलू नये असे मी कधी म्हटलेले नाही.

**उपसभापती** : ठीक आहे. मी आता पुढील लक्षवेधी सूचना पुकारीत आहे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती मिळणे

**मु. शी.** : राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती मिळणे यासंबंधी सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, संजय केळकर,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकासमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"धनगर समाजाचा अनुसूचित जमाती (एस.टी) मध्येच समावेश करण्यासंदर्भात विधानपरिषदेमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने संचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन, व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी झारखंड, ओरिसा, आंध्र प्रदेश, बिहार या राज्यांना भेटी देऊन महाराष्ट्रातील धनगर हे इतर राज्यातील धनगरांपेक्षा भिन्न आहेत, त्या राज्यात धनगर नव्हे धांगड जात एस.टी. मध्ये असल्याचे नमूद करुन अहवाल सादर करणे, तसे उत्तरही आदिवासी विकास मंत्र्यांनी देणे, केंद्र शासनाच्या राजपत्रात ओरिसा, झारखंड या राज्यातील धनगरांचा (ओरॉन) समावेश एस.टी. मध्ये केल्याचे प्रसिध्द होऊनही संचालकांनी धनगर नव्हे तर धांगड ही जात त्या राज्यामध्ये एस.टी.मध्ये असल्याचे अहवाल देण्याने स्पष्ट होणे, सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल धनगर समाजाच्या मनात शासनाविषयी पसरलेला प्रचंड असंतोष यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

डॉ.विजयकुमार गावित (आदिवासी विकासमंत्री): सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये 'ध' चा 'मा' झाल्याचे आपण सर्वांनी ऐकले आहे. त्यातून काय उद्‌भवले हेही आपण वाचले आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील पेशवाईमध्ये हा प्रकार घडल्याचे सर्वश्रूत आहे. असाच एक प्रकार धनगर समाजाला उद्‌ध्वस्त करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने केलेला आहे. कालेलकर समितीने 1956 मध्ये या समाजाचा सर्व्हे केला आणि केंद्र शासनाला अहवाल सादर केला. त्या अहवालामध्ये धनगर समाज हा आर्थिकदृष्टया, सामाजिकदृष्टया व शैक्षणिकदृष्टया मोस्ट बॅकवर्ड असल्याची शिफारस केंद्र सरकारला केली. त्या अहवालाच्या आधारे केंद्र शासनाने महाराष्ट्राची एस.टी.ची यादी जाहीर केली. त्या यादीमध्ये 36 एस.टी.समाजाचा उल्लेख केलेला आहे. ती यादी प्रसिध्द झाली तेव्हा त्यात ओरॉन नंतर स्वल्पविराम टाकून धनगड या शब्दाचा अंतर्भाव केला. मागील वेळी मी सभागृहात हा प्रश्न उपस्थित केला होता. महाराष्ट्रात धनगड ही जमात कुठून आली? धनगड नसून धनगर असा उल्लेख होणे आवश्यक आहे. हिंदीमध्ये शब्दाच्या शेवटी र असेल तर ड असा लिहायची पध्दत आहे. विधानभवनामध्ये सुवर्ण महोत्सवाच्या उद्‌घाटनासंबंधीची जी पाटी लावलेली आहे त्यावर सुध्दा श्री.बलराम जाखड असा उल्लेख आहे. हिंदीमध्ये 'जाखर' ऐवजी 'जाखड' असा उल्लेख केला जातो. जया भादुरी हे नाव आपण ऐकले आहे. 'जया भादुरी' ऐवजी 'जया भादुड़ी' असा उल्लेख केला जातो. अशाच प्रकारे 'धनगर' ऐवजी 'धनगड' असा उल्लेख झ ााल्यामुळे महाराष्ट्रातील एक जमात 50 वर्षापासून, तीन पिढ्यांपासून उद्‌ध्वस्त झालेली आहे. प्रत्येक अधिवेशनात मी हा प्रश्न धसास लावण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, या संदर्भात माननीय सभापतींच्या दालनात एक बैठक झाली. हाच प्रश्न इतर राज्यामध्ये निर्माण झाला त्यावेळी त्या त्या राज्यांनी धनगर समाजाला एस.टी.चा दर्जा दिला. बिहार, ओरिसा व झारखंड राज्यांनी जी.आर.काढून सुधारणा केली आणि केंद्र शासनाने ती सुधारणा स्वीकारली. धनगड म्हणजे धनगर समाज आहे. ओरॉनसंबंधी जी.आर.काढला त्या संदर्भात महाराष्ट्र शासनाला कळविले होते. परंतु ओरिसा, बिहार राज्यात धनगड समाज आहे अशी चुकीची माहिती शासनाकडून दिली जाते. माझी शासनाला विनंती आहे की, बिहार, ओरिसा व झारखंड राज्यांनी ज्या चुकीची दुरुस्ती केली, त्या आधारे धनगड म्हणजे धनगर समाज आहे अशी दुरुस्ती करणारी आणि या समाजाला एस.टी.च्या सवलती देण्याबाबत केंद्र शासनाकडे शिफारस केली जाईल काय?

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, माननीय सभापतींच्या दालनामध्ये 12 जुलै, 2005 रोजी एक बैठक झाली होती. त्या बैठकीस सन्माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, प्रकाश शेंडगे हे देखील उपस्थित होते.

(नंतर श्री.भारवि.........

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ KGS/ भोगले... 15:10

डॉ.विजयकुमार गावित...

त्यावेळी असे ठरले की, बिहार, ओरिसा, झारखंड या राज्यात सर्वेक्षणासाठी कमिटी पाठवायची. ओराम आणि धांगड व धनगर आहे असे ते म्हणतात. याबाबत सर्व्हे करून अहवाल सादर करण्यास सांगितले होते. त्यानुसार अहवाल सादर करण्यात आला आहे. या अहवालात नमूद करण्यात आले आहे की, ओराम ही धांगड ची सबकास्ट आहे. त्यांच्या चालीरिती आणि येथल्या चालीरिती या भिन्न आहेत. त्यांची प्राथमिक अवस्था, जीवनमान, संस्कृती भिन्न आहे. त्यामुळे धनगर आणि धांगडमध्ये फरक आहे. येथे धांगड हे मजुरी करतात. शेती करतात. अशा पद्धतीचा अहवाल सादर केला आहे. त्यामुळे धनगर या समाजाचा आदिवासीमध्ये समावेश करता येणार नाही. सन 2002 मध्ये पार्लमेंटमध्ये बिल पास झालेले आहे. त्यावेळी धांगड हे धनगरच आहेत असे नमूद करण्यात आले आहे. यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.प्रदीप रावत यांनी उपस्थित केला होता. तेव्हा संबंधित मंत्र्यांनी असे उत्तर दिले आहे की, नॉमेन क्लेचर सीमिलर आहे. परंतु, धनगर आणि धांगड हे डिफरंट आहेत. त्यांच्या चालीरिती व संस्कृती सर्व भिन्न आहेत. धनगर हे शेफर्ड आहेत. धनगर आणि धांगड हे भिन्न असल्यामुळे धनगर समाजाचा आदिवासीमध्ये समावेश करता येणार नाही असे त्यांनी सांगितले आहे. त्याप्रमाणे बिल पास झाले आहे. त्यामुळे धनगरांचा समावेश आदिवासींमध्ये केलेला नाही.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, राज्यात राहणाऱ्या धनगर समाजाची शब्दाचा अपभ्रंश करून कुचेष्टा चालली आहे. काश्मीर पासून कन्याकुमारीपर्यंत भारत एक आहे असे आपण म्हणतो. धनगर या शब्दाचा धनगड हा अपभ्रंश झालेला आहे. यासंबंधी केंद्र शासनाचे जी.आर.आहेत, नोटिफिकेशन आहे. सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे यांनी बलराम जाखड़ यांचे उदाहरण दिले. मी आपल्याला श्री.मुरली देवरा यांचे उदाहरण देतो. आपण देवरा म्हणतो पण दिल्लीमध्ये त्यांना श्री.मुरली देवड़ा असे म्हणतात. येथे आपण पाच एकर जमीन असे म्हणतो तर तेथे पाच एकड जमीन असे म्हणतो. उत्तर भारतातील एका अधिकाऱ्याने शब्दाचा अपभ्रंश केला. त्यामुळे महाराष्ट्रातील धनगर समाजावर स्वातंत्र्य मिळाल्यापासून अन्याय सुरू आहे. धनगर हा

...2

श्री. प्रकाश शेंडगे...

दऱ्याखोऱ्यात राहणार समाज आहे. आदिवासी जगणारा हा समाज आहे. कुठल्या तरी समाजावर अन्याय होईल म्हणून धनगर समाजाला सवलती नाकारल्या जात आहेत. केंद्राच्या काही जी.आर.मधून शब्दांची समानता दाखविली आहे. त्याचा अभ्यास करून या समाजाला सवलती देणार आहात काय ? ते जर बरोबर असेल तर या समाजाला सवलती द्याव्यात अशी केंद्र सरकारला आपण शिफारस करणार आहात काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती मी सांगितले आहे की, नॉमेन क्लेचर डिफरंट आहे. अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्यासंबधी नॉर्म्स आहेत, त्यामध्ये धनगर समाज बसत नाही. त्यामुळे धनगर समाजाला सवलती देता येत नाहीत.

**उपसभापती** : मी येथे आपणा सर्वांना एक गोष्ट समजावून सांगतो. शब्दाच्या अपभ्रंशामुळे काय होते ते सांगतो. आमचा एक मित्र जिल्हाधिकारी झाला. दुसरा मित्र जळगावला एस.पी.झाला. दोघांच्या बायका ऐकमेकांना भेटल्यावर जिल्हाधिकाऱ्यांच्या सौभाग्यवतीने एस.पी.च्या सौभाग्यवतींना उद्या माझ्याकडे चहाला या असे सांगितले. त्या बिचाऱ्या दहा वाजता घरी पोचल्या. त्यांनी नोकराला सांगितले की, तुमच्या बाईसाहेबांना सांग मी आले आहे. तो वर गेला आणि थोड्या वेळाने परत आला आणि म्हणाला मी बाईसाहेबांना तुमचा निरोप दिला. बाई म्हणाल्या मला वेड लागेल. तेव्हा एस.पीं.च्या सौभाग्यवतींनां क्षणभर प्रश्न पडला. मला बोलाविले आणि वेड लागेल असे कसे काय सांगत आहेत. त्या सौभाग्यवती वरून खाली आल्यानंतर एस.पीं.च्या सौभाग्यवती त्यांना म्हणाल्या की, आपण बोलाविल्यामुळे मी आले आणि तुम्ही निरोप पाठविला की, मला वेड लागेल. हे असे कसे काय ? तेव्हा त्या म्हणाला वैद्य बाई तसे नाही. या जळगावमध्ये 'ळ' ला 'ड' म्हणतात. मी त्याला सांगितले होते की, वेळ लागेल.

यानंतर श्री.पी.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** .......

हेच सांगण्यासाठी सभागृहात आपण आणखी वेळ घालविला तर आपल्यालाही वेड लागेल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी केंद्राचा उल्लेख केला. देशात तीन राज्यांमधील धनगर समाजावर अन्याय होत होता म्हणून त्या राज्यांनी केंद्राकडे तशी शिफारस केली व त्यानुसार केंद्रशासनाने विधेयक आणले आणि धनगर समाजाचा समावेश एस.टी. मध्ये करुन सन 2002 मध्ये दुरुस्तीसह गॅझेट काढण्यात आले. मागील अधिवेशनात दि. 31 मार्च, 2005 मध्ये यासंबंधीचा प्रश्न उपस्थित केला त्यावेळी या राज्याचे तत्कालीन आदिवासी विकास मंत्री श्री. सुरुपसिंग नाईक यांनी उत्तर दिले होते की, या राज्याच्या लिस्टमध्ये जी नावे आहेत ती दुरुस्ती करायची राहिली असून केंद्रशासनाकडे ती लिस्ट पाठविली होती ती दुरुस्ती होऊन आली आहे. तेव्हा लिस्टमध्ये ज्या दुरुस्ती राहिल्या असतील तेवढयाच पाठविल्या जातील. अशा प्रकारे धनगर समाजाचा प्रश्न केवळ "र " आणि "ड" एवढ्या शब्दापुरताच आहे. सांस्कृतिक चालीरितीचाही उल्लेख येथे केला. आपल्या राज्यात धनगर समाजाला न्याय देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. कारण एकंदर जंगलात भटकणारा हा समाज असून त्यांना न्याय मिळावा म्हणून केंद्राकडे तसा प्रस्ताव शासनाकडून पाठविण्यात येणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, माननीय सभापतींच्या दालनात चर्चा झाली व सर्व्हे पूर्ण झाल्यानंतर आदिवासींमध्ये धनगर समाज बसत नसल्यामुळे तसा प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी उभे असतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, हे शासन धनगर समाजाच्या विरोधात असेल आणि धनगरांना न्याय द्यावयाचा नाही, अशीच या शासनाची भूमिका दिसत आहे. त्यांचे आर्थिक विकास महामंडळ बंद करण्यात आले आहे. त्यांना न्याय देण्याची भूमिका मात्र या शासनाची नाही. सरकार जर धनगर समाजाच्या प्रश्नावर विचार करण्यास तयार नसेल तर हे सरकार धनगर समाजविरोधी आहे आणि म्हणून या शासनाचा निषेध करुन आम्ही सभात्याग करतो.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.45 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 3.18 ते 3.45 पर्यंत मध्यंतर )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. बाळासाहेब थोरात : आता सभागृहात कोणते काम होईल व कोणते काम होणार नाही याचा खुलासा झाला तर बरे होईल. बियाण्यांच्या संदर्भातील विधेयक घेतले तर चांगले होईल अशी माझी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विधेयक क्रमांक 26 हे चिकित्सा समितीकडे पाठवण्याचा निर्णय झालेला आहे त्यामुळे या विधेयकावर आता चर्चा करु नये. तसेच विधेयक क्रमांक 36 हे विधानसभेतून मंजूर होऊन आलेले नाही. हे विधेयक आता जरी मंजूर होऊन आले तरी आयत्यावेळी त्या विधेयकावर आम्ही चर्चा करणार नाही.

**उपसभापती** : ठीक आहे लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती, विशेष उल्लेख व त्यानंतर अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा होईल.

-----------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "शहापूर (जि.ठाणे) येथ इयत्ता नववीमध्ये शिकणा-या एका अनाथ विद्यार्थीनीच्या गुन्हेगारी प्रवृत्तीबाबत" या विषयावरील श्री. जितेंद्र आव्हाड व इतर वि.प.स. यांनी निांक 4 जुलै, 2006 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तरांच्या वेळी आश्वासन दिल्या प्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबतची माहिती छापावी.)

----------------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "खाजगी वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी महाविद्यालयांच्या रुग्णलयाबाबत" या विषयावरील श्री. मधुकर सरपोतदार, माजी वि.प.स. व इतर वि.प.स. यांनी दिनांक 13 जुलै, 2006 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तरांच्या वेळी आश्वासन दिल्या प्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबतची माहिती छापावी.)

----------------------

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक 8 (क) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 191 या लक्षवेधी सूचनांसंबधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 191 ही निवेदने कृपया छापावीत. )

---------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>विशेष उल्लेख</u>

पृ.शी . राज्यातील डॉक्टरांनी दवाखान्याची माहिती पोलीस स्टेशनला देणे

मु.शी : राज्यातील डॉक्टरांनी दवाखान्यांची माहिती पोलीस स्टेशनला देणे या बाबत डॉ. दीपक सावंत,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, काल या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी बोगस डॉक्टरांच्या संदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देत असतांना माननीय वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री श्री. सुरेश शेट्टी यांनी असे विधान केले होते की, दुकान सुरु करीत असतांना ज्या प्रमाणे महानगरपालिकेची परवानगी घ्यावी लागते त्याचबरोबर शॉप्स ॲन्ड एस्टिॅब्लिशमेन्ट ॲक्टप्रमाणे जे लायसेन्स घ्यावे लागते त्याप्रमाणे् नवीन दवाखाना सुरु `करीत असतांना डॉक्टरांनी आपल्या डिग्रीचे सर्टिफिकेटस पोलीस स्टेशनमध्ये दाखावयाचे असून माझे क्वालिफिकेशन अमुक अमुक असून मी अमुक अमुक ठिकाणी दवाखाना सुरु करीत आहे अशा प्रकारची जाणीव पोलीस स्टेशनला करुन द्यावयाची आहे. या संदर्भातील बातमी आजच्या सर्व वर्तमानपत्रात आली असून त्यामुळे सगळया डॉक्टरांमध्ये एक गोंधळ निर्माण झाला आहे. ही बातमी काल जेव्हा टी.व्ही. वरुन सांगण्यात आली होती तेव्हापासून आज सकाळ पर्यत मला 50 डॉक्टरांकडून फोन आले असून नेमके काय घडले होते याबाबतीत मला विचारणा करण्यात आली होती. काल जेव्हा माननीय राज्यमंत्री हे विधान करत होते त्यावेळी मी हरकत घेतली असल्यामुळे माझेही नाव वर्तमानपत्रात छापून आल्यामुळे अनेक डॉक्टरांनी माझ्याकडे फोनवरुन विचारणा केली आहे माननीय सभापतींबरोबर देखील मी या बाबत बोललो आहे. माननीय वैद्यकीय राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. तेव्हा त्यांच्या कालच्या विधानामुळे जो संभ्रम निर्माण झालेला आहे त्याबाबतीत त्यांनी आता खुलासा करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. अशा प्रकारे पोलिसांना

2.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सर्टिफिकेटस दाखविण्याच्या बाबतीत सांगितले तर भ्रष्टाचाराचे एक नवीन. कुरण निर्माण होईल बोगस डॉक्टरांवर बंदी घालण्याचा शासनाचा उद्देश चांगला आहे. त्याप्रमाणे बोगस डॉक्टरांवर बंदी घातलीच पाहिजे परंतु हा उद्देश साध्य करण्यासाठी पॅन्डोराज बॉक्स आपण ओपन करीत आहात . सर्वच डॉक्टरांना हा नियम लागू राहणार आहे तेव्हा कोणताही निर्णय घोषित करण्याच्या बाबतीत इंडियन मेडिकल असोसिएशन तसेच इतर पॅथीच्या डॉक्टरांच्या असोसिएशनबरोबर सर्वकष चर्चा करुन नंतर निर्णय घ्यावा.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, काल बोगस डॉक्टरांच्या संदर्भातील लक्षवेधी सूचनेला उत्तर देत असतांना मी असे म्हणालो होतो की, बोगस डॉक्टरांवर एक उपाय असा आहे की डॉक्टरांनी स्थानिक पोलीस स्टेशनच्या माहितीसाठी फक्त सांगावयाचे की मी अमुक अमुक एरियामध्ये दवाखाना सुरु करणार आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले की, असे करणे योग्य होणार नाही. त्यानंतर मी असे सांगितले की, सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांबरोबर याबाबतीत चर्चा करुन नंतर नियम ठरवू. या बाबतीतील रेकॉर्डसुध्दा आपण तपासून पाहू शकता.

डॉ.दीपक सावंत : याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी प्रेस नोट द्यावी.

( उत्तर दिले नाही )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. नाशिक विद्यापीठ स्थापन करणे
मु.शी :नाशिक विद्यापीठ स्थापन करणे याबाबत श्री.प्रतापराव सोनवणे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.प्रतापराव सोनवणे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.प्रतापराव सोनवणे ( नाशिक विभाग पदवीधर ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो :-

" नाशिक जिल्हा हा शैक्षणिक दृष्टया आजतागायत पुणे विद्यापीठाला जोडलेला आहे. काळानुरुप आज शिक्षण क्षेत्राची परिस्थिती खूप बदललेली आहे. नाशिक जिल्हयाची लोकसंख्या 50 लाखाच्या पुढे गेलेली आहे आज जिल्हयात 50 च्या आसपास कॉलेजेस आहेत, अनेक ठिकाणी पदव्युत्तर विषयांची कॉलेजेस आहेत. मुंबई - पुणे - नाशिक ही क्षेत्रे आज प्रगतीच्या दृष्टीकोनातून "गोल्डन ट्रॅंगल" म्हणून ओळखली जात आहे. शैक्षणिक दृष्टया नाशिक हे महत्वाचे केन्द्र तयार झालेले असून पुणे विद्यापीठाने नाशिकसाठी उपकेन्द्र सध्या सुरु केलेले आहे. दुस-या बाजूला पुणे शहर तर शैक्षणिकदृष्टया देशात महत्वाचे केंद्र ठरलेले असून विद्यापीठाच्या पायाभूत सुविधा या पुणे जिल्हयाला पुरेल इतपतच आहेत असे म्हणता येईल.

सभापती महोदय, प्रशासकीय सोयीसाठी व गुणवत्तावाढीसाठी पुणे विद्यापीठाचे विकेन्द्रीकरण करणे हे निश्चित उपयुक्त ठरणार आहे. स्मॉल इज ब्युटीफुल असे एक तत्व विचारवंतानी मांडलेले आहे ते सुध्दा येथे लागू पडेल.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी अधिक सोयीच्या दृष्टीने तसेच उच्च शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता वाढीच्या दृष्टीकोनातून नाशिक येथे "नाशिक विद्यापीठ" स्थापन करणे ही काळाची गरज तयार झाली आहे. पुण्या नंतर नाशिक सुध्दा विद्येचे माहेर घर होऊ शकते आणि म्हणून नाशिक मधल्या अनेक संघटनांनी व राजकीय पक्षांनी स्वतंत्र "नाशिक विद्यापीठाची" मागणी केली आहे. मात्र शासन अजून हा विषय गांभीर्याने घेत ासल्यामुळे जनतेच्या मनात असंतोष निर्माण झालेला आहे . . सार्वजनिक दृष्टया हा विषय अतिशय महत्वाचा आहे हे लक्षात घेऊन तातडीने नाशिक विद्यापीठची स्थापना करावी अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

4..



श्री.प्रतापराव सोनावणे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या नाशिक जिल्हया बरोबरच नगर जिल्हयाचीही शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने नाशिक सारखीच परिस्थिती असून नाशिक विद्यापीठाप्रमाणेच "नगर विद्यापीठ" सुध्दा स्वतंत्रपणे स्थापन करणे ही सुध्दा काळाची गरज आहे तेव्हा शासनाने नाशिक विद्यापीठाची स्थापना करीत असतांनाच "नगर विद्यापीठ" सुध्दा स्थापन करावे अशी सुध्दा मी या निमित्ताने मागणी करीत आहे ."

------

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: म्हाडाच्या सदनिकांची दलालांमार्फत होत असलेली विक्री

**मु.शी.**: म्हाडाच्या सदनिकांची दलालांमार्फत होत असलेली विक्री याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"गरीब व मध्यम वर्गीय जनतेसाठी शासनाच्या म्हाडा महामंडळाव्दारे घरे बांधून त्यांची विक्री करण्यात येते. गरीबांना 10 लाख घरे देण्याचे राज्य शासनाचे क्रांतिकारक धोरण जाहीर करण्यात आलेले आहे. राज्य शासनाचे हे धोरण राबविण्यात येणार आहे. अलिकडे काही वर्षात घरांच्या किंमती वाढून त्या गगनाला भिडू लागल्या आहेत, अशात गोरगरीबांना घरे विकत घेणे दुरापास्त होत आहे. शासनाची योजना हाच एकमेव आशेचा किरण गोरगरीबांना दिसत आहे. मात्र या क्षेत्रात घुसलेल्या दलालांनी उच्छाद मांडल्यामुळे गोरगरीबांना म्हाडाच्या योजनेतून मिळालेली घरे त्यांना पैशाच्या लालसेपोटी श्रीमंत लोकांना विकण्यासाठी प्रवृत्त केले जात आहे, त्याकरिता दलाल व्यक्ती मोठया रकमेचे आमिष या गोरगरीबांना दाखवित आहे.आणि गोरगरीबांच्या वाटयाला आलेली घरे धनदांडग्यांच्या घशात घालीत आहेत. म्हाडाच्या वसाहती असलेल्या प्रतिक्षा नगर, चुनाभट्टी, दिंडोशी, गोरेगाव या ठिकाणी हे दलाल अत्यंत सक्रिय झालेले आहेत. तेव्हा आतापर्यंत दलालांमार्फत विक्री करण्यात आलेल्या सदनिकांची सी.आय.डी.मार्फत चौकशी करुन दलालांना जेरबंद करावे आणि गरिबांना वितरित करण्यात आलेल्या त्यांच्या घरांची विक्री त्यांना कोणत्याही परिस्थितीत करता येणार नाही या अटीवर देण्यात यावीत. अन्यथा गरिबांसाठी घरे हे स्वप्नच राहील. या सार्वजनिकदृष्टया अत्यंत महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: उच्च माध्यमिक स्तरावरील गणित विषयाच्या
वाढीव कार्यभाराची गणना करुन पद निश्चित करणे

**मु.शी.**: उच्च माध्यमिक स्तरावरील गणित विषयाच्या वाढीव कार्यभाराची गणना
करुन पद निश्चित करणे याबाबत श्री. भगवानराव साळुंखे, वि.प.स.
यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील गणित विषयाच्या वाढीव कार्यभाराची एकूण कार्यभारात गणना करुन पद निश्चिती होणे बाबत"

सभापती महोदय, इयत्ता 11 वी व 12 वीसाठी गणित विषयासाठी प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. साहजिकच त्यामुळे गणित शिक्षकांचा कार्यभार वाढला आहे.राज्यातील काही विभागात हा वाढीव कार्यभार गणित विषयाच्या कार्यभारात मोजला जातो. मात्र अनेक विभागात या वाढीव कार्यभाराची दखलच घेतली जात नाही. याबाबत शासनाने निश्चित भूमिका स्पष्ट करावी.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: गंगाखेड तालुक्यातील गावांचा डोंगर विकास योजनेत समावेश करणे

**मु.शी.**: गंगाखेड तालुक्यातील गावांचा डोंगर विकास योजनेत समावेश करणे याबाबत श्री. प्रकाश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"परभणी जिल्हयातील गंगाखेड तालुक्यात अनेक गावे डोंगर दऱ्या खोऱ्यात वसली आहेत. ही गांवे आजही मूलभूत सोयी सुविधांपासून उदा. पाणी, वीज, रस्ते, आरोग्य या सुविधांपासून वंचित आहेत. या तालुक्यातील जिल्हा परिषद कोद्री पूर्ण गट, जिल्हा परिषद राणी सावरगांव पूर्ण गट तर जिल्हा परिषद महादपूरी गटातील पट्टेगांव बलवमंगळा, आकोली, खादगांव, सुरळवाडी व इतर गावे आणि जिल्हा परिषद मईजगाव गटातील, कवडगांव, इळेगांव, मसनेवाडी, विठ्ठलवाडी, धनगरवाडी, पांढरगांव, अरबुजवाडी व इतर गावे आहेत, डोंगर विकास योजनेत गंगाखेड तालुक्यांतील अशा प्रकारच्या गावांचा समावेश करावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे".

**उपसभापती** : यानंतर माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विक्रम काळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली होती. परंतु माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत.

(यानंतर श्री. सुंबरे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** (पुढे चालू...)

आता अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल. तत्पूर्वी माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांचे या संदर्भात आलेले पत्र येथे मी आपल्याला वाचून दाखवितो. त्यांनी पत्रात म्हटले आहे की, आज 26.7.2008 रोजी विधान सभेमध्ये लक्षवेधी सूचना, आंतिम आठवडा प्रस्ताव हा ऊर्जा विभागाशी संबंधित असून त्याच वेळी विधान परिषद सभागृहामध्ये देखील अंतिम आठवडा प्रस्ताव ऊर्जा विभागाशी संबंधित आहे. मी विधानसभेमध्ये त्यावेळी असल्याने विधान परिषदेमध्ये अपारंपारिक ऊर्जा खात्याचे माननीय मंत्री श्री.विनय कोरे यांना ऊर्जा खात्याशी संबंधित असलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर उत्तर देण्याची विनंती केली आहे तरी आपणही त्यासाठी अनुमती द्यावी. तेव्हा आपल्या या चर्चेला माननीय मंत्री श्री.विनय कोरे हे उत्तर देणार आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये आधी असे ठरले होते की, एकाच विषयाशी संबंधित कामकाज एकाच वेळेस दोन्ही सभागृहामध्ये ठेवू नये. परंतु या प्रस्तावाच्या वेळीच विधानसभा सभागृहामध्ये देखील हाच विषय ठेवला गेला आहे. खरे तर आम्हाला ऊर्जा मंत्र्यांकडून काही बाबतीत उत्तरे पाहिजे होती. मी या ठिकाणी अपारंपारिक ऊर्जा खात्याच्या मंत्र्यांचा अवमान करू इच्छित नाही परंतु ऊर्जे संबंधात राज्यामध्ये आज जी काही परिस्थिती उदभवली आहे त्या परिस्थितीला आपण कसे सामोरे जाणार आहोत आणि आता जे काही लोडशेडींग चालू आहे त्याच्या समस्या आम्ही आता येथे कशा मांडायच्या ? ...

**उपसभापती** : माननीय ऊर्जा मंत्र्यांनी तोंडी असेही कळविले आहे की, विधानसभेतील त्यांचे काम आटोपले की ते लागलीच या सभागृहात येणार आहेत. ..

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा अंतिम आठवडा प्रस्ताव मांडण्यापूर्वी या सभागृहामध्ये दोन निवेदने व्हावयाची आहेत. एक तर काल आपल्या संबंधीच्या एका पत्राचा मुद्दा आम्ही येथे उपस्थित केला होता ....

**उपसभापती** : त्यासंबंधीचे निवेदन केले गेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दुसरे म्हणजे सध्या राज्यात जी दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे या परिस्थितीचा सामना हे सरकार कशा प्रकारे करणार आहे याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे येऊन निवेदन करावे अशी मागणी आम्ही केली होती आणि आपणही तसे सांगितले होते. तेही निवेदन अजून व्हायचे आहे. आता अंतिम आठवडा प्रस्तावावरील

...... 3यू 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर .....

चर्चा संपल्यानंतर लगेचच वंदेमातरम् होऊन सभागृहाची बैठक संस्थगित होईल. तेव्हा आता राज्यात जी स्थिती निर्माण झाली आहे तिचा मुकाबला हे सरकार कसा करणार आहे ? त्यासाठी सरकार पैसे कोठून उपलब्ध करून देणार आहे, बजेटमध्ये कपात करणार आहे की, कॉंटीजन्सी फंडातून देणार आहे ? या संबंधातील माहिती या निवेदनातून माननीय मुख्यमंत्र्यांनी द्यायची आहे. ती माहिती आम्हाला मिळाली नाही तर आम्ही बाहेर जाऊन जनतेला तरी काय सांगणार आहोत ? काल येथे आपण निर्देश दिले की, या सभागृहाचे नेते किंवा माननीय मुख्यमंत्री याबाबत निवेदन करतील. तर ते निवेदन अजून व्हायचे राहिले आहे.

**उपसभापती** : मी तसे पत्र पाठविले आहे. तरीही आपण प्रस्ताव मांडून चर्चेला सुरूवात करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

...... 3यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यात अगोदरच 8 ते 15 तासांचे भारनियमन असताना 24.7.2008 पासून त्यात एक तासाने करण्यात आलेली वाढ

**मु.शी.** : राज्यात अगोदरच 8 ते 15 तासांचे भारनियमन असताना 24.7.2008 पासून त्यात एक तासाने करण्यात आलेली वाढ या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, डॉ.दीपक सावंत, श्री.विनोद तावडे, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, संजय केळकर, परशुराम उपरकर, प्रकाश शेंडगे, ॲड.अनिल परब, पाशा पटेल, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 259 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो. ..

" राज्यात दिनांक 24 जुलै 2008 पासून एका तासाचे वाढीव भारनियमन करण्यात आल्यामुळे शहरी भागात सात ते आठ तासांचे तर ग्रामीण भागात 15 ते 16 तासांचे भारनियमन सुरू असणे, वीजेची उपलब्धता 9 हजार मेगावॅट असताना मागणी 14 हजार मेगावॅटवर गेल्याने राज्यात 5200 मे.वॅ.चा तुटवडा भासणे, 2100 मे.वॅ. क्षमतेच्या दाभोळ प्रकल्पात अनेक आर्थिक व तांत्रिक अडचणींची सतत भर पडणे, दाभोळ प्रमाणेच इतर वीज निर्मिती केंद्रात देखील विविध अडचणी येऊन वीज निर्मिती अधून मधून बंद असणे, सद्यस्थितीत राज्यातील 53 टक्के वीज निर्मिती बंद असणे, राज्यातील सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत वीज टंचाईमुळे पाणीपुरवठा योजनांना वीज न मिळाल्यामुळे ग्रामीण व शहरी भागात 8-8 दिवस पिण्याचे पाणी न मिळणे, वीजेच्या या गंभीर संकटामुळे उद्योगधंदे, शेती, कुटीरोद्योग यांवर विपरित परिणाम होणे, अनेक उद्योग बंद होणे, तर अनेक उद्योग परराज्यात स्थलांतरित होणे, शेतामधील वीजपंपांना वीज मिळत नसल्याने शेती क्षेत्रावर देखील वीज टंचाईचा विपरित परिणाम होऊन शेती उत्पादन घटणे, सातारा, सांगली जिल्ह्यांतील आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांच्या-मंत्र्यांच्या पवनचक्क्या पर्यायी ऊर्जेच्या नावाखाली सुरू ठेवून शेतकऱ्यांकडून अनामत रकमेच्या नावाखाली पैसे घेऊन त्यांची फसवणूक व लूट करण्यात येणे, विजेच्या या भीषण संकटाचा सामना करण्यास शासनास आलेले संपूर्ण अपयश व याबाबत शासनाने करावयाची उपाय योजना विचारात घेण्यात यावी. "

( यानंतर सौ.रणदिवे ....3व्ही 1

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 16:05

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

सभापती महोदय, मी या विधीमंडळामध्ये गेली पाच वर्षे सतत हा प्रस्ताव मांडत आहे. या राज्यात आघाडीचे सरकार आल्यापासून लोड शेडींगमध्ये दर सहा महिन्याला, दर वर्षाला वाढ होत गेली आहे. ग्रामीण भागामध्ये एक तासापासून आता जवळपास 18 ते 20 तासापर्यंत लोडशेडींग वाढलेले आहे. शहरी भागातील "ब" वर्ग नगरपालिकांमध्ये सुध्दा 13 ते 14 तास लोड शेडींग सुरु झालेले आहे. राज्यातील 8 कोटी जनतेवर पहिल्यांदा निसर्ग कोपला, 225 तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला, आत्महत्या करु लागला. त्याचबरोबर केंद्र शासनानेही देशामध्ये प्रचंड महागाई वाढविली. या महागाईचा फटका शेतकऱ्यांना, गोरगरीब माणसांना बसला. एका बाजूला तो महागाईमध्ये होरपळत आहे आणि दुसऱ्या बाजूला दुष्काळामुळे त्याची अत्यंत दयनीय स्थिती झालेली आहे. आज शेतकऱ्याची शेती पाणी मागत आहे. पण प्रत्यक्षात शेती ओस पडलेली आहे. त्यातच तिसरे संकट म्हणजे 24 तारखेला भारनियमन आणखी एक तास वाढविण्याचा निर्णय घेतला आणि यामुळे शेतकऱ्याच्या, गोरगरीब माणसाच्या संकटात भर टाकलेली आहे. संपूर्ण राज्य अंधारामध्ये बुडालेले आहेत. आजच्या घडीला राज्यातील 53 टक्के वीजनिर्मिती बंद आहे. कोऱ्हाडी येथे 115 मे.वॅ.प्रत्येकी 2 आणि 210 मे.वॅ.चे एक युनिट तांत्रिक अडचणीमुळे बंद झाले आहे. परळीमध्ये 210 मे.वॅ. आणि चंद्रपूर मध्ये 500 मे.वॅ.युनिट ओव्हर आईलींगसाठी बंद आहे. केवळ भूसावळ येथील 210 मे.वॅ.क्षमतेची दोन युनिट वीज निर्मिती करीत आहेत. राज्यात सध्या असलेली वीज निर्मिती केंद्रे खूप जुनी झालेली आहेत. चंद्रपूर, खापरखेडा, कोऱ्हाडी इ.वीज निर्मिती केंद्रे 20-25 वर्षापूर्वीची आहेत. तसेच पारस हे केंद्र देखील 30-35 वर्षापूर्वीचे आहे. त्यामुळे वारंवार ही सर्व केंद्र बंद पडत आहेत. दाभोळचा संच बंद पडलेला आहे अशाही बातम्या येत आहेत. ते थांबविले पाहिजे आणि किमानपक्षी गरजेच्या वेळी तरी वीज निर्मितीमध्ये खंड पडणार नाही अशा प्रकारे या केंद्रांची देखभाल-दुरुस्ती करण्याचा वीज मंडळाने कधीच प्रयत्न केलेला नाही असे म्हणावे लागेल.

सभापती महोदय, औष्णिक वीज निर्मिती केंद्राची जी स्थिती आहे, तशीच ती जल विद्युत निर्मिती केंद्रांची आहे. कोयना, वैतरणा, खापरखेडा, भीरा व तिल्लारी या हायड्रो पॉवर प्रकल्पांना पाण्याचा तडाखा बसला. दुष्काळ पडल्यामुळे कोयना धरण अर्धेच भरलेले आहे. या केंद्रातून प्रामुख्याने वीज निर्मिती केली जाते.वैतरणा,खापरखेडा,भीरा,तिल्लारी या वीज निर्मिती प्रकल्पांनाही

. . . .3 व्ही-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

पाण्यामुळे तडाखा बसलेला आहे आणि पाणी नसल्यामुळे त्याचा वीज निर्मितीवर गंभीर परिणाम झालेला आहे. यावर्षी कोयना धरण क्षेत्रात गतवर्षीच्या तुलनेमध्ये पावसाचे प्रमाण निम्मेच आहे. कोयना येथे 1 जून पासून 1478 मि.मि.पावसाची नोंद झाली. याच काळामध्ये गेल्या वर्षी मात्र दुप्पटीहून अधिक म्हणजे 2961 मि.मि. पाऊस झाला होता आणि हे धरण जवळजवळ 78 टक्के भरलेले होते. कारण महापूर आला होता. माननीय मंत्री महोदय त्याच भागातील आहात आणि मी स्वत: त्यावेळी पहाणी करण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी या धरणातील पाणी सोडण्याची वेळ आली होती. या धरणातील पाणी वीज निर्मितीसाठी वापरले जाते.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

या हंगामामध्ये 20 अब्ज घनफूट पाण्यापैकी 15 अब्ज घनफूट पाणी वीज निर्मितीसाठी वापरले गेले. यापुढे जर पाऊस झाला नाही तर या धरणातून होणाऱ्या वीज निर्मितीचे प्रमाण कमी होईल. अशीच परिस्थिती राहिली तर वीज निर्मिती आठवडाभर सुरु राहील अन्यथा त्यामध्ये घट करावी लागेल असे तेथील अभियंता श्री. शेळके यांनी सांगितले. आता पाऊस पडला नाही तर वीज निर्मिती बंद करावी लागेल. आमच्या नागपूर विभागामध्ये जे सिंचन प्रकल्प आहेत त्यामध्ये 20 टक्के पाणी आहे. सध्या मुंबईमध्ये पाऊस पडत असला तरी विदर्भामध्ये अजूनही पाऊस पडलेला नाही. मी आज सकाळी विदर्भातील काही जिल्ह्यांची माहिती घेतली. त्या ठिकाणी पाऊस सुरु आहे काय हे विचारले. त्या ठिकाणी पावसाचा थेंबही पडलेला नाही. तेथील सिंचन प्रकल्पांमध्ये आता फक्त 20 टक्के पाण्याचा साठा शिल्लक राहिलेला आहे. अमरावती विभागातील सिंचन प्रकल्पात 13 टक्के पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे तेथील वीज निर्मिती संच बंद पडण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. सद्यस्थितीत वीज निर्मिती प्रकल्पांची क्षमता आणि प्रत्यक्ष वीज निर्मिती याबाबत अशी परिस्थिती आहे की, नाशिक येथील वीज प्रकल्पामध्ये क्षमता 880 मेगावॅट असून वीज निर्मिती मात्र 728 मेगावॅट होत आहे. कोराडी वीज प्रकल्पामध्ये क्षमता 1090 मेगावॅट असून प्रत्यक्षात 444 मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. खापरखेडा वीज प्रकल्पामध्ये क्षमता 840 मेगावॅट असून प्रत्यक्षात 789 मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. पारस वीज प्रकल्पामध्ये 305 मेगावॅट क्षमता आहे परंतु त्या ठिकाणी फक्त 70 मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. माननीय ऊर्जा मंत्र्यांनी सांगितले होते की, त्या ठिकाणी 250 मेगावॅट वीज निर्मिती होईल परंतु त्या ठिकाणी फक्त 70 मेगावॅट वीज उपलब्ध आहे. परळी वीज प्रकल्पामध्ये क्षमता 880 मेगावॅट असून प्रत्यक्ष 598 मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. चंद्रपूर वीज प्रकल्पामध्ये 2340 मेगावॅट क्षमता असून प्रत्यक्षात 1245 मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. भुसावळ वीज प्रकल्पामध्ये क्षमता 475 मेगावॅट असून प्रत्यक्षात 302 मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. उरण येथील गॅसवर आधारित वीज निर्मिती प्रकल्पामध्ये क्षमता 852 मेगावॅट असून प्रत्यक्षात 392 मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. हायड्रो प्रकल्पांच्या माध्यमातून वीज निर्मितीची एकूण क्षमता 2340 मेगावॅट असून प्रत्याक्षात फक्त 172 मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. अशा प्रकारे एकूण 9996

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/

श्री. पांडुरंग फुंडकर ......

मेगावॅट क्षमतेपैकी फक्त 4743 मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य म्हणून समजले जाते. एकीकडे वीज निर्मिती कमी होत असताना आणि वीज निर्मिती संच बंद पडत असताना तर दुसरीकडे वीज चोरी आणि गळतीचे प्रमाण वाढत आहे. विधानसभा सभागृहामध्ये नावे वाचण्यात आली पण मी या ठिकाणी कोणाचेही नाव घेणार नाही. विधानसभेमध्ये मंत्री, राजकारणी, अभियंते, कलाकार, उद्योगपती यांची यादी वाचली गेली. ती यादी मी वाचणार नाही. ती यादी माझ्याकडे आली आहे. ही यादी वाचावी आणि कोणाकडे किती वीज बिल थकले आहे ते दाखवून द्यावे असे मला सांगण्यात आले. परंतु तो उल्लेख मी या ठिकाणी करणार नाही. पण वीज चोरीचे प्रमाण वाढत आहे. राज्यात विविध भागामध्ये वीज गळतीचे प्रमाण किती आहे हे मी सांगू इच्छितो. याबाबत काही परिमंडळाची माहिती मी सांगणार आहे. लातूर हा माननीय मुख्यमंत्र्यांचा जिल्हा आहे. त्या ठिकाणी वीज गळतीचे प्रमाण 50 टक्के आहे. नांदेडमध्ये वीज गळतीचे प्रमाण 42 टक्के आहे. बीडमध्ये वीज गळतीचे प्रमाण 50 टक्के आहे. सोलापूरमध्ये वीज गळतीचे प्रमाण 39 टक्के आहे. अकोल्यामध्ये वीज गळतीचे प्रमाण 39 टक्के आहे. यवतमाळमध्ये वीज गळतीचे प्रमाण 41 टक्के आहे. औरंगाबाद ग्रामीणमध्ये वीज गळतीचे प्रमाण 35 टक्के आहे. परभणीमध्ये वीज गळतीचे प्रमाण 52 टक्के आहे. उस्मानाबादमध्ये वीज गळतीचे प्रमाण 41 टक्के आहे. गोंदियामध्ये वीज गळतीचे प्रमाण 38 टक्के आहे. राज्याच्या ग्रामीण भागात जसे आकडे टाकून वीज चोरी होते तशी शहरामध्ये मीटरमध्ये तांत्रिक फेरफार करुन चोरी केली जाते. या ठिकाणी खेड्यातील लोकांना बदनाम केले जाते की, ते आकडे टाकून वीज चोरतात. परंतु आपण या वीज मंडळाच्या वेगवेगळ्या कंपन्या निर्माण केल्यापासून आता शेतकरी आकडे टाकत नाहीत. याचे कारण असे की, या कंपन्यांनी शेतकऱ्यांमध्ये दहशत निर्माण केलेली आहे. एखादा शेतकरी आकडा टाकून चोरी करताना पकडला गेला तर त्याला जेलमध्ये पाठवितात. परंतु मुंबईमध्ये जवळपास 60 कोटी रुपयांची वीज चोरी होते. ग्रामीण भागाच्या लोकांना बदनाम केले जाते पण मुंबईमध्ये 200 मेगावॅट विजेचा बेकायदेशीर किंवा अनियंत्रित वापर केला जातो. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना बदनाम करता.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

ग्रामीण भागातील गरीब माणसांना बदनाम करता. परंतु मुंबईमध्ये 200 मे.वॉ.अनियंत्रित चोरी करुन विजेचा वापर होत आहे. त्याबाबत शासन काय करणार आहे ? चित्ता कॅम्पमध्ये 12 लाख रुपयांची विजेची चोरी होते अशी रिलायन्स एनर्जी कंपनीच्या एका अधिका-याने माहिती दिली आहे. बैंगनवाडी, घाटकोपर, विक्रोळी येथे 48 कोटी रुपयांच्या विजेची चोरी होते असेही त्यांनी सांगितले आहे. एका बाजूला वीज चोरी रोखण्यासाठी वीज कंपन्या अकार्यक्षम ठरल्या आहेत. या कंपन्या काय करतात ? या कंपन्या ग्रामीण भागामध्ये जातात. परंतु शहरी भागातील एखाद्या उद्योगपतीच्या घरावर धाड टाकण्याची शासनामध्ये हिंमत नाही, एखाद्या सिने कलावंताच्या घरावर धाड टाकण्याची हिंमत नाही, एखाद्या राजकारण्यांच्या किंवा मंत्र्यांच्या घरावर धाड टाकण्याची हिंमत नाही. पण कंपन्यांचे अधिकारी मात्र ग्रामीण भागातील शेतक-यांच्या घरावर धाडी टाकतात. मुंबईतील विजेची चोरी शासनाला पकडता येत नाही. मुंबईमध्ये 60 कोटीची चोरी होत आहे. तरी देखील मुंबईमध्ये झगमगाट आहे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल असे म्हणत असतात की, भारत देश दोन भागामध्ये विभागला गेला आहे. एक भारत ग्रामीण भागात आहे तर दुसराशहरामध्ये आहे. खेडयातील माणसांची स्थिती काय आहे ते मंत्रिमहोदयांनी जाऊन पहावे. तेथे सध्या 24-24 तास वीज नसते. सभापती महोदय, मी परवा गावाला गेलो होतो. लोडशेडिंगमुळे लोकांचे किती हाल होत आहेत त्याचे मोबाईलमध्ये मी फोटो काढले आहेत. त्याठिकाणी लोक आता खाण्याच्या तेलाचे दिवे लावत आहेत. याचे कारण या शासनाच्या काळात लोकांना आता रॉकेल सुध्दा मिळत नाही. एखाद्या वेळी खाण्याचे तेल मिळेल, पण रॉकेल मिळत नाही. त्यामुळे लोक आता खाण्याच्या तेलाचे दिवे लावत आहेत, त्यांना मेणबत्ती लावणे परवडत नाही. अनेक ठिकाणी विजेच्या मीटरमध्ये तांत्रिक फेरफार केला जातो. रिमोट कंट्रोलचा वापर करुन विजेचे बिल कमी केले जाते. मेन लाईनमधून वीज घेतली जाते. 10 हजार मीटरपैकी 3500 मीटर इतका फेरफार झाल्याचे रिलायन्सच्या अधिका-यांनी सांगितले आहे.

सभापती महोदय, वाळकेश्वर येथे सर्वात जास्त विजेची चोरी होत आहे. हा भाग गरीबांचा नाही. झोपडपट्टीमध्ये विजेची चोरी होते हे मी समजू शकतो. पण वाळकेश्वर येथील विजेच्या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/

श्री.पांडुरंग फुंडकर....

चोरीबाबत शासन काय कारवाई करणार आहे ते सांगावे. वीज चोरी आणि गळती थांबविली तर विजेचा तुटवडा ब-याचअंशी कमी करता येईल. सध्या मोठमोठया कंपन्यांमधून वीज मंडळाच्या अधिका-यांना हाताशी धरुन मनसोक्त विजेची चोरी होते. त्याचा भूर्दंड मात्र इमानेइतबारे विजेचे बिल भरणा-या लोकांना सोसावा आहे. टाटा आणि रिलायन्स एनर्जी या वीज कंपन्या दरवर्षी विजेची दरवाढ करीत आहेत. दरवाढ करुनही लोकांना पुरेशी वीज देत नाही. शेतकरी आता म्हणत आहेत की, आम्ही पैसे देण्यास तयार आहोत, पण आम्हाला वीज द्यावी. पण शासन त्यांना पैसे घेऊनही वीज देऊ शकत नाही. इतकी वाईट अवस्था या ऊर्जा खात्याची झाली आहे. आघाडी शासनाने निवडणुकीपूर्वी आम्ही तुम्हाला मोफत वीज देऊ असे जाहीरनाम्यामध्ये आश्वासन दिले होते. सभापती महोदय, यानिमित्ताने मी एक गंमतीदार उदाहरण सांगतो. त्यावेळी विधानसभेची निवडणूक जाहीर झाली होती. भाजपा व शिवसेना युतीचा प्रचार करण्यासाठी मी एका ठिकाणी गेलो होतो. आदरणीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी आमचे सरकार आल्यानंतर आम्ही तुम्हाला मोफत वीज देऊ अशी घोषणा केली होती. त्यावेळी सभेतील एक तरुण मुलगा उभा राहिला आणि म्हणाला की, तुम्ही काय आश्वासन देता ? काँग्रेस पक्षाच्या आघाडीने निवडणुकीपूर्वीच आम्हाला शून्य रकमेची बिले दिली आहेत. शून्य रकमेचे बिल घेऊन तो तरुण मंचावर आला होता. तो म्हणाला की, तुम्ही केवळ मोफत विजेच्या गप्पा मारता, पण त्या अगोदरच आम्हाला काँग्रेस पक्षाने शून्य रकमेची बिले देण्यास सुरुवात केली आहे. त्यावर मी त्याला म्हटले होते की, हे बिल माझ्याकडे ठेवून घेऊ काय, यावर तो म्हणाला की, नाही, ते बिल माझ्याकडेच राहू द्या.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....

मी त्याला म्हटले की, बाबू तू मला निवडणुका झाल्यानंतर दोन महिन्यांनी येऊन भेट. त्यानंतर तीन महिन्यानी एका कार्यक्रमाच्या निमित्ताने मी त्या भागामध्ये पुन्हा गेलो. कार्यक्रम संपल्यानंतर तोच मुलगा मला पुन्हा येऊन भेटला आणि म्हणाला की, साहेब तुम्ही म्हणालात ते खरे होते. त्याने खिशातून बिल काढून मला दाखवले आणि सांगितले की, सरकारने 3 हजाराचे बिल दाबून दिलेले आहे. तुम्ही झिरो बिलाचा गप्पा मारल्या आणि नंतर दोन महिन्यांनी 3 हजाराचे बिल देऊन शेतक-यांची घोर फसवणूक केलीत. इमानेइतबारे बिल भरणा-या लोकांनाही खूप त्रास सहन करावा लागत आहे. दर सहा महिन्यांनी वीजदरवाढ केली जाते. वीज न देता जादा विजेची बिले दिली जातात. माझी तर अशी मागणी आहे की, जेवढी वीज दिली जाईल तेवढेच बिल दिले गेले पाहिजे. 20-20 तास 24-24 तास वीज दिली जात नसताना विजेची बिले मात्र कशी दिली जातात ? दुसरीकडे या वीज मंडळाच्या कंपन्या फायद्यामध्ये आहेत असे सांगितले जाते. वीज न देता शेतक-यांकडून बिले घेतल्यामुळे वीज मंडळाच्या कंपन्या फायद्यातच जातील.

सभापती महोदय, वीज टंचाई आणि वीज चोरी बाबत एका अधिका-याने जे सांगितले त्याचा उल्लेख मी येथे करु इच्छितो. त्याने सांगितले की, राज्यभरामध्ये सध्या विजेची टंचाई असून इतर राज्याकडून सरकारला महागडी वीज घ्यावी लागते. मात्र मुंबईत सुमारे 200 मेगावॅट वीज बेकायदेशीर आणि अनियंत्रितपणे वापरली जाते. झोपडपट्टीमध्ये अनेक ठिकाणी वीज चोरुन वापरली जाते. ही वीजचोरी माननीय मंत्री महोदय रोखू शकणार आहेत की नाहीत ? या राज्यामध्ये 9 वर्षापासून तुमचे सरकार असून केन्द्रामध्येही तुमचेच सरकार आहे.या 9 वर्षामध्ये किती मेगावॅट विजेची निर्मिती केली हे माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगावे. "लोकमत" दैनिकामध्ये प्रसिध्द झालेल्या वृत्तामध्ये असे म्हटलेले आहे की, गेल्या 10 वर्षामध्ये राज्यामध्ये एकाही मेगावॅटची भर पडली नाही. महाजनकोने 11269 मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता गाठली. परंतु गेल्या 10 वर्षामध्ये त्यांना एक मेगावॅटची देखील भर घालता आली नाही. अशा परिस्थितीमध्ये महाजनको अतिरिक्त वीज निर्माण करण्याचे उद्दिष्ट कसे पूर्ण करणार हा प्रश्न आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील हे नेहमी तीच तीच उत्तरे देत असतात. पारस वीज केन्द्र अमूक तारखेपासून सुरु होईल, परळी वीज केन्द्र अमूक तारखेपासून सुरु होईल, दाभोळची वीज या तारखेपासून मिळेल. त्यांच्या या तारखा लांबतच राहिलेल्या आहेत. पारस येथे 270 मेगावॅट वीज निर्मिती होणार होती. त्या ठिकाणी आता फक्त 70 मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. केन्द्रामधील ऊर्जा मंत्रालयाचे मंत्री हे आपल्याच राज्यातील आहेत. या हुशार मंत्र्यांनी भार नियमनाला वीज गळतीचे निकष लावले. ज्या भागामध्ये वीज गळती कमी तेथे भारनियमन कमी. आमच्या बुलडाणा जिल्ह्यामध्ये वीज गळती कमी आहे. तेथील भारनियमन तुम्ही कमी करणार आहात काय ? "ब" वर्ग नगरपालिकेला 8 तासाचे भारनियमन आहे. पण तेथे 20-20तास भारनियमन होते. आता झिरो लोडशेडिंग आणि इमर्जन्सी लोडशेडिंग असे शब्दप्रयोग केले जातात. मी अधिका-याला फोन करुन विचारले की, "ब" वर्ग नगरपालिकेमध्ये सकाळी 4 तास आणि संध्याकाळी 4 तास असे 8 तास भारनियमन असताना रात्री 2.00 वाजल्यापासून सकाळी 6.00 वाजेपर्यन्त वीज का नव्हती ? त्याने सांगितले की, त्यावेळी झिरो लोडशेडिंग होते, इमर्जन्सी लोडशेडिंग होते.

...नंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. उल्हास पवार)**

श्री. पांडुरंग फुंडकर .....

झिरो लोडशेडींग आणि इमर्जन्सी लोडशेडींग तसेच फ्रीक्वेन्सी या शब्दांची व्याख्या एकदा समजावून सांगा. लोकांना आणि शेतकऱ्यांना सरकारने फसवले आहे. 20/20 तास वीज देणार नाही. सरकारकडून एकदा जाहीर करुन टाका की, महाराष्ट्र सरकार ग्रामीण भागातील जनतेला वीज देणार नाही. 25 वर्षापूर्वी जसे कंदील होते आणि दिवे होते ते लावून सुखाने नांदा. वीज पुरवठयाच्या बाबतीत नाटके कशाला करता ? शासन वीज पुरवू शकत नाही हे एकदा सांगून टाका. 2011 पर्यंत वीज देऊ शकत नाही असे ऊर्जामंत्र्यांचे स्टेटमेंट आहे. ऊर्जामंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी सांगितले की, वीज निर्मितीसाठी जॉइंट व्हेंचर्सला प्राधान्य दिले जाणार असून पुढील पाच वर्षात 30 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. 2003 मध्ये झालेल्या कायद्यातील बदलामुळे फायदा होईल. सर्व देशामध्ये 15500 मे.वॅ.वीजेचा तुटवडा आहे. गेल्या पंचवार्षिक योजनेत 42000 मे.वॅ.वीज निर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले होते पण प्रत्यक्षात 21000 मे.वॅ.वीजेची निर्मिती झाली. गुजरातमध्ये वीजेची समस्या भेडसावत नाही असे नाही. तेथील सरकारचा दावा असला तरी फेडर सेपरेशन करण्यात आले होते. या शासनाने का केले नाही ? मी मागील अधिवेशनात फेडर सेपरेशनची मागणी केली होती. ते शासन करीत नाही. सेपरेशन केले म्हणून शेतीसाठी आणि गावासाठी वेगवेगळया फीडरमधून पुरवठा होतो म्हणून तेथे वीजेचा तुटवडा जाणवत नाही. महाराष्ट्रात तसे करण्यात आले नाही ही परिस्थिती लक्षात घेतली पाहिजे असे मंत्री म्हणाले. केंद्र शासनाचा अंदाज फसला. केंद्रीय वीजमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे असे म्हणाले की, वीज उत्पादनामध्ये 80000 मे.वॅ.ने वाढ केली जाईल. देशाला लागणाऱ्या वीजेच्या उत्पादनात वाढ होईल अशी अपेक्षा आहे. पण गुंतवणुकदारांना तेवढा विश्वास वाटत नाही कारण रिलायन्स पॉवर शेअरीची किंमत 473 वरुन 350 वर आली आहे. त्यामुळे ऊर्जा मंत्रालयाने काढलेले निष्कर्ष काल्पनिक व खोटे असल्याचे सिध्द होते. ऊर्जा मंत्रालयाने स्थापन केलेल्या केंद्रीय केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या 17 व्या पॉवर इलेक्ट्रीक पाहणीत म्हटले आहे की, वीजेची सर्वाधिक मागणी 2007 मध्ये 93547 मे.वॅ.इतकी होती त्यावेळी पाच वर्षात हीच मागणी 1 लाख 52 हजार 746 इतकी वाढेल. म्हणजे वीजेच्या उत्पादनात फक्त 60000 मे.वॅ.वाढ होईल. ऊर्जामंत्री मात्र विनाकारण 80000 मे.वॅटच्या गप्पा मारुन जनतेची दिशाभूल करीत आहेत.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.शिगम 16:25

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, वीज चोरीचा विषय सांगितला. एक बातमी त्याच लोकमत पेपरमध्ये आली. समांतर वीज चालविणाऱ्या अधिकाऱ्यांना बढतीचे बक्षिस देण्यात आले. त्यातील काही भाग मी वाचून दाखवितो. उरणमध्ये समांतर वीज केंद्र चालविले जात असल्याचे उघड झाले असताना ही किमया करणाऱ्या महावितरणच्या अधिकाऱ्यांना बढतीचे बक्षिस दिल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मात्र याप्रकरणी ज्या अधिकाऱ्यावर संशय आहे त्याच्यावर तर कारवाई झालीच नाही पण त्यांची बदली मात्र रोखण्यात आली आहे. नव्या मुंबईतील बहुचर्चित सेझच्या मार्गातील जासई गावाजवळील टोल नाक्यावरील शेजारी या वीज केंद्रातून पेट्रोलपंपासह 3 ते 4 ग्राहकांना वीज कनेक्शन दिल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणात तेथील उपकार्यकारी अभियंता श्री. रसाळ यांचा आशिर्वाद असल्याचे सांगण्यात येत असून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ते काम करीत असल्याची तक्रार पनवेल येथील तज्ज्ञ श्री. अजितकुमार भाकरे यांनी ऊर्जामंत्र्यांसह महावितरणाच्या व्यवस्थापकीय संचालकाकडे केली. श्री.रसाळ यांनी कोणत्याही कार्यालयाची प्रशासकीय आणि तांत्रिक मंजुरी नसताना महावितरण खर्चाने 63 के.व्ही.चा रोहित्र एकाच वीज खांबावर दोन्ही एसटी लाईन लो टेंशन आणि हाय टेंशन अशी यंत्रणा उभी करुन महावितरणला कोटयवधी रुपयांचा चुना लावला. पंपाच्या कोटेशनवर कोणत्याही प्रकारची तांत्रिक मंजुरी नसताना 10 ते 12 एच.पी.चा विद्युत भार लागत असताना अनधिकृतपणे आपल्या अधिकाराच्या बाहेर जाऊन पंपास 5 के.डब्ल्यूचा वीज पुरवठा दिला आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ 16:30

श्री.पांडुरंग फुंडकर...........

सभापती महोदय, सभागृहाचा वेळ वाया जाऊ नये म्हणून मी पूर्ण वाचून दाखवू इच्छित नाही. परंतु अशा पध्दतीने ऊर्जा विभागाचा कारभार चालू आहे. एका बाजूला महाराष्ट्र अग्रेसर आहे, नंबर 1 वर आहे असे सांगितले जाते. दुसऱ्या बाजूला काय परिस्थिती आहे? मी एक उदाहरण देऊ इच्छितो. कोकणातील उरण तालुक्याच्या पूर्व भागातील आदिवासी बांधवांनी अद्याप विजेचा प्रकाश पाहिलेला नाही. या महाराष्ट्रामध्ये स्वातंत्र्यानंतर 60 वर्षे उलटून गेली तरी उरण तालुक्यातील पूर्व भागाला अद्याप वीज म्हणजे काय असते हे माहिती नाही. उरण तालुक्यातील कोद्रोली पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात शासनाने 20 वर्षापूर्वी धरण बांधले आहे. या धरणाच्या वरच्या बाजूला आदिवासींचा पाडा आहे. आदिवासींच्या 35 कुटुंबांना शासनाने घरकूल योजनेतून घरे बांधून दिली. परंतु त्यांना अद्याप वीज पुरवठा केला नाही. हे ऊर्जा खाते आहे? दुष्काळामुळे ग्रामीण भागाला भारनियमनाचा फटका अधिक प्रमाणात बसतो आहे. या महाराष्ट्रातील हजारो पाणीपुरवठा योजना विजेवर चालणाऱ्या आहेत. विजेमुळे योजनांचे पंपिंग होते. परंतु महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात 12-12 तास, 14 तास, 18 तास लोडशेडिंग होत असेल तर हजारो पाणीपुरवठा योजनांचे पाणी पंपिंग होणार नाही. परिणाम दिसू लागले आहेत. पंपिंग होत नाही म्हणून पाणीपुरवठा योजनांच्या माध्यमातून गावांना, शहरांना, ब व क वर्ग नगरपालिकांच्या क्षेत्रात आठ ते दहा दिवस नळाद्वारे पाणीपुरवठा होत नाही. अशा प्रकारे भारनियमन वाढत गेले तर ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था काय करणार आहात? पिण्याच्या पाण्याच्या नळयोजनांचे काय करणार आहात? टंचाईच्या परिस्थितीत शासनाने जाहीर केले की, ग्रामपंचायतींनी विजेची बिले भरली नाहीत म्हणून विजेचे कनेक्शन कापले जाणार नाही. परंतु वीज पुरवठा होत नसेल तर त्या कनेक्शनचा उपयोग काय? आज ग्रामीण भागातील हजारो पाणीपुरवठा योजना विजेअभावी बंद आहेत. अनेक उद्योगधंदे बंद आहेत.

सभापती महोदय, डिझेलची किंमत वाढली. गावातील चक्क्या बंद झाल्या. ज्या दराने शेतकरी एक किलो ज्वारी खरेदी करतो तोच दर एक किलो ज्वारी दळण्यासाठी द्यावा लागतो. शेतकरी एक किलो धान्य ज्या दराने खरेदी करतो तोच दर एक किलो धान्य दळण्यासाठी द्यावा लागतो. कारण आता ग्रामीण भागातील चक्क्या विजेऐवजी डिझेलवर चालविल्या जात आहेत. इतकी भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. शेतकऱ्यांचे 5 लाख कृषिपंपाचे अर्ज प्रलंबित





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

आहेत. पंप दिले काय आणि नाही दिले तरी खंत वाटणार नाही. कारण पंप देऊनही उपयोग काय? वीज पुरवठा देणार नसाल तर त्या पंपांचा उपयोग काय? 5 लाख शेतकरी वीज कनेक्शनची मागणी करीत आहेत. शासन त्याची परिपूर्ती करु शकत नाही. अशा प्रकारे विजेचा अंधार महाराष्ट्रामध्ये निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, वाढीव भारनियमन ही एकच गोष्ट निवडणुकीमध्ये शासनकर्त्यांना नडणार आहे. आता जनतेला कोणत्या पुढाऱ्याची गरज नाही. कोणत्या नेत्याची गरज नाही. जनताच रस्त्यावर येत आहे. काचा फोडत आहे. वीज मंडळाच्या कार्यालयांना टाळे लावण्याचे काम करीत आहे, अधिकाऱ्यांना घेराव घालीत आहे, अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासत आहे. आता जनतेला कोणत्या पुढाऱ्याची गरज नाही. या भारनियमनाचा गांभीर्याने विचार झाला नाही तर काँग्रेसच्या एकाही पुढाऱ्याला गावात मुक्तपणे फिरता येणार नाही, इतकी भयानक स्थिती निर्माण झाली आहे. याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा. केंद्र सरकारकडे अधिक वीज पुरवठ्याची मागणी करण्यात यावी. केंद्रातील ऊर्जामंत्री हे महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणारे आहेत. त्यांना राज्यातील परिस्थिती बिघडली असल्याचे कळविण्यात यावे. आज शासन दोन-दोन तासांनी भारनियमनाचा कालावधी वाढवित आहे. त्याऐवजी तो कमी केला पाहिजे. विजेचे संच बदलण्यात यावेत. शासनाने सांगितले की, पैसा नाही. एका वृत्तपत्राने बातमी प्रसिध्द केली. 'कॅबिनेटच्या बैठकीमध्ये भारनियमनावरुन मंत्र्यांची जुंपली' असा मथळा देऊन एका वृत्तपत्राने बातमी प्रसिध्द केली.

(नंतर श्री.भारवि...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, सरकारकडून वीज मंडळाला 2 हजार कोटी रूपये येणे आहे. ज्यावेळी वीज मंडळाचे विभाजन करण्यात आले, त्यावेळी शासनाने दोन हजार कोटी रूपये वीज मंडळा द्यावेत अशा मागणी वीज मंडळाकडून करण्यात आली होती. तेथेच मंत्र्यांची जुंपली. दोन हजार कोटी रूपये वीज मंडळाला मिळू शकले नाहीत. महाराष्ट्रात नवीन संचासाठी एमओयु केले. यासाठी 30 हजार कोटी रूपये लागणार आहेत. हे 30 हजार कोटी रूपये शासन कुठून आणणार आहे ? प्रकल्प कसे उभे करणार आहात ? यासंबंधीची सविस्तर माहिती सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व जनतेला दिली पाहिजे. ग्रामीण भागातील आणि अ, ब, क नगरपालिकेच्या हद्दीत राहणाऱ्या जनतेची अवस्था काय असेल ? महिन्या दीड महिन्यापूर्वी सह्याद्री गेस्ट हाऊसवर केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी बैठक घेतली होती. यासंबंधातील बातमी आपण वर्तमानपत्रात वाचली असेल. बैठक सुरू झाल्यानंतर तेथील वीज गेली. मंत्री घामाघूम झालेत. मग अधिकाऱ्यांची धावपळ सुरू झाली. तेथे फक्त 20 मिनिटे वीज गेली. 20 मिनिटांमध्ये अधिकाऱ्यांनी धावपळ करून पंखे, लाईट सुरू करण्याचा कसाबसा प्रयत्न केला. 20 मिनिटांमध्ये आपली ही अवस्था झाली तर ग्रामीण भागातील माणूस 20-20 तास कसा जगत असेल याचा आपण गांभीर्याने विचार करावा. त्याचा अंत पाहू नका. त्याचा विचार केला नाही तर फार दिवस आपण सत्तेवर राहू शकणार नाही. केंद्रात आपले सरकार काही मताने वाचले. आज महाराष्ट्रातील 8कोटी जनता वीज नसल्यामुळे भरडली जात आहे. त्यामुळे उद्योगपती, मंत्री, नट-नट्या यांचे कनेक्शन तोडण्याची हिंमत करावी. तशी आपली हिंमत आहे काय ? पण गरीब माणसाचे वीज कनेक्शन तोडण्यासाठी आपले अधिकारी दादागिरी करतात. हे सर्व बंद झाले पाहिजे. वीज गळती बंद झाली पाहिजे. वीज चोरी बंद झाली पाहिजे. नवे संच कसे उभे करणार हे आम्हाला सांगा. 30 हजार कोटी रूपये कसे उभे करणार हे आम्हाला सांगा. पाच लाख वीज कनेक्शन कसे देणार हे आम्हाला सांगा. लोड शेडिंग कसे कमी करणार हे देखील आम्हाला जाता-जाता सांगावे एवढीच विनंती करून मी माझे भाषण पूर्ण करतो.

......

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

एका बाजूला दुष्काळ आहे, पिण्याच्या पाण्याची कमतरता असल्यामुळे आमदारांना आपापल्या मतदार संघात जाऊन काम करावयाचे असल्यामुळे अधिवेशन गुंडाळत आहोत अशा प्रकारचे वक्तव्य शासनाच्यावतीने माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी केले आहे. कमीतकमी कालावधीचे अधिवेशन म्हणून या अधिवेशनाकडे पाहिले जाईल. या कालावधीत सरकारच्या कार्यक्षमतेचा, अकार्यक्षमतेचा नमुना आम्हाला पहायला मिळालेला आहे. प्रचंड भारनियमाने जनता त्रस्त आहे. विजेच्या प्रस्तावावर चर्चा सुरू असताना ऊर्जा मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. आम्हाला दोन्ही सभागृहामध्ये उपस्थित रहावे लागते अशा प्रकारची कारणे ते सांगतात. ऊर्जा मंत्र्यांचे भाषण ऐकल्यानंतर भारनियमनावर एक तरी तोडगा त्यांच्या भाषणात सापडला तर ते नशिब म्हणावे लागेल. मंत्रिमहोदयांचे भाषण एकत्र करून दहा विद्यर्थ्यांनी डॉक्टरेट केली तर भारनियमानासंबंधी तोडगा काढल्याचा एकही मतितार्थ सापडणार नाही, हे मी येथे नमूद करू इच्छिते. त्यांची अनेक भाषणे मी वारंवार ऐकली आहेत. वाहिन्यांवर त्यांच्या बरोबर गेली आहे. प्रेक्षक असो किंवा सूत्रसंचालन करणारे लोक असोत वा पॅनलिस्ट असो, मंत्रिमहोदयांच्या भाषणामध्ये कुठलाही तोडगा नसतो. आज मी भाग्य समजते की, येथे अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत मंत्री उत्तर देणार आहेत. निदान ते तरी सर्वांना हैराण करीत नाही. खरे काही असेल तर लांबलचक ऐकून घेण्याची आमची सहनशक्ती असते. विधिमंडळातील कोणताही आमदार 30 ते 45 मिनिटाचे भाषण ऐकण्याच्या मन:स्थितीत नाही. तिच तिच उत्तरे मंत्रिमहोदय देत असतात.

यानंतर श्री.पी खर्चे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ......

परंतु तीच तीच उत्तरे ऐकायला मिळतात, रिझल्ट मात्र काहीच नाही, अशी परिस्थिती आहे. दरवेळी असे दिसते विधानपरिषदेतील आमदार आणि आपण देखील यासभागृहात बराच वेळ बसतो, चर्चा करीत असतो,विचार मांडतो आणि त्यातील मुद्दे न घेता कोणीतरी एकत्र केलेले मुद्दे फक्त त्या त्या सदस्यांचे नाव घेऊन संदर्भ दिला जातो. ज्याप्रमाणे शाळेत जाणारी मुले त्यांच्या पाठातील जोड्या लावतात त्याप्रमाणे त्यांना कोणाचे भाषण आणि कोणाचे मुद्दे अशा जोड्या लावायला दिल्या तर तेही सांगू शकतील अशीच भाषणे या सभागृहात होतात. परंतु अमुक सदस्याने अमुक मुद्दा मांडला आणि त्यावर हे उत्तर अशा प्रकारची ठोस भाषणे मात्र येथे ऐकायला मिळत नाहीत, ठोस आश्वासने मिळत नाहीत. याचे महत्वाचे कारण गेल्या 7-8 वर्षात उर्जा क्षेत्रातील दुर्दशा. त्या दुर्दशेचा विचार करायला गेलो तर स्पष्टपणे असे दिसते की, या राज्यात एकही नवीन उर्जा प्रकल्प उभा राहिला नाही. त्याची कारणे म्हणजे बेजबाबदार सरकार आणि या सरकारचे धोरण, भूसंपादनातील अडथळे, प्रकल्पासाठी निवडलेल्या चुकीच्या जागा ही सांगता येतील. रायगड जिल्ह्यातील वातावरण आज त्यामुळेच खदखदत आहे. अशा प्रकारे जेथे जेथे उर्जा प्रकल्पांची उभारणी करण्याचा विचार हे शासन करीत आहे, त्यांची जागा योग्य पध्दतीने व विचार करुन निवडलेली नाही. तसेच पूर्वीच्या उर्जा प्रकल्पांच्या बाबतीत विचार केला तर परळी आणि पारस हे आहेत. परंतु अजुनही त्यांची वीज निर्मिती सुरु झालेली नाही. अलिकडच्या काळातील विजेच्या संदर्भातील उद्योग जे येत आहेत ते सर्व रायगड जिल्ह्यातच आणण्याचा प्रयत्न होत आहे. कारण त्यांना मुद्दाम मुंबईशी कनेक्टिव्हिटी पाहिजे असते. परंतु ज्या भागात जमिनीला प्रचंड भाव आहे, जी जमीन सुपीक आहे अशाच ठिकाणी उर्जेचे प्रकल्प घ्यायला परवानगी देऊ लागले तर शेतकरी आंदोलन करणार यात वादच नाही. मी हे केवळ माझ्या पक्षाचे समर्थन अथवा कौतूक करण्यासाठी बोलत नाही तर वस्तुस्थिती म्हणून शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे साठी आपण शेतकऱ्यांच्या जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया केली. तशा प्रकारे ज्या ठिकाणी कमीत कमी आक्षेप असतील अशाच जागा या प्रकल्पांसाठी निवडावयाच्या की ज्या भागात जमिनीला जास्तीत जास्त भाव असेल त्या जागांवर प्रकल्प घेण्यास परवानगी द्यावयाची याचा कुठे तरी विचार करण्याची गरज आहे. परंतु रायगडमधील जमिनीचे भाव लक्षात घेऊन

.......2

डॉ. नीलम गोऱ्हे ......

आणि हाच मुलाधार लक्षात घेऊन अशा उर्जा प्रकल्पांना मंजुरी दिली जाते, असे मला वाटते. याउलट असे प्रकल्प उभे करावयाचेच होते तर त्यासाठी तज्ज्ञांच्या मदतीने, सुकर पध्दतीने आणि शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन प्रकल्पासाठी जागेची निवड केली असती, लोकांच्या सहकार्याने, त्यांच्या सहभागातून जागा निवडली असती, ज्या जमिनीवर तेवढे उत्पादन होत नाही अशा ठिकाणी हे प्रकल्प उभारता आले असते. पण गेल्या 5-6 वर्षांमध्ये एकाही प्रकल्पाला परवानगी आपण दिलेली नाही. कारण त्यासाठी तांत्रिक अडचणी आहेत, कधी एनओसी मिळत नाही म्हणून एकही प्रकल्प उभा राहिला नाही. दुर्देवाची गोष्ट म्हणजे यासंदर्भात आत्मपरीक्षण करण्याची शासनाची तयारी नाही. आज सन 1999 पासून 2008 साल सुरु आहे आणि या 10 वर्षांमध्ये राज्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादीचेच सरकार सत्तेवर आहे. मघाशी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उल्लेख केला त्याप्रमाणे जनतेला आश्वासने देऊन त्यांची दिशाभूल कशा प्रकारे या सरकारने केली हे त्यावरुन स्पष्ट होते. कदाचित आपल्याही लक्षात असेल की नागपूर अधिवेशनात सन 2004 मध्ये ज्यावेळेस हे सरकार दुसऱ्यांदा सत्तेवर आले त्यावेळेस माननीय उपमुख्यमंत्री बोलत असताना त्यांनीच दिलेल्या आश्वासनांच्या बाबतीत त्यांनी समर्थन करताना म्हटले होते की, "मरता क्या नही करता". अशा प्रकारे जनतेला महामुर्ख बनविण्याचे राजकारण हे करीत आहेत. तसेच या आश्वासनांच्या बाबतीत दोन तीन महिने प्रिंटिंग मिस्टेक म्हणून लोकांना ठकवावयाचे. परंतु माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी आश्वासन दिले त्यावेळी मात्र "अव्यवहारी नेता" म्हणून हेच सांगतात परंतु दुसऱ्या बाजूला लोकांना मुर्ख बनविण्याचे राजकारण हे करतात. याची परिणीती म्हणजे राज्यात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या, गावोगावी झालेली बेरोजगारी, वेगवेगळ्या भागात होत असलेले विजेचे भार नियमन 6 ते 12 तास आणि त्यामुळे संपूर्ण सामान्य जीवन कशा पध्दतीने खिळखिळे होत चालले याची शेकडो उदाहरणे मांडता येतील. इस्पितळ म्हटले की, भार नियमन, वेगवेगळे उद्योग, संगणक. परंतु पुण्यात ज्याप्रमाणे सर्व उद्योग धंद्यांनी एकत्र येऊन या भार नियमनातून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला व स्वतंत्र वीज निर्मिती करुन हा भार हलका करण्याची तयारी दाखविली आणि त्यातून वाढीव दराची वीज घेण्यासाठी या भागातील उद्योग ग्राहकही तयार आहेत त्या पुणे शहरातील श्री. प्रदीप भार्गव हे इंडस्ट्रीज असोशिएशनचे अध्यक्ष जे आहेत त्यांचेही अनुभव विचारात घेणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुध्दित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ MMP/ प्रथम श्री. खर्चे.... 16:45

डॉ. नीलम गो-हे.....

की, लोक जर स्वत:हून वीज तयार करीत असतील तर त्यासंदर्भात शासनाची काय भूमिका राहणार आहे असा आम्ही विजेच्या संदर्भात या सभागृहात प्रश्न विचारला होता परंतु यासंदर्भात आम्हाला शासनाकडून कोणत्याही प्रकारची माहिती मिळू शकली नाही. आज पुण्यामध्ये सुध्दा बाकी महाराष्ट्रासारखेच 5-6 तासाचे भारनियमन सुरु झालेले आहे. ऊर्जा विभागाला लोकांच्या सहभागातून तयार होणारे प्रकल्पच नको आहेत हे त्यातील महत्वाचे कारण आहे. 1971 ते 81 या काळात वीज निर्मितीमध्ये 10 टक्क्याने वाढ झाली होती. सन 1981 ते 91 या 10 वर्षाच्या काळात 10 टक्क्याने वाढ झाली होती, सन 1999 ते 2001 मध्ये 7 टक्क्योन वाढ झाली होती आणि 2001 ते 2008 या काळात वीज उत्पादनात फक्त .40 टक्क्यानेच वाढ झालेली आहे. खरे म्हणजे वीज उत्पादनातच वाढ होत नाही. एमएसईबीच्या संदर्भात पूर्वी "मंडे टू संडे वीज बंद" अशी व्याख्या होती. वीज मंडळाचे शासनाने तीन कंपन्या केल्या व या तीन कंपन्यामार्फत आज ग्राहकांना वीज उपलब्ध होत आहे. पंरतु महावितरण कंपनीने राज्यातील वितरण आणि वहन तूट भरुन काढण्यासाठी विद्युत नियामक आयोगाकडे आर्थिक पाठबळाची मागणी केली होती. आर्थिक पाठबळीच्या संदर्भात वीज नियामक आयोगाने परवानगी दिली की, तुम्ही 1999 ते 2003 पर्यंत ही तूट भरुन काढण्यासाठी राज्यातील विविध प्रवर्गातील वीज ग्राहकांकडून रक्कम घ्या. प्रत्यक्षात 2003 मध्ये मुदत संपल्यानंतर देखील महावितरण कंपनीने 3228 कोटी रुपये वीज ग्राहकांकडून उकळले. वितरण कंपनीने 3228 कोटी रुपये वीज ग्राहकांकडून उकळत असतांना काय पध्दतीने नियम लावला यासंदर्भात लोक विद्युत कक्षांमार्फत, न्यायालयांमार्फत दादा मागत आहेत. मराठवाडयातील अनेक औद्योगिक मंडळी आम्हाला जास्तीची बिले का लावली म्हणून विचारीत आहेत. या ठिकाणी भारनियमनाची चर्चा सुरु असतांना भारनियमानाच्या संदर्भात आम्ही काही तोडगे सांगणार आहोत. सरकारी पैशांची कशा प्रकारे फसवणूक करण्यात आलेली आहे त्याची माहिती मी देणार आहे. लेखापालांच्या अहवालात जे ताशेरे मारण्यात आलेले आहेत ते मी या ठिकाणी सांगणार आहे. भंडारा जिल्हयाच्या योजनेत 3 वर्षाच्या कालावधीत 667 कृषी पंपाना विद्युत जोडणीची योजना समाविष्ट केली होती. या योजनेसाठी 2.65 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. 2004 मधील योजना आयोगाच्या निर्देशा प्रमाणे राष्ट्रीय समविकास निधीतून ट्रान्सफॉर्मर, हाय टेन्शन लाईन आणि लो टेन्शन लाईन्सच्या खर्चाला परवानगी नव्हती.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे.....

परंतु प्रत्यक्षात मात्र असे आढळून आले की, 2005-2007 या कालावधीत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, भंडारा यांना 1.30 कोटी रुपये प्रदान करण्यात आले. मार्च, 2007 पर्यंत त्यातील 1.26 कोटी रुपये खर्च करण्यात आले. त्यांनी असे सांगितले की, आम्ही 203 लाभार्थ्यांना विद्युत जोडणीची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे. 1.26 कोटी रुपये खर्च केल्यानंतर असे दिसून आले की, 203 लाभार्थ्यांपैकी 39 लाभार्थ्यांना विद्युत जोडणी करुन देण्यात आली परंतु या 39 लाभार्थ्यांना कृषी विभागाकडून विद्युत पंपच उपलब्ध करुन देण्यात आले नव्हते. परिणामी 25 लाखाचा खर्च वाया गेलेला आहे. जर अशा प्रकारे सरकारी पैशाला गळती लागत असेल तर ते योग्य नाही. वीज वितरणासाठी जो निधी आलेला आहे तो या प्रकारे एका बाजूने वापरला जात आहे, दुसरीकडे समांतर वीज केंद्र चालवली जातात आणि तिसरेकडे वीज ग्राहकांकडून 3228 कोटी रुपये उकळले जात आहेत. इनव्हर्टर, कॅपॅसिटर यांच्या एजन्सीज नक्की कोणाला दिलेल्या आहेत यासंदर्भात प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे वीज कारभारात संपूर्णपणे गैरव्यवस्थापन,राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि विजेच्या गळतीच्या संदर्भात चुकीची भूमिका ही त्याची कारणे आहेत. विजेच्या संदर्भात या सदनात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. जे ग्राहक प्रामाणिक आहेत, नियमित बिले भरतात परंतु सर्वच ग्राहक काही कमी बिले भरणारी नसतात.

यानंतर श्री. गायकवाड....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ श्री.जुन्नरे नंतर 16.50

डॉ.नीलम गो-हे ......

सभापती महोदय, वीज चोरीच्या संदर्भात मला एक मुद्दा मांडावयाचा आहे.आज मोठया प्रमाणावर विजेची गळती आणि विजेची चोरी होत असते. ज्या भागात जास्त वीज चोरी होईल त्या भागात जास्त तास भार नियमन केले जाईल असा नियम करण्यात आला आहे परंतु प्रत्यक्षात असे दिसून येते की, जे लोक प्रामाणिकपणे विजेची बिले भरतात त्यांच्यासाठीच जास्त तास भारनियमन लागू केले जाते. तेव्हा याबाबतीत देखील योग्य ते निकष लावण्यात आले पाहिजेत. वीज निर्मितीची जी यंत्रणा आहे त्यामध्ये योग्य पध्दतीची दुरुस्ती केली तर पुष्कळ वीज गळती आपल्याला रोखता येईल.असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, वीज बचत आणि अपारंपारिक ऊर्जा निर्मिती या दोन अत्यंत आवश्यक गोष्टी आहेत. समाजामध्ये जी चांगली माणसे आहेत त्या चांगल्या माणसाकडून सूचना मागविण्यासाठी जेव्हा सरकार त्यांना बोलावते तेव्हा ती माणसे सरकारकडे गेल्यानंतर जनतेने वीज बचत कशी करावी याबाबतीत सूचना करतात आणि जनतेसमोर गेल्यानंतर सरकारने काय करावयास पाहिजे हे सांगतात. भारनियमनाच्या समस्येला तोंड देत असतांना लोकांनी विजेची बचत कशा प्रकारे करावी या संदर्भात नेहमीच वर्तमानपत्रात बातम्या प्रसिध्द केल्या जातात. अर्थात अशा बातम्या प्रसिध्द करणे योग्य आहे असे मला सुध्दा वाटते. परंतु वीज बचत करीत असतांना विजेची चोरी आणि विजेची गळती रोखण्यासाठी शासकीय यंत्रणा कशा प्रकारे मजबूत केली पाहिजे या संदर्भात मात्र कोठेही बोलले जात नाही ही वस्तुस्थिती आहे त्याचप्रमाणे अपारंपारिक ऊर्जा निर्मितीची आवश्यकता असतांनासुध्दा सातारा जिल्हयामध्ये ज्या ज्या ठिकाणी पवन चक्क्या उभारण्यात आल्या होत्या त्या बाबतीत शेतक-यांची फसवणूक करण्यात आल्याबद्दल काल सभागृहामध्ये एक मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. एका बाजूला भार नियमनामुळे लोक त्रस्त झाल्यामुळे अनेक जण अपारंपारिक ऊर्जेचा वापर करण्याकडे वळतात. अनेक लोकांनी सौर ऊर्जेची युनिटस आपापल्या घरामध्ये बसवून घेतलेली आहेत. मी सुध्दा सौर ऊर्जेचे युनिट वापरत असल्यामुळे मला त्यासंबंधी पूर्ण कल्पना आहे. दोन तीन वर्षे झाल्यानंतर हे युनिट बिघडलेले आहे त्यामुळे नवीन बसवून घ्यावे लागेल. असे अनेक उत्पादक सांगत असतात. एकदा सौर ऊर्जेचे युनिट बसविल्या नंतर ग्राहकांना असे वाटते की आपल्याला कायम स्वरुपी या युनिटचा उपयोग होईल म्हणूनच हे युनिट बसविण्यासाठी ती व्यक्ती पंधरा ते वीस हजार रुपये खर्च करीत असते

2..

अशा वेळी ग्राहकांच्या हिताचे रक्षण योग्य प्रकारे केले जात नाही. अनेक जण सौर ऊर्जेची यंत्रणा बसवत असल्यामुळे विविध कंपन्यांच्या अनेक युनिटसची विक्री होत असते परंतु तीन चार महिन्यानंतर ते नादुरुस्त व्हावयास लागल्यानंतर या लोकांना मेन्टेनन्सकरिता मनस्ताप सहन करावा लागतो या सौर ऊर्जेचा फायदा आपल्याला मिळणार आहे किंवा नाही? याबाबतीत लोकांच्या मनात शंका निर्माण होत असते. सौर ऊर्जेच्या यंत्रसामुग्रीच्या संदर्भात काम करणा-या ज्या एजन्सीज आहेत त्यांनी लोकांची फसवणूक होता कामा नये हे सुध्दा पाहिले पाहिजे त्याचप्रमाणे या कंपन्याच्या जाहिरातीमध्ये सरकारचे नाव निर्देशित केले तर जिल्हा परिषदा आणि इतर ठिकाणाहून कॉन्ट्रॅक्टस लवकर मिळतील. गुणवत्तेच्या बाबतीत योग्य तो दर्जा न ठेवता सौर ऊर्जेच्या संदर्भात बचत गटांना तसेच इतरांना मीस गाईड करणा-या काही एजन्सी आज निर्माण झालेल्या आहेत त्याही बाबतीत शासनाने योग्य ती दक्षता घेतली पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, पवन चक्क्यांना परवानगी देण्यासबंधी ऊर्जा विभागाचा संबंध येत असतो . महाउर्जाने तुळजाभावनी विंड फॉर्मना 35 प्रकल्प उभारण्यास परवानगी दिली होती परतु या सस्थेने भारतातील अनेक ठिकाणाहून लाभधारक जमा केले होते. अपारंपारिक ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात जर लोकांनी गुंतवणूक केली तर या कंपनीला 70 टक्के आर्थिक फायदा होऊ शकतो. तुळजा भवानी विंड फार्मने भू विज्ञान आणि खणीकर्म विभागाचे बोगस ना हरकत प्रमाणपत्र सादर केले होते. तुळजाभावनी विंड पार्मला ब्लॅकलिस्ट करण्यात आले आहे काय त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे, त्यांना अशा प्रकारे बोगस ना हरकत प्रमाणपत्र देणारे अधिकारी कोण आहेत?. अशा प्रकारे बोगस प्रमाणपत्र दिल्याबद्दल त्यांच्याविरुध्द गुन्हेगारी स्वरुपाचे खटले दाखल करावयास पाहिजे होते व त्यांच्यावर खटला दाखल करुन शिक्षा व्हावयास पाहिजे. तशा प्रकारची कारवाई त्यांच्या विरुध्द करण्यात आली आहे काय ? वीज चोरी पकडण्यासाठी पोलिसांचा एक स्वतंत्र विभाग तयार करण्यात आला आहे त्याप्रमाणे फास्ट स्ट्रॅक कोर्ट सुरु करुन बोगस प्रमाणपत्र देणा-या गुन्हेगारांविरुध्द खटला सुरु केला पाहिजे हे संघटीत गुन्हेगार आहेत त्यामुळे त्यांनी ऑर्गनाईज क्राईम केला म्हणून त्यांच्याविरुध्द मोक्का कायदा देखील आपण लावू शकतो. हा गुन्हा करणारा एकटा गुन्हेगार नाही तर त्याच्या पाठीमागे



VTG/ MMP/ SBT/ श्री.जुन्नरे नंतर 16.50

डॉ.नीलम गो-हे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एक यंत्रणा आहे .तेव्हा त्यांच्या विरुध्द त्वरित कारवाई करण्यात यावी. तुळजाभवानी विंड फार्मने शासनाचे फायदे घेऊन जनतेची फसवणूक केलेली आहे. ज्या ज्या ठिकाणी पवनचक्या उभारण्यात आलेल्या आहेत त्या त्या ठिकाणी गावक-यांनी अशी तक्रार केली आहे की ,मृत व्यक्तीच्या नावासमोर जींवत व्यक्तीची छायाचित्रे लावण्यात आलेली आहेत, 65 वर्ष वयाच्या खातेदारा ऐवजी 25 वर्षाच्या खातेदाराचा उल्लेख करण्यात आला आहे त्याचप्रमाणें जमिनीचे नंतर पैसे देतो असे सांगण्यात येते .नंतर पैसे मागण्यासाठी गेल्यावर एजंटकडून मारहाण केली जाते आणि एजंटाकडून असे सांगितले जाते की, " तुला जे काही मिळालेले आहे ते घे." त्याचबरोबर काही लोकांना असे सांगण्यात आले आहे की, " या कंपनीचे शेअर्स देण्यात येणार आहे.

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

आणि प्रत्यक्षात शेअर नावावर असेल किंवा नसेल परंतु त्या खातेदाराला त्या शेअरचे एका दमडीचे सुध्दा व्याज मिळालेले नाही. त्या शेअरचा पांढऱ्या कागदाचा तुकडा सुध्दा त्या शेतकऱ्याला मिळालेला नाही. तर मग त्या पवन चक्क्यांचा फायदा कुणाकडे जातो? या अपारंपारिक ऊर्जेचे फायदेकरी कोण आणि तोटेकरी कोण? या संदर्भात कोणतीही स्पष्टता झालेली नाही. म्हणून सातारा व सांगली जिल्हयातील या पवन चक्क्यांना ज्या ज्या ठिकाणी परवानगी दिली आहे, आणि ज्याठिकाणी लोकांनी गुन्हेगारी स्वरुपाच्या तक्रारी केल्या आहेत, त्याची संपूर्ण चौकशी करणे अतिशय गरजेचे आहे. मी या संदर्भात एवढेच सांगेन की, वीजेच्या संदर्भात अनेक जणांनी वेळोवेळी बिलामधून माफी मागितली आहे. त्यासंदर्भात आपणास कल्पना आहे की, नगर जिल्हयातील प्रवरानगर लोणी येथील उपसा जलसिंचन योजनेची कोटयावधी रुपयांची बिले वषानुवर्षे प्रत्येक सरकार माफ करीत असते. शेतकरी तोटयात आल्यामुळे काही बिले माफ करावी लागली हे आम्ही समजू शकतो. परंतु राजकीय सौदेबाजीसाठी जर का या गोष्टी केल्या जात असतील तर त्या तोडून काढल्या पाहिजेत किंवा त्याबाबतीत दुरुस्त्या झाल्या पाहिजेत. असे मला आवर्जून सांगावेसे वाटते. भारनियमाच्या संदर्भात लोकांनी आता इन्व्हर्टरचा, जनरेटरचा विचार करावा असे सांगत असतो. परंतु जनरेटरला लागणारे डिझेल सुध्दा प्रचंड महाग झाले आहे. तसेच, पाच ते सहा तास चालल्यानंतर इन्व्हर्टरसुध्दा बंद पडण्याची वेळ येते. तसेच, इनव्हर्टरवर सर्व उपकरणे चालतात असे नाही. आज भारनियमनामुळे संगणकापासून ते शेतीसाठी लागणाऱ्या विजेपर्यंत संपूर्ण अर्थव्यवस्था खिळखिळी होणार आहे. यामुळे महाराष्ट्राचा हळू हळू बिहार होण्याकडे वाटचाल सुरु आहे. याला चुकीचे नियोजन हे कारण आहे. आपल्याला जर भारनियमन कमी करावयाचे असेल तर माननीय ऊर्जा मंत्र्यांच्या भाषणाच्या भारातून जर कां नियमन केले आणि त्यांना मुद्यावर बोलण्यासाठी जर आपण प्रेरित करु शकलो तर निश्चितपणे उपयोग होईल.

सभापती महोदय, कोणत्याही मोठया प्रश्नाचे उत्तर देण्याकरिता जर मंत्रिमहोदयांनी कम्युनिकेशन स्कील वापरली तर दहा ते पंधरा मिनिटामध्ये सुध्दा त्यांचे उत्तर पूर्ण होऊ शकते. परंतु कोणताही प्रश्न विचारल्यानंतर त्यावर ते पंचवीस मिनिटे भाषण देत असतात. त्यामुळे किमान त्यांनी मुद्याला धरुन उत्तरे ध्यावीत. आणि सामान्य जनतेला भार नियमनातून कशाप्रकारे दिलासा मिळू शकेल या बाबत त्यांनी चर्चेच्या अनुषंगाने समर्पक उत्तर ध्यावे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/ SBT/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे....

शेवटी मी एवढेच सांगणार आहे की, ज्या ज्या वेळी ऊर्जेसंबंधी विषय निघतो. मग तो जाहीर सभेत निघो किंवा या सदनामध्ये निघो. त्या प्रत्येक वेळी चर्चेचे गाडे त्या एन्रॉनपाशी येऊन घसरत असते. एन्रॉनसंदर्भात जे एम.ओ.यू. करण्यात आले होते, त्यावेळी ज्या अटी घालण्यात आल्या, त्या एम.ओ.यू. च्या संदर्भात बऱ्याच अडचणी होत्या हे हळू हळू नंतर आपल्या लक्षात यायला लागले आहे. प्रत्येक वेळी जेव्हा आपण एन्रॉनची मुदत रद्द करीत होतो किंवा एन्रॉनला अडचणी निर्माण करीत होतो त्यावेळी जेवढया अडचणी तयार होतील तेवढा भारताचा घाटा होत होतो. त्यावेळी एम.ओ.यू. तशा प्रकारचे करण्यात आले होते. याचा अर्थ असा होतो की, आंतरराष्ट्रीय स्तरावरील कायद्याची समज असणारी माणसे महाराष्ट्र शासनामध्ये नव्हती. आणि महाराष्ट्र शासन त्यांची मदत घेऊ शकले नाही. त्यामुळे त्याचा फटका देशाला बसला. उलटपक्षी मी असे म्हणेन की, हे एक प्रकारचे षडयंत्र तयार करुन नंतरच्या काळात एन्रॉनचे अवडंबर तयार करण्याचा सातत्याने प्रयत्न झाला किंवा काय? याबद्दल सुध्दा चर्चा झाली पाहिजे. परंतु ऊर्जा निर्मिती ही एक अत्यावश्यक बाब आहे. त्यामुळे हे जे प्लँट रखडले आहेत, त्याबद्दल हुकूमशाही पध्दतीने ठोकून काढून त्याठिकाणी ऊर्जा प्रकल्प उभा रहाणे शक्य नसेल तर ते रद्द करुन दुसऱ्या ठिकाणी प्रकल्पाचे प्रोसेस सुरु करणे हाच त्यामधील व्यवहार्य मार्ग होऊ शकेल असे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते.

धन्यवाद. जय महाराष्ट्र.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक आधुनिकीकरण करण्यासाठी मदरसा शिक्षण बोर्ड स्थापन करणे यासंदर्भात समिति गठीत करणे

**पृ.शी.**: मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक आधुनिकीकरण करण्यासाठी मदरसा शिक्षण बोर्ड स्थापन करणे यासंदर्भात समिती गठीत करण्याबाबत शालेय शिक्षण मंत्र्यांचा प्रस्ताव

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधान परिषद नियम 158 अन्वये खालील प्रस्ताव मांडतो.

दिनांक 14 डिसेंबर, 2006 रोजी विधानपरिषद सभागृहात उत्तरित झालेल्या सर्वश्री सदाशिव पोळ, जितेंद्र आव्हाड, प्रा. फौजिया खान,वि.प.स. यांच्या " मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक आधुनिकीकरण करण्यासाठी मदरसा शिक्षण बोर्ड स्थापन करणे" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 23361 चर्चेच्या वेळी माननीय शालेय शिक्षणमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन उपाय योजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहाच्या खालील 25 माननीय सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी.

1. प्रा. वसंतराव पुरके, मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण
2. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स., विरोधी पक्षनेता
3. श्री. हसन मुश्रीफ, राज्यमंत्री, शालेय शिक्षण
4. श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स.
5. श्री. नरसय्या आडम, वि.स.स.
6. श्री. गजानन कीर्तिकर, वि.स.स
7. श्री. हर्षवर्धन देशमुख,वि.स.स.
8. श्री. वामनराव चटप, वि.स.स.
9. डॉ. सय्यद अहमद, वि.स.स.
10. श्री.हाफीज धत्तुरे, वि.स.स.
11. श्री. शेख रशिद हाजी, वि.स.स.
12. श्री. दुर्राणी अब्दुल्ला खान अ.लतिफ खान, वि.स.स.
13. श्री. खान मोहम्मद आरीफ नसीम, वि.स.स.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/ SBT/ MMP/

प्रा.वसंत पुरके....

14. श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
15. श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.
16. श्री. दादा भुसे, वि.स.स.
17. श्री. एकनाथराव गणपतराव खडसे-पाटील, वि.स.स.
18. श्रीमती शोभा बच्छाव, वि.स.स.
19. प्रा. फौजिया खान, वि.प.स.
20. श्री. मुजफ्फर हुसेन नझर हुसेन,वि.प.स.
21. श्री. पाशा पटेल, वि.प.स.
22. श्री.एम. एम.शेख,वि.प.स.
23. ॲड. अनिल परब,वि.प.स.
24. श्री.अरविंद सावंत, वि.प.स.
25. श्री. जितेंद्र आव्हाड,वि.प.स.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : प्रा. वसंत पुरके, शालेय शिक्षण मंत्री यांना मी या समितीचा समिती प्रमुख म्हणून नियुक्त करतो.

(यानंतर श्री. सुंबरे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यात अगोदरच 8 ते 15 तासांचे भारनियमन असताना 24.7.2008 पासून त्यात एक तासाने करण्यात आलेली वाढ.

**मु.शी.** : राज्यात अगोदरच 8 ते 15 तासांचे भारनियमन असताना 24.7.2008 पासून त्यात एक तासाने करण्यात आलेली वाढ. या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, डॉ.दीपक सावंत, श्री.विनोद तावडे, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, संजय केळकर, परशुराम उपरकर, प्रकाश शेंडगे, ॲड.अनिल परब, पाशा पटेल, वि.प.स. यांचा प्रस्ताव. (चर्चा पुढे चालू...)

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 259 अन्वये राज्यातील वीज तुटवड्यासंबंधीचा प्रस्ताव येथे आणला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये देखील हा प्रस्ताव आला होता आणि अनेक प्रकारच्या उपाय योजना सन्माननीय सदस्यांनी चर्चेच्या ओघात शासनाला दिल्या होत्या. परंतु मागील अधिवेशनापेक्षाही अधिक बिकट परिस्थिती सध्या सुरू आहे. प्रगतीशील महाराष्ट्रामध्ये जणू काही अंधारयात्रा सुरू आहे की काय अशीच परिस्थिती सुरू झालेली आहे. आज 8 तास लोडशेडींग होते ते 12 तासाचे झाले आहे, जेथे 12 तासाचे लोडशेडींग होते ते 16 तासांचे झाले आहे अशा प्रकारे जवळ जवळ 24 तास महाराष्ट्र अंधारातच बुडतो आहे की काय अशी परिस्थिती या वीज टंचाईमुळे निर्माण झालेली आहे. या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपल्याला सांगितले की, निरनिराळ्या प्रकल्पांमध्ये किती वीज निर्मिती क्षमता आहे आणि प्रत्यक्षात किती निर्मिती होते आहे. खरे तर हा विषय मागील वेळेसही चर्चिला गेला होता. मागील वेळेस दिलेले उत्तरच याही वेळेस मिळणार आहे, त्यात कोणतीही सुधारणा झालेली नाही त्यामुळे जी आपली क्षमता आहे ती आपण निर्माण केली तरी देखील लोडशेडींगवर काही प्रमाणात मात आपल्याला करता येईल अशी स्थिती आहे. परंतु त्या क्षमतेपेक्षा कमी वीज निर्मिती हा आपल्या अकार्यक्षमतेचा नमुना आहे असेच म्हणावे लागेल. या ठिकाणी वीज बचत आणि वीज निर्मिती असे दोन भाग आहेत. आपण गेल्या 10 वर्षात एकही मेगावॅट वीज निर्मिती करू शकत नसू तर वीज बचत तरी किती आणि कशी केली पाहिजे याचे

..... 4 जी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केळकर ....

मार्गदर्शन, दिग्दर्शन शासनाने केले पाहिजे. आज आमच्या खेड्यातील विद्यार्थी मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशात अभ्यास करीत आहे आणि मुंबईतील विद्यार्थ्याला मात्र पंचतारांकित अशा खोलीमध्ये, सोसायटीमध्ये, एसी रूमध्ये अभ्यास करायला मिळतो आहे अशा प्रकारची विषमता दिसते आहे. एका बाजूला एक भागामध्ये न्यूऑन साईनचे दिवे जळत असल्याचे पहावयास मिळतात तर दुसऱ्या बाजूला दुसरा भाग हा अंधारात बुडालेला असतो. तेव्हा यावर आपण काही पायबंद घालणार आहात की नाही ? या बाबतीत काही नियंत्रण आणणार आहात की नाही ? आज निरनिराळ्या सरकारी कार्यालयांमध्ये, कार्पोरेट कार्यालयांमध्ये अखंडितपणे 12-12 तास ए.सी. चालू असतो त्यावर पायबंद आपल्याला घालता येणार नाही का ? आपली आर्थिक राजधानी मुंबई असली तरी मुंबईमध्ये आपण काही मेगावॅट वीज अशा प्रकारे वाचविली तरी तिचा उपयोग बाकीच्या भागामध्ये आपल्याला होऊ शकेल. तेव्हा या बाबतीत शासनाने काही नियंत्रण आणण्याची गरज आहे असे मला वाटते. सभापती महोदय, आजच्याच वर्तमानपत्रात आलेले आहे की, ठाणे जिल्ह्यातील वाडा भागामध्ये उद्योगधंदे आहेत तेथे आंदोलन झाले. त्या ठिकाणी ज्या फिडरवर उद्योग आहेत त्याच फिडरवर तेथील गावे आहेत, निवासी भाग देखील आहे. त्यामुळे उद्योगधंद्यांना 40 तास लोडशेडींग होते तसेच ते त्या गावांना, निवासी घरांना देखील होते अशी स्थिती आहे. खरे तर ही स्थिती बदलता येऊ शकते. उद्योगधंद्यांसाठी वेगळा आणि गावांसाठी, निवासी भागासाठी वेगळा फिडर आपल्याला देता येऊ शकतो. परंतु अशा प्रकारे दूरगामी योजना न केल्यामुळे त्याचा परिणाम त्यांना भोगायला लागतो आहे आणि तेथील गावांपुढे 40-40 तास वीजेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, या ठिकाणी ठाणे जिल्ह्यासारख्या भागामध्ये बेलापूर पट्टीत तर एकेकाळी सोन्याचा धूर तेथील उद्योगधंद्यांतून निघत होता. त्या काळामध्ये आशिया खंडातील नंबर एकची औद्योगिक इस्टेट म्हणून 'वागळे इस्टेट' गणली जात होती. परंतु तेथे आज 60-70 टक्के उद्योगधंदे बंद आहेत, ते बाहेर जायला लागले आहेत. त्यांचा विचार या प्रगतीशील महाराष्ट्राने करण्याची गरज आहे. ...

( यानंतर सौ. रणदिवे .....4एच 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 17:05

श्री.संजय केळकर . . ..

याठिकाणी कोकणासाठी स्वामीनाथन् समितीने अनेक उपाययोजना सुचविल्या आहेत. मी देखील अनेक वेळेला पत्रव्यवहार केलेला आहे, प्रश्न उपस्थित केलेला आहे आणि माननीय मंत्री महोदयांनी वेळोवेळी सांगितलेले आहे की, आमचे अशा प्रकारच्या प्रस्तावांवर लक्ष आहे, आमचे प्रयत्न सुरु आहेत. आपण कोकणातील पाण्याचा उपयोग जल विद्युत निर्मितीसाठी करु शकतो. तेथे छोटी-छोटी जल विद्युत निर्मिती केंद्र उभी करु शकतो. परंतु त्यासाठी शासनाची इच्छा शक्ती पाहिजे, त्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावयास पाहिजेत. केवळ आमच्या प्रस्तावावर विचार सुरु आहे अशा प्रकारचे उत्तर न देता, जर तेथे छोटी-छोटी जल विद्युत निर्मिती केंद्र सुरु करण्यात आली तर कमी प्रमाणात का होईना, काही काळासाठी का होईना, वीज निर्मिती होऊ शकते.

सभापती महोदय, मला एका महत्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधावयाचे आहे. एका बाजूला असे सांगितले जाते की, "तुम भी खाओ, हम भी खाते है" अशा प्रकारे निरनिराळया विभागामध्ये काम सुरु आहे. म्हणजे तुम्ही देखील वीज चोरी करा आणि आम्ही देखील आमच्या पध्दतीने भ्रष्टाचार करतो अशी स्थिती आहे. मी मागील अधिवेशनामध्ये विजेच्या चर्चेच्या वेळेस रत्नागिरी जिल्हयातील उदाहरण दिले होते. . . .

. . . .4 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मदरसा बोर्डाच्या संदर्भात नेमण्यात आलेल्या तदर्थ समितीबाबत

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी मदरसा बोर्डाच्या संदर्भात जी तदर्थ समिती नेमण्यात आली आहे, त्यातील सदस्यांची नावे वाचण्यात आली. मी माहिती घेतली. या समितीमध्ये विविध पक्षाच्या सदस्यांना घेतलेले आहे हे ठीक आहे. पण या सदनामध्ये शिक्षक मतदार संघातून निवडून आलेले सन्माननीय सदस्य आहेत आणि मदरसा बोर्डाच्या बाबतीत, शिक्षणाच्या बाबतीतील ही समिती आहे. त्यामुळे त्यांच्यातील एका प्रतिनिधींना या समितीमध्ये घेतलेले आहे काय ? याबाबत मी माहिती घेतली आहे. या बाजूकडील दोन सन्माननीय सदस्यांना, त्या बाजूकडील दोन सन्माननीय सदस्यांना घेतले. पण कोणाला घ्यावयाचे . . . .

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांना सांगू इच्छितो की, याबाबतीत माझी काही अडचण नाही. यासंबंधात एका सन्माननीय सदस्यांचे नाव आलेले आहे. मीच सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगितले की, आपण माननीय सभापतींकडे नाव द्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शिक्षक मतदार संघापैकी कोणत्या सन्माननीय सदस्यांना घेण्यात यावे हे मी कसे सांगणार ? या सभागृहाचे ते एक भाग आहेत की नाही ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, या सभागृहाचे ते एक भाग आहेत हे निर्विवाद आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही सन्माननीय सदस्य श्री.मोतेसरांना . . . .

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण नाव द्याल असे वाटले होते. पण हा वेगळा मतदार संघ आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पक्षाने एक मुसलमान आहे म्हणून त्यांना सभासदत्व दिले. पण मदरसा बोर्डाशी त्यांचा काय संबंध आहे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची सूचना अतिशय रास्त आहे. मी मदरसा बोर्डाच्या संदर्भात नेमलेल्या समितीमध्ये एक नाव ॲड करतो.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे नाव दिलेले आहे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब यांना सांगू इच्छितो की, जी नावे आलेली आहेत, ती मी सर्व घेतलेली आहेत. फक्त यामध्ये शिक्षक ....

. . . .4 एच-3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

मतदार संघ हा महत्वाचा घटक राहिला होता.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आमच्या पक्षाकडून सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांच्या व्यतिरिक्त कोण सदस्य आहेत ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब आहेत. तसेच मला या समितीमध्ये एका सन्माननीय सदस्यांचे नाव समाविष्ट करण्यासाठी परवानगी द्यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

----

. . . .4एच-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: राज्यात अगोदरच 8 ते 15 तासांचे भारनियमन असताना 24.7.2008 पासून त्यात एक तासाने करण्यात आलेली वाढ

**मु.शी.** : राज्यात अगोदरच 8 ते 15 तासांचे भारनियमन असताना

24.7.2008 पासून त्यात एक तासाने करण्यात आलेली वाढ.
या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते,नितीन
गडकरी,डॉ.दीपक सावंत,श्री.विनोद तावडे,डॉ.नीलम गोऱ्हे,
सर्वश्री मधुकर चव्हाण,अरविंद सावंत,संजय केळकर,परशुराम
उपरकर,प्रकाश शेंडगे,ॲड.अनिल परब,पाशा पटेल वि.प.स.
यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु)

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, याठिकाणी एका बाजूला वीज चोरीला प्रोत्साहन दिले जाते, वीज गळती रोखली जात नाही आणि अनेक प्रकारचे घोटाळे वीज मंडळामध्ये पहावसयास मिळतात. त्यामुळे "तुम भी खाओ, हम भी खाएंगे" अशा प्रकारची स्थिती अनेक भागामध्ये दिसते. मागच्या अधिवेशनामध्ये मी रत्नागिरी जिल्हयातील वीज घोटाळयाबाबत माहिती दिली होती. त्या माहितीच्या अनुषंगाने अहवाल देणे बाजूलाच राहिले, उलट वर्तमानपत्रामध्ये असे जाहीर केले की, अशा प्रकारे घोटाळा झालेला नाही. ही बाब धादांत असत्य आहे. विधीमंडळामध्ये मी जाहीरपणे या घोटाळयाबाबत सांगितले होते आणि त्याची चौकशी केली जाईल असे माननीय मंत्री महोदयांनी देखील आश्वासन दिले. पण तेथील अधिकाऱ्यांनी जाहीर केले की, यामध्ये काही घोटाळा झालेला नाही.

सभापती महोदय, मी आपल्याकडे दुसरे एक उदाहरण देखील सादर केले होते की, मुंब्रा विभागात शीळ उपविभागातील अधिकाऱ्यांनी 15.46 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे दक्षता व सुरक्षा संचालनालयाने मान्य करुन, त्यात कसूरदार असलेल्या 18 अधिकारी व कर्मचारी यांची नावेही दिलेली आहेत. दोषी ठरविलेल्या 18 पैकी 10 कर्मचाऱ्यांना दोषमुक्त ठरवून पुन्हा कामावर घेतले आहे. याठिकाणी संबंधितांची चौकशी केली. यामध्ये 15 कोटी 46 लाख रुपयांचा घोटाळा केला आणि 18 जण दोषी आढळून आले. पण त्यांना कोणती शिक्षा दिली ? इतर 8 जणांना सोडूनच दिले आहे. तसेच ज्यांनी 15 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे, त्यापैकी कोणाची एक वर्षाची वेतनवाढ कायमस्वरुपात बंद केली, कोणाला दोषमुक्त केले. बहुतेक जणांना शिक्षा म्हणून त्यांची एक वर्षाची वेतनवाढ कायम स्वरुपात बंद केलेली आहे. एका बाजूला जनतेच्या पैशाचा अपहार करणाऱ्यांना, 15 कोटीचा घोटाळा करणाऱ्यांना केवळ एवढीच शिक्षा दिली जाणार





श्री.संजय केळकर . . . .

असेल तर मग म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावत जाईल, अशी स्थिती आहे. यामुळे संबंधितांना असे वाटेल की, आपण काहीही केले तरी एक वेतनवाढ रोखली जाते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

दुसरीकडून कोट्यवधी रुपये आपल्या खिशामध्ये पाडून घेतात. मग त्यांना वेतन मिळाले काय किंवा मिळाले नाही काय, काही फरक पडत नाही. त्यांचा पगार म्हणजे पॉकेटमनी सारखे आहे. अशाच प्रकारे जर आपण वीज मंडळाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई केली तर अशीच स्थिती निर्माण होईल. भ्रष्टाचार, घोटाळे थांबण्यापेक्षा ते वाढण्याची स्थिती निर्माण होईल. त्या ठिकाणी घोटाळा झालेला आहे, हे सिध्द झालेले आहे त्या ठिकाणी आपण कडक कारवाई करावयास पाहिजे. त्यांना ताबडतोब निलंबित करावयास पाहिजे. आपण फक्त एक वेतनवाढ थांबवली याचा अर्थ काय ? ते दुसऱ्या ठिकाणी गेले त्या ठिकाणी सुध्दा त्यांचा भ्रष्टाचार चालू आहे. त्याची माहिती नंतर देऊ. आपण या आठ अधिकाऱ्यांना सोडून दिले. ते ज्या ठिकाणी काम करीत आहेत त्या ठिकाणी ते भ्रष्टाचार करण्यासाठी मोकळे आहेत. माझी अशी मागणी आहे की, अशा प्रकारच्या घोटाळ्यामध्ये अडकलेल्या लोकांना त्या ठिकाणी ठेऊ नका. आताच अंधारयात्रा चालू आहे. लोक त्रासलेले आहेत. अशी माणसे त्या ठिकाणी जाऊन बसली तर आणखी त्या त्रासामध्ये भर पडेल. मागच्या अधिवेशन काळामध्ये दहावी आणि बारावीच्या परीक्षा चालू असताना अनेक केंद्रांवर विद्यार्थ्यांना काळोखामध्ये पेपर लिहावा लागला. उन्हाळ्यामध्ये पंखा नाही आणि दुसऱ्या बाजूला अंधार. प्रकाशाचा पत्ता नाही. आमची मुले वर्षभर अभ्यास करतात आणि परीक्षेला गेल्यानंतर त्यांना परीक्षा केंद्रावर लोडशेडींमुळे या सगळ्या गोष्टींना सामोरे जावे लागते. अचानक शासनाला कोणतीही दुरुस्ती करता येत नव्हती परंतु आता आपल्याकडे वेळ आहे. याबाबत शासनाने उपाययोजना केली पाहिजे. त्यावेळी अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले होते की, शासनाकडे पैसे नसतील तर आम्ही आमदार फंडातून जनरेटरसाठी, इन्व्हर्टरसाठी पैसे देण्यास तयार आहोत. आमची जी उद्याची पिढी आहे त्यांना योग्य प्रकारे परीक्षेला बसवावयाचे असेल तर त्या ठिकाणी योग्य पध्दतीची व्यवस्था करावी. आतापासूनच शासनाने त्याबाबतीत विचारविनिमय करुन योजना आखावी अशा प्रकारची मागणी करतो. केंद्राकडून अनेक वेळा आपल्याला पैसे येतात. ठाणे विभागामध्ये 107 कोटी रुपये जुनी मशीनरी बदलून नवीन बसवणे, वायरींग इत्यादीसाठी आले. त्या ठिकाणी पुन्हा नवीन घोटाळा होऊ नये म्हणून आतापासूनच त्या ठिकाणी व्हिजिलंस ठेवावा अशी मी मागणी करतो आणि या प्रस्तावाला पाठींबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

----

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी जो अतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर थोडक्यात माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्र राज्यात आज मोठ्या प्रमाणावर लोडशेडींग आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी सांगितले की, जवळजवळ 20 तासापर्यंत लोडशेडींग पोहोचलेले आहे. मुंबईतील काही भाग देखील लोडशेडींगच्या सावलीखाली आलेले आहेत. ठाणे, भांडूप, मुलुंडपर्यंत लोडशेडींग आले आहे. हे लोडशेडींग पश्चिम उपनगरांमध्ये सुध्दा येईल, पूर्व उपनगरामध्ये घाटकोपरपर्यंत लोडशेडींग येईल तसेच दक्षिण मुंबईमध्ये सुध्दा लोडशेडींग येईल अशी भीती वाटते. ज्या ज्या वेळी या विषयावर चर्चा केली गेली त्या त्या वेळी माननीय ऊर्जा मंत्र्यांनी जी भाषणे केली ती अतिशय ठोकळेबाज केली. मी त्यांची तीन भाषणे वाचली त्यामधील सारांश एकच आहे. 2009 मध्ये विजेचे संकट पूर्णपणे दूर होणार आहे असे माननीय केंद्रीय ऊर्जा मंत्र्यांनी सांगितले. केंद्रीज ऊर्जा मंत्र्यांनी ते सांगत असताना आता काय करावयास पाहिजे हे मुळीच सांगितलेले नाही. सध्या मुंबईवर आणि महाराष्ट्रावर जे संकट घोंगावत आहे त्याबाबत काही सांगितले नाही. भांडूप, मुलुंडमधील विद्यार्थ्यांना परीक्षेच्या काळात मेणबत्तीच्या प्रकाशात अभ्यास करावा लागत असेल तर कसे होईल. ? दुनिया मेरे मुठ्ठी में असे सांगणारे रिलायन्स कंपनीचे श्री. अंबानी यांच्यावर वीज ग्राहकांचा राग आहे. त्यांनी लोकांचा गळा पकडलेला आहे. त्यामुळे दुनिया मेरे मुठ्ठी में ऐवजी गर्दन मेरे मुठ्ठी में अशी परिस्थिती आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, मी केवळ दोनच मुद्दे मांडणार आहे. यानंतर विजेच्या बिलात 10 टक्क्यांनी वाढ होणार असल्यामुळे 26 लाख लोकांवर दरवाढीची कु-हाड कोसळणार आहे. रिलायन्स, टाटा, बेस्ट यांच्या विजेचा तुलनात्मक अभ्यास केला तर रिलायन्सचे दर खूप जास्त आहेत. त्यांचे स्टॅण्डबाय चार्जेस काय असतात ते मला कळलेले नाही. मुंबईमध्ये 2,600 मे.वॅट इतकी वीज लागते. मुंबईतील पश्चिम व पूर्व उपनगरामध्ये रिलायन्स एनर्जीकडून विजेचा पुरवठा केला जातो. त्यांचे दर किती आहेत ते मी सभागृहाच्या माहितीसाठी वाचून दाखवितो. 100 युनिटपर्यंत 1.40 पैसे दर होता तो 1.45 पैसे होईल, 101-300 युनिटपर्यंत 3.50 पैसे होता तो 3.75 पैसे होईल, 301-500 पर्यंत 5.60 पैसे होता तो 5.75 पैसे होईल आणि 500 पेक्षा अधिक युनिटसाठी 6.10 पैसे होता तो 6.40 पैसे होणार आहे. हा घरगुती विजेचा दर आहे, कमर्शिअल विजेचा दर नाही. सध्या गॅस, रॉकेल, भाज्या इत्यादी सर्व गोष्टी महाग झालेल्या आहेत. वाढत्या महागाईमुळे चाकरमान्यांवर परिणाम झाला आहे. सभापती महोदय, टाटाचे विजेचे दर फार वेगळे आहेत अशातील भाग नाही. 100 युनिटपर्यंत 1.50 पैसे, 101-300 युनिटपर्यंत 3.50 पैसे, 301-500 युनिटपर्यंत 5.20 पैसे आणि 500 पेक्षा अधिक युनिटसाठी 6.50 पैसे आहे. या विजेच्या दरवाढीमुळे मध्यमवर्गीय माणसांना आपल्या खिशातून दर महिन्याला 3,500-4,000 रुपये विजेच्या बिलापोटी खर्च करावा लागेल. एका कुटुंबाकडून एक पंखा, एक फ्रीज, एक गिझर आणि 5-6 पॉईन्टस् इतकी वीज वापरली जाते. त्याला दरमहा 4 हजार रुपये खर्च येणार असेल तर मला वीज नको, मला माझा अंधार बरा असे म्हणण्याची वेळ आली आहे.

सभापती महोदय, रिलायन्स कंपनी मुंबईत काही कंपन्यांबरोबर फ्रेन्चायझी करणार आहे. ही कंपनी टाटा, बेस्ट या कंपन्यांबरोबर फ्रेन्चायझी करणार आहे काय ? श्री.खोब्रागडे यांनी रिलायन्स कंपनीचा विजेचा परवाना रद्द करावा असे म्हटले आहे त्यात काय चुकीचे आहे, संपूर्ण मुंबईचा विजपुरवठा बेस्टकडे का देत नाही, ही हिंमत का दाखवित नाही ? सरकार रिलायन्स कंपनीचे एवढे लाड का करीत आहे ? पश्चिम आणि पूर्व उपनगरामध्ये विजपुरवठा करण्यासाठी रिलायन्स कंपनी कोणाला फ्रेन्चायझी करुन घेणार आहे ते कळले पाहिजे. रिलायन्स कंपनी आता



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

डॉ.दीपक सावंत.....

आणखी एका प्रायव्हेट पार्टनरला या क्षेत्रामध्ये उभे करणार आहे. त्यामुळे पुन्हा दरवाढीची कु-हाड कोसळणार आहे. जर रिलायन्स फ्रेन्चायझी कंपन्या नेमणार असेल तर त्यांच्या मूळ करारनाम्यामध्ये तसा उल्लेख आहे काय ? त्याला शासनाने मान्यता दिली होती काय हे सांगण्यात यावे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याचे विजेचे बिल 5 लाख रुपये आहे, बंद असलेल्या मंत्र्यांच्या बंगल्याचे बिल लाखाच्या घरामध्ये आहे. सभापती महोदय, मला सांगण्यास लाज वाटते. परंतु सांगणे आवश्यक आहे. सभागृहात येण्यापूर्वी आज सकाळी माझ्या अर्ध्या तासांच्या चर्चेच्या संदर्भात माहिती घेण्यासाठी मी माझ्या पी.ए.सह आपल्या इमारतीतील सहाव्या मजल्यावरील ग्रंथालयामध्ये सकाळी 9.25 वाजता गेलो होतो. त्याठिकाणी ए.सी.मशिन्स सुरु होत्या, टेम्परेचर 19 एवढे होते. परंतु एकही कर्मचारी उपस्थित नव्हता. राज्यामध्ये ग्रामीण भागामध्ये मुले मेणबत्ती लावून परीक्षेचा अभ्यास करीत असतील तर हा विजेचा अपव्यय नाही काय ? त्यानंतर मी त्याच ग्रंथालयाच्या दुस-या कक्षामध्ये अंदाजपत्रकाच्या संदर्भात गेलो होतो. तेथे देखील तशीच परिस्थिती आढळून आली. तेथे केवळ एक माणूस कपडे बदलत असल्याचे दिसून आले. सभापती महोदय, मी वैद्यकीय संचालनालयाच्या कार्यालयात गेलो असताना तेथील ए.सी.बंद असल्याचे आढळून आले. त्याबाबत मी तेथील कर्मचा-याकडे कारण विचारले होते.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 17:20

(डॉ. दीपक सावंत...)

तो अधिकारी असे म्हणाला की, "मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे की, चॅरिटी बिगिन्स ॲट होम, त्यामुळे ए.सी. बंद आहे". मंत्र्यांचे बंगले बंद असताना त्यांचे लाखो रुपयांचे बिल कसे आले ? या सभागृहामध्ये विजेवर चर्चा होत असताना या इमारतीमधील कर्मचारी जर विजेचा अपव्यय करीत असतील तर ते दुर्दैव आहे.

सभापती महोदय, आपण नवीन पॉवर प्लॅण्ट उभे करणार आहात. तसेच ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न देखील आपल्या पुढे आ वासून उभा राहिलेला आहे. या सभागृहामध्ये ग्लोबल वॉर्मिंग संबंधी चर्चा झाला त्यावेळी मी सांगितले होते की, जगामध्ये भारताचे नाव या ग्लोबल वॉर्मिंगमध्ये पुढे आहे. आपण समुद्र किनारी असल्यामुळे जास्तीत जास्त ग्लोबल वॉर्मिंग हे भारतामध्ये होणार आहे. आपण जितकी वीज वापरु तितका कार्बनडायऑक्साईड वायू निर्माण होईल आणि हरितगृहामध्ये हा वायू साठून ग्लोबल वॉर्मिंग होईल. हा प्रश्न आपल्या पुढे असताना आपण पॉवर स्टेशन उभारण्याच्या गोष्टी करीत आहात. आज मुंबईतील मॉल्सना किती मेगावॅट वीज दिली जाते ? आपणास तिप्पट दर मिळतात म्हणून त्यांना जास्तीची वीज दिले जाते काय ? जाहिरातीची जी होर्डिंग्ज लावली जातात त्यासाठी स्थिर आकार 200 रुपये, ऊर्जा आकार 1358 रुपये, स्टॅण्डबाय चार्जेस 27 रुपये आणि महागडी वीज 2.50 रु. असा आकार एमईआरसीने ठरवून दिलेला आहे. मॉल्समधील ए.सी.वर किती वीज वापरली जाते ? हे मॉल्स सकाळ पासून रात्री 12-12 वाजेपर्यन्त सुरु असतात. हे मॉल्स सकाळी 10.00 ते रात्री 9.00 वाजेपर्यन्तच सुरु ठेवण्याची परवनगी द्यावी. ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा जे मॉल्स जास्त वेळ चालू राहातील त्यांच्यावर कडक कारवाई करावी. एकीकडे भरमसाठ आणि अनियंत्रित विजेचा वापर होत असताना दुसरीकडे शेतक-याची विजेच्या बाबतीत छळवणूक का करता ? त्याला 20-20 तास वीज का देत नाही ? शेतक-याच्या वीजपंपाना वीज का देत नाही ? मुंबईमध्ये ठिकठिकाणी लावलेल्या मोठ मोठ्या होर्डिंग्जवर रात्रभर दिवे लखलखत असतात. सभापती महोदय, रात्री 10.00 ते सकाळी 6.00 पर्यन्त ह्या जाहिराती कोण पहातो ? तर कोणीही त्या जाहिराती पहात नाही. विजेचा अपव्यय मात्र मोठ्या प्रमाणावर होत असतो. पश्चिम उपनगरामध्ये अमरसन्स, रिबॉक्स बेन्झर या कंपन्यांचे मोठमोठे होर्डिंग्ज आहेत, शोरुम्स आहेत. त्याठिकाणी रात्रभर विजेचे दिवे जळत असतात. आता रात्री शोरुममध्ये मॅनिकिन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 17:20

(डॉ. दीपक सावंत...)

पहायला, त्यांच्या अंगावरचे कपडे पहायला कोणीही जात नाही. तरीही त्या शोरुममधील लाईट रात्रभर सुरु ठेवलेली असते. दुसरीकडे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी वीज नाही. तुमच्या टाटा, रिलायन्स आणि बेस्टला जास्त पैसे मिळत असल्यामुळे हा विजेचा अपव्यय बंद होत नाही. या बाबतीत गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. एका बाजूला ग्लोबल वॉर्मिंग आणि दुस-या बाजूला वीज निर्मितीच्या गोष्टी आपण करीत आहात. यामधील आपण काय स्वीकारणार आहात ? ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात कमिटी नेमून ते कसे कमी करता येईल हे पाहू असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते. परंतु त्याबाबतीत पुढे काहीच हालचाल झाली नाही. या प्रस्तावावर माननीय ऊर्जामंत्री कोणते ठोकळेबाज उत्तर देतील त्याची आम्हाला कल्पना आहे. माझ्याकडे त्यांनी आजवर सभागृहामध्ये दिलेल्या उत्तराचे कार्यवृत्त आहे. आजच्या प्रस्तावावर माननीय अपारंपरिक ऊर्जामंत्री हे उत्तर देणार आहेत. आपण अपारंपरिक ऊर्जा किती आणि कशी निर्माण करणार आहात ? देवगड येथील पवनचक्क्या केवळ गरगर फिरत आहेत पण त्यातून वीज निर्मिती होत नाही. देवगड येथील पवनचक्क्या आता प्रेक्षणीय स्थळे झाली असून लोक त्याखाली उभे राहून फोटो काढतात. माझी माननीय अपारंपरिक ऊर्जा मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी ठोकळेबाज उत्तर देऊ नये तसे ते दिले तर मी त्यांना मध्येच अडवीन. तेव्हा जे प्रॅक्टीकल आहे तेवढेच सांगावे आणि जे जमत नाही ते नाही म्हणून सांगावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

...नंतर श्री. कानडे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.गिते 17:25

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, वीजेच्या तुटवडयासंबंधी मागील अधिवेशनात सुध्दा चर्चा झाली होती. परत या अधिवेशनामध्ये लोकांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु झालेली आहे. गावात पिण्याच्या पाण्याची पूर्वीप्रमाणे आता काहीच सोय राहिलेली नाही. पूर्वी विहिरी, आड यातून पाणी मिळत होते. पोहऱ्यातून धारेने पाणी शिंपडले जात होते. पोहऱ्याची जागा पंपाने घेतली. विहिरीची जागा सबमर्सिबल पंपाने घेतली. घागरीची जागा पंपाने घेतली. बोअरवेलमध्ये पाणी असले तरी पाणी देता येत नाही कारण वीज नाही. पाणी एका ठिकाणाहून मिळत नाही. पाणी बोअरचे आणून विहिरीत टाकावे लागते. विहिरीतून पाणी मोटरने टँकरमध्ये भरावे लागते. टँकर नेऊन गावातील विहिरीत रिकामा करावा लागतो आणि पुन्हा ते पाणी टाकीत चढवावे लागते. म्हणजे आता पूर्वीची पारंपारिक पध्दत राहिलेली नाही. हे सर्व करताना वीज गेली तर यातील काहीच होत नाही आणि पाणी मिळत नाही. एवढी वीज टंचाई असताना वीज निर्मिती होत नाही. वीज निर्मिती एका दिवसामध्ये होणे शक्य नाही. सरकार एवढे संवेदनाशून्य झालेले आहे की, असे कितीही प्रस्ताव चर्चेला आणले तरी सरकारला काहीच फरक पडत नाही. प्रस्ताव आणून वीज देणार काय ? कितीही चर्चा केली तरी सरकारवर काही फरक पडत नाही आणि काहीच सुधारणा होण्याची शक्यता दिसत नाही. सरकार इतके गेंडयाच्या कातडीचे कसे झाले हे कळत नाही. एक महत्वाची गोष्ट मी सांगतो की महाराष्ट्रामध्ये कोळशापासून वीज निर्माण होते, पाण्यापासून वीज निर्माण होते, पवनचक्क्याद्वारे वीज निर्माण होते परंतु राज्यामध्ये आणखी एका माध्यमातून वीज निर्माण होऊ शकते ते माध्यम म्हणजे साखर कारखाने आहेत. राज्यामध्ये 202 साखर कारखाने आहेत त्यातील 184 सहकारी साखर कारखाने आहेत आणि 18 खाजगी आहेत. महाराष्ट्रात फक्त दोन साखर कारखान्यात वीज तयार होऊ लागली आहे. त्यातील एक पंढरपूरचा पांडुरंग सहकारी साखर कारखाना आहे. आमदार सुधाकर परिचारक यांचा कारखाना आहे. या कारखान्यातून वीज निर्मिती होऊ लागली आहे आणि दुसरा खाजगी कारखाना नॅशनल शुगर फॅक्टरी ही उस्मानाबाद जिल्हयातील कळंब तालुक्यात आहेत. श्री. ठोंबरे या कारखान्याचे चेअरमन आहेत. बाकी कारखाने वीज निर्मिती का करीत नाही हे समजत नाही. त्यांच्याकडे स्टाफ नाही काय ? पैसे नाहीत काय ? एकेका कारखान्याच्या चेअरमनकडे एवढे पैसे आहेत की तो स्वत:च्या खिशातून वीज निर्मिती करु शकेल. परंतु याबाबत सरकार गंभीर नाही. बऱ्याच कारखान्यांकडे अद्ययावत मशीनरी आहे, प्लॅन्ट तयार

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.गिते 17:25

श्री. पाशा पटेल....

आहेत. परंतु घोडे कुठे पेंड खाते हे समजून येत नाही. एक युनिट वीज निर्माण करण्यासाठी तीन कोटी रुपये लागतात. राज्यातील साखर कारखान्यांनी वीज निर्मिती करावयाची ठरविली तर 1500 मे.वॅ.वीज तयार होऊ शकते. एका तज्ज्ञाला मी वीज निर्माण करण्याबाबत विचारले असता तो म्हणाला,साखर कारखान्यातून वीज निर्माण करण्यासाठी 6000 कोटी रुपये लागतील तर कोळसा आणि पाणी यापासून वीज निर्माण करण्यासाठी 12000 कोटी रुपये लागतील. म्हणजे कारखान्यात वीज तयार केली तर निम्म्या पैशात खात्रीची वीज तयार होईल. साखर कारखान्यातून निर्माण केलेल्या वीजेचा फायदा असा आहे की कोळसा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेऊन वीज निर्मिती केली जाते. त्यामध्ये लॉसेस होतात. कारखान्यामध्ये तेथेच प्लॅन्ट असतो. वीज वाहून नेण्यामध्ये 40 टक्के लॉसेस आहेत. कारखान्यातील वीज तयार करुन त्या त्या भागात द्यावयाची झ ााली तर 10 टक्के लॉसेस आहेत. शिवाय शेतकऱ्यांना दोन पैसे जास्त मिळतात. राज्याला बाहेरुन वीज मिळत नाही. असे असताना साखर कारखाने वीज निर्मिती करु शकतात कारण त्यांच्याकडे युनिटस् उभे आहेत. सर्व सुविधा आहेत तरी वीज तयार करण्यासाठी सरकार काही करीत नाही.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 17:30

श्री.पाशा पटेल..........

प्रत्येक वेळी सभागृहात दोन्ही बाजूच्या पक्षाकडून आरोप प्रत्यारोप झाले की, विरोधी पक्षाच्या आमदारांना शेतीतलं काय कळतं? शेंगा जमिनीवर लागतात की जमिनीच्या खाली लागतात हे यांना माहित नाही अशी आमच्यावर टीका केली जाते. साखर कारखाने तुमचेच आहेत. तुमच्याच ताब्यात कारखाने आहेत. बँका तुमच्या. कारखाने तुमचे. उसं तुमची. शेतकरी तुमचे. मग एवढे सगळे असताना, वरुन खालपर्यंत तुमचेच सरकार असताना या गोष्टी तुम्हाला का सुचत नाहीत? मी सरकारला या चर्चेच्या माध्यमातून विनंती करतो, एवढी चांगली संधी आलेली असताना, एवढा विजेचा तुटवडा असताना ती तूट भरुन काढण्यासाठी, शेतकऱ्यांच्या पदरात दोन पैसे टाकून ग्राहकाला वीज देऊन सरकारच्या नावाने जी बोंबाबोंब चालली आहे ती थांबविता येईल. मग हे तुम्हाला का सुचत नाही? मी मंत्रीमहोदयांना विनंती करतो की, या संदर्भात आज विचार करता आला तर बघा. काही करता येते का हे बघा. मी एका कारखान्याच्या चेअरमनला विचारले की, काय केले तर तुम्ही वीज तयार करु शकता? त्यांनी काय सांगितले? सरकार एवढी महागडी वीज खरेदी करते. 3.05 रुपये दराने वीज खरेदीचा करार झालेला आहे. 6000 कोटी रुपये खर्चून महाराष्ट्रातील साखर कारखान्यांमधून जर 1500 मे.वॅट वीज निर्मिती होणार असेल तर 6000 कोटी रुपयांपैकी 3000 कोटी रुपये सबसिडी आणि 3000 कोटी रुपये कर्जाने दिले तर साखर कारखाने उत्साहाने पुढे येतील. सन्माननीय अपारंपारिक ऊर्जामंत्री श्री.विनय कोरे समोर बसले आहेत. म्हणूनच मी सौम्य शब्दांचा वापर करीत आहे. त्यांच्या आजोबांची, वडिलांची पुण्याई आहे आणि त्यांनी ती पुण्याई पुढे चालविली आहे. दुसरा चेहेरा समोर असता तर आमच्या अंगात विस्तव पडला असता. ज्याचे जळते त्यालाच कळते. विषय असा आहे की,शेतकऱ्यांचे जर भले करणार असाल तर या या सगळ्या गोष्टी केल्या पाहिजेत. आता तर दुष्काळ आहे. लोकांनी सरकारवर कसा विश्वास ठेवावा? कर्जमाफीच्या संदर्भात आम्ही असे ऐकले की, 61 हजार कोटी रुपये देशातील शेतकऱ्यांना देत आहात. काही दिवसांनी 71 हजार कोटी रुपये कर्जमाफी दिली जाणार अशी बातमी प्रसिध्द झाली. त्यातील महाराष्ट्राच्या वाट्याला 12 हजार कोटी रुपये मिळणार होते. परंतु फक्त 7 हजार कोटी रुपये दिले गेले. किती खोटे बोलावे? खोटे बोलायची मर्यादा संपली. एक गोष्ट लक्षात ठेवा. विजेच्या प्रश्नाच्या संदर्भात लोक रस्त्यावर उतरले आहेत. काल परवा एक बातमी वाचायला मिळाली. भुसावळमध्ये लोकांनी वीज मंडळाची सहा कार्यालये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..........

फोडली. वीज मिळत नाही म्हणून लोकांचा संताप अनावर होऊ लागला आहे. लोक अशा पध्दतीने तोडफोड करु लागले आहेत. उद्योगांचे काय? महाराष्ट्रामध्ये वीज मिळत नाही म्हणून उद्योगधंदे निमूटपणे गुजराथ आणि हिमाचलप्रदेश या राज्यात स्थलांतरित होत आहेत. परंतु सरकार याकडे डोळेझाक का करीत आहे? आता उद्योगधंद्यांना आठवड्यातून 40 तास लोडशेडिंग लागू करीत असल्याची घोषणा वीज मंडळाने केली आहे. अशाप्रकारे वीज पुरवठा होणार असेल तर कारखाने या राज्यातील कशाला राहतील? कामगारांचे काय होईल? कारखान्यांचा फायदा कसा होईल? म्हणून मला सांगावयाचे आहे की, आता योग्य वेळ आलेली आहे. लवकर सुधारणा करण्याची गरज आहे. कोणत्याच बाबतीत तुम्ही सुधारणार नसाल तर लोक अगदी वैतागले आहेत आणि त्यांचा कधी उद्रेक होईल हे आज कोणीही सांगू शकत नाही. लातूरमध्ये परवा खतासाठी 5000 लोक रस्त्यावर सैरावैरा पळत होते. पुढाऱ्यांचे पोस्टर दिसले की, पोस्टरवर हल्ला. ही पहिली फेज आहे. दुसऱ्या फेजमध्ये वर्षभरात निवडणुका येणार आहेत. निवडणुकीच्या निमित्ताने जनतेसमोर जाण्यासाठी तुम्ही हेल्मेट खरेदी करा, चिलखत खरेदी करा. त्याशिवाय लोक तुम्हाला येऊ देणार नाहीत.

(नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल...

सत्ताधारी पक्षाला एक नाजूक गोष्ट कळली आहे. हेल्मेट आणि चिलखत घालायला लोकं शुद्धीवर राहिली पाहिजेत. निवडणुका आल्या की लोकांना देशी दारू पाजली जाते. आता दारूची दुकाने, परमिट रूम हा प्रकार गेला. आता बिअर शॉपी सुरू झाली आहे. म्हणजे चालत चालत घ्या आणि चालत चालत बेशुद्ध पडा. आज महागाई वाढली आहे. पण या गबरू-खुशालचेंडू सरकारने एका वस्तूचे भाव वाढवलेले नाहीत. ती वस्तू म्हणजे दारू. कारण त्यात शासनाचा फायदा आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**उपसभापती** : थोड्या वेळाने लाईट जाणार आहेत. त्यामुळे आपण आपले भाषण लवकर आटपावे. मी सांगून ठेवले आहे, जास्त वेळ भाषणे चालली की लाईट घालवून टाका म्हणजे सर्वजण आपोआप घरी निघून जातील.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, मी शेवटची विनंती करणार आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी चांगला प्रस्ताव मांडला आहे. शासनाला जर मनाची, जनाची थोडी असती तर त्यावर गंभीरपणे विचार केला असता. शासन कधीच गंभीरपणे विचार करीत नाही. मला सभागृहात येऊन दोन वर्ष झाली आहेत. सभागृहामध्ये बऱ्याच चांगल्या गोष्टी सांगितल्या. सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीची अंमलबजावणी कधीही झालेली नाही. होत नाही. उलट होते. उलट कसे होते याची एक गंमत सांगतो. एक तलाठी शेतकऱ्याचा फेर वढत नव्हता. त्याने विचारले की, फेर का वढत नाही ? तलाठ्याने सांगितले दोन हजार रूपये दे. शेतकऱ्याने तहसीलदाराला सांगितले की, तुमचा नालायक तलाठी दोन हजार रूपये मागत आहे. तहसीलदाराने सांगितले की, मी तलाठ्याला सांगतो. जा उद्या आणि फेर ओढून घ्या. दुसऱ्या दिवशी ज्यावेळी संबंधित शेतकरी तलाठ्याकडे गेला तेव्हा त्या शेतकऱ्याला तलठ्याने सांगितले की, मी तुझे काम करतो. पण त्यासाठी तीन हजार रूपये द्यावे लागतील. शेतकरी म्हणाला, काल दोन हजार रूपये म्हणाला होता, आज तीन हजार रूपये कसे काय मागतात ? तो म्हणाला, तहसीलदारांना माहित नव्हत ना. तू जाऊन तहसीलदारांना सांगितले. त्यामुळे साहेबांनी सांगितले



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल....

तुझे भी घे अन् माझे भी ठेव. म्हणून तुला आता तीन हजार रूपये द्यावे लागतील. असे सगळे उलट चालले आहे. हे शासन भीत का नाही ? कारण लोक दारू आणि चिवड्याला बळी पडतात म्हणून. शेवटी याला देखील मर्यादा असते. एका माकडीणीला पिल्लासह हौदामध्ये सोडले. जस जसे पाणी वाढत गेले, तस तसे माकडीणीने पिल्लाला वर घेतले. परंतु, जेव्हा माकडीणीच्या नाकात पाणी गेले तेव्हा त्या माकडीणीने पिल्लाला आपल्या पायाखाली ठेवले आणि पटकन उडी मारून निघून गेली. तसे लोक शासनाला पाया खाली घेतल्याशिवाय राहणार नाही. ही वेळ येण्याआधीच येथे केलेल्या सूचनांचा विचार करावा अशी मी विनंती करतो आणि येथे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रस्ताव आणला आहे त्याला पाठिंबा देतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

........

यानंतर श्री.पी खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विजेच्या संदर्भात जो प्रस्ताव चर्चेसाठी आणला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, युतीच्या काळात कोट्यवधी रुपये खर्च करुन कोंकणातील पाणीपुरवठ्याच्या योजना राबविल्या, त्यानंतर विजेची बिले ग्रामपंचायतींना लागू झाली ती हॉर्स पॉवर्सप्रमाणे परंतु ते सरकार गेल्यानंतर या सरकारच्या काळात मात्र युनिटवर विजेची बिले आकारायला सुरुवात झाली. तसेच या बिलावर मिळणारे अनुदान सुरुवातीला 50 टक्के, त्यानंतर 20 टक्के, 10 टक्के आणि आता 0 टक्के असे झाले आहे. या अनुदानापोटी ज्या ग्रामपंचायती 100 टक्के वीज बिल भरत होत्या त्यांची 50 टक्के रक्कम अजूनही सिंधुदुर्ग जिल्ह्यातील या ग्रामपंचायतींना मिळालेली नाही, याचा खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यात राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना मागासवर्गीय वस्ती व वाड्यांमध्ये लागू करण्यात आली. त्यासाठी तीन वेळा टेंडर काढले परंतु तिन्ही वेळेस या टेंडरला प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे योजना लागू होऊ शकली नाही. यासंदर्भात अधिकाऱ्यांना विचारले असता मला असे सांगण्यात आले की, मुंबई-पुणे अशा ठिकाणच्या वस्त्या एकत्र असतात पण कोकणातील वाड्या विखुरलेल्या असल्यामुळे ठेकेदारांना विद्युतीकरण परवडत नाही म्हणून प्रतिसाद मिळत नाही. संपूर्ण राज्यात ही योजना लागू असताना त्या त्या जिल्ह्यातील ठेकेदारांना परवडते परंतु कोकणातील भौगोलिक परिस्थितीमुळे त्यांना परवडत नसल्यामुळे ही योजना राबवू शकत नाही. म्हणून डोंगरी भागात ज्याप्रमाणे 10 टक्के जादा अनुदान दिले जाते त्याप्रमाणे या दरामध्ये वाढ करता येईल काय याचाही विचार होणे आवश्यक आहे. मघाशी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले की, देवगड तालुक्यात सन 1970 पासून पवनचक्क्या आहेत पण त्या बंद पडल्या आहेत. त्या पवनचक्क्यांच्या जागेचे भाव वाढल्यामुळे विकासकाला देखील ही जागा वितरण कंपनी देत नाही आणि आहे त्यांची दुरुस्तीही केली जात नाही. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी दोन तीन वेळा उत्तर दिले की, या पवनचक्क्या चालू करण्यासाठी विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांना बोलावून प्रयत्न करतो, परंतु अद्यापही तसे प्रयत्न झालेले नाहीत. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यात कर्नाटक राज्यातून 100 मेगावॅट एवढी वीज घेतली जाते, त्याचे पैसे 100 टक्के भरले जातात परंतु त्यातही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

भार नियमन करण्यात येते, असे भार नियमन होऊ नये अशा प्रकारची विनंती वारंवार केली परंतु त्याचाही विचार होत नाही. तसेच विजेचे भार नियमन वाढत असल्यामुळे शिवसेनेचे पदाधिकारी वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांना घेराव घालत होते, परंतु आता तर काँग्रेसचे कार्यकर्ते देखील सिंधुदुर्ग जिल्ह्यात घेराव घालायला लागले. म्हणजे खऱ्या अर्थाने आता सत्ताधारी पक्षाच्या लोकांनाही विजेच्या भार नियमनाची जाणीव व्हायला लागली म्हणून हे थांबविण्यासाठी प्रयत्न होणार की नाही, याचा खुलासा झाला पाहिजे. त्याचप्रमाणे रत्नागिरी जिल्ह्यातील भार नियमनाचे कारण सांगताना असे सांगण्यात येते की, एनरॉन प्रकल्पातून विजेची निर्मिती बंद झाली म्हणून 6 तास भार नियमन होत आहे. अधिकारी वर्गाकडून अशा प्रकारचा अहवाल पाठविलेला आहे की, रत्नागिरी जिल्ह्यात दीड तास भारनियमन करावे. त्या अहवालाचे अवलोकन करुन कोकणातील भार नियमन वगळून तेथील जनतेला दिलासा द्यावा तसेच मी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचे सविस्तर उत्तर द्यावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----------

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आदरणीय विरोधी पक्ष नेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी विजेच्या संदर्भात जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे त्याला समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. मागच्या निवडणुकीच्या वेळी आघाडी सरकारने महाराष्ट्रातील शेतक-यांना फुकट वीज देण्याच्या संदर्भात आश्वासन दिले होते. आघाडी सरकारचे शासन स्थापन झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्रातील शेतक-यांना मोफत विजेचे जे आश्वासन दिले होते ते त्यांनी पाळले नाही. जनतेची आपण फसवणूक का केली अशी आम्ही सभागृहात विचारणा केली असता त्यासंदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहात सांगितले की, " मरता क्या नही करता." निवडणुकीच्या तोंडावर राज्य वाचवण्याचा प्रयत्न करावा लागला असे प्रांजळमत माननीय आबांनी दिलेले आहे.

सभापती महोदय, मुख्यमंत्री लातुरचे आहेत त्या ठिकाणी 9 तास लोडशेडींग केले जाते, केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे हे सोलापूरचे आहेत त्यामुळे त्या ठिकाणी 11.00 तास लोडशेडींग आहे आणि बाकीच्या पूर्ण महाराष्ट्रात 18-18 तासाचे लोड शेडींग आहे. ऊर्जा मंत्री हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे असून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे चिन्ह हे घडयाळ आहे. घडयाळामध्ये 12 आकडे आहेत त्यामुळे लोड शेडींग 12 तासाच्यावर केले जाणार नाही असे आम्हाला वाटले होते परंतु आमची अपेक्षा फोल ठरली आहे.

सभापती महोदय, माननीय केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांना मी विचारले की, तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद भुषवून आता आपण केंद्रीय ऊर्जा मंत्री झालेला आहात त्यामुळे आता विजेच्या प्रश्नाच्या संदर्भात आपण काय करणार आहात ? त्यावेळी त्यांनी मला हात दाखवला आणि 2011 पर्यंत थांबा म्हणून सांगितले. 2011 नंतर आम्ही तुम्हाला मागेल तेवढी वीज देऊ असेही त्यांनी सांगितले. खरे म्हणजे महाराष्ट्रातील जनतेने 2011 सालापर्यंत काय करावयाचे ? आज महाराष्ट्रात विजेची जेवढी निर्मिती होते आहे त्यपेक्षा अजून 53 टक्के वीज आपण निर्माण करु शकतो. अजून 53 टक्के वीज निर्माण करण्याची आपली क्षमता आहे परंतु आपली वीज निर्माण करण्याची जेवढी क्षमता आहे तेवढया क्षमतेने सुध्दा आपण वीज निर्माण करीत नाही. परंतु ही क्षमता आपण का वापरत नाही हा माझा सवाल आहे. विजेचे नवीन प्रकल्प आपण बासनात गुंडाळून ठेवलेले आहेत, ऊरणच्या गॅस प्रकल्पाचे काय झाले, ऊरणच्या वीज केंद्राची विद्युत

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे...

निर्माण करण्याची जास्त कॅपेसीटी असतांना त्या ठिकाणी कमी वीज का निर्माण केली जात आहे, किती वीज केंद्रे बंद पडलेली आहेत, का बंद पडलेली आहेत , वीज केंद्र रिपेअर का केली जात नाहीत या सर्वांची माहिती आम्हाला मिळण्याची आवश्यकता आहे. वीज निर्मितीमध्ये तुम्हाला अपयश का आले याचेही तुम्ही उत्तर दिले पाहिजे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 17.50

श्री.प्रकाश शेंडगे ....

सभापती महोदय, औद्योगिक क्षेत्रासाठी 40 तास वीज देण्यात येणार नाही असे सांगण्यात आलेले आहे त्यामुळे कामगारांचे मोठया प्रमाणावर मॅन अवर्सचे नुकसान होणार असल्याने कामगारांना नुकसान भरपाई देण्यात येणार आहे काय ? कमी वीज मिळाल्यामुळे कामगारांना पगार कमी देण्यात येणार आहे त्यामुळे अशा कामगारांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो. वीज कमी दिली जाते त्याला कामगार जबाबदार नाहीत. त्यांची काम करण्याची व मेहनत करण्याची तयारी आहे परंतु शासनाकडून वीज न मिळाल्यामुळे कारखाना 40 तास कमी चालणार आहे त्यामुळे त्या कामगाराच्या वेतनात कपात केली जाणार असल्यामुळे या कामगारांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी माझी मागणी आहे

सभापती महोदय, ट्रान्समिशन लॉसेस कमी करण्यात येणार आहेत व त्यासाठी कोण कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे या संबंधी गेल्या आठ दहा वर्षापासून आम्ही सतत ऐकत आलो आहोत परंतु अजूनही 50 ते 60 टक्के ट्रान्समिशन लॉसेस होत आहेत. त्याचबरोबर वीज चोरीचे प्रमाणसुध्दा मोठया प्रमाणावर आहे. धनदांडगे लोक ज्या ठिकाणी राहतात अशा वाळकेश्वर सारख्या ठिकाणी सुध्दा वीजचोरी होत असते. असे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सागितले आहे. माझी माहिती अशी आहे की, मुंबईतील झोपडपट्टीधारक वीज चोरी करीत नसून सर्वात जास्त वीज चोरी वाळकेश्वर सारख्या धनदांडग्या भागातील लोक करीत आहेत हे सत्य एकदा बाहेर येणे गरजेचे आहे जे श्रीमंत लोक वीज चोरी करतात त्यांना त्वरित अटक करण्यात यावी व त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी उत्तर देण्यासाठी अपारंपारिक ऊर्जा मंत्री उपस्थित आहेत त्यांना मी सांगू इच्छितो की, पवन चक्क्यांच्या माध्यमातून चार हजार मेगॅवॅटस वीज निर्मिती करता येऊ शकते परंतु यासबंधीचे धोरण ठरविण्यासाठी शासनाने चार वर्षे लावली आहेत.. एका बाजूला वीज न मिळाल्यामुळे शेतकरी उद्ध्वस्त व्हावयास लागले आहेत . पवन चक्क्यांच्या माध्यमातून 700 मेगॅवॅटस वीज निर्मिती करण्यात आल्याचा खुलासा मध्यंतरी करण्यात आला होता. परंतु 700 मेगॅवॅटसची वीज निर्मिती केल्यानंतर किती शेतक-यांचे प्रत्यक्षात कल्याण करण्यात आले आहे हा देखील महत्वाचा मुद्दा आहे .ज्या शेतक-याची जमीन पवन चक्क्यासाठी घेण्यात आली होती त्यांना योग्य पध्दतीने न्याय न दिल्यामुळे ते शेतकरी रस्त्यावर आले आहेत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे ....

त्याच्या शेतात पवन चक्क्याच्या माध्यमातून वीज निर्मिती व्हावयास लागली आहे परंतु त्याच्या घरात मात्र अंधार केला आहे तेव्हा त्या शेतक-यांना योग्य न्याय केव्हा देण्यात येणार आहे ? याचे उत्तर शासनाने दिले पाहिजे. आता त्या शेतक-यांच्या जमिनी भाडेपट्टयाने घेतल्या आणि एकरी 25 हजार रुपये त्यांना भाडे दिले , घरातील व्यक्तीला नोकरी दिली तर पवन चक्क्यासाठी जमीन देण्याकरिता शेतकरी आपल्याकडे रांगा लावतील. 4 हजार मेगॅवॅटसचे वीज निर्मिती करण्याचे शासनाचे जे उद्दिष्ट आहे ते दोन वर्षात पूर्ण होईल. जनता भरडली तरी चालेल पंरतु शेतक-यांना योग्य तो वाटा देण्यास शासन तयार नाही तेव्हा या शेतक-यांना योग्य तो न्याय देण्याच्या बाबतीत शासनाने त्वरित धोरण जाहीर करावे आणि शेतक-यांना भाडे द्यावे अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो महाराष्ट्रात जे वीज संकट आलेले आहे त्याबाबतीत योग्य पध्दतीने नियोजन करण्यात यावे आणि राज्यातील संकटापासून जनतेला मुक्त करावे अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधान सभेने निवडलेले): सभापती महोदय, नियम 259 अन्वये मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माझ्याकडे एक चिठ्ठी दिली असून त्यांनी मला असे सागितले की ही चिठ्ठी वाचावयाची राहिली असल्यामुळे तुम्ही ती चिठी वाचून दाखवा . त्यात असे म्हटलेले आहे की, " माननीय ऊर्जा मंत्री आपले निवेदन वाचत होते त्यावेळी त्यांनी सांगितले , देशात विजेचे उत्पादन वाढले आणि लोक आनंदाने नाचत होते या घटनेचे वृत्त ऊर्जा मंत्री मेणबत्तीच्या प्रकाशात वाचत होते. " माननीय ऊर्जा मंत्र्याचा फोटो देशोन्नतीमध्ये छापून आला होता.

सभापती महोदय,माननीय मंत्री महोदय जे उत्तर देणार आहेत त्यांचे भाषण मीच वाचून दाखवतो. सभापती महोदय, वीज निर्मितीच्या सघ्याच्या परिस्थितीमध्ये नाशिकमध्ये 880 मेगॅवॅटस वीज निर्मितीची क्षमता असतांना फक्त 728 मेगॅवॅटस वीज निर्माण होत आहे. कोराडीमध्ये 1090 वीज निर्मितीची क्षमता असतांना फक्त 444 मेगॅवॅटस वीज निर्माण होत आहे. खापरखेडामध्ये 840 मेगॅवटस वीज निर्माण होण्याची क्षमता असतांना फक्त 789 मेगॅवॅटस वीज निर्माण होत आहे. पारसमध्ये 305 मेगॅवॅटस ऐवजी एक संच बिघडल्यामुळे फक्त 70 मेगॅवॅटस वीज निर्माण होत आहे .परळी येथे 880 ऐवजी 598 मेगॅवॅटस वीज निर्मिती होते. तेथे ओला कोळसा येत असल्यामुळे कमी वीज निर्माण होते चंद्रपूरमध्ये 3 हजार 40 मगॅवैटसची क्षमता असतांना 50 टक्क्याहून कमी म्हणजे 1 हजार 250 मेगॅवॅटस वीज निर्मिती होत. त्या ठिकाणी पाच पैकी 3 संच बंद आहेत आणि 2 संच चालू आहेत.. भुसावळ येथे 475 मेगवॅटसची वीज निर्मिती क्षमता असतांना 302 मेगॅवॅटस वीज निर्माण होत आहे

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ही परिस्थिती पाऊस न पडल्यामुळे निर्माण झाली. उरणचा गॅस मिळत नसल्यामुळे उरणची क्षमता 852 मेगावॅटची असतांना 395 मेगावॅट इतकी वीज निर्माण होत आहे. हायड्रो प्रोजेक्टमधून 2340 मेगावॅट वीज निर्माण व्हावयाची होती, ती इतकी घटली की, 10 टक्क्यापेक्षा कमी निर्माण व्हावयास लागल्यामुळे ती फक्त 172 मेगावॅट निर्माण होत आहे. अशाप्रकारे आपल्याला एकूण 9996 मेगावॅट इतक्या वीजेची अपेक्षा होती. आज वीजेची मागणी 15000 मेगावॅटवर गेल्यामुळे आपले लोड शेडींग अगोदर सुरुच होते. त्यामध्ये आपली वीजेची निर्मिती सुध्दा 50 टक्के घटल्यामुळे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जरी याबाबत आक्षेप घेतला तरी पाऊस वेळेवर न पडल्यामुळे आणि ओला कोळसा सतत येत असल्यामुळे..... म्हणजे पाऊस न पडता देखील ओला कोळसा येत आहे...पावसाळयामध्ये अनेक ठिकाणी दुरुस्तीचे पारंपारिक काम सुरु झाल्यामुळे पाऊस येणार हे आम्ही गृहीत धरले होते. त्यामुळे भारनियम 18 तासाचे करण्यात आले आहे, ही परिस्थिती आमच्यामुळे नाहीतर दुष्काळी परिस्थितीमुळे निर्माण झाली आहे. अशाप्रकारचे उत्तर आपणाकडून दिले जाणार आहे.

सभापती महोदय, दरवेळी मी वीजेवर बोलतो यावेळी बोलावे की नाही याबाबत साशंक होतो. मी प्रत्येक वेळी यावर बोलत असल्यामुळे तुम्ही काही करीत नाही, तुमची अगतिकता सांगण्याचा मी प्रयत्न करतो. तुम्ही ती ऐकता की नाही हा प्रश्न आहे? ज्यांनी तुम्हाला सुळावर चढविले त्यांना तुम्ही फाशी देणार की नाही ? हा प्रश्न मी तुम्हाला नेहमी विचारतो. मी यापूर्वीच्या तीनही भाषणात सविस्तरपणे मांडले होते त्याकडे आपण लक्ष दिले नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिलेली चिठ्ठी मी वाचली. त्यामध्ये राज्यामध्ये भारनियमन जवळ जवळ थांबले आहे अशाप्रकारचे कंपनीने दि. 23 मे रोजी वृत दिले आहे. मे महिन्यामध्ये आजच्यासारखी परिस्थिती नव्हती. त्यावेळी पावसाचा संबंध नव्हता. आता तुम्ही पाऊस नाही असे कारण सांगाल. परंतु 23 मे रोजीची वृत्तपत्रातील ही बातमी आहे. त्यामध्ये आता फक्त 900 मेगावॅटची तफावत आहे.म्हणजे भारनियमन फक्त 5 टक्क्यावर आले आहे. असे आपण मे महिन्यामध्ये अधिकृतरित्या सांगितले . तर मग दीड महिन्यात अशी परिस्थिती कां निर्माण झाली? आपण कोणत्या भूलथापा देतो. आपले अधिकारी नक्की काय करीत आहेत?. त्यानंतर मी मूळ मुद्दयावर येतो. हे सर्व कां घडले? मी नेहमी सांगतो आज पुन्हा सांगणार आहे. मी नेहमी गोडबोले समितीचा उल्लेख केला आहे. त्यांच्यावर आपण खटला का भरीत नाही? असा मी नेहमी प्रश्न विचारला आहे. महाराष्ट्रामध्ये



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

1999 ते 2000 सालामध्ये लोड शेडींग पहिल्यांदा झाले. त्यावेळी तुमची सत्ता होती. त्यावेळी 1280 मेगावॅटचे लोडशेडींग झाले. त्यावेळी लोड शेडींग हे गंभीर प्रकरण असल्यामुळे आपण ते सांभाळले पाहिजे म्हणून त्यावेळी तज्ज्ञ म्हणून गोडबोले समितीची नियुक्ती केली. त्या समितीमध्ये दीपक पारीख, डॉ. ए.एस.शर्मा, राजेंद्र बजोरीया, विनय मोहन लाल होते. या समितीने 10 एप्रिल 2001 रोजी अहवाल देतांना 2002 पासून 2010 पर्यंत महाराष्ट्रात वीजेची गरज कशी लागणार आहे त्यासंबंधीचे कोष्टक दिले. प्रत्येक वेळी भाषणामध्ये मी हे मांडण्याचा प्रयत्न करतो. "कोडग्या कोडग्या लाज नाही, कालचा गोंधळ आज नाही" अशी परिस्थिती वीज निर्मितीच्या बाबतीत या सरकारची झालेली आहे. तरीसुध्दा या सरकारला कोडगेपणाने पुन्हा पुन्हा आम्हाला सांगावे लागत आहे. ही आमच्यावर पाळी आपण कां आणीत आहात? हे आम्हाला समजत नाही. प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रस्ताव आम्हाला कां आणावा लागत आहे? हे आम्हाला समजत नाही. गोडबोले समितीने 2002 पासून 2010 पर्यंत तुम्हाला शेडयुल दिले त्यामध्ये वीज किती लागणार आहे हे तुम्हाला सांगितले. त्यावर तुम्ही कां विसंबून राहिलात त्याचे उत्तर तुम्हाला द्यावे लागेल. त्यावेळी गोडबोले समितीचा अहवाल आला होता कां? आला नव्हता. गोडबोले समितीबरोबर तुमच्या एमएसईबीचा अहवाल होता. नवी दिल्लीच्या. एनर्जी रिसर्च इंस्टिटयुट "टेरी" या संस्थेने तुम्हाला अहवाल दिला होता. त्यांनी तुम्हाला सत्य अहवाल दिला होता की, भविष्यात विजेची मागणी वाढणार आहे, त्यादृष्टीने तुम्ही तयारीला लागा. सभापती महोदय, या विजेच्या संदर्भात महाराष्ट्रात आंदोलनाचा विचार कुणी केला याबाबत सांगतो की, आमच्या शिवसेनेने केली नाही एवढी तोडफोड, मोडतोड, मोर्चे कुणी काढले असतील तर ते राष्ट्रवादी कॉंग्रेसने काढले. त्यांच्या नेत्यांची गोडबोलेंवर खास मर्जी. तुम्ही फक्त गोडबोलेंचे ऐका, बाकीच्यांना केराची टोपली दाखवा. सरकारला केराची टोपली दाखविण्याची परिस्थिती त्यामुळे आली आहे. तुम्ही गोडबोलेंचे ऐकल्यामुळे वीज निर्माण झाली नाही. एमएसईबी आणि "टेरी" यांनी तुम्हाला अहवाल दिला होता, तो आपण बाजूला ठेवल्यामुळे तुम्हाला त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत.

(यानंतर श्री. सुंबरे)

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रावते ....

त्यातून काय निर्माण झाले ? आम्ही या संदर्भात काहीही बोललो की, माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील नेहमीच आम्हाला बोलत होते की, तुमची सत्ता होती तेव्हा तुम्ही काय केले ? तुमचे मंत्री दिल्लीत केंद्रीय ऊर्जा मंत्री होते तेव्हा का वीज राज्याला दिली नाही ? मी सांगू इच्छितो की, त्यावेळेस आमच्या मंत्र्यांनी या राज्याला वीज देऊ केली होती. मी स्वत: अमरावतीच्या एका कार्यक्रमाला उपस्थित होतो आणि त्यावेळेस माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील हेही माझ्या बरोबर होते. त्या कार्यक्रमाला आमच्या काळात दिल्लीत केंद्रीय ऊर्जा मंत्री होते ते माजी मंत्री म्हणून, एक खासदार म्हणून आले होते. त्यांनाही त्या कार्यक्रमाला निमंत्रण होते. त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये हे सांगितले आहे, त्यावेळेस माननीय श्री.वळसे-पाटील हे समोर उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, मी केंद्रीय वीज मंत्री असताना 2200 मे.वॅ. वीज तुम्हाला देऊ केली होती पण तुम्ही लेखी पत्र देऊन सांगितले की, आम्हाला विजेची गरज नाही त्यामुळे मग ती वीज इतर राज्यांना द्यावी लागली. म्हणजे त्यावेळी 2200 मे.वॅ. वीज आपल्या राज्याला मिळणार होती ती तुम्ही स्वत:हून हातून घालविली. अशा परिस्थितीत आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, घरामध्ये सगळीकडे अंधार पसरला आहे. वीज ही सर्वांनाच लागते. ती गरीबाला लागते तशीच श्रीमंतालाही लागते फरक एवढाच आहे की, जो तो ज्याच्या त्याच्या गरजेनुसार ती घेत असतो, ऐपतीप्रमाणे घेत असतो. ग्रामीण भागामध्ये देखील एसी, फ्रीज वगैरे सगळे काही आहे. ग्रामीण भागामध्ये असे काही नसते असे नाही. सारे काही आहे, परंतु आपापल्या गरजेनुसार प्रत्येकजण वीज घेत असतो. तेव्हा वीज ही नेहमीच आवश्यकतेप्रमाणे निर्माण झाली पाहिजे आणि मिळाली पाहिजे. हा विषय खरे तर येथे आहे. आज आपण सारे शेतकरी, शेतकरी म्हणतो पण आज शेतकऱ्याला वीज दिली तरी तो घेणार नाही. कारण पंपासाठी पावसाळ्यामध्ये वीजेची गरज नाही. आज तुम्ही देतो म्हटले तरी तो ती घेणार नाही, कारण पंपाला पाणीच नाही. तेव्हा आपण किती मर्यादेपर्यंत जाऊन फटके मारायचे ते ठरविले पाहिजे. कोणत्या वेळेस काय केले पाहिजे हे ठरविले पाहिजे. पावसाळा संपल्यानंतर शेतकऱ्याला विजेची गरज असते ती जानेवारी ते मार्च या काळामध्ये. तरीही विजेचा तुटवडा 400 पर्यंत आलेला आहे. मध्यंतरी तुमची एक जाहिरात आली होती. ती मी मागविली होती पण ती अजून माझ्या हाती आलेली नाही. त्यात आपण म्हटले होते की, टीव्हीची बटने देखील बंद करा. म्हणजे आपल्याकडे टीव्ही आपण रिमोटवर ठेवतो आणि रिमोटनेच बंद करतो.

...... 4एस 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

त्यावेळेस त्याला वीज पुरवठा करणारे मुख्य बटण हे चालूच असते. तो लाल दिवा नेहमीच पेटता असतो. तोही बंद करावा कारण भार नियमनाला तोंड देण्यासाठी आपल्याला असे करणे आवश्यक आहे अशी ती जाहिरात आहे. म्हणजे आपल्या सरकारला किती काळजी आहे ते पहा. त्यांनी अधिकृतपणे सांगितले की, ग्रामीण हालअपेष्टांची जाणीव म्हणून मंत्रालयापासून इतर ठिकाणचे ए.सी. युनिटस् बंद करा वगैरे वगैरे. ही जाहिरात मागील पाचव्या अधिवेशनातील आहे. मंत्र्यांनी बंगल्यातील, केबिनमधील ए.सी. बंद करायचे, मग आपले पेपरवाले येऊन त्याचे फोटो काढणार. सारे काही बरोबर मॅनेज करायचे. आता ही नाटके दोन दिवस करतात आणि पुन्हा सारे सुरू. त्यामुळेच मग बंद असलेल्या बंगल्याची विजेची बिले येतात ती कशी येतात हेही आपणा सर्वांनाच माहिती आहे. आता तर म्हणे एसी असलेल्या मॉल्सनी त्यांचा विजेचा वापर 30 टक्क्यांनी कमी करावा अन्यथा त्यांची वीज बंद करावी लागेल अशीही धमकी दिली गेली. शहरी घरांमध्ये अनावश्यक विजेचा वापर कमी करा. घरामध्ये एक दिवा चालू ठेवल्यास 300 मे.वॅ. वीजची मागणी कमी होईल. मग पाणी कशावर तापवायचे ? तर गॅसवर पाणी तापवा. आता गॅस देखील इतका महाग करून ठेवला आहे की विचारता सोय नाही. आताचे आमचे पंतप्रधान, माननीय श्री.मनमोहन सिंग हे पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी कौतुकाने आपल्या पत्नीला विचारले की, मी तुमच्यासाठी काय करू ? त्यावर आमच्या त्या माय-माऊलीने सांगितले की, तुम्ही पंतप्रधान झालात तर आता गॅसच्या किंमती प्रथमत कमी करा. म्हणजे आमच्या त्या मातेने कशाचा आग्रह धरला तर गॅसच्या किंमत कमी करा. आणि आता सर्वात जास्त किंमत त्या गॅसचीच झालेली आहे. मग म्हणणार की, थंड पाण्याने आंघोळ करा. ....

( यानंतर सौ. रणदिवे .... 4टी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 18:05

श्री.दिवाकर रावते . . . .

तुम्ही ही परिस्थिती निर्माण केलेली आहे. त्याच्यामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, "तसेच आदेशानुसार भार नियमानाचे वेळापत्रक कठोरपणे अंमलात आणण्यात येईल. तीन महिने भार नियमन न वाढविले तर अन्यथा महाराष्ट्र राज्यातील अनेक तास ग्रीड फेल्युअरमुळे अंधारात जातील." माननीय मंत्री महोदय, तुम्ही लोकांना कशा प्रकारचे सल्ले देत आहात ? आम्ही सुधारण्याऐवजी तुम्ही बिघडा हे सांगण्याचा प्रयत्न का करीत आहात ? हे मला कळत नाही. खरे म्हणजे माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, आपण हा विषय मांडावयास हवा होता. याबाबतीत आम्हाला माननीय मंत्री महोदयांकडून खुलासा पाहिजे. या अधिकाऱ्यांपैकी एकाला तरी घरी बसवा, नाहीतर याबाबतीत जनतेला खुलासेवार उत्तर द्या. मध्यंतरी अशी माहिती देण्यात आली की, "महावितरणला 80 कोटीचा नफा." एकीकडे लोकांना वीज मिळत नाही, वीज निर्मिती होत नाही. मग तुम्हाला हा नफा कसा झाला ? कुठून नफा झाला ? परत तुम्ही तुमचे अधिकृत परिपत्रक काढून लोकांना सांगत आहात की, महावितरण नफ्यामध्ये आलेले आहे. परंतु हा नफा कसा झाला ? माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांनी काल एक वाक्य उच्चारले, पण ते आज उच्चारलेले नाही. आपण असे म्हटलेले होते की, तुम्ही दोन तास वीज देता, पण 24 तासाचे पूर्ण पैसे वसूल करण्यात येतात. खरे म्हणजे जेवढे मीटर फिरले असेल तेवढेच पैसे घ्यावयास पाहिजेत. असे असताना महावितरणला एवढा नफा कसा झाला ? दुसरी गोष्ट म्हणजे माननीय मुख्यमंत्र्यांनी याबद्दल कौतुक केले होते. आमचे माननीय मुख्यमंत्री सगळयांचेच कौतुक करतात. आमचे माननीय श्री.नारायण राणे यांचे दुपारी कौतुक केले ते तुम्ही सर्वांनी ऐकलेच. ते तेथे कौतुकाने बोलले. "नववधू प्रिया मी बावरते" ही कुसुमाग्रजांची कविताही ते दिल्लीमध्ये म्हणाले. त्यावर सदनामध्ये एवढे मोठे रामायण घडेल असे त्यांना त्यावेळी देखील वाटले नव्हते. ते हल्ली फार लोकांचे कौतुक करतात. ते माननीय श्रीमती सोनिया गांधी यांचेही कौतुक करण्यासाठी गेले होते. पण माननीय श्रीमती सोनिया गांधी यांचे कौतुक करताना, ते माननीय पंतप्रधान यांचे, माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांचे कौतुक करावयास विसरले. केंद्र शासनाने कर्जमाफी जाहीर केल्यानंतर माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेबांनी जाहिरातीमध्ये माननीय श्रीमती सोनिया गांधी व माननीय पंतप्रधान यांचे कौतुक केले होते की नाही ? पण ते त्यांचे कौतुक करावयास विसरले. माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेब, माननीय श्रीमती सोनिया गांधी .....

. . . .4 टी -2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

यांच्या बाजूला बसले होते. आपण सर्वजण टी.व्ही.वर पहात होतो. मध्ये-मध्ये ते माननीय रेल्वे मंत्री श्री.लालूप्रसाद यादव यांना देखील सल्ला देत होते. कुठे काय चालले आहे ? कोळसा कुठून येतो ? कुठून काय येते ? वगैर.पण ते बाकीच्यांचे कौतुक करावयास विसरले. माननीय मुख्यमंत्र्यांनी महावितरणला झालेल्या नफ्याचे कौतुक केले. मग अशी बातमी आली की,"महावितरणला 80 कोटी रुपयांचा नफा झाला, त्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांकडून कौतुक" पण अशा प्रकारे कौतुक करीत असताना, मी या राज्याचा मुख्यमंत्री आहे आणि या माझ्या राज्यातील जनता काळोखात रहात आहे याची त्यांना कशी जाणीव झाली नाही ? हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, यानंतर मला मुंबईच्या संबंधात बोलावयाचे आहे. मुंबईच्या संबंधात येथे सतत विषय मांडला जातो. मुंबई या देशाची आर्थिक राजधानी आहे, महाराष्ट्र राज्याची राजधानी आहे. पण मुंबईला एम.एस.ई.बी.कडून वीज पुरवठा होत नाही, तर मुंबईसाठी टाटा कडून स्वतंत्ररित्या वीज पुरवठा होतो आणि तो गेली 80 वर्षे होत आहे. सन्माननीय सदस्यांना ऐकावयाचे असेल तर सांगू इच्छितो की, त्यावेळेला माननीय श्री.फिरोजशहा मेहता हे मुंबईचे महापौर होते. त्यांचा श्री.टाटा यांच्याबरोबर वाद झाला. तेही पारशी आणि हेही पारशी. पण त्यांनी श्री.टाटा यांना सरळ सांगितले की, मला तुमची वीज नको आणि त्यांनी दोन दिवसात मुंबईमध्ये कंदील लावले. त्यावेळी मुंबईसाठी टाटा कंपनीची गॅसमार्फत वीज मिळत असे. माननीय श्री.फिरोजशहा मेहता यांनी सांगितले की, मला तुमचा गॅस नको. मला या भावाने वीज देत असाल तर द्या. अमुका एका भावाने देणार असाल तर द्या, नाहीतर मला याबाबतीत करार करावयाचा नाही वगैरे आणि ही सर्व चर्चा महानगरपालिकेतील रेकॉर्डमध्ये आहे. तेव्हा पूर्वीपासून मुंबईमध्ये टाटा मार्फत वीज मिळते आणि बी.एस.ई.एस.उपनगरासाठी वीज देत होती, ती आता रिलायन्सने विकत घेतली आहे. मध्यंतरी विदर्भातील वीज मुंबईसाठी दिली जात आहे म्हणून शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते. पण तशी स्थिती नाही. जी वीज मिळते, त्याचे मेन ग्रीड कळवा येथे आहे आणि तेथून सर्व महाराष्ट्रामध्ये डिस्ट्रीब्युशन होते. कळवा येथे 450 मे.वॅ.क्षमतेचे ट्रान्समिशन आहे. पण मुंबईच्या बाबतीत उलटा प्रचार केला जातो. खरे म्हणजे मुंबईला कोणीही वीज देत नाही. ग्रामीण भागातील खेडयापाडयांमध्ये लाईट देखील लागत नव्हता, तेव्हापासून मुंबईसाठी स्वतंत्रपणे वीज निर्मिती होत आहे. म्हणून मुंबईमध्ये मॉल आहेत, मुंबईमध्ये हे आहे, ते आहे वगैरे म्हटले जाते. पण येथे टाटा

. . . .4 टी-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

मार्फत वीज पुरवठा होतो आणि ते उत्पन्न घेतात. मी शासनाला आवाहन करणार आहे की, टाटा बी.ई.एस.टी.च्या माध्यमातून ज्या भावाने मुंबई शहरामध्ये वीज देते, त्याच दराने ग्रामीण भागातील जनतेला देखील वीज देण्यात यावी. मुंबईमध्ये सर्वात स्वस्त वीज मिळते. मुंबईमध्ये मिळणारी वीज महाग नाही, पण उपनगरामध्ये विजेचे बील भरताना तोंडाला फेस येतो.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

रिलायंसवाले लोकांना लुटत आहेत. बीईएसटी, टाटा या कंपन्या या ठिकाणी लोकांना लुटत नाहीत. आज मुंबई महानगरामध्ये जी बससेवा दिली जाते ती विजेच्या आलेल्या नफ्यातून दिली जाते. या ठिकाणी स्वस्तात वीज देऊन ते नफ्यात आहेत आणि आपण महाग वीज देऊन सुध्दा घाट्यात आहात. हे काय गणित आहे याचे एकदा संशोधन करावे. श्री. गोडबोले यांच्यासारख्या माणसाला कधीच नियुक्त करु नका. त्यांनी आपल्याला मातीत घातले. मुंबईमध्ये जो वीजपुरवठा होतो त्यामधून मुलुंडचे दोन चार रस्ते बाजूला ठेवले आहेत. तो भाग सुध्दा यांच्याकडे देऊन टाकावा. किमान ते तरी सुखी होतील. आपल्या लोडशेडींगमध्ये मुंबईचा तेवढाच भाग अंधारात असतो. माझ्याकडे एक कोष्टक आलेले आहे. उपनगरासह संपूर्ण मुंबईला सरासरी विजेची मागणी 2700 मेगावॅट आहे. त्यामध्ये टाटा 830 मेगावॅट वीज मुंबईला देते आणि रिलायन्स 1400 मेगावॅट वीज तयार करते. त्या प्रकल्पाचे काम जेव्हा डहाणूला चालू होते त्या फाऊंडेशनच्या कामापासून मी त्या ठिकाणी वेगळ्या कामासाठी जात होतो. तेव्हापासून मी त्या प्रकल्पाची उभारणी पाहिलेली आहे. त्यातील अर्धी वीज गुजरातला जाते. आपण ती वीज घेतली नाही. ती वीज आपण नाकारली. आता उपनगरात विजेच्या बाबतीत मोठे भांडण लागले आहे. तो वेगळा विषय आहे. तो या प्रस्तावाचा विषय नाही. परंतु टाटा एनर्जी, बीईएसटी आणि त्यांचे वितरण, त्याच्या कोर्टकचेऱ्या या सगळ्या बाबी आहेत. आता टाटा कंपनीला स्वतंत्र वीज पुरवठा करण्यास कोर्टाने मान्यता दिलेली आहे. म्हणजे टाटा कंपनी आता माझ्या घरामध्ये थेट वीज देऊ शकते. आता बीईएसटीची गरज नाही. कोर्टाने मान्यता दिलेली आहे. आता रिलायन्सची सुध्दा गरज नाही. उद्या जर टाटाला पूर्ण लायसन्स देऊन टाकले आणि वीज उपलब्धता वाढली तर टाटा आपल्या एमएसईबीच्या क्षेत्रात सुध्दा येऊ शकते आणि त्याचे स्वागत करण्यास हरकत नाही. या ठिकाणी साखर कारखान्याचा उल्लेख करण्यात आला म्हणून मी त्याच्यावर बोलणार आहे. बगॅसवर वीज निर्मिती करण्याचा विषय आहे. मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. सगळ्या साखर सम्राटांनी कारखाने बुडवले त्यांच्या बाबतीत आपण आज भाडे तत्वावर का होईना पण बुडणाऱ्या शेतकऱ्याला वाचविण्याचे खूप मोठे काम आपण करीत आहात. शेतकऱ्यांना तेवढे पैसे मिळत नसतील पण शेतकरी आज खूश

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. दिवाकर रावते .....

आहेत. मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. या मंत्रिमंडळामध्ये ज्यांच्याकडे आशेने पाहावे असे आपण एकमेव मंत्री आहात आणि आपण आपल्या कर्तृत्वावर मंत्रिमंडळामध्ये आहात. आपल्याला काही देतच नाहीत. आपल्याला चांगले खाते दिले असते तर त्याचे सोने झाले असते. आपल्याला फिरणारे पंखे दिले आहेत. अपारंपारिक ऊर्जा विभाग आणि फलोद्यान विभाग आपल्याकडे आहे. आपल्या कर्तृत्वाला आम्ही वाव देऊ. आपण चिंता करु नका.

सभापती महोदय, काल मला सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब सांगत होते. आपण किती कर्मदरिद्री लोक आहात ? या सगळ्या अधिकाऱ्यांना काय म्हणावयाचे ? सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांकडे बगॅसवर वीज निर्मिती होत होती. ती वीज आपण 3 रुपये 5 पैसे दराने घेत होता. आता बगॅस संपला आणि कारखाने बंद झाले. कोळशावर वीज निर्मिती सुरु झाल्यानंतर त्यांचा दर साडेतीन रुपये आला. आपण इमरजंसीमध्ये बाहेरुन पाच रुपये, सात रुपये दराने वीज घेता. मग विदर्भामध्ये आपल्याच एका सन्माननीय सदस्यांने श्रमाने उभ्या केलेल्या त्या वीज प्रकल्पातून जी पाच किंवा दहा मेगावॅट वीज निर्माण करतात ती का घेत नाही ? ते म्हणाले की, मला साडेतीन रुपये खर्च येतो त्यामुळे आपण साडेतीन रुपये दराने वीज घ्यावी. शासनाने सांगितले की, आम्हाला 3 रुपये 5 पैसे दराने वीज द्या. त्यांनी महिन्याला 15 लाख रुपये तोटा सहन करण्यापेक्षा ती वीज निर्मिती बंद केली. आपण किती कर्मदरिद्री लोक आहात ? ती वीज आपण का घेतली नाही ? मला कालच सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब सांगत होते की, मला वीज निर्मितीचा खर्च साडेतीन रुपये खर्च येतो. तेवढ्या दराने तरी ती वीज घ्यावी. किमान बाजूबाजूच्या दोन-तीन जिल्ह्यांना तरी ती वीज पुरेल. ती वीज आपण घेतली नाही. त्यामुळे महिन्याला पंधरा लाख रुपये तोटा नको म्हणून त्यांनी ती वीज निर्मिती बंद केली. साखर कारखान्यांच्या बाबतीत आपण पैसे वगैरे द्या असे जे सांगत आहात ते अजिबात देऊ नका. ते पैसे पण बुडवतील. कारखान्याचे पैसे बुडवले तसे तेही पैसे बुडवतील. राज्यात वीज विकण्याच्या करारातून आम्हाला मुक्त करा असे साखर कारखाने सांगत आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, आम्ही निर्माण केलेली वीज आपल्याला 3 रुपये 5 पैसे दराने विकण्याऐवजी आम्हाला बाहेर पाच ते

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. दिवाकर रावते .....

सहा रुपये दर मिळत आहे त्यामुळे आपला करार रद्द करा अशी मागणी करीत आहेत. मग आपल्या शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी आपल्याकडे असलेली वीज का घेत नाही ? शेतकऱ्यांचाच कारखाना आहे. जर दोन पैसे तिकडे गेले तर ते शेतकऱ्यांकडेच जाणार आहेत. त्या ठिकाणी सक्षमता का निर्माण करीत नाही ? 1600 कोटीचा विजेचा करार रद्द करण्याच्या प्रकरणात 1500 ते 1600 कोटी रुपयांचा भूर्दन्ड बसेल अशी कारखानदारांची परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यावर आपण काय उपाययोजना करणार आहात ? आपण त्या खात्याचे मंत्री आहात. ती वीज निर्माण होते हे आपण सांगावयास पाहिजे. दुसरी बाब अशी की, आपण बिलातून लोकांकडून लससम एक हजार रुपये घेत आहात, ते बंद करा. आपण लोकांना का छळत आहात ? आता त्याच्यावर आंदोलने पेटली आहेत. मला माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरातून एक अपेक्षा आहे. मी जे सातत्याने मागतो ते आपण देत नाही. या सदनातून जर ते मिळणार नसेल तर कोठून मिळणार हा प्रश्न आहे. अपांरपारिक ऊर्जेच्या माध्यमातून फिरणारे पंखे आपल्या ताब्यात दिलेले आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्याबाबतीत प्रचंड घोळ आहे. एकटया बजाज कंपनीला 750 कोटी रुपयांची सबसिडी दिली आहे. त्या कंपनीचे किती पंखे फिरतात, त्यातून किती वीज निर्मिती होते ते सांगावे. सुजलाम् आणि इतर काही लोकांनी अपांरपारिक ऊर्जेसाठी पंखे उभे केले आहेत. त्यातून किती वीज निर्मिती अपेक्षित आहे व प्रत्यक्षात किती विजेचे उत्पादन होत आहे, लोकांना विजेचे किती बिल येत आहे, या कंपन्यांची नावे सांगावीत. या प्रस्तावामध्ये आम्ही असा विषय मांडलेला आहे की, "विजेच्या या गंभीर संकटामुळे उद्योगधंदे, शेती, कुटीरोद्योग यावर विपरित परिणाम होणे, अनेक उद्योग बंद होणे, तर अनेक उद्योग परराज्यात स्थलांतरित होणे, शेतामधील वीज पंपांना वीज मिळत नसल्यामुळे शेती क्षेत्रावर देखील वीज टंचाईचा विपरित परिणाम होऊन शेती उत्पादन घटणे, सातारा, सांगली जिल्ह्यातील आजी-माजी राजकीय पुढा-यांच्या-मंत्र्यांच्या पवन चक्क्या पर्यायी ऊर्जेच्या नावाखाली सुरु ठेवून शेतक-यांकडून अनामत रक्कमेच्या नावाखाली पैसे घेऊन त्यांची फसवणूक व लूट करण्यात येणे" त्यामुळे या आजी-माजी मंत्र्यांची नावे सांगावीत. आपण केवळ कंपन्यांची नावे सांगू नयेत, त्या कंपन्यांचे बाप कोण आहेत तेही सांगावे. त्यांच्या परमपूज्य पिताश्रींची नावे सांगावीत अशी मागणी करतो. त्याचप्रमाणे सिक्युरिटी डिपॉझिट घेण्याचे बंद करण्यात यावे. सन्माननीय मंत्रिमहोदयांकडून चांगले व व्यवस्थित उत्तर मिळावे अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे ( अपारंपारिक ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्रातील विजेच्या टंचाईच्या संदर्भात अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे.

सभापती महोदय, या वरिष्ठ सभागृहामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून जनतेला विजेच्या टंचाईचा सामना करावा लागत असल्यामुळे राज्याची विजेची नेमकी परिस्थिती काय आहे, नेमके काय घडणार आहे याबद्दल सविस्तर चर्चा होऊन राज्यातील जनतेला दिलासा मिळावा असे आपल्या सर्वांना अभिप्रेत आहे. खरे तर आज या चर्चेला माझे सहकारी सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील हे उत्तर देणार होते. परंतु एकाचवेळी दोन्ही सभागृहांमध्ये अंतिम आठवडा प्रस्तावाद्वारे एकाच विषयावर चर्चा सुरु असल्यामुळे मी या चर्चेला उत्तर देणार आहे. या चर्चेच्या निमित्ताने अनेक प्रश्न या सभागृहात चर्चिले गेले. त्यात प्रामुख्याने लोडशेडिंगमध्ये झालेली वाढ, त्यातून निर्माण झालेला असंतोष, उद्योग क्षेत्रामध्ये लोडशेडिंग वाढविल्यामुळे उद्योगधंद्यावर होणारे संभाव्य परिणाम, पिण्याच्या पाण्याच्या अनुषंगाने काही ठिकाणी उद्‌भवलेली परिस्थिती, शेतीच्या क्षेत्रात निर्माण झालेली परिस्थिती या सगळया प्रश्नांसंबंधी काही सूचना करीत असताना यावर नेमक्या काय उपाययोजना करता येईल आणि जनरेशन, डिस्ट्रीब्यूशन आणि ट्रान्समिशन कंपन्यांच्या माध्यमातून अजूनही चांगल्या पध्दतीचे काम करुन लोकांना चांगला दिलासा देता येईल अशाप्रकारच्या भावना व्यक्त केल्या आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी एक प्रमुख मुद्दा उपस्थित केला आहे.

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

नंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 18:20

(श्री. विनय कोरे....)

गेले दोन-तीन दिवस महाराष्ट्रातील अनेक प्रमुख वृत्तपत्रातून सुदा त्या दिशेने काही बातम्या लिहिण्याचे प्रयत्न सातत्याने होत आहेत. महाराष्ट्राच्या एकूण उत्पादन क्षमतेपैकी जवळ जवळ 53 टक्के क्षमता बंद आहे त्यामुळे अशा प्रकारची परिस्थिती महाराष्ट्रासमोर निर्माण झालेली आहे. तेव्हा सर्वप्रथम या विषयाचा खुलासा व्हावा, या संदर्भातील संभ्रम दूर व्हावा म्हणून महाराष्ट्रामध्ये नेमकी असणारी विजेची उत्पादन क्षमता आणि आज महाराष्ट्रात चालू असणा-या क्षमतेच्या माध्यमातून सुरु असलेली वीज निर्मिती याबाबतची तपशीलवार माहिती मला सभागृहाला द्यावयाची आहे. खरे तर वीज निर्मितीचे प्रमुख साधन म्हणून कोळशापसून फार मोठ्या प्रमाणावर औष्णिक वीज निर्मिती होते. कोळशापासून 6800 मेगावॅट इतकी औष्णिक वीज निर्मिती करण्याची आपली स्थापित क्षमता आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आपल्या भाषणामध्ये असे सांगितले की, अनेक यंत्रे ही 30-30, 33-33 वर्षापासून कार्यरत आहेत. म्हणून आपली औष्णिक वीज निर्मितीची स्थापित क्षमता ही 6800 मेगावॅट इतकी जरी दिसत असली तरी प्रत्यक्षात 6500 मेगावॅट इतकी स्थापित क्षमता आपणास उपलब्ध होते. उरणचा 852 मेगावॅटचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाला ओएनजीसी आणि गेलच्या माध्यमातून गॅस मिळण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत. परंतु 852 मेगावॅट वीज निर्माण करता येईल इतका गॅस आपल्याला मिळत नाही. या उरण प्रकल्पातून आपल्याला 350 मेगावॅट वीज उपलब्ध होते. आता पुन्हा केन्द्र शासनाने 0.33 एमएम गॅस देण्याचे कबूल केल्यामुळे येणा-या एक दोन दिवसामध्ये 400 ते 425 मेगावॅट पर्यन्त वीज निर्माण करता येईल. तिसरी एक वीज निर्मिती करणारी मोठी क्षमता आपण सातत्याने मोजण्याचा प्रयत्न करतोय आणि ती क्षमता म्हणजे कोयना धरण होय. या कोयना वीज प्रकल्पाची स्थापित क्षमता 1900 मेगावॅट आहे. परंतु या कोयना वीज प्रकल्पाचा वापर आपण फक्त पिक पिरिअडच्या वेळी करण्याचा प्रयत्न करीत असतो. सकाळी 6.00 ते 10.00 आणि सायंकाळी 6.00 ते रात्री 10.00 या वेळी जास्तीत जास्त विजेची मागणी असते आणि त्या वेळेला कोयना वीज प्रकल्पातून निर्माण केलेली वीज वापरण्यात येते. कोयना धरणातील 67 टीएमसी इतके मर्यादित पाणी वीज निर्मितीसाठी लवादाने उपलब्ध करुन दिलेले आहे. त्यामुळे आपली जी

...2..

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 18:20

(श्री. विनय कारे...

स्थापित क्षमता आहे तिच्या सरासरी 700 मेगावॅट इतकीच क्षमता आपल्याला उपयोगात आणता येते. वेगवेगळया ठिकाणी असलेल्या वीज प्रकल्पातून साधारणत: 350 मेगावॅट इतकी वीज उपलब्ध होते, त्यातही आपल्याला निसर्गावर फार अवलंबून रहावे लागते. स्थापित क्षमतेची बेरीज केली तर 9900 मेगावॅट इतकी क्षमता आपल्याकडे उपलब्ध आहे अशी आकडेवारी आपल्या समोर येते. परंतु प्रत्यक्षात मिळणारी वीज गृहीत धरली तर 7700 मेगावॅट इतकीच विजेची स्थापित क्षमता आपल्याला उपलब्ध होते. वर्षातील वेगवेगळया महिन्यामध्ये असणारी मागणी, मागणीत होणारी वाढ आणि घट या सर्वांचा विचार करुन त्याचे नियोजन करीत असताना गेल्या तीन वर्षामध्ये एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात आली की आपणला प्लॅन, रिपेअर आणि मेण्टेनन्सची कामेही करावी लागतात. 12 महिन्यातून एकदा बॉयलर ओव्हरहॉलिंगसाठी काढला नाही तर अनेक प्रश्न निर्माण होतात.

....नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 18:25

श्री. विनय कोरे...

त्या बॉयलरच्या परिसरामध्ये काम करणाऱ्या कामगारांना धोका निर्माण होतो त्याचप्रमाणे इंधनाचा वापर देखील वाढतो, एफीशीअन्सी कमी होते. म्हणून प्रत्येक पॉवर जनरेटरला रोटेशनने काही ठराविक काळानंतर कुठल्या टप्प्यावर काम करावे लागेल याचे शास्त्रशुध्द नियोजन करीत असतो. हा आराखडा तयार करीत असताना 6800 वीजेची स्थापित क्षमता असेल तर वर्षाच्या 12 महिन्यात एकेक संच देखभाल आणि दुरुस्तीसाठी यावा अशा प्रकारचे नियोजन करावयाचे असेल तर साधारणत: प्रत्येक महिन्याला 650 मे.वॅ.इतके लोड देखभाल आणि दुरुस्तीसाठी उपलब्ध झाले पाहिजे अशा प्रकारचे नियोजन असते. दर महिन्याला 650 मे.वॅ.वीजेचे नियोजन करीत असताना वर्षातील दोन महिने असे आहेत की ज्यावेळी वीजेची सगळयात जास्त मागणी असते. ते महिने म्हणजे मे आणि ऑक्टोबर असे दोन महिने वीजेची सगळयात जास्त मागणी नोंदविली जाते. याचे नियोजन करीत असताना दर महिन्याला 650 मे.वॅ.चे संच दुरुस्ती आणि देखभालीसाठी काढण्याऐवजी मे आणि ऑक्टोबर महिन्यात 350 मे.वॅ. दुरुस्तीसाठी जाऊन त्यावेळेला जास्तीची 350मे.वॅ. वीज उपलब्ध करुन घ्यावी आणि सगळयात कमी मागणी असणारे पावसाळयातील काही महिने असतात या महिन्यात हे संच देखभाल आणि दुरुस्तीसाठी उपलब्ध व्हावेत अशा प्रकारचे यावर्षी नियोजन केले नाही तर संपूर्ण वर्षाची वीज पुरवठयाची जबाबदारी स्वीकारत असताना असे नियोजन करीत असतो. देखभाल आणि दुरुस्तीसाठी अशा प्रकारे संच उपलब्ध करीत असतानाच हवामान तज्ज्ञांनी पाऊस वेळेवर पडेल असा अंदाज व्यक्त केले सुरुवातही जूनच्या 7 तारखेला झाली. देखभाल आणि दुरुस्तीचे काम घेत असताना एक संच दुरुस्तीसाठी काढावयाचा म्हटले तरी त्याची तयारी त्याच्या आधी 4-5 महिने करावी लागते. संबंधित कंपनीला ऑर्डर द्यावी लागते. स्पेअर पार्टसाठी ऑर्डर द्यावी लागते. काम करणारी टीम तयार करावी लागते. या सगळया शक्यता गृहीत धरुन 1250 मे.वॅ. संचाच्या दुरुस्तीची नियोजन अगोदरच केले होते. त्यानुसान दुरुस्तीसाठी ते काढले होते. हा हिशोब करीत असताना 6400 मे.वॅ.वीज उपलब्ध व्हावयाला पाहिजे अशा प्रकारचे जे चित्र होते आणि दुरुस्त झालेल्या संचातून जे जनरेशन होते त्यामध्ये फार मोठी तफावत पडली असे चित्र नाही. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब यांनी प्रश्न उपस्थित केला की वीजेचेअनेक प्रश्न हे पावसाच्या दिवसात निर्माण होतात. खरे पाहिले तर कोळशाच्या खाणी ज्या परिसरात आहेत तेथील माती ब्लॅक कॉटन सॉइल आहे. त्या परिसरात पाऊस

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 18:25

श्री. विनय कोरे...

पडल्यावर ती माती पावसाच्या पाण्याबरोबर माईनमध्ये जाते. माईनमधून कोळसा जनरेशनसाठी उपलब्ध होतो तो ओला आणि चिकट झालेला येतो. सध्याच्या पध्दतीनुसार रेकने कोळसा येतो आणि तो ग्रेडरमध्ये ओतला जातो. अशा पध्दतीचा ओला कोळसा रेकऐवजी माणसांच्या माध्यमातून खाली करावा लागतो आणि त्याचे ग्रेडींग करावे लागते. या सगळयाचा परिणाम वीज निर्मितीवर होतो. खरे तर ही घटना दरवर्षी घडते. यावर्षी नेमका डिमांड वाढल्यामुळे आणि दुकाळी परिस्थिती निर्माण झाली त्यामुळे तसेच कृषीपंपावरील लोड वाढल्यामुळे ज्या ठिकाणी पीके घेतली जातात तेथे लोड थोडसे वाढले.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे.....

आणि दुसऱ्या बाजूला मात्र जनरेशनचे काम करावे लागले. त्यामुळे एक वेगळी परिस्थिती यावेळी निर्माण झाली. म्हणून जनरेशन कंपनीचे काम कसे झाले हे सांगण्यापूर्वी यावेळची जी एकदम अडचणीची परिस्थिती आपल्यासमोर निर्माण झाली, मधले काही दिवस आपल्यासमोर अडचणीचे आले याची प्रमुख कारणे सभागृहाला पहिल्यांदा सांगू इच्छितो.

सभापती महोदय, प्रामुख्याने ज्याचा अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला त्या एन्रॉन प्रकल्पाच्या माध्यमातून 1200 मे.वॅट वीज सातत्याने मिळेल अशा प्रकारची आपली अपेक्षा होती, परंतु एन्रॉनच्या माध्यमातून सरासरी विचार केला तर 600 मे.वॅटपेक्षा जास्त वीज आजपर्यंत उपलब्ध होऊ शकली नाही. मधले काही दिवस एकदम ती वीज जवळजवळ शून्यापर्यंत जाऊन पोहोचली. आज पुन्हा 600 मे.वॅटचे जनरेशन सुरु झाले आहे. भरवशाचे निर्मिती केंद्र म्हणून एन्रॉनकडे बघत होतो. जे नवीन प्रश्न निर्माण होतात त्यातून खरे तर भरवशाचे निर्मिती केंद्र म्हणून एन्रॉनकडे बघता येईल की नाही याकडे सर्वांनाच प्रामुख्याने बघावे लागेल अशी स्थिती आहे. याखेरीज सेंट्रल सेक्टरकडून वीज मिळते. त्यामध्ये विंध्याचल पॉवर प्रॉजेक्टमधून 1000 मे.वॅट वीज पुरविली जाते. फोर्स प्लॅन नसताना अचानक विंध्याचल प्रकल्पामध्ये बिघाड झाला आणि तेथील जनरेशन बंद पडले व 1000 मे.वॅटचा लोड महाराष्ट्रावर आला. या प्रमुख दोन कारणांमुळे अडचणीची परिस्थिती निर्माण झाली. खरे तर विजेच्या क्षेत्रात थोडी शिस्त लावण्याचा प्रयत्न केला, 12 तासाचे लोडशेडिंग ठरविले होते. 12 तास लोडशेडिंग केल्यानंतर वीज मिळू शकेल अशा प्रकारचा विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या विश्वासाला तडा जाईल अशा प्रकारची स्थिती या क्षेत्रामध्ये निर्माण झाली ही वस्तुस्थिती मान्य करतो.

सभापती महोदय, आणखी एक गोष्ट मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. विजेच्या क्षेत्रात ज्यावेळी ग्राहकांच्या मनात अनिश्चितता निर्माण होते त्यावेळी सगळ्यांनी मिळून मिळेल तेवढी वीज वापरायची अशी भावना प्रामुख्याने तयार होते. मी ग्रामीण भागात राहणारा कार्यकर्ता आहे. त्या परिसरात ऊसाची शेती ही प्रामुख्याने पाण्यावर अवलंबून असणारी शेती आहे. आपल्याकडे शेतकऱ्यांनी वीज येईल त्यावेळी आपोआप मोटार सुरु झाली पाहिजे अशा प्रकारची यंत्रणा कार्यान्वित करण्याचा प्रयत्न केला. उद्या वीज येईल की नाही अशी काळजी वाटते त्यावेळी इन्व्हर्टरच्या माध्यमातून वीज साठविणे, ज्यावेळी वीज येईल त्यावेळी जास्तीत जास्त वीज

SGB/ MMP/ SBT/ 18:30

श्री.विनय कोरे.....

वापरण्याची प्रवृत्ती वाढल्यामुळे प्रत्यक्षात असणाऱ्या मागणीपेक्षा तयार झालेली मागणी ही 700 ते 800 मे.वॅटपर्यंत वाढते. म्हणून ग्राहकांच्या मनामध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करणे महत्वाचे ठरते. 12 तासानंतर हमखास वीज येईल, अमुक तास वीज मिळणार आहे या अनुषंगाने लोडशेडिंगचा प्लॅन बदलणे या चांगल्या उपाययोजना मांडल्या जातात. म्हणूनच पुणे, भांडुप, ठाणे, नवी मुंबई याठिकाणी शून्य लोडशेडिंग लागू केले होते. त्याठिकाणी लोडशेडिंगला सुरुवात करणे अशा प्रकारचे उपाय प्रामुख्याने या संकटातून बाहेर पडण्यासाठी स्वीकारले. खरे तर मला याठिकाणी आनंदाने सांगितले पाहिजे, काही आपले बंद पडलेले संच परत आले. विंध्याचल प्रकल्पातून 600 मे.वॅट वीज पुन्हा मिळायला सुरुवात झाली. केंद्र सरकारने पुन्हा अतिरिक्त 500 मे.वॅट वीज उपलब्ध करुन दिली. या सगळ्यांचा परिणाम म्हणून 25 जुलैपासून जास्त लोडशेडिंग करण्याची महाराष्ट्रात आपल्यावर पाळी आलेली नाही. खरे तर लोडशेडिंगच्या अनुषंगाने दोन विषयांची चर्चा याठिकाणी करण्यात आली. शून्य लोडशेडिंग म्हणजे काय? इएचयू ऑपरेशन म्हणजे काय? इमर्जन्सी फ्रिक्वेन्सी फेल्युअरबाबत खुलासा करावा अशी भावना सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी व्यक्त केली. मला प्रामुख्याने सांगितले पाहिजे. डिमांड किती आहे हे आपल्याला कधी कळते? हे वीज मंडळाला कधीच माहित नव्हते. त्यांनी माहिती देणारी गोष्ट एकच असते ती म्हणजे आपल्याकडे आज उपलब्ध वीज किती आहे.

(नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे.....

वीज किती उपलब्ध आहे हे विचारात घेऊन वीज वितरणाचे नियोजन केलेले असते. वीज वितरीत होताना प्रत्येक फिडरवर आलेला लोड, प्रत्येक सबस्टेशनवरची मागणी आणि तफावत यातून त्या दिवशी नेमकी किती मागणी होती यासंबंधीचा आकडा येतो. लोडशेडिंगच्या माध्यमातून प्लॅन केलेला सप्लाय दिल्यानंतर, त्यात मोठ्या प्रमाणावर अडथळा निर्माण होतो, त्यावेळी एएचयु ओपन करावा लागतो. तो एएचयु ओपन केल्यानंतर प्लॅन लोड शेडिंगपेक्षा अधिकचे लोडशेडिंग करावे लागते. मला येथे आश्वस्त करावयाचे आहे की, प्लॅन लोडशेडिंगपेक्षा जास्त लोडशेडिंग करण्याची वेळ उद्याच्या काळात महाराष्ट्रात येईल असे मला तरी स्वत:ला वाटत नाही. आता आपण लोडशेडिंग वाढवले आहे, ते कमी करणे शक्य आहे, अशा प्रकारचे चित्र निसर्गाने पावसाच्या रूपाने देण्यास सुरूवात केल्याने त्यातून साध्य करता येईल असे मला वाटते. जनरेशनच्या क्षेत्रात आपण चांगले काम करू शकलो काय ? वीज हानी, वीज गळतीसंबंधी काळजीपूर्वक काम करतो आहे काय ? या सगळ्या गोष्टीचा विचार यानिमित्ताने करावयाचे ठरविले तर मला सांगितले पाहिजे की, मार्च 2005-2006 साली 40928 मिलियन युनिटस जनरेशन आपण करीत होतो. मार्च-एप्रिल 2006-2007 मध्ये 42607 मिलियन युनिटस वीज निर्माण करू शकलो. प्लॅन लोड फॅक्टर 73 टक्क्यांवरून 76.99 टक्क्यांपर्यंत नेऊ शकलो. मला येथे सांगितले पाहिजे की, योग्य वेळी मेंटेनन्स केल्यामुळे ऑईल कन्झमशन 2.27 टक्के होते, ते 1.78 टक्के खाली आणण्यात यश मिळू शकले. मेगॅवॅटच्या दृष्टीने आपण जनरेशन किती केले याची दोन वर्षातील तुलना करायचे ठरविले तर जून 2006 साली 4659 एवढे उत्पादन आपण थर्मलच्या प्रोजेक्टद्वारे करत होतो. जून 2007 साली तेच उत्पादन 4807 मे.वॅ.वर आले. 2008 साली ते उत्पादन 4830 मे.वॅ.वर आले. जुलैमधील तुलना डोळ्यासमोर आणावयाची ठरविले तर जुलै 2006 मध्ये 4159 मे.वॅ.होते. जुलै 2007 मध्ये 4221 मे.वॅ.झाले. जुलै 2008 मध्ये आपल्याला सर्वात त्रास झाला असे म्हणतो त्यावेळचे 25 तारखेचे जनरेशन 4551 मे.वॅ.करू शकलो. म्हणजे उत्पादनाच्या क्षेत्रात फार मोठी

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ SBT/ भोगले... 18:35

श्री.विनय कोरे.....

अडचण आपल्या सर्व कार्यपद्धतीमुळे झाली अशा प्रकारचे चित्र आपल्या समोर येत नाही. लोडशेंडिंगसंबंधी अनेक प्रश्न येथे उपस्थित झाले. लातूरला लोडशेडिंग कमी, सोलापूरला लोडशेडिंग वेगळे, महाराष्ट्रात इतर ठिकाणी असलेले लोडशेडिंग वेगळे. श्री.फुंडकर साहेबांनी एक विषय मांडला की, जेथे लॉसेस जास्त आहे, तेथे लोडशेडिंग जास्त. यासंबंधी मला सांगितले पाहिजे की अशा प्रकारचा फरक कुठेही करण्यात आलेला नाही. जेथे लॉसेस जास्त आहे, तेथे पूर्वीचे आपले जे लोडशेडिंग आहे, त्यापेक्षा जास्त लोडशेडिंग करण्याचा निर्णय महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिलेला आहे. त्या व्यतिरिक्त आपल्याला लोडशेडिंग करावे लागले. लोडशेडिंग करत असताना त्यात कुठल्याही प्रकारची तफावत महाराष्ट्रातील जिल्ह्यामध्ये करण्यात आलेली नाही. तरी सुद्धा चर्चा करण्या इतपत शंका लोकांच्या मनात निर्माण होणार असतील, विजेच्यासंबंधी गांभीर्य निर्माण करणारे प्रश्न निर्माण होणार असतील तर त्यादृष्टीने प्रयत्न केले जातील. परवाच शासनाच्यावतीने जी.आर.काढलेला आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली आणि प्रत्येक तालुक्यात तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली एक समन्वय समिती निर्माण करण्याचे ठरविले आहे.

यानंतर श्री.पी खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे .......

आणि या समितीच्या माध्यमातून त्या त्या जिल्ह्यातील ग्राहकांच्या मनातील सर्व प्रश्न संपविणे, या क्षेत्रात चाललेल्या सर्व घटनांची माहिती देणे अशा प्रकारे एक नवी शांतता निर्माण करण्यासाठी हा जी.आर. शासनाने काढलेला आहे. लॉसेसच्या अनुषंगाने काही गोष्टींची चर्चा केली की वीज वितरणात बचत आपण करु शकलो काय ? यासंदर्भात मला असे सांगितले पाहिजे की, सन 2006-07 मध्ये 29 टक्के लॉसेस आपण 22 टक्क्यापर्यंत कमी केले आणि यामध्ये जनरेशन कंपनी, डिस्ट्रीब्युशन कंपनीचे जे उत्पन्न होते ते 17500 कोटीवरुन 19600 कोटीवर आपण नेऊ शकलो. खरे तर विजेची चोरी थांबावी यासाठी अनेक उपाययोजना करण्याचे प्रयत्न आतापर्यंत आपण केले आहेत. त्यात पोलीस केसीस दाखल करणे अशा उपायांचा समावेश आहे. त्या अनुषंगाने आपण सन 2006-07 मध्ये आपण 59000 केसीस दाखल केल्या आणि 39 कोटीची वसुली केली. यावर्षीची विजेच्या चोरीची टक्केवारी पाहिली तर 89880 प्रकरणी पकडली असून 9411 केसीस दाखल केल्या आणि त्यातून 55 कोटी एवढी वसुली करण्यात आली. तसेच टक्केवारीचा विचार केला तर ही सन 2006-07 मध्ये 94 टक्के होती आता ती 97.90 टक्के एवढी आहे. या क्षेत्रात जास्तीत जास्त चांगले काम कसे करता येईल यासाठी प्रयत्न केला व त्यातून 90 लाख विजेच्या ग्राहकांना फोटोसह जोडणी देणे अशा प्रकारचा अभिनव उपक्रम यशस्वीपणे हाताळण्याचाही प्रयत्न आपण केला आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी फ्रंचाईसी मॉडेलचा उल्लेख केला. त्यांनी अशीही शंका व्यक्त केली की, विजेची चोरी जास्त प्रमाणात होते कारण आपलेच अधिकारी सामील होऊन मदत करतात, त्यामुळे काहीही केले तरी आपल्याला प्रगती दिसून येत नाही. अशा ठिकाणी खाजगी लोकांना तेथील डिस्ट्रीब्युशनचे हक्क द्यावयाचे, त्यांनी तेथे विविध ग्राहकांना वीज द्यावी, त्यांनी त्या भागातील विजेची चोरी थांबवावी व जास्तीत जास्त महसूल गोळा करावा व जो लॉसमधून फायदा होईल त्यातील काही हिस्सा वीज वितरण कंपनीला द्यावा, अशा प्रकारचे मॉडेल ऑपरेट करण्याचा प्रयत्न एमईआरसीच्या माध्यमातून केला. त्यासाठी सर्वात जास्त विजेची चोरी असणाऱ्या भिवंडीची निवड करण्यात आली व तेथून या योजनेला सुरुवात केली. प्रामुख्याने तेथील अनुभव समोर आला तो असा की, तेथील विजेची चोरी 17 टक्क्यावर आली व जादाचा महसूल मिळवून देण्यात यश आले. त्याचप्रमाणे जवळपास सर्वच



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे .....

सन्माननीय सदस्यांनी विजेच्या भार नियमनाचा राज्यातील उद्योगांवर होणारा परिणाम याबद्दलच्या भावना व्यक्त केल्या. आपल्या सर्वांच्या मताशी मी देखील सहमत आहे. या निमित्ताने मी एवढेच सांगू इच्छितो की, राज्याची विजेची परिस्थिती चालू असताना राज्यातील एकाही उद्योगाला आपण हात लावायचा नाही. थोडासा त्रास ग्रामीण भागातील जनता असेल, शहरी भागातील जनता असेल त्यांना सोसावा लागला तर त्यांनी तो सोसावयाचा आहे परंतु या देशात सर्वात जास्त गुंतवणूकीचे राज्य असलेल्या आपल्या राज्याच्या गुंतवणुकीवर कुठलाही परिणाम होऊ द्यावयाचा नाही आणि राज्यात येणाऱ्या उद्योगाला विजेच्या माध्यमातून असुरक्षितता वाटेल असे चित्र निर्माण करावयाचे नाही यासाठी आपण सर्व जाणीवपूर्वक प्रयत्न करीत होतो. परंतु परवाच हा जो प्रकार झाला यात उद्योगांना थोडे एक दिवसाचा स्ट्रॅगरिंग डे दिला होता आणि त्यात वाढ करावी व तो काळ 16 तासावरुन 24 तास, त्यानंतर 34 तास आणि त्यानंतर 48 तासापर्यंत जावा अशी ती चर्चा होती. या सर्व उद्योगांनी याला मान्यता दिली होती पण 40 तासापेक्षा खाली आणावयाचे ठरविले आणि येणाऱ्या चार आठ दिवसात पूर्वी जसे 16 तासाचे ठरले होते तेवढाच एक दिवसाचा स्ट्रॅगरिंग डे देत होतो तशी व्यवस्था करण्यासाठी अडचण होईल, असे मला वाटत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे...

या ठिकाणी 3228 कोटी रुपयांच्या वसुलीचे काम सुरु आहे या संदर्भातील उल्लेख काही सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी केलेला आहे. एखादा ग्राहक सरासरी जितकी वीज वापरतो किमान त्या विजेइतके डिपॉझिट असावे अशा प्रकारचा विषय ए.जी.च्या ऑडीटमध्ये आला होता. म्हणून ही आकारणी करण्यात यावी अशा प्रकारची शिफारस करण्यात आली होती. यासंदर्भात जी वाढ लावण्यात आली होती त्यासंदर्भात अनेक लोकांनी तक्रारी केल्या होत्या. त्यांचे म्हणणे असे होते की, जी वाढ लावण्यात आलेली आहे ती बरोबर नाही. खरे तर ऑडीटचा कम्पलायन्स करण्यासाठी हे काम सुरु करण्यात आले होते परंतु लोकांच्या तक्रारी आल्यामुळे जमा केलेले 500 कोटी रुपये परत करण्याचे ठरवले आणि जी वाढ करावयाची होती ती एकदम न करता 9 हप्त्यात ग्राहकांकडून वसूल करण्याचा निर्णय घेतला गेला. अनेक सन्माननीय सदस्यांनी लोडशेडींगमुळे पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात जे प्रश्न निर्माण झाले आहे त्यासंदर्भात काय करणार आहात? लोडशेडींगचा प्रश्न असाच चालू राहिला तर आपण पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कसा हाताळणार आहात अशी भावना या ठिकाणी मांडली. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण महानगरपालिका, नगरपालिका यांना आपण पूर्वीच सूचना केल्या होत्या की, पाणी पुरवठयाचे कनेक्शन आपण सेप्रेट फिडरवरुन घेऊ शकलो तर तो फिडर आपल्याला पूर्णपणे लोडशेडींग मुक्त करता येऊ शकेल. लोडशेडीगमुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उद्‌भऊ नये यासाठी आपण अशा प्रकारची योजना अनेक ठिकाणी केलेली आहे परंतु ज्या ठिकाणी अशा प्रकारची व्यवस्था झालेली नाही, ज्या महत्वाच्या शहरात अशा प्रकारची व्यवस्था झालेली नाही त्या ठिकाणी कृषीपंपाच्या फिडर सेप्रेशनचा कार्यक्रम जसा हाती घेतलेला आहे तशाच पध्दतीचा कार्यक्रम आपल्याला जाणीवपूर्वक हाती घ्यावा लागेल व तशा प्रकारची व्यवस्था शासन त्या त्या ठिकाणी जरुर करेल. खरे तर फिडर सेप्रेशनच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने काय केले, गुजरात पॅटर्न प्रमाणे आपण महाराष्ट्रात काही करु शकलो काय अशा प्रकारच्या भावना या ठिकाणी व्यक्त झाल्या. मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, सिंगल फेजींग आणि फिडर सेप्रेशन या दोन योजनेच्या माध्यमातून शेतीला ठराविक तास खात्रीपूर्वक विजेचा पुरवठा द्यावा व ठराविक तास वीज पुरवठा केल्यानंतर तो बंद करुन घरगुती विजेचा जो पुरवठा आहे तो जास्तीत जास्त काळ सुरु रहावा

....२

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे...

यासाठी आपण ही योजना अंमलात आणली होती. पहिल्या फेजमध्ये ७५१७ गावांचे काम या योजनेखाली हाती घेण्यात आले होते. जवळ जवळ २९०४ गावांचे काम पूर्ण झालेले असून ९४३ कोटी रुपये या कामावर खर्च करण्यात आलेले आहेत. फेज सेकंडमध्ये राहिलेली ८७१४ गावांची कामे होती घेतलेली असून त्यासाठी १४४६ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी दिलेली आहे. डिसेंबर २००८ पर्यंत ही सगळी कामे पूर्ण केली जाणार आहेत. या ठिकाणी तिसरा महत्वाचा विषय चर्चेला आला की, विजेच्या पुरवठयाच्य संदर्भात महाराष्ट्र शासनाने काय केले ? पेपरमध्ये आलेल्या बातम्यांचा उल्लेख या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी केला आहे. विजेच्या संदर्भात .४० टक्क्यापेक्षा अधिक प्रमाणात मागील काळात विजेची निर्मिती आपण वाढवू शकलो नाही असे त्यांचे म्हणणे आहे. या ९ वर्षात विजेच्या जनरेशनच्या संदर्भात काय झाले याचा आढावा घ्यावयाचा ठरवला तर मला सांगावे लागेल की, सन १९९९-२००० साली कोयना टप्पा क्रमांक ४ मध्ये ७५० मे.वॅट विजेच्या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले, सन २०००-२००१ मध्ये खापरखेडा येथे ४२० मे.वॅट विजेच्या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले, सन २०००-२००१ मध्ये कोयना संच क्रमांक ४ येथे २५० मे. वॅट विजेच्या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले. सन २००७-२००८ मध्ये परळी टप्पा ६ येथे २५० मे.वॅट विजेच्या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले. पारस येथे २५० मे.वॅट प्रकल्प पूर्ण झाला. या दोन्ही प्रकल्पातून विजेची निर्मिती होत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पारस येथे वीज मिर्निंतीचे काम बदं आहे. सन्माननीय मंत्री महोदय चुकीची माहिती देत आहेत.

श्री. विनय कोरे : पारसचा प्रकल्प सुरु झाल्यानंतर त्या ठिकाणी ग्रेडरमध्ये एक समस्या निर्माण झाल्यामुळे हा प्रकल्प बंद झाला होता ही वस्तुस्थिती मी मान्य करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. गायकवाड....

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 18.50

श्री.पांडुरंग फुंडकर : सध्या तेथे वीज निर्माण होत नाही.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, पारसचा प्रकल्प सुरु झाल्यानंतर ग्रेडरमध्ये अडचण निर्माण झाल्यामुळे तो प्रकल्प बंद होता. भेलच्या अधिका-यांनी तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेतले होते व ते काम पूर्ण केले असून आता तो प्रकल्प सुरु झाला आहे..

श्री.पांडुरंग फुंडकर : पारसच्या प्रकल्पातून आता किती वीज निर्मिती होत आहे.?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, नवीन वीज प्रकल्पातून 250 मेगॅवॅटस् वीज निर्मिती केन्द्रातून पूर्ण क्षमतेने वीज निर्मिती होत आहे असे मी जबाबदारीने या ठिकाणी विधान करीत आहे. पिकींग लोडसाठी आवश्यक असलेला 250 मेगॅवॅटस्चा घाटघर प्रकल्प सुरु केला असून दहा वर्षात एन्रॉनची 2100 मेगॅवॅटस् वीज सोडून महाराष्ट्रात 2174 मेगॅवॅटस्ची अतिरिक्त क्षमता या निमित्ताने आपण निर्माण करु शकलो.. यानंतर उद्याची विजेची गरज किती राहणार आहे, खाजगी क्षेत्रात उभ्या करावयाच्या प्रकल्पाच्या एम.ओ.यु.चे काय झाले आहे आणि हे प्रकल्प खरोखर उभे राहणार आहेत किंवा नाही याबद्दल शंका वाटावी अशी स्थिती आपली सर्वाची झाली आहे . मला सांगावयाचे आहे की, जिंदालचा 1200 मेगॅवॅटस्चा प्रकल्प असून या प्रकल्पाचे जवळजवळ 50 टक्के काम झालेले आहे. ऑक्टोबर 2009 पर्यत 2 टप्यात 1200 मेगॅवटस्चे वीज निर्मितीचे काम पूर्ण् होईल . टाटाचा 1600 मेगॅवॅटस् आणि रिलायसन्सचा 2400 मेगॅवॅटस् असे दोन प्रकल्प असून ते प्रकल्प 2010 मध्ये येणार असल्यामुळे मी त्याचा या ठिकाणी उल्लेख करु इच्छित नाही. टाटाचा 250 मेगॅवॅटस्चा ट्रॉम्बेचा प्रकल्प ऑक्टोबर 2008मध्ये सुरु होणार आहे त्यानतर के.एस.के.चा 540 मेगॅवॅटस्च्या प्रकल्पासाठी जमीन मिळालेली आहे त्याचबरोबर पर्यावरणासंबंधीचे क्लिअरन्स देखील मिळालेले आहे .त्या प्रकल्पाच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली असून मशिनरीसाठी ऑर्डर देण्यात आलेली आहे हा प्रकल्प ऑक्टोबर 2009 साली सुरु होईल त्याचबरोबर एम्कोच्या 540 मेगॅवॅटस् प्रकल्पाच्या कामात ब-याच अंशी प्रगती झालेली आहे तो प्रकल्प सुध्दा लवकर सुरु होईल. "अदानी" कंपनीच्या तिरोडा येथील 1009 मेगॅवॅटस् विजेच्या प्रकल्पासाठी लागणा-या मशिनरीची ऑर्डर देण्यापर्यत आपण प्रगती केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी पारस विद्युत निर्मिती प्रकल्पासंबधी मघाशी मुद्दा मांडला होता त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, 250 मेगॅवॅटस

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे ..

इतक्या क्षमतेने हा प्रकल्प सुरु नाही ही त्यांची माहिती खरी आहे. त्या ठिकाणी 90 मेगॅवेटस वीज निर्मिती केली जाते अशी माहिती मला आताच मिळालेली आहे. या खात्याच्या संदर्भात मी आजच संबंधित अधिका-यांडून ब्रिफींग घेतलेले आहे त्यामुळे माझ्याकडून चूक होऊ शकते. ही चूक मी प्रांजळपणे मान्य करतो मी या खात्याचे पूर्णपणे काम पहात नाही त्यामुळे माझ्याकडून ही चूक झालेली आहे. सेन्ट्रल सेक्टरच्या माध्यमातून अनेक नवीन प्रकल्प महाराष्ट्रामध्ये येऊ घातलेले आहेत. सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री दिलीप वळसे पाटील यांची या पूर्वीची दोन तीन भाषणे आपण ऐकलेली आहेत वा वाचलेली आहेत. त्यामुळे त्या सगळयाच भाषणतील सर्व मुद्यांचा मी पुन्हा उल्लेख करीत नाही. ज्या प्रकल्पांची कामे 30 टक्के वा 50 टक्के सुरु झालेली आहेत त्या प्रकल्पांचा मी उल्लेख केलेला आहे.

सभापती महोदय, अपारंपारिक ऊर्जा विभागाच्या संदर्भात या ठिकाणी काही चांगल्या सूचना करण्यात आल्या आहेत. मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्रात विंड सेक्टरच्या माध्यमातून 1685 मेगॅववॅटस विजेची स्थापित क्षमता निर्माण झाली आहे. हया क्षेत्रात विविध सवलती देत असतांना 20 टक्क्या पेक्षा जास्त प्लॅन्ट लोड फॅक्टर असला पाहिजे अशी अट घालण्यात आली आहे. म्हणजे 1 मेगॅवॅटचे जर मशिन उभे करण्यात आले तर किमान 200 ते 220 मेगॅवॅटस प्रती तास प्रती वर्ष इतके युनिटस मिळाले पाहिजे अशी त्यामागची संकल्पना आहे. या प्रकल्पाची सर्वात जास्त क्षमता पावसाळयामध्ये असते . मोसमी वारे पावसाळयात जोराने वाहतात त्यामुळे त्या वेगाच्या माध्यमातून चार महिन्याच्या काळात हे प्रकल्प 50 टक्क्या पेक्षा जास्त क्षमतेने चालतात. अतिशय अडचणीच्या काळात विजेच्या भार नियमनाच्या प्रश्नाला सामोरे जात असतांना गेल्या आठ दिवसात पवन उर्जेच्या माध्यमातून सरासरी 400 ते 700 मेगॅवॅटस वीज महाराट्रात उपलब्ध झालेली आहे.

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे...

आणि म्हणून या प्रकल्पांना जास्तीत जास्त पाठबळ देणे अशा प्रकारचे काम वेगवेगळया धोरणाच्या माध्यमातून करण्याचा आपण प्रयत्न करतो. एकटया बजाजला 700 कोटींची सबसिडी मिळाली कां? अशा प्रकारची भावना माननीय सदस्य श्री. रावते यांनी विचारली. खरे तर या प्रकल्पांची सुरुवात झाली पाहिजे. याकरिता 1998-99 मध्ये पहिल्यांदा ही योजना आणली गेली. त्यावेळी सर्वात आकर्षक अशी योजना आणण्याचा आपण प्रयत्न केला. त्यामध्ये जितका खर्च होता तो सर्व खर्च, जर ती कंपनी महाराष्ट्रात विक्री कर भरत असेल तर विक्री कराच्या माध्यमातून त्याला ती रक्कम परत घेता येईल. डेप्रिसिएशनच्या माध्यमातून इन्कम टॅक्समध्ये फायदा घेता येईल. 20 लाख रुपये प्रति युनिट याप्रमाणे कॅपिटल सबसिडी महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून देण्यात येईल अशा प्रकारची आकर्षक योजना त्या काळात आणली गेली. त्या योजनेमधून जवळ जवळ 250 मेगावॅट इतके प्रकल्प उभे राहिले. त्यानंतर ती योजना बंद झाली. आज राज्य सरकार कॅपिटल सबसिडी देत नाही. राज्य सरकार या प्रकल्पासाठी विक्रीकराची सवलत देत नाही.आज केंद्र सरकारची डेप्रिसिएशनची सवलत त्यांना मिळते. महाराष्ट्र सरकारच्या वतीने इवॅक्युएशन ॲरेजमेंट म्हणजे तयार झालेली वीज ग्रीडमध्ये आणण्यासाठी सब स्टेशन लाईन्स कराव्या लागतात. हे दोन्ही करण्यासाठी 50 टक्के अनुदान हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर एमएसईबीची इवॅक्युएशन ॲरेजमेंटची मालकी स्थापित झाल्यानंतर देतो. आणि राहिलेले 50 टक्के एमएसईबी समान हप्त्यामध्ये देते. आतापर्यंत राज्य सरकारच्या वतीने एकही पैसा आपण त्यांना दिलेला नाही. आपल्याकडे पैसे उपलब्ध नसल्यामुळे ते देऊ शकलो नाही.

सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी बगॅस बेसवर को - जनरेशनच्या माध्यमातून वीज निर्मितीचे काम करावे असे सांगितले. वीज टंचाईच्या काळात महाराष्ट्रात निर्माण होणारे इंधन आपण दरवर्षी निर्माण करु शकतो, त्या इंधनाचा फायदा घ्यावा अशा प्रकारची भावना त्यांनी व्यक्त केली. मला त्यांना सांगितले पाहिजे की, अनेक वर्षे अनेक योजना या ठिकाणी आणण्याचा प्रयत्न केला. परंतु महाराष्ट्रातील कोणताही कारखाना फार मोठया प्रमाणात या योजनेमध्ये सहभागी झाला नाही ही वस्तुस्थिती आहे. पांडुरंगचा कारखाना आणि ठोंबरेचा कारखाना असे दोनच कारखाने आज वीज निर्मिती क्षेत्रामध्ये को - जनरेशनचे काम करीत आहेत ही माहिती तितकीशी बरोबर आहे असे मला वाटत नाही. जवाहर सहकारी साखर कारखाना, वाटेगाव येथील राजाराम बापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे युनिट, माळेगावचा कारखाना असे अनेक कारखाने या

DGS/ SBT/ MMP/

श्री. विनय कोरे...

वीज निर्मितीच्या क्षेत्रात काम करीत आहेत. तसेच, अनेक नवीन उपक्रम आपण यामध्ये आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. हे कारखाने या क्षेत्रामध्ये कां आले नाहीत? याचा एक कारखानदार म्हणून मी अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी असे लक्षात आले की, अडीच हजार क्षमतेचा नवीन कारखाना उभा करावयाचा म्हटले तर 40 कोटी रुपये लागतात. आणि त्या कारखान्यावर 12 मेगावॅटचा को-जनरेशनचा प्रकल्प उभा करावयाचा म्हटले तर 65 ते 70 कोटी रुपये लागतात. आणि म्हणून अगोदरच कर्जबाजारी झालेला कारखाना,मोठया कर्जामधून मुक्त झालेला कारखाना एवढे मोठे नवीन कर्ज घ्यायला तयार होत नव्हता. वित्तीय संस्था त्यांच्या कामामुळे कदाचित ते फायनान्शिअल क्लोजर करीत नव्हत्या. आणि म्हणून महाराष्ट्रात ही क्षमता असतांना सुध्दा आपण ती वापरु शकलो नाही ही वस्तुस्थिती खरी आहे. आणि म्हणून अपारंपारिक ऊर्जा विभागाच्या माध्यमातून संपूर्ण देशामध्ये आपण पहिल्यांदा अभिनव प्रयोग केला. ज्याला रिस्क कॅपिटल म्हणतो, ईक्विटी फंड म्हणतो. महाराष्ट्र सरकारच्या ग्रीन एनर्जी सेसमधून गोळा झालेले 218 कोटी आणि सरकारी क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या जीआयसी, एलआयसी, स्टेट बँकेसारख्या संस्थाकडून आलेले 200 कोटी असे 418 कोटी रुपयांचा व्हेंचर कॅपिटल फंड "ऊर्जांकुर" या नावाने महाराष्ट्रात निर्माण केला. आणि महाराष्ट्रातील ज्या कारखान्यांना को-जनरेशन करावयाचे आहे, त्या कारखान्यांनी एक रुपयादेखील न घालता त्यांच्या साईटवर अशाप्रकारचा प्रकल्प राबविला जाईल. बाराव्या किंवा तेराव्या वर्षी तो प्रकल्प त्या कारखान्याला हस्तांतरीत केला जाईल. मधल्या काळात 50 रुपयांपासून 100 रुपयापर्यंत प्रति टनाला रॉयल्टी दिली जाईल अशाप्रकारची एक अभिनव योजना संपूर्ण देशात पहिल्यांदा महाराष्ट्रात आणण्याचा प्रयत्न केला.

(यानंतर श्री. सुंबरे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे ....

पहिल्या टप्प्यामध्ये शिरोळ येथील दत्त सहकारी साखर कारखाना, भीमा-टाकळी हा सोलापूर जिल्ह्यातील कारखाना आणि किसन अहीर हा सातारा जिल्ह्यातील कारखाना आणि नंतरच्या टप्प्यामध्ये माझा वारणा सहकारी साखर कारखाना, या सगळ्या कारखान्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. पहिल्या तीन कारखान्यांची टेंडर्स फायनल झालेली आहेत. जवळ जवळ 3.80 कोटी मे.वॅ. येथपर्यंतची टेंडर्स आलेली आहेत. शिरोळच्या दत्त सहकारी साखर कारखान्याचे काम प्रत्यक्षपणे सुरू झालेले आहे. वारणा सहकारी साखर कारखान्याचे टेंडर माझ्या माहितीप्रमाणे 8-10 दिवसात फायनल होईल आणि तेही काम 15-20 तारखेच्या दरम्यान सुरू करण्यात आपल्याला यश येईल. त्यानंतर सहकार विभागाच्या माध्यमातून एक वेगळी योजना आपण घेत आहोत. म्हणजे ज्या कारखान्यांना स्वत:हून हे प्रकल्प करावयाचे आहेत त्यांना 5 टक्के भाग-भांडवल ग्रीन एनर्जी फंडातून किंवा बजेटमधून द्यायचे आहे. अजून 5 टक्के भांडवल एसडीएफचे त्यांना शेअर भांडवल मंजूर होईपर्यंतच्या काळासाठी द्यायचे तसेच स्टेट बँकेने त्यांना खास कर्जाची सुविधा पुरवायची आणि हे प्रकल्प कार्यान्वित करावयाचे अशी एक योजना सहकार विभागाच्या माध्यमातून अशा कारखान्यांना जास्त मदत करण्याच्या दृष्टीने सुरू आहे. त्या योजनेंतर्गतदेखील माझ्या माहितीप्रमाणे 4-5 कारखान्यांची टेंडर्स फायनल होण्याच्या स्टेजला आलेली आहेत आणि तेही काम यशस्वीपणे पुढे नेण्याचा प्रयत्न आम्ही सगळेजण करीत आहोत. खरे तर तुळजाभवानी विंड फार्मच्या अनुषंगाने काही माहिती सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी विचारली आहे. त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, तुळजा भवानी विंड फार्मस् नावाच्या एक विकासकाने, आता या विंड सेक्टरमध्ये दोन प्रकार आहेत., यात एक डेव्हलपर म्हणजे विकासक आहेत आणि दुसरा इन्व्हेस्टर म्हणजे गुंतवणूकदार आहे. जो इन्व्हेस्ट करतो त्याच्यासाठी जागा घेणे, त्या ठिकाणी पवनचक्की उभी करणे, ती तीस वर्षांपर्यंत मेंटेन करणे हे सगळे काम डेव्हलपर म्हणजे विकासक करीत असतो. तर तुळजाभवानी विंड फार्मस् नावाचा जो विकासक होता त्याने या संबंधात एक चुकीची गोष्ट अशी केली की, यासाठी मायनिंग क्लिअरन्स लागतो आणि तो मायनिंग डिपार्टमेंटकडून आणावा लागतो. हा मायनिंग क्लिअरन्स त्या विकासकाने स्वत:च बोगस तयार केला आणि तो 'मेढा'च्या कार्यालयात आपल्या कागदपत्रांमध्ये जोडला. ज्या क्षणी ही गोष्ट लक्षात आली त्याच क्षणी आपण त्याला काळ्या यादीत टाकले तसेच त्याच्यावर पोलीस ठाण्यामध्ये

..... 5इ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे ...

फौजदारी गुन्हा देखील दाखल केलेला आहे. त्यानंतर ते संबंधित इन्व्हेस्टर्स म्हणजे गुंतवणूकदार आमच्याकडे आले आणि आमच्याकडे तक्रार केली की, या विकासकाने आम्हाला फसवले आहे. प्रत्यक्षात आम्ही यामध्ये गुंतवणूक केलेली आहे. तेव्हा आमच्या या गुंतवणुकीचे आपण काय करणार आहात ? आम्हाला यामध्ये न्याय कसा मिळणार? आमच्या पवनचक्क्या त्या ठिकाणी उभ्या राहिल्या आहेत. तेव्हा त्या गुंतवणूकदारांना देखील आपण सांगितले आहे की, राज्याला असणारी विजेची गरज लक्षात घेता, आज तुमच्या पवनचक्क्या उभ्या राहिल्या आहेत. तुम्हाला आम्ही कमिशनिंग देतो, परंतु तुमची कायदेशी बाबींची काही नवी प्रकरणे उभी राहिली तर त्याची सर्वस्वी जबाबदारी ही तुमच्यावर राहील आणि राज्य शासनाकडील ज्या काही देय सोयी-सवलती असतील त्या पूर्णपणे तुमच्या प्रकरणाचा निपटारा झाल्याशिवाय तुम्हाला देय राहणार नाहीत. अशा प्रकारचा मार्ग त्याही प्रकरणात काढण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. सभापती महोदय, साधारणपणे येथे उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्याचा, स्पर्श करण्याचा प्रयत्न मी केला आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांना सांगू इच्छितो की, देशाची आर्थिक राजधानी मुंबई आहे, आणि त्यामुळे मुंबईकडे थोडेसे तरी वेगळ्या दृष्टीने पाहिले पाहिजे. दुसरे असे की, मुंबईला वीज टाटा आणि रिलायन्स कंपनी देत आहे, तरीही आपल्या सगळ्यांच्या सूचना येण्याअगोदर प्रत्येक मॉलने, तुमच्या सगळ्यांच्याच भावना लक्षात घेता, मी आपल्याला सांगेन की, ज्यावेळेस ही परिस्थिती निर्माण झाली त्यावेळेस शासनाने तीन प्रकारचे निर्णय घेण्याचा प्रयत्न केला. एक म्हणजे जेवढे म्हणून आपले शासकीय उपक्रम आहेत त्यांनी 10 टक्के विजेची बचत सक्तीने करण्याचे आदेश दिले आहेत, किंबहुना त्यासाठी त्यांना तेवढा वीज पुरवठाच कमी करण्याचे आदेश दिलेले आहेत. दुसरे म्हणजे शहरातील सगळ्या मॉल्सना 20 टक्के किमान वीज बचत केली पाहिजे म्हणून सांगितले आहे आणि तिसरा निर्णय म्हणजे होर्डिंगसाठी 15 दिवस वीज पुरवठाच करू नका अशा अप्रत्यक्ष सूचना त्या ठिकाणी गेलेल्या आहेत. परंतु याचा डायरेक्ट असा मोठा परिणाम, जास्त मोठ्या संख्येने ग्रामीण भागात असलेल्या शेतकऱ्यांसाठी आणि लोकांसाठी आपण करायचा प्रयत्न करतो आहोत पण याचा त्यादृष्टीने फार मोठा इम्पॅक्ट येईल असे वाटत नाही. पण एक दिशा, एक सिग्नल देण्याचे काम या निमित्ताने आपण करायचे ठरविले आहे. तेव्हा दुष्काळामुळे निर्माण झालेल्या विंध्याचल सारख्या एका मोठ्या सेंट्रल सेक्टरमधून येणाऱ्या शॉर्ट सप्लायमुळे निर्माण झालेल्या,

....... 5इ 3 ...



KBS/SBT/MMP. श्री. सरफरे नंतर --- 19:00

श्री. विनय कोरे .....

एन्रॉनकडे एक ॲश्युअर्ड सोर्स म्हणून बघत असताना त्यामुळे निर्माण झालेल्या एका अडचणीच्या परिस्थितीतून तुम्हा सगळ्यांच्या बरोबरीने काही मार्ग काढणे शक्य झाले आहे असे मला वाटते. ...

श्री.दिवाकर रावते : पण त्या कंपनीचा मालक कोण आहे ?

श्री. विनय कोरे : यामध्ये त्याचा मालक कोण आहे हे आम्ही कशासाठी बघतोय ? आमच्याकडे कंपनीच्या नावाने अर्ज येतात. पण तरीही मी आपल्याला या मागील एक आमची भावना सांगतो. एखादा मंत्री त्याचा मालक असेल ....

( यानंतर सौ. रणदिवे ..... 5एफ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 19:05

श्री.विनय कोरे . . . .

सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी माझी भावना ऐकून घ्यावी. विंड बिल कोणाला परवडते ? जो ऑफीशिअली इन्कम दाखवू शकतो, जो ऑफीशिअल इन्कम टॅक्सचा फायदा घेऊ शकतो, त्यालाच ते परवडते. मग तो राजकारणातील असला तरी काळा पैसा त्यामध्ये लावू शकत नाही.

(सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते खाली बसून बोलतात.)

सन्माननीय सदस्यांची कदाचित तशी भावना असेल तर मी याबाबतीत खुलासा करीत आहे. जर माननीय मंत्री ऑफीशिअल ही गोष्ट करीत असतील तर आपण त्यांचे स्वागत केले पाहिजे. पण यापुढे जाऊन माझी एक भावना सदनाला सांगावयाची आहे की, सन्माननीय आदरणीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी गोडबोले समितीचा उल्लेख केला. त्यांनी अतिशय योग्य प्रकारची भावना मांडली आहे. खरेतर विजेच्या सेक्टरमध्ये काय झाले ? हे आपण सर्वांनी पाहिले आहे. पण एखादा देश, एखादे राज्य प्रगती करीत असते, एखाद्या दिशेने पुढे जात असते तेव्हा त्या राज्यातील सर्वच लोकांनी मग तो विरोधी पक्ष असेल, सत्ताधारी पक्ष असेल, जनता असेल किंवा वेगवेगळे कार्यकर्ते असतील, त्यांनी कोणत्या प्रश्नांचे राजकारण करावयाचे व कोणत्या प्रश्नाचे राजकारण करावयाचे नाही हे एकदा ठरविले पाहिजे आणि ऊर्जा हा माझ्या दृष्टीने . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, . . . .

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांना सांगू इच्छितो की, मी माझी भावना मांडत आहे.. . .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तुमची गोडबोले समितीने दिशाभूल केली हे आपण मान्य करावे, त्यात राजकारण आणू नका.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, मी हे मान्य केले आहे आणि त्याच्याही पुढे जाऊन असे म्हणू इच्छितो की, ऊर्जा हा विषय आपल्या सगळयांचा असला पाहिजे. राज्याच्या हिताचा . . . .

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : आम्ही कोणीच राजकीय हेतूने बोललो नाही.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, तुम्ही आज असे बोलला आहात असे मी म्हणत नाही. मी माझी भावना मांडत आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : आपल्या विनयशील . . .

. . . .5 एफ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय मंत्री श्री.विनय कोरे यांनी मला उद्देशून बोलावे.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, अन्न, वस्त्र, निवारा या तीन गरजांबरोबर ऊर्जा ही चौथी गरजेची वस्तू म्हणून याला विशेष महत्व विरोधी पक्ष असेल किंवा सत्ताधारी पक्ष असेल, या सगळयांनी मिळून दिले पाहिजे आणि महाराष्ट्राला या प्रश्नातून पुढे नेत असताना हे सभागृह समग्रपणे, एकत्रितपणे पुढे जात आहे असा विश्वास महाराष्ट्रातील जनतेला दिला पाहिजे एवढीच भावना व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-----

. . . .5 एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खरे म्हणजे याठिकाणी मी पुन्हा एकदा आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, येथे जर माननीय ऊर्जा मंत्री उपस्थित असते तर अधिक बरे झाले असते.आम्ही येथे विविध प्रश्न मांडले. ग्रामीण भागातील लोड शेडींगचा मुद्दा मांडला, तसेच इमर्जन्सी लोड शेडींगबाबत, पिण्याच्या पाण्याच्या पुरवठयाबाबत मुद्दा मांडला. पण माननीय मंत्री महोदयांनी जी उत्तरे दिली, ती खरे म्हणजे गोलमाल होती असे मी म्हणणार नाही. परंतु त्या मध्ये अर्धसत्य आहे. आता जे सांगितले आहे, त्यावरुन असे वाटू लागले आहे की, आम्ही गेली तीन-चार वर्षे या विषयाच्या संबंधात उत्तरे ऐकत आहोत. पण हे "मुंगेरी लाल के हसीन सपने" अशा सारखे आहे. प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारची कृती होत नाही हे आम्ही गेली पाच वर्षे पहात आहोत. माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराने आमचे समाधान झालेले नाही आणि सध्या जी परिस्थिती आहे त्यामध्येही फार काही फरक पडेल असे आम्हाला वाटत नाही एवढेच मला सांगावयाचे आहे.

-----

. . . .5 एफ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आम्ही बरेच कॉंक्रीट स्वरुपाचे मुद्दे उपस्थित केले होते, पण त्याची उत्तरे मिळालेली नाहीत. पण एका महत्वाच्या बाबीसंबंधात विचारावयाचे आहे की, महावितरणने वीज ग्राहकांकडून 3228 कोटी रुपये जास्त घेतलेले आहेत. हे पैसे परत करण्याचे आदेश कोर्टाने दिलेले आहेत. त्याबाबतीत मी मुद्दा उपस्थित केला होता. म्हणजेच लोकांकडून परत वसूल करण्याचा प्रश्नच नाही तर ग्राहकांनाच हे पैसे परत दिले पाहिजेत. त्याबाबतीत खुलासा करावा.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, त्यातील 500 कोटी रुपये परत देण्याचा कोर्टाने जो निर्णय दिला होता, त्याप्रमाणे ते परत देण्याची कार्यवाही केलेली आहे असे मी सांगितले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराने समाधान होण्याचा प्रश्न निर्माण होतच नाही.पण मला धक्का बसला की, आपण अधिकाऱ्यांना आलेले सर्व अपयश अतिशय संयमी शब्दामध्ये,विनयतेने एवढे व्यवस्थितपणे मांडलेले आहे.महावितरणच्या माध्यमातून हे ऊर्जा खाते कसे रसातळाला गेलेले आहे. वीज निर्मिती किती कमी झालेली आहे ? लोकांना किती त्रास होत आहे ? भरनियमन कसे चालले आहे ? आपल्या अधिकाऱ्यांनी खात्याचे कसे खच्चीकरण केलेले आहे ? हे सगळे आपण व्यवस्थितपणे, शांतपणे मांडले. पण एका गोष्टीचे वाईट वाटते, तसेच आपण जे सांगितले ते निश्चितपणे निषेधार्ह आहे आणि त्यासाठी आपला निषेध करावयाचा की सरकारचा निषेध करावयाचा की खात्याचा निषेध करावयाचा की कंपन्यांचा निषेध करावयाचा ? हा प्रश्न आहे. आपण असे सांगितले की, बी-बियाणे आणि खत वाटप करण्यासाठी पोलीस आणि तहसीलदार यांची मदत घ्यावी लागली. तुम्ही उत्तराच्या भाषणामध्ये अशा प्रकारचा नवीन कन्सेप्ट सांगितला आहे. आता आम्ही गावा-गावामध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली तहसीलमध्ये कमिटया नेमलेल्या आहेत. या कमिटयांच्या माध्यमातून शांतता प्रस्थापित करण्याच्या बाबतीत आणि वीज निर्मितीच्या बाबतीत प्रयत्न करीत आहोत. हे फारच भयानक आहे. कारण आपले खाते हे संपूर्णपणे खालावलेले आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्याचा आदर करणे आम्हाला काही शक्य नाही. त्यामुळे आरडाओरडा न करता या शासनाने विजेच्या बाबतीत राज्याला जे रसातळाला नेलेले आहे त्याचा थोडा निषेध करतो आणि आम्ही सभात्याग करतो.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करुन लगेच सभागृहात परत येतात )

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, मै माननीय मंत्री जी को धन्यवाद देना चाहता हूं कि उन्होंने चर्चा का बहुत अच्छा जबाब दिया, विरोधी पार्टी को मजबूर किया, विरोधी पार्टी के पास कोई जबाब नही था, इसलिये वे वॉक आऊट कर रहे है. उनका पॉलिटिकल मोटिव पूरा हो गया. इसलिये वे सभागृह में दुबारा आ गये, उनका वेलकम है.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य या प्रस्तावावर प्रश्न कसे काय विचारत आहेत ? आता राष्ट्रगीत व्हावयास पाहिजे.

श्री. सय्यद जामा : मुझे माननीय सभापति महोदय ने समय दिया है...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जामा यांना मी प्रश्न विचारण्याची परवानगी दिलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. जामा यांनी या प्रस्तावावर भाषण सुध्दा केलेले नाही. हा विरोधी पक्षाचा प्रस्ताव आहे. आता राष्ट्रगीत व्हावयास पाहिजे. ही कोणती पध्दत काढलेली आहे ?

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य पुन्हा सभात्याग करतात )

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर झाल्यानंतर जर एखाद्या सन्माननीय सदस्याला एखाद्या बाबीबद्दल स्पष्टीकरण पाहिजे असेल तर विरोधकांचा जसा तो अधिकार आहे तसा सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचा सुध्दा अधिकार आहे. सन्माननीय सदस्य श्री. जामा यांनी प्रश्न विचारावा.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या ठिकाणी प्रस्ताव मांडल्यानंतर हा प्रस्ताव संपूर्ण सभागृहाची प्रॉपर्टी आहे. त्यामुळे सत्तारुढ बाजूच्या सदस्यांना सुध्दा प्रश्न विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने भविष्य में जनरेशन बढाने के प्रोग्राम के बारे में बताया है. केंद्र सरकार ने 4-4 हजार मेगावॅट के 7 मेगा प्रोजेक्ट एन.टी.पी.सी. के द्वारा स्थापित करने का निर्णय किया है. मेरा पहला प्रश्न यह है कि इन 7 प्रोजेक्ट में से महाराष्ट्र में प्रोजक्ट हैं या नही ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि मौदा में स्थापित होने वाले एन.टी.पी.सी. के 1 हजार मेगावॅट के पावर प्रोजेक्ट की आज क्या स्थिति है ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, मौदा प्रकल्पाचे काम भूसंपादनाच्या बाबतीत अंतिम टप्प्यात आलेले आहे. नवीन मेगा प्रोजेक्टमध्ये सुध्दा महाराष्ट्राचा समावेश आहे.

**सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

----

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहात येतात )

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी. / मु. शी.** : सत्रकाळातील कामकाजाचा आढावा

**सभापती** : पावसाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकींची संख्या - 9

एकूण काम - 61 तास

मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 20 मिनिटे

अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - 40 मिनिटे

प्रत्यक्षात झालेले कामकाज - 60 तास

रोजची सरासरी कामकाज - 6 तास 40 मिनिटे

<u>तारांकित प्रश्न</u>

एकूण आलेले तारांकित प्रश्न - 3829

कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न - 2993

स्वीकृत प्रश्न - 889

सभागृहात तोंडी उत्तरित झालेले तारांकित प्रश्न - 55

<u>नियम 93 अन्वये सूचना</u>

एकूण प्राप्त झालेल्या सूचना - 120

स्वीकृत सूचनांची संख्या - 61

चर्चा झाली - 43

<u>लक्षवेधी सूचना</u>

प्राप्त झाल्या - 848

मान्य झाल्या - 230

चर्चा झाली - 29

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**सभापती** .....

विशेष उल्लेखाच्या 31 सूचना मांडण्यात आल्या.

<u>नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा</u>

प्राप्त झाल्या - 03

मान्य झाली - 02

चर्चा झाली - 02

शासकीय विधेयक संमत - 3 ( 2 परिषद, 1 सभा )

नियम 260 अन्वये 3 प्रस्तावांवर चर्चा झाली.

अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चा - 1

<u>अर्धा-तास चर्चा</u>

प्राप्त झाल्या - 63

मान्य झाल्या - 55

चर्चा झाली - 13

----

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा.

**सभापती** : मी खालील घोषणा करतो :-

राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, महाराष्ट्र विधान परिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक 17 नोव्हेंबर, 2008 रोंजी विधान भवन, नागपूर येथे घेण्यात यावे.

यानंतर श्री. खंदारे ....

.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सत्र-समाप्तीसंबंधी घोषणा

**सभापती** : सभागृहाचे कामकाज आता संपले आहे. राज्यपालांकडून पुढीलप्रमाणे संदेश आला आहे :-

" मी, एस.सी.जमीर , महाराष्ट्राचा राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2), उपखंड (क) व्दारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, याव्दारे शनिवार, दिनांक 26 जुलै, 2008 रोजी होणाऱ्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

( यानंतर राष्ट्रगीत झाले )

( 7 वाजून 16 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले. )

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही